
# तत्वज्ञान

## इयत्ता बारावी



# भारताचे संविधान

## भाग ४ क

## नागरिकांची मूलभूत कर्तव्ये

**अनुच्छेद ५१ क**

**मूलभूत कर्तव्ये – प्रत्येक भारतीय नागरिकाचे हे कर्तव्य असेल की त्याने –**

(क) प्रत्येक नागरिकाने संविधानाचे पालन करावे. संविधानातील आदर्शांचा, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीताचा आदर करावा.

(ख) स्वातंत्र्याच्या चळवळीला प्रेरणा देणाऱ्या आदर्शांचे पालन करावे.

(ग) देशाचे सार्वभौमत्व, एकता व अखंडत्व सुरक्षित ठेवण्यासाठी प्रयत्नशील असावे.

(घ) आपल्या देशाचे रक्षण करावे, देशाची सेवा करावी.

(ङ) सर्व प्रकारचे भेद विसरून एकोपा वाढवावा व बंधुत्वाची भावना जोपासावी. स्त्रियांच्या प्रतिष्ठेला कमीपणा आणतील अशा प्रथांचा त्याग करावा.

(च) आपल्या संमिश्र संस्कृतीच्या वारशाचे जतन करावे.

(छ) नैसर्गिक पर्यावरणाचे जतन करावे. सजीव प्राण्यांबद्दल दयाबुद्धी बाळगावी.

(ज) वैज्ञानिक दृष्टी, मानवतावाद आणि जिज्ञासूवृत्ती अंगी बाळगावी.

(झ) सार्वजनिक मालमत्तेचे जतन करावे. हिंसेचा त्याग करावा.

(ञ) देशाची उत्तरोत्तर प्रगती होण्यासाठी व्यक्तिगत व सामूहिक कार्यात उच्चत्वाची पातळी गाठण्याचा प्रयत्न करावा.

(ट) ६ ते १४ वयोगटातील आपल्या पाल्यांना पालकांनी शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात.

शासन निर्णय क्रमांक : अभ्यास-2116/(प्र.क्र.43/16) एसडी-4 दिनांक 25.4.2016 अन्वये स्थापन करण्यात आलेल्या समन्वय समितीच्या दिनांक 30.01.2020 रोजीच्या बैठकीमध्ये हे पाठ्यपुस्तक सन 2020-21 या शैक्षणिक वर्षापासून निर्धारित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

# तत्वज्ञान

## इयत्ता बारावी

**महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.**

Q6Q8J8

आपल्या स्मार्टफोनवरील DIKSHA App द्वारे पाठ्यपुस्तकाच्या शीर्षक पृष्ठावरील Q.R.Code द्वारे डिजिटल पाठ्यपुस्तक, त्या पाठासंबंधित असलेले अध्ययन-अध्यापनासाठी उपयुक्त दृक्-श्राव्य साहित्य उपलब्ध होईल.

प्रथमावृत्ती : २०२०
पुनर्मुद्रण : ऑक्टोबर २०२१

© महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे ४११ ००४.

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे या पुस्तकाचे सर्व हक्क राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्धृत करता येणार नाही.

**तत्वज्ञान विषय समिती**

श्रीमती मृणालिनी वनारसे, अध्यक्ष
डॉ. दीप्ति गंगावणे, सदस्य
डॉ. हरिश्चंद्र नवले, सदस्य
डॉ. शर्मिला वीरकर, सदस्य
प्रा. वर्षा जपे, सदस्य
डॉ. सीमा देशपांडे, सदस्य
डॉ. राजेसाहेब मारडकर, सदस्य
डॉ. श्रीधर आकाशकर, सदस्य
सौ. वर्षा सरोदे, सदस्य-सचिव

**तत्वज्ञान अभ्यासगट समिती**

डॉ. नागोराव कुंभार
डॉ. शितल येरूळे
प्रा. माधवी कवि
प्रा. ईश्वरअप्पा मठवाले
डॉ. मीनल कातरणीकर
प्रा. अजय शिंगाडे
डॉ. शांताराम गोवर्धन बुटे
डॉ. संतोष ठाकरे
डॉ. सचिन बाबूराव खोकले
प्रा. विजय कारेकर
प्रा. विद्या मिलिंद गारखेडकर
प्रा. तनुजा येलाले

**लेखन गट**

श्रीमती मृणालिनी वनारसे
डॉ. वैजयंती बेलसरे
डॉ. दीप्ति गंगावणे
डॉ. शर्मिला वीरकर
डॉ. हरिश्चंद्र नवले
डॉ. राजेसाहेब मारडकर
डॉ. श्रीधर आकाशकर
डॉ. मीनल कातरणीकर
प्रा. विद्या गारखेडकर

**संयोजक**

**सौ. वर्षा सरोदे**
सहायक विशेषाधिकारी, इतिहास व नागरिकशास्त्र
पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे.

**मुखपृष्ठ**

श्रीमती मधूरा पेंडसे

**आतील चित्रे व सजावट**

श्री. देवदत्त बलकवडे

**अक्षरजुळणी**

**डी.टी.पी. विभाग,**
बालभारती, पुणे

**कागद**

७० जी.एस.एम.क्रिमवोव्ह

**मुद्रणादेश**

**मुद्रक**

**निर्मिती**

**श्री. सच्चितानंद आफळे,**
मुख्य निर्मिती अधिकारी
**श्री. प्रभाकर परब,**
निर्मिती अधिकारी
**श्री. शशांक कणिकदळे,**
सहायक निर्मिती अधिकारी

**प्रकाशक**

श्री. विवेक उत्तम गोसावी, नियंत्रक
पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ, प्रभादेवी,
मुंबई-२५.

# भारताचे संविधान

## उद्देशिका

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडविण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस:

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय;**
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे **स्वातंत्र्य;**
दर्जाची व संधीची **समानता;**

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;

**आमच्या संविधानसभेत**
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
**याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**

# राष्ट्रगीत

जनगणमन–अधिनायक जय हे
भारत–भाग्यविधाता ।
पंजाब, सिंधु, गुजरात, मराठा,
द्राविड, उत्कल, बंग,
विंध्य, हिमाचल, यमुना, गंगा,
उच्छल जलधितरंग,
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिस मागे,
गाहे तव जयगाथा,
जनगण मंगलदायक जय हे,
भारत–भाग्यविधाता ।
जय हे, जय हे, जय हे,
जय जय जय, जय हे ।।

# प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत.

माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी ह्यांतच माझे सौख्य सामावले आहे.

# प्रस्तावना

**विद्यार्थी मित्रांनो,**

तत्त्वज्ञान या विषयात माणसाला गेली कित्येक शतके जे अनेक प्रश्न पडत आले आहेत, त्यासंबंधी मूलभूत चिंतन केले जाते. एखाद्या अभ्यासविषयाच्या मुळाशी जाऊन त्याचा समग्रतेने आणि त्याच वेळी चिकित्सकपणे अभ्यास करणे हे तत्त्वज्ञानाचे वैशिष्ट्य आहे.

गेल्या वर्षी तुम्ही या विषयाचा आणि त्याच्या तीन प्रमुख शाखांचा परिचय करून घेतलाच आहे. त्यामुळे या विषयाबद्दलची तुमची जिज्ञासा वाढलेली असेल हे लक्षात घेऊन बारावीच्या पुस्तकाची रचना केली आहे. या वर्षी तुम्हाला सत्तामीमांसा, ज्ञानमीमांसा आणि नीतीमीमांसा या तीन शाखांमधील प्रमुख संकल्पना आणि सिद्धांत यांची थोडी सविस्तर ओळख करून त्याचबरोबर सौंदर्यमीमांसा या शाखेचाही परिचय करून दिला आहे.

सत्तामीमांसेची व्याप्ती आणि महत्त्व ध्यानात घेता, या पुस्तकातील पहिले तीन पाठ तत्त्वज्ञानाच्या या शाखेतील प्रश्नांची चर्चा करतात. त्याचबरोबर या प्रश्नांसंबंधी आजचे विज्ञान काय सांगते याचीही माहिती देतात. यामुळे तत्त्वज्ञान आणि विज्ञानाचा संबंध समजून घ्यायला तुम्हाला मदत होईल. ज्ञानमीमांसा हा चौथ्या पाठाचा विषय आहे. यामध्ये ज्ञानाची संकल्पना आणि ज्ञानाचे स्रोत यांची चर्चा आहे. आपल्या कृतींचे नैतिक मूल्यमापन कशाच्या आधारे करावे याचे विवेचन पाचव्या पाठात केले आहे. सहावा पाठ सौंदर्यवादी दृष्टिकोनाचे स्वरूप स्पष्ट करून कलेच्या तत्त्वज्ञानातील महत्त्वाच्या संकल्पनांची माहिती करून देतो. गेल्या वर्षीप्रमाणे या वर्षीही एक पाठ विज्ञान, तंत्रज्ञान आणि तत्त्वज्ञान यांच्यातील परस्परसंबंधांचे विवेचन करणारा आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या विकासाचा आढावा घेताना या विकासाने निर्माण केलेल्या नीतीविषयक प्रश्नांची दखलही हा पाठ घेतो.

गेल्या वर्षीप्रमाणे या वर्षीही भारतीय आणि पाश्चात्य या दोन्ही परंपरांमध्ये वरील सर्व विषयांसंबंधी जो ऊहापोह झाला आहे, त्याचा आढावा घेण्यात आला आहे. त्यामुळे या दोन्ही परंपरांची वैशिष्ट्ये तुमच्या लक्षात येतील. त्यांच्यामधील साम्यभेदही समजतील.

अमूर्त संकल्पना आणि सिद्धांतांच्या स्पष्टीकरणासाठी तुमच्या माहितीतील उदाहरणांचा वापर केला आहे. त्याचबरोबर या वर्षी तत्त्वज्ञानातील पारिभाषिक संज्ञादेखील समाविष्ट केल्या आहेत.

या पुस्तकाच्या अभ्यासाने तुमचे तत्त्वज्ञानाबद्दलचे कुतूहल काहीसे शमले, तरी विषयाचा अधिक सखोल आणि सांगोपांग अभ्यास करण्याची तुम्हाला इच्छा होईल, याची खात्री आहे. त्यासाठी या पुस्तकाव्यतिरिक्त इतर ग्रंथांचा, आंतरजालावरील माहितीपूर्ण लेखांचा, विश्वकोशांचा तसेच दृक्श्राव्य माध्यमाचाही उपयोग अवश्य करा. आपल्या मदतीसाठी क्यू.आर.कोडवर देखील माहिती ठेवलेली आहे. हा अभ्यास तुम्हाला आनंददायी आणि फलदायी होवो, यासाठी शुभेच्छा!

**(विवेक गोसावी)**
**संचालक**
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

**पुणे**
**दिनांक : २१ फेब्रुवारी, २०२०**
**भारतीय सौर : २ फाल्गुन, १९४१**

# – शिक्षकांसाठी –

इयत्ता अकरावीच्या पुस्तकाचे एक प्राथमिक उद्दिष्ट विद्यार्थ्यांना या नवीन विषयाची गोडी लागेल या पद्धतीने तत्त्वज्ञान या विषयाची ओळख करून देण्याचे होते. त्या पुस्तकाच्या अभ्यासाने विद्यार्थ्यांमध्ये तत्त्वज्ञानाविषयी जी उत्सुकता निर्माण झाली असेल, ती ध्यानात घेऊन या पुस्तकाची रचना केली आहे. ही रचना ज्ञानरचनावादी शिक्षण आणि विद्यार्थीकेंद्री कृतीशील अध्यापन यांना महत्त्व देणारी आहे.

सत्तामीमांसा, ज्ञानमीमांसा आणि नीतीमीमांसा या तत्त्वज्ञानाच्या तीन प्रमुख शाखांबरोबरच सौंदर्यमीमांसा या शाखेच्या विवेचनाचा समावेशही या पुस्तकात केला आहे. सत्तामीमांसेची चर्चा सत्तामीमांसेतील मुख्य सिद्धांत, कार्यकारणसंबंध आणि 'स्व' विषयक आकलन या तीन मुद्द्यांच्या संदर्भात तीन पाठांत विभागून केली आहे. गेल्या वर्षीप्रमाणे या वर्षीही संबंधित शाखांच्या संदर्भातील भारतीय आणि पाश्चात्त्य या दोन्ही परंपरांमधील मध्यवर्ती संकल्पनांचा आणि सिद्धांतांचा परिचय करून दिला आहे. त्याचप्रमाणे या शाखांमधील प्रमुख प्रश्नांबद्दल आज विज्ञानाची भूमिका काय आहे याचीही प्राथमिक माहिती प्रत्येक पाठाच्या शेवटी करून दिली आहे. विज्ञान, तंत्रज्ञान आणि तत्त्वज्ञान यांच्यातील संबंधांचा आणि काही महत्त्वाच्या मुद्द्यांचा परामर्श शेवटच्या पाठात घेतला आहे. यामुळे तत्त्वज्ञानाची सध्याच्या काळातील प्रस्तुतता आणि महत्त्व समजून घ्यायला विद्यार्थ्यांना मदत होईल.

तत्त्वज्ञानातील मुख्य शाखांसंबंधी मूलभूत माहिती देण्याबरोबरच विद्यार्थ्यांमध्ये तत्त्वचिंतनाची आवड निर्माण करणे आणि त्याआधारे जीवनदृष्टी विकसित करायला मदत करणे ही देखील या पुस्तकाची उद्दिष्टे आहेत. पाठातील उपक्रम, कृती, पाठांखालचे स्वाध्याय इत्यादींची रचना त्या दृष्टिकोनातून केली आहे. यासाठी विद्यार्थ्यांना उत्तेजन देणे, आवश्यक ती मदत करणे हे आपण शिक्षक या नात्याने करालच. त्याचबरोबर पाठ्यपुस्तकाबाहेरील साधने – उदाहरणार्थ, वर्तमानपत्रे, वाचन, माहितीपट, ध्वनीफिती, चित्रपट, आंतरजालावरील अधिकृत व विश्वसनीय संकेतस्थळे यांचा उपयोग केल्यास अध्ययन आणि अध्यापन रंजक होण्याबरोबरच विद्यार्थ्यांना चिंतनशील आणि कृतीप्रवण करेल.

अकरावी आणि बारावी या दोन्ही वर्षांची पाठ्यपुस्तके एकत्रितपणे तत्त्वज्ञानाच्या अधिक सखोल आणि विस्तृत अभ्यासासाठीचा पाया म्हणून विद्यार्थ्यांना उपयुक्त ठरतील. क्यू.आर.कोडच्या माध्यमातून दिलेल्या पूरक माहितीचाही त्यासाठी चांगला उपयोग करून घेता येईल.

# क्षमता विधाने

| अ.क्र. | घटक | क्षमता |
|---|---|---|
| १. | काहीतरी आहे, पण काय आहे? | • अंतिम सत्ता म्हणजे काय हे स्पष्ट करता येणे.<br>• अंतिम सत्तेच्या संख्या आणि स्वरूपाविषयीच्या विविध मतांचा परामर्श घेता येणे.<br>• भारतीय व पाश्चात्य परंपरेतील विविध मतांची तुलना करता येणे.<br>• सत्‌संबंधीचा आजचा विज्ञानविचार सांगता येणे. |
| २. | कारण म्हणजे काय? | • कार्यकारणसंबंधाच्या स्वरूपाची चर्चा करता येणे.<br>• कार्यकारणसंबंधविषयक भारतीय व पाश्चात्य विचारांचे विश्लेषण करता येणे.<br>• कार्यकारणभावासंबंधीच्या तात्त्विक आणि वैज्ञानिक दृष्टिकोनांची तुलना करता येणे. |
| ३. | 'मी कोण आहे'? 'मी काय आहे'? | • तत्वज्ञानातील 'मी' ची संकल्पना स्पष्ट करता येणे.<br>• 'मी' विषयीच्या भारतीय व पाश्चात्य विचारांची मांडणी करता येणे.<br>• स्व-विषयक जाणिवेबद्‌दलच्या विज्ञानविचारांमधील मुख्य मुद्‌दे नमूद करता येणे. |
| ४. | कळते कसे? | • प्रमा, प्रमाता व प्रमाण यांतील परस्परसंबंध सांगता येणे.<br>• न्याय दर्शनाचा प्रमाणविचार विस्तारपूर्वक सांगता येणे.<br>• पाश्चात्य ज्ञानमीमांसेतील 'ज्ञान' संकल्पनेचे विश्लेषण करता येणे.<br>• बुद्‌धिवाद आणि अनुभववाद यांत फरक करता येणे.<br>• बुद्‌धिवाद आणि अनुभववाद यांचे मूल्यमापन करता येणे.<br>• विज्ञानाच्या दृष्टिकोनातून व्यक्ती आणि समूहाच्या जाणून घेण्याच्या प्रक्रियेतील वेगळेपणा अधोरेखित करता येणे. |
| ५. | काय करावे आणि का? | • भारतीय नीतिविचारातील कर्मसिद्‌धांत आणि पुरुषार्थ कल्पना स्पष्ट करता येणे.<br>• चार्वाक, जैन आणि बौद्‌ध दर्शनातील नीतिविचार सांगता येणे.<br>• सुखवादाचे वर्गीकरण करता येणे.<br>• कर्तव्यवाद व परिणामवादाची तुलनात्मक मांडणी करता येणे.<br>• उत्क्रांतीच्या नियमाच्या प्रकाशात नीतीमीमांसेतील समस्यांचा ऊहापोह करता येणे.<br>• कृतीची निवड करताना किंवा कृतीचे मूल्यमापन करताना नैतिक सिद्‌धांताचे उपयोजन करता येणे. |
| ६. | कलेच्या वाटेने जाताना | • मानवी जीवनातील सौंदर्यानुभवांचे महत्त्व जाणता येणे.<br>• सौंदर्यात्मक दृष्टिकोनाची वैशिष्ट्यपूर्णता स्पष्ट करता येणे.<br>• सौंदर्यसंकल्पनेबद्‌दलच्या विविध मतांची चर्चा करता येणे.<br>• एखाद्या विशिष्ट कला प्रकाराची निवड करून कलाप्रक्रियेतील घटक आणि त्यातील परस्परसंबंध ओळखता येणे.<br>• सौंदर्यानुभव आणि कलानुभव यांतील वस्तुनिष्ठ असलेले घटक विज्ञानाच्या दृष्टिकोनातून समजावून घेता येणे. |
| ७. | विज्ञान, तंत्रज्ञान आणि तत्वज्ञान | • तंत्रज्ञानाच्या मानवी जीवनातील वाढत्या प्रभावामुळे तत्वज्ञानासमोर निर्माण झालेल्या समस्यांची चर्चा करता येणे.<br>• माणूस आणि निसर्ग यांतील संबंधाबद्‌दलच्या विविध दृष्टिकोनांतील फरक सोदाहरण स्पष्ट करता येणे.<br>• निसर्गनियम आणि मानवी वर्तन यांतील परस्परसंबंध स्पष्ट करता येणे.<br>• परिसर तत्वज्ञानात चर्चिल्या जाणाऱ्या प्रश्नांची चर्चा करता येणे.<br>• पर्यायी तंत्रज्ञान म्हणजे काय हे समजून पर्यायी जीवनशैलीचा ऊहापोह करता येणे. |

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | प्रकरणाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १. | काहीतरी आहे, पण काय आहे? | १ |
| २. | कारण म्हणजे काय? | १७ |
| ३. | मी कोण आहे? मी काय आहे? | २९ |
| ४. | कळते कसे? | ४० |
| ५. | काय करावे आणि का? | ५८ |
| ६. | कलेच्या वाटेने जाताना | ७८ |
| ७. | विज्ञान, तंत्रज्ञान आणि तत्त्वज्ञान | ९५ |


# १. काहीतरी आहे, पण काय आहे?

- प्रस्तावना
- अंतिम सत्ता : संख्या व स्वरूप
- भारतीय तत्त्वज्ञानातील सत्तामीमांसा
- पाश्चात्त्य तत्त्वज्ञानातील सत्तामीमांसा
- वैज्ञानिक दृष्टिकोन

## प्रस्तावना

तत्त्वज्ञानाची ओळख करून घेताना मागच्या वर्षी आपण त्यामधील तीन प्रमुख प्रश्न आणि त्यामधून निर्माण होणाऱ्या शाखांची थोडी माहिती घेतली आहे. सत्तामीमांसा ही तत्त्वज्ञानाची शाखा 'काय आहे'? या प्रश्नाचे उत्तर शोधते. या शोधात सत्, असत्, नित्य, अनित्य, ईश्वर इत्यादी संकल्पना कशा निर्माण झाल्या याचा अभ्यासही आपण केला. सत्तामीमांसेतील काही सिद्धांत, संकल्पना, समस्या आणि त्यांचे महत्त्व आपण या वर्षी समजून घेऊया.

आपण सगळे एका अफाट विश्वाचा भाग आहोत. या विश्वात अनेक प्रकारच्या, अनेक गुणधर्मांच्या परस्परांशी निगडीत अगणित वस्तू आहेत. या सगळ्या वस्तूंच्या एकमेकांशी विविध तऱ्हांच्या आंतरक्रिया होत असल्यामुळे जगात क्षणोक्षणी असंख्य घटना घडत असतात. वस्तूंच्या स्वरूपामध्ये बदल होत असतात. अशा या जगाचे शक्य तेवढे ज्ञान मिळवण्याचा ध्यास माणसाने प्राचीन काळापासूनच घेतला. त्यासाठी त्याने केलेल्या प्रयत्नांमधूनच तत्त्वज्ञान आणि विज्ञान यांची निर्मिती झाली. सभोवतालच्या जगाचे निरीक्षण करून त्या निरीक्षणाच्या आधाराने विचार करताना, सुरुवातीला त्याच्या हे लक्षात आले, की काही ठराविक मूळ घटकांमधूनच जगातल्या या असंख्य वस्तू उत्पन्न होतात. वरकरणी वेगवेगळ्या वाटणाऱ्या अनेक वस्तू मुळात एकाच कुठल्या तरी गोष्टीपासून निर्माण झालेल्या असतात किंवा केलेल्या असतात.




जसे, तुम्ही वर्गात सभोवताली पाहिले तर तुमच्या लक्षात येईल, की टेबल, खुर्ची, बाके, दारे-खिडक्या आणि त्यांच्या चौकटी हे सगळे लाकडापासून तयार केले आहे. लाकूड झाडांपासून मिळते. पण लाकडाबरोबरच झाडांकडून किंवा एकंदरीतच वनस्पतींपासून कितीतरी वस्तू आपल्याला मिळतात. पाने, फुले, फळे यांबरोबरच अनेक अन्नपदार्थ तसेच औषधे वनस्पतींपासून आपण तयार करतो. बांबूसारखी बहुपयोगी वनस्पती तर अनेक उपयोगी वस्तूच नव्हे तर कलात्मक वस्तू बनवण्यासाठीही उपयोगात येते.

**चला जमवूया!**

बांबूपासून निर्माण होणाऱ्या वस्तूंची माहिती मिळवून त्यांचे वर्गीकरण करा.

वरील उदाहरणे मानवनिर्मित वस्तूंची आहेत. निसर्गातही एकाच गोष्टीची अनेक रूपे आपण अनुभवतो. लहानशी ठिणगी, जळता निखारा, पेटलेला पाचोळा, जंगलाला लागलेला वणवा ही सगळी अग्निचीच रूपे! जलचक्र, अन्नसाखळी ही निसर्गक्रमाने एखाद्या गोष्टीचे दुसऱ्यात रूपांतर होण्याचीच उदाहरणे आहेत. अंडे, अळी/सुरवंट, कोश, फुलपाखरू या म्हटले तर वेगवेगळ्या गोष्टी आहेत, म्हटले तर एकाच जिवाच्या वेगवेगळ्या अवस्था आहेत.



**चला लिहूया!**

'एकाच गोष्टीची अनेक रूपे' याची विविध उदाहरणे मिळवा आणि त्यांचे निसर्गनिर्मित व मानवनिर्मित असे वर्गीकरण फळ्यावर लिहा.

अशाच प्रकारच्या निरीक्षणांमधून माणसाने अंदाज केला, की जगात सर्वत्र वैविध्य भरून राहिले असले, तरी मुळात ते काही मर्यादित मूळ घटकांपासून तयार झाले असले पाहिजे. हा अंदाज बरोबर असला तरी त्यातून अनेक प्रश्न निर्माण झाले. मूळ घटकांमध्ये काही बदल झाल्यामुळे इतर वस्तूंची निर्मिती झाली, असे मानले तर ते बदल कोणत्या कारणांमुळे झाले? बदलांची

प्रक्रिया काय होती? हे बदल आपोआप झाले की कोणी घडवून आणले? घडवून आणले असले, तर कुठल्या उद्देशाने? या प्रश्नांबरोबरच दोन अगदी मूलभूत प्रश्न माणसाला पडले ते म्हणजे या मूलभूत घटकांची संख्या नेमकी किती आहे, एक, दोन की अनेक? त्यांचे स्वरूप काय आहे? म्हणजेच त्यांच्यामध्ये असे कोणते गुणधर्म आहेत ज्यामुळे एवढ्या निरनिराळ्या वस्तू त्यांच्यापासून उत्पन्न होऊ शकल्या? या पाठात मुख्यतः आपण या दोन प्रश्नांना भारतीय आणि पाश्चात्त्य परंपरेत जी उत्तरे दिली गेली आहेत त्यातील काहींचा अभ्यास करणार आहोत. म्हणूनच या पाठाचे शीर्षक आहे, 'काहीतरी आहे, पण काय आहे'?

तत्त्वज्ञानाला अंतिम सत्तेचे स्वरूप समजून घेण्यात रस असतो असे म्हटले जाते. इथे सुरुवातीलाच आपण हे लक्षात घेऊया की 'सत्ता' हा शब्द "सत्" म्हणजे जे वस्तुतः अस्तित्वात आहे, जे खरे किंवा वास्तविक आहे, त्याचा निदर्शक आहे. त्याचा राजकीय, आर्थिक किंवा इतर कुठल्याही वर्चस्वाशी वा प्रभुत्वाशी संबंध नाही. आपण मागच्या वर्षी पाहिल्याप्रमाणे जे 'सत्' असते त्याचे अस्तित्व आणि स्वरूप कुठल्याही व्यक्तीवर किंवा अनुभवावर अवलंबून नसते. 'सत्ता' याचा अर्थ 'सत् त्व' किंवा 'सत् असणे'. अशी सत्ता, म्हणजे जे जे अस्तित्वात आहे, ज्यांना ज्यांना आहे, त्या सर्वांच्या मुळाशी असणारे अस्तित्व किंवा सत् म्हणजे अंतिम सत्ता. तिला अंतिम म्हणण्याचे कारण असे, की अस्तित्वात असलेल्या सर्व गोष्टींचे मूळ शोधण्याच्या प्रक्रियेत ही सत्ता आपल्याला शेवटी म्हणजे 'अंतिमतः' गवसते. ही सत्ता स्वतः इतर कुठल्याही अस्तित्वापासून निष्पन्न झालेली नसते. म्हणूनच अंतिम सत्तेच्या घटकांना मूलभूत म्हटले जाते.

हे एका उदाहरणाच्या साहाय्याने अधिक चांगल्या पद्धतीने समजू शकेल. झाडांची खोडे, फांद्या, डहाळ्या, पाने, फुले, फळे हे सगळे आपल्याला दिसते, पण जी मुळे झाडांचे पोषण करतात, त्यांना मातीशी धरून ठेवतात, ती मुळे जमिनीच्या पोटात दडलेली असतात, ती सहसा नजरेस पडत नाहीत. पण झाडांचे अस्तित्व त्यांच्यावर अवलंबून असते. अनुभवाला येणाऱ्या, दृश्य जगाच्या मुळाशी असणारी अंतिम सत्ता शोधण्याचा, जाणण्याचा प्रयत्न तत्त्वज्ञांनी विचारांच्या, संकल्पनांच्या पातळीवर केला. तत्त्वज्ञांनी जी वैचारिक झेप त्या काळात घेतली, तिला आधुनिक वैज्ञानिक पद्धतींची जोड मिळाल्यावर या प्रवासाने वेग घेतला. त्यामधूनच आपण आवर्तसारणीपर्यंत पोचलो आहोत.

या सर्व प्रवासात तत्त्वज्ञांना पडलेले प्रश्न, ते सोडविण्यासाठी वापरलेल्या पद्धती आणि सुचलेली उत्तरे व त्यासाठी वापरलेली परिभाषा यांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. तत्त्वचिंतनाने काळाच्या ओघात जी वळणे घेतली, त्यामधून विज्ञानाला दिशा सापडत गेलेल्या दिसतात. अंतिम सत्तेच्या संख्येबद्दल आणि स्वरूपाबद्दल तत्त्वज्ञांनी जे विचार मांडले, त्यातील प्रमुख विचारांचा अभ्यास आता करूया.

भारतीय आणि पाश्चात्त्य या दोन्ही परंपरांमध्ये तत्त्वचिंतनाच्या आरंभीच्या काळातच विश्वाच्या मूळ स्वरूपाबद्दलचे चिंतन आढळून येते. वैदिक परंपरेतील नासदीय सूक्त, ग्रीक परंपरेतील सॉक्रेटिसपूर्व चिंतन ही त्याचीच उदाहरणे आहेत. हे चिंतन बरेचसे तर्काधारित कल्पना या स्वरूपाचे होते. मुख्य म्हणजे पुराणकथांप्रमाणे नैसर्गिकरित्या घडणाऱ्या घटनांचे, अस्तित्वात असणाऱ्या वस्तूंचे स्पष्टीकरण करताना, या चिंतनात दैवी किंवा अतिभौतिक अस्तित्व, घटना यांचा आधार घेतला गेला नव्हता. या प्रकारच्या चिंतनात जेव्हा अधिकाधिक सुस्पष्टता यायला लागली, तेव्हा भारतीय परंपरेत 'द्रव्य' या संकल्पनेचा, तर पाश्चात्य विचारधारेत 'सबस्टन्स' (substance) या संकल्पनेचा उदय झाला. जगाचे ज्ञान आपल्याला मुख्यतः इंद्रियानुभवांच्या माध्यमामधून होते. आपण गेल्या वर्षी पाहिल्याप्रमाणे, अनुभव आणि जिचा अनुभव येतो ती वस्तू यांमध्ये फरक असतो. अनुभवाला येणारी प्रत्येक गोष्ट अस्तित्वात असतेच असे नाही. उदा. मृगजळ. याउलट अस्तित्वात असलेली प्रत्येक गोष्ट इंद्रियानुभवांचा विषय असतेच असेही नाही. उदा. अणू.

भौतिक वस्तूंचा जो अनुभव आपल्याला येतो तो अनुभव त्यांचे रूप, रंग, आकार, प्रकार, त्यांची परिमाणे, त्यांचा इतर वस्तूंशी असलेला संबंध या प्रकारचा असतो. आपण जर संत्रे खाल्ले, तर त्याचा नारिंगी-पिवळा रंग, गोल आकार, आंबट-गोड वास आणि चव, शीतल स्पर्श या सगळ्यांचा अनुभव

आपल्याला येतो. ते लहान आहे की मोठे, ते मोसंब्यापेक्षा वेगळे कसे आहे हेही आपण अनुभवतो. पण संत्रे म्हणजे फक्त त्याचा रंग, वास, चव, स्पर्श, आकार यांचा समूह की आणखी काही? तुम्ही म्हणाल, हा काय प्रश्न आहे? रंग, वास इत्यादी हे संत्र्याचे गुणधर्म आहेत, ते म्हणजे संत्रे नव्हे. तुमचा त्यामागचा विचार असा आहे, की हे सगळे ज्या कशाचे गुणधर्म आहेत, ते म्हणजे संत्रे. ते गुणधर्म त्याच्या आधारानेच असतात. हा जो अनुभवाला येणाऱ्या गुणधर्मांचा आधार असतो, तो म्हणजेच द्रव्य. गुण, परिमाण (मोजमाप), संबंध हे सगळे 'कशाचे तरी' असतात. ते स्वतंत्रपणे अस्तित्वात असू शकत नाहीत. त्यांचे अस्तित्व द्रव्यावर अवलंबून असते. रंग, गंध, आकार इ. एकाच वेळी अनेक द्रव्यांमध्ये असू शकतात. पण द्रव्यांशिवाय मात्र ते अस्तित्वात नसतात. तुलनेने द्रव्य मात्र विशिष्ट गुणांच्या अस्तित्वावर अवलंबून नसते. वर्गातला फळा काळा, हिरवा किंवा पांढरा असू शकतो, पण रंग बदलला तरी फळा हा फळाच राहतो. छोट्या रोपाचे झाड होते, झाडाचा वृक्ष होतो, पण मूळ द्रव्य तेच राहते. थोडक्यात, द्रव्यांचे गुणधर्म, मोजमाप, परस्परसंबंध बदलले, तरी द्रव्याचे अस्तित्व कायम राहते.

### अंतिम सत्ता : संख्या व स्वरूप

तत्त्वज्ञांपुढचा प्रश्न असा होता, की अशी किती द्रव्ये अस्तित्वात आहेत? जी आहेत ती काही मूलभूत द्रव्यांपासून निर्माण होतात का? ती मूलभूत द्रव्ये कोणती? ती किती आहेत? आपल्या परंपरेतील पंचमहाभूतांची कल्पना तुम्हांला माहितीच असेल. पृथ्वी, आप, तेज, वायू आणि आकाश यांना पंचमहाभूते मानले जाते. याचे कारण असे, की याच पाच मूलतत्त्वांच्या किंवा द्रव्यांच्या वेगवेगळ्या प्रमाणात होणाऱ्या मिश्रणातून सर्व भौतिक जग आकाराला येते अशी तेव्हा समजूत होती. आस्तिक दर्शनांनी पंचमहाभूतांची कल्पना स्वीकारली होती. चार्वाकांनी आकाश सोडून इतर चार तत्त्वे मान्य केली. प्राचीन ग्रीक तत्त्वज्ञ एम्पिडोक्लिस यानेही पृथ्वी, जल, अग्नि, वायू यांनाच महाभूते मानले.

आज आपल्याला हे ठाऊक आहे, की या पाच किंवा चार महाभूतांना मूलद्रव्ये मानता येणार नाही, कारण वैज्ञानिक विश्लेषणातून ही द्रव्ये कशापासून उत्पन्न होतात हे आपल्याला कळले आहे. हायड्रोजनचे दोन अणू आणि ऑक्सिजनचा एक अणू मिळून पाण्याचा रेणू तयार होतो, म्हणून पाणी हे मूलद्रव्य असू शकत नाही. याचा अर्थ तत्त्वज्ञानाने मूलद्रव्यांचा वेध घेण्याचा जो प्रयत्न केला तो चुकीचा होता असा मात्र होत नाही. कारण 'मूलद्रव्य' ही संकल्पना चुकीची नाही. विज्ञानपूर्व काळात, केवळ बुद्धिच्या आणि सामान्य निरीक्षणांच्या बळावर मूलद्रव्यांची संख्या किती या प्रश्नाचे अचूक उत्तर देणे शक्य नव्हते. पण हा प्रश्न तत्त्वज्ञानाने उपस्थित केल्यामुळे विज्ञानाची वाटचाल त्या दिशेने होऊन उत्तरे सापडली हे विसरता येणार नाही.



**चला विचार करूया.**

आकाशाचा रंग, इंद्रधनुष्यातले सप्तरंग हे कुठल्या द्रव्याचे गुणधर्म आहेत?

तार्किक दृष्टीने पाहिले, तर 'विश्वाच्या मुळाशी किती घटक आहेत'? या प्रश्नाचे उत्तर एक, दोन किंवा अनेक यांपैकीच एक असू शकते, हे स्पष्टच आहे. त्यामुळेच वेगवेगळ्या तत्त्वज्ञांनी किंवा तत्त्वप्रणालींनी दिलेल्या उत्तरांचे वर्गीकरण एकतत्त्ववाद, द्वितत्त्ववाद, अनेकतत्त्ववाद या प्रकारांमध्ये करता येते. त्याचप्रमाणे या घटकांचे स्वरूप काय आहे या प्रश्नाच्या संभाव्य उत्तरांचेही ठराविक प्रकारात विभाजन करता येते. आपण गेल्या वर्षी पाहिल्याप्रमाणे अस्तित्वात असलेल्या सगळ्या वस्तूंची सजीव आणि निर्जीव अशी वर्गवारी करता येते. निर्जीव वस्तू भौतिक, जड असतात तर सजीवांमध्ये जडाबरोबरच चैतन्याचे अस्तित्वही असते. साहजिकच, अंतिम सत्ता मुळात जडरूप आहे किंवा चैतन्यरूप आहे किंवा जड आणि चेतन हे दोन्ही अंतिम सत् आहेत असे पर्याय तार्किकदृष्ट्या संभवतात. त्यामधून जडवाद, चिद्वाद आणि वास्तववाद असे तीन वेगवेगळे सिद्धांत निष्पन्न होतात. वेगवेगळ्या संस्कृतींमध्ये तत्त्वचिंतन काहीसे बदलत असले, तरी त्यामध्ये विचारले जाणारे प्रश्न बरेचसे एकसारखे असतात. त्यांच्या उत्तरांचे तेच पर्याय वेगवेगळ्या परंपरांनुसार वैशिष्ट्यपूर्ण रूपात पुढे येतात. भारतीय आणि पाश्चात्य परंपरांमधील सत्तामीमांसेतील या मुख्य सिद्धांताची ओळख आता करून घेऊया.

## भारतीय तत्त्वज्ञानातील सत्तामीमांसा


भारतीय परंपरेत आस्तिक आणि नास्तिक, दोन्ही प्रकारच्या दर्शनांमध्ये अंतिम सत्तेच्या संख्येबद्दल आणि स्वरूपाबद्दलचे चिंतन आढळते. त्यातील काही प्रमुख सिद्धांतांचा थोडक्यात आढावा घेऊया. हा आढावा घेताना ऐतिहासिक कालक्रमाचाही विचार करण्याची गरज आहे. बहुसंख्य दर्शने अनेकतत्त्ववाद मान्य करतात. यांमध्ये चार्वाक, जैन, मीमांसा, न्याय, वैशेषिक यांचा प्रामुख्याने समावेश होतो. मात्र, अंतिम सत्तेच्या स्वरूपाबद्दल त्यांच्यामध्ये काही मतभेद आहेत. प्रमुख दर्शनांमध्ये जडवाद स्वीकारणारे चार्वाक हे एकमेव दर्शन आहे. विश्वाचे मूळ स्वरूप जड म्हणजे अचेतन, भौतिक स्वरूपाचे आहे आणि त्या जडामधूनच चैतन्याची उत्पत्ती होते असे जडवाद सांगतो. जडवादी हे सहसा अनेकतत्त्ववादी असतात असे तत्त्वज्ञानाचा इतिहास सांगतो. म्हणजेच त्यांच्या मते अंतिम सत्तेची संख्या दोनपेक्षा अधिक असते. मात्र, अंतिम तत्त्वांची संख्या कितीही असली, तरी अंतिम तत्त्व जडस्वरूपाचेच असते, असे हे सिद्धांत मानतात.

### चार्वाक दर्शन

चार्वाकांचे मत असे आहे, की पृथ्वी, जल, अग्नी आणि वायू या चार भौतिक घटकांपासून सगळ्या विश्वाची निर्मिती होते. या विश्वाचा कोणी निर्माता नाही. या चार मूलभूत घटकांमध्ये ज्या आंतरक्रिया होतात, ज्या प्रकारची संयुगे निर्माण होतात त्यांमधून कुठल्याही निर्मात्याशिवाय, उद्दिष्टांशिवाय विश्वातील सर्व गोष्टींची निर्मिती होत असते. जीवांमध्ये आढळणारी जाणीव किंवा चैतन्य यांचा आधार 'आत्मा' असे काही स्वतंत्र तत्त्व असते हा इतर अनेक दर्शनांचा विचार चार्वाकांना मान्य नाही. चार महाभूतांच्या विशिष्ट प्रकारे एकत्र येण्यातूनच जिवंत किंवा चेतनायुक्त शरीर निर्माण होते असे त्यांचे मत आहे. निर्जीव घटकांच्या एकत्र येण्यातून सजीवाची निर्मिती कशी होते याचे उत्तर त्यांच्या मते त्या विशिष्ट प्रकारात दडलेले आहे. याबद्दलचे त्यांचे स्पष्टीकरण आपण तिसऱ्या प्रकरणात पाहणारच आहोत. एका अर्थाने चार्वाकमत आधुनिक विज्ञानाच्या जवळ जाणारे आहे. विज्ञानाप्रमाणेच चार्वाक जडवाद आणि अनेकतत्त्ववाद स्वीकारतात.

### जैन दर्शन

चार्वाकांप्रमाणेच नास्तिक दर्शनात समाविष्ट असणारे जैन दर्शन अनेकतत्त्ववादाचा पुरस्कार करते. जैन दर्शनात अस्तित्वात असणाऱ्या सर्व गोष्टींचे जीव आणि अजीव या प्रकारांत वर्गीकरण केले जाते. अजीवांच्या म्हणजे चैतन्य नसलेल्या, निर्जीव वस्तूंच्या स्वरूपाची चर्चा करताना जैनांनी परमाणूंनी बनलेल्या जडतत्त्वाखेरीज गती, स्थिती, काळ आणि अवकाश यांचाही विचार केला आहे. विज्ञानात आपण हे शिकलोच आहोत, की प्रत्येक भौतिक वस्तू विशिष्ट अवकाश व्यापते. विशिष्ट काळात अस्तित्वात असते. ती वस्तू निर्माण होण्यासाठी गतीची आवश्यकता असते. तुम्ही आणि तुमचे मित्र-मैत्रिणी वर्गात एकच पुस्तक वाचत असलात, तरी त्या पुस्तकाची प्रत्येक प्रत वेगळ्या जागेत आहे. तुमच्या नंतरच्या बॅचमधल्या विद्यार्थ्यांनी तेच पुस्तक वाचले, तरी कदाचित ते तुमच्या पुस्तकानंतर छापलेले असेल. ते लिहिण्याच्या, छापण्याच्या प्रक्रियेत अनेक व्यक्ती-वस्तू यांचा सहभाग असतो.




प्रत्येक वस्तू जडाच्या अविभाज्य कणांपासून (पुद्गल) म्हणजे अणूंपासून तयार झालेली असते. जैनमतानुसार सजीवांची शरीरे, नैसर्गिक वस्तू एवढेच नव्हे तर मन, वाचा, श्वास हे देखील जडाचीच उत्पत्ती आहे. जीव किंवा आत्मा चैतन्ययुक्त असतो. आत्मा कधीच अचेतन असत नाही. 'शरीर हाच आत्मा' हे

चार्वाकमत जैनांना मान्य नाही. त्यांच्या मते आत्मा किंवा जीव शरीरापेक्षा वेगळा असतो. तिसऱ्या पाठात आपण जैनांनी जिवांचे जे प्रकार सांगितले आहेत ते आणि त्यांच्या स्वरूपाची चर्चा करणारच आहोत. इथे हे लक्षात ठेवणे पुरेसे आहे, की जैन अनेकतत्त्ववादी आहेत. ते भौतिक द्रव्य आणि चेतन द्रव्य/चैतन्य स्वतंत्रपणे अस्तित्वात असते असे मानतात.

### बौद्ध दर्शन : प्रतीत्यसमुत्पाद आणि सत्‌चे अनित्य स्वरूप

सिद्धार्थ गौतम बुद्धांना सत्तामीमांसेतील प्रश्नांमध्ये फारसा रस नव्हता. या प्रश्नांची चर्चा दुःखमुक्तीसाठी निरूपयोगी असते असे त्यांचे मत होते. दुःखाच्या समस्येच्या संदर्भात जी चार आर्यसत्ये त्यांनी मांडली, त्यामधून त्यांचा सत्‌विषयक दृष्टिकोन समजतो. 'दुःखाला कारण असते' या दुसऱ्या आर्य सत्याच्या मांडणीमध्ये त्यांनी प्रतीत्यसमुत्पादाचा सिद्धांत सांगितला आहे. या सिद्धांतानुसार विश्वात असणाऱ्या प्रत्येक गोष्टीचे अस्तित्व कुठल्या ना कुठल्या दुसऱ्या गोष्टींवर अवलंबून असते. म्हणजेच प्रत्येक गोष्टीचे अस्तित्व सोपाधिक असते. ज्यावर वस्तूचे अस्तित्व अवलंबून असते, ती गोष्ट नष्ट झाल्यानंतर त्या वस्तूचे अस्तित्वही नष्ट होते. कार्यकारणाच्या परिभाषेत सांगायचे तर असे म्हणता येते, की प्रत्येक वस्तू किंवा घटनेच्या मागे काही ना काही कारण असते. कारणाशिवाय काहीच अस्तित्वात येत नाही. कारण असेल, तर कार्य निर्माण होतेच. त्याचप्रमाणे अस्तित्वासाठी आवश्यक असलेली कारणे किंवा घटक नष्ट झाले, तर वस्तूही नष्ट होते. आपल्याला जंतूसंसर्गाने जेव्हा काही आजार होतो, तेव्हा डॉक्टर आपल्याला जंतूंचा नायनाट करणारे औषध देतात. जंतू नष्ट झाले की आजारही नाहीसा होतो. आरोग्यासाठी सकस आहाराची गरज असते. असा आहार मिळाला नाही, तर आरोग्यावर विपरीत परिणाम होतो.

प्रत्येक गोष्टीचा उगम दुसऱ्या कशावर तरी अवलंबून असतो असे सांगणाऱ्या या प्रतीत्यसमुत्पादाच्या सिद्धांतामधून बौद्ध दर्शनाचा अनित्यतेविषयीचा सिद्धांत निष्पन्न होतो. या सिद्धांतानुसार जगात जे जे काही आहे, ते कधी ना कधी नष्ट होणार आहे. म्हणजेच कशाचेच अस्तित्व नित्य किंवा शाश्वत नाही. जे जे आहे, ते अनित्य आहे, बदलणारे आहे; कारण प्रत्येक गोष्टीचे अस्तित्व दुसऱ्या कशावर तरी अवलंबून असते. अनित्यता, परिवर्तन हाच विश्वाचा गुणधर्म आहे. बौद्ध दर्शन ईश्वराचे आणि आत्म्याचे किंवा कुठल्याही नित्य द्रव्याचे अस्तित्व मुख्यतः याच कारणाने नाकारते.

### वैशेषिक दर्शन

तुम्हांला हे कदाचित माहीत असेल, की अणू/परमाणू ही संकल्पना प्राचीन काळात वैशेषिकांनी मांडलेली आहे. आपल्या अनुभवाला येणाऱ्या, आपल्याला दिसू शकणाऱ्या प्रत्येक वस्तूला काही आकारमान असते, म्हणूनच ती बघणे आपल्याला शक्य होते. अतिशय सूक्ष्म आकार असणाऱ्या वस्तू आपल्या डोळ्यांना दिसू शकत नाहीत. त्यामुळेच अशा वस्तू किंवा जीव बघण्यासाठी सूक्ष्मदर्शकाचा उपयोग केला जातो. पण सूक्ष्मदर्शकामधून दिसू शकणाऱ्या गोष्टींचीही अतीसूक्ष्म परिमाणे असतातच. वस्तूंची तोडमोड होते तेव्हा त्यांचे छोट्या-छोट्या तुकड्यांमध्ये विभाजन होते. अपघातात फुटलेल्या गाडीच्या काचा तुम्ही कधी बघितल्या आहेत का? किती बारीक चुरा होतो त्या काचांचा! अशा अनुभवांमधून हे समजते, की दिसणाऱ्या वस्तू अतिशय बारीक, सूक्ष्म, डोळ्यांना दिसू न शकणाऱ्या कणांनी तयार झालेल्या असतात. तंत्रज्ञान जेवढे प्रगत तेवढे वस्तूंचे अतिशय छोट्या कणांमध्ये विभाजन करण्याची आपली क्षमता जास्त!

**चला बोलूया!**

वस्तूंचे बारिक कणांत रूपांतर करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या घरगुती तंत्रज्ञानाची उदाहरणे सांगा. उदा. जाते, पाटा-वरवंटा, मिक्सर इत्यादी.

वैशेषिकांना हे लक्षात आले, की वस्तूंचे असे विभाजन आपण करत राहिलो, तर अंतिमतः आपण ज्यांचे विभाजन करणे शक्यच होणार नाही अशा अविभाज्य कणांपर्यंत पोहोचू. प्रत्यक्षात अशा कणांपर्यंत त्यांना पोहचता आले नाही, तरी त्यांच्या तर्कबुद्धीच्या झेपेमधून अशा कणांची शक्यता त्यांच्या लक्षात आली. त्या अविभाज्य कणांनाच त्यांनी 'परमाणू' हे नाव दिले. सगळ्या भौतिक वस्तू पृथ्वी, जल, अग्नि आणि वायू यांचे परमाणू एकत्र येण्यामधून निर्माण होतात, तर वस्तूंचा विनाश हे एकत्र आलेले परमाणू एकमेकांपासून विलग होण्यामुळे होतो. परमाणू स्वतः मात्र नित्य, शाश्वत असतात. म्हणजे ते निर्माणही होत नाहीत आणि त्यांचा विनाशही होऊ शकत नाहीत. ते कायमच अस्तित्वात असतात. थोडक्यात म्हणजे परमाणू हे नित्य आणि अविनाशी असतात. मात्र, त्यांच्यामधून उत्पन्न होणाऱ्या वस्तू अनित्य आणि नष्ट होऊ शकणाऱ्या असतात. वर उल्लेख केलेल्या चार महाभूतांखेरीज आकाश हे पाचवे महाभूत तसेच दिक्, काल, मनस आणि आत्मा अशी एकूण नऊ द्रव्ये विश्वाला आधारभूत आहेत असे वैशेषिकांचे मत आहे.




दृश्य जगाचे स्पष्टीकरण वैशेषिक ही नऊ द्रव्ये, त्यांचे गुणधर्म, क्रिया, त्यांच्यामधील समानता, त्यांची वैशिष्ट्ये आणि त्यांच्यामधील संबंध यांच्या संदर्भात करतात. वैशेषिक सत्तामीमांसेचे एक ठळक वैशिष्ट्य म्हणजे या स्पष्टीकरणात प्रारंभीच्या काळात ते फक्त अस्तित्वाची म्हणजे अस्तित्वात असणाऱ्या गोष्टींची चर्चा करत होते. पण नंतर त्यांनी अनस्तित्वाची म्हणजे अभावाचीही चर्चा केली. जगाबद्दलच्या आपल्या ज्ञानामध्ये 'काय आहे' याच्याच बरोबर 'काय नाही' याचाही समावेश असतोच. तुम्ही परीक्षेच्या जागी पोहोचता आणि एकदम लक्षात येते, की अरे अमुक एक मित्र किंवा मैत्रिण परीक्षेला आलेलीच नाही. सहलीला गेल्यावर अशा येऊ न शकलेल्या व्यक्तीचा अभाव आपल्याला जाणवतो. दुकानात आपल्याला हव्या असलेल्या वस्तू कधीकधी नसतात. जगाचा आपला अनुभव असा अस्तित्व आणि अनस्तित्व, भाव (असणे) आणि अभाव (नसणे), हे आहे आणि ते नाही या दोन्हींचा मिळून तयार होतो हे वैशेषिकांना ठळकपणे जाणवले आणि म्हणून त्यांनी अभावाची सविस्तर चर्चा केली. वैशेषिकांचा अंतिम सत्तेबद्दलचा विचार हा अनेकतत्त्ववादी आणि वास्तववादी आहे.

## सांख्य दर्शन

भारतीय परंपरेत द्वितत्त्ववादाची पद्धतशीर मांडणी सांख्य दर्शनाने केली आहे. सांख्यदर्शन वास्तववादही स्वीकारते. जडतत्त्व आणि चेतनतत्त्व स्वतंत्रपणे अस्तित्वात असतात असे सांख्यांचे मत आहे. ही दोन्ही तत्त्वे अनादी, अनंत आहेत. सांख्य चेतनतत्त्वाला 'पुरुष' असे संबोधतात. चैतन्य हा या पुरुषाचा केवळ एक गुणधर्म नाही, तर त्याचे सारस्वरूप आहे. पुरुष म्हणजे शुद्ध चैतन्य! या तत्त्वात जडाचा अंशही नसतो. त्यामध्ये कुठल्याही प्रकारचे परिवर्तन होत नाही. पुरुष अकर्ता असतो, म्हणजे तो कुठलीही कृती करत नाही. भौतिक वस्तूंच्या जगापलीकडे त्याचे अस्तित्व असते. बदल, कृतीशीलता, उत्पत्ती, विनाश ही सगळी जडतत्त्वाची लक्षणे आहेत.

सांख्य जडतत्त्वाला 'प्रकृती' म्हणतात. प्रकृतीचे सत्त्व, रज आणि तम असे तीन घटक असतात. सर्व जड, भौतिक वस्तू प्रकृतीपासून निर्माण होत असल्यामुळे सर्व वस्तूंमध्ये हे तीन घटक कमीअधिक प्रमाणात असतात. प्रकृतीच्या मूळ अवस्थेत हे तीनही साम्यावस्थेत असतात. म्हणजे कोणतेही तत्त्व इतरांवर कुरघोडी करत नाही. पुरुष प्रकृतीच्या संयोगाने ही साम्यावस्था बदलते आणि या तीन गुणांची घुसळण होते. मग क्रमाक्रमाने

पूर्ण दृश्य जग निर्माण होते. बुद्‌धी किंवा महत, अहंकार, मनस, ज्ञानेंद्रिये, कर्मेंद्रिये, पाच सूक्ष्म घटक (तन्मात्रा) आणि पाच स्थूल घटक (पंचमहाभूते) असा हा सूक्ष्माकडून स्थूलाकडे जाणारा प्रकृतीच्या उत्पत्तीचा क्रम आहे. सांख्य असे मानतात, की प्रलयाच्या काळात प्रत्येक घटक आपल्या मूळ रूपात परत येऊ लागतो आणि हळूहळू सगळे दृश्य जग पुन्हा एकदा प्रकृतीमध्ये विलय पावते. उत्पत्ती आणि विनाश या अवस्था पुन्हापुन्हा येतच राहतात.

भारतीय परंपरेतील काळाची कल्पना चक्राकार आहे. काळाच्या या चक्राकार किंवा वर्तुळाकार गतीमुळे विश्वामध्ये त्याच त्याच अवस्थांची एकाच क्रमाने पुनरावृत्ती होत राहते असे मानले जाते. भारतीय संस्कृतीतील 'युग' ही संकल्पना याच वर्तुळाकार कालसंकल्पनेशी निगडीत आहे.

**चला जाणून घेऊया!**

भारतीय परंपरेतील चार युगांची कल्पना माहिती करून घ्या. या परंपरेतील काळाच्या कल्पनेशी तिचा असलेला संबंध जाणून घ्या.

सांख्यांच्या सत्तामीमांसेचा थोडक्यात गोषवारा असा, की जडतत्त्व आणि चेतनतत्त्व स्वतंत्रपणे अस्तित्वात असून त्यांचे गुणधर्म परस्परविरुद्‌ध आहेत. जडात चैतन्याचा अंशही नाही, तसाच चैतन्यात जड-द्रव्य कणभरही नाही. मनुष्यामध्ये मात्र शरीर आणि आत्मा; म्हणजे जड, भौतिक द्रव्य आणि चैतन्य हे दोन्ही एकत्र आलेले दिसतात. मग मनुष्य वास्तविक काय आहे? जडरूप की चैतन्यरूप? याचा विचार आपण तिसऱ्या पाठात करू.

## अद्‌वैत वेदांत दर्शन

हे सर्व विश्व मुळात एकच आहे, त्यात अस्तित्वात असणारी प्रत्येक गोष्ट म्हणजे एका अत्यंत विराट पुरुषाच्या देहाचाच एक भाग आहे, अशी कल्पना भारतीय परंपरेत अगदी पूर्वीपासून म्हणजे ऋग्वेदापासून आढळते. विश्वाच्या या एकत्वाच्या कल्पनेचा परिपोष उपनिषदांमध्येही झालेला दिसतो. विश्वात सर्वत्र भरून असलेल्या या एकमेव सत्‌ तत्त्वाला 'ब्रह्म' म्हटले गेले.

आदि शंकराचार्यांनी एकतत्त्ववादाच्या केलेल्या विवरणानुसार जगात अनुभवाला येणारी अनेकता, वैविध्य, परिवर्तन या गोष्टी म्हणजे निव्वळ भास असून, केवळ ब्रह्मच नित्य, शाश्वत, अपरिवर्तनीय असे अस्तित्व आहे. अस्तित्वात जे काही आहे, ते फक्त ब्रह्मच आहे, त्यात कुठलाही बदल खरे तर होत नाही. आपल्याला बदल झाल्यासारखे वाटते, पण तो प्रत्यक्षात होतच नाही. आपल्याला आपण अनेक गोष्टी/वस्तू अनुभवतो आहोत असे वाटते, पण वास्तवात सारे काही एकच आहे. अनेकत्व अस्तित्वातच नाही. एवढेच नव्हे, तर 'आपण' आणि आपल्याला अनुभवाला येणारे जे काही असेल, तेही वस्तुतः वेगळे नाहीच.

तुम्हांला सगळ्यांना स्वप्ने पडतात ना? स्वप्नात आपण अनेक व्यक्तींना भेटतो, अनेक वस्तू बघतो, त्यांचा अनुभव घेतो. पण स्वप्नात अनुभवलेले जग खरे नसते. तसेच स्वप्नाचे अस्तित्व आपल्या अस्तित्वापेक्षा वेगळे नसते, हे तुम्हांला माहीतच आहे. स्वप्न बघत असताना आपल्याला ते खरेच वाटते. जाग आल्यावर आपल्याला कळते, की जे अनुभवत होतो, ते तर फक्त स्वप्न होते, वास्तव नव्हे. त्याचप्रमाणे जागेपणी आपण जे बदल, वैविध्य अनुभवतो ती केवळ माया आहे, भास आहे हे आपल्याला सत्‌चे यथायोग्य ज्ञान झाल्यावर कळते. या ज्ञानालाच 'ब्रह्मज्ञान' असे म्हटले जाते.

शंकराचार्य सत्तेच्या तीन पातळ्यांचे वर्णन करतात. स्वप्नामध्ये आपण जे अनुभवतो, त्याला 'प्रातिभासिक' सत्‌ म्हणतात. जागेपणी येणारा अनुभव व्यावहारिक सत्‌चा असतो. ते व्यावहारिक पातळीवरून खरेच असते, पण ज्याप्रमाणे जागे झाल्यावर स्वप्नातले जग मिथ्या ठरते, त्याप्रमाणे ब्रह्मज्ञान झाल्यावर व्यावहारिक सत्‌देखील त्या पातळीवरून मिथ्या ठरते. सत्‌च्या त्या अंतिम पातळीला 'पारमार्थिक' सत्‌ असे शंकराचार्य म्हणतात. हे पारमार्थिक सत्‌ मात्र कधीच खोटे ठरत नाही.

प्रातिभासिक सत्‌ → व्यावहारिक सत्‌ → पारमार्थिक सत्‌

↓ स्वप्नातील अनुभव | ↓ जागेपणीचे अनुभव | ↓ ब्रह्मज्ञान

गेल्या वर्षी आपण 'दिसतं तसं नसतं' या पाठात

शुक्तिरजत–न्याय आणि रज्जूसर्प–न्याय ही जी उदाहरणे पाहिली ती हाच मुद्दा स्पष्ट करण्यासाठी दिली गेली आहेत.

ब्रह्मामध्ये कुठलेही गुणधर्म नाहीत, त्याला कुठलाही आकार नाही, म्हणून त्याला निर्गुण, निराकार म्हटले जाते. आपल्या अज्ञानामुळे आपल्याला एकमेव सत् असणाऱ्या ब्रह्माचा अनुभव येत नाही, तर गुणधर्मांनी युक्त, आकार असणाऱ्या अशा वस्तूंचा अनुभव येतो. ब्रह्म हे चैतन्यरूप आहे. हेच चैतन्य आपल्यामध्येही आहे. आपला आत्मा, आपले चैतन्य हेच ब्रह्म आहे हे अनुभवाला आले की आपल्याला ब्रह्मज्ञान होते असे अद्‌वैत वेदान्ताचे मत आहे. थोडक्यात, अद्‌वैत वेदान्त चिद्‌वादी आणि एकतत्त्ववादी आहे.

## पाश्चात्त्य तत्त्वज्ञानातील सत्तामीमांसा

सॉक्रेटिसपूर्व काळातील तत्त्वज्ञांच्या एका परंपरेला विश्वाचे अंतिम स्वरूप जाणणे खूप महत्त्वाचे वाटत होते. या तत्त्वज्ञांनी अंतिम सत्‌बद्‌दल वेगवेगळ्या कल्पना मांडल्या. त्यांपैकी थेलिस, अॅनॅक्झिमँडर, अॅनॅक्सिमिनस, अॅनॅक्सिगोरस, पारमेनिडिस, हेराक्लिटस इत्यादी एकतत्त्ववादी होते. मात्र ते एकतत्त्व नक्की कुठले होते, याबद्‌दल त्यांनी वेगवेगळी मते मांडलेली आहेत. मागच्या वर्षीच्या पुस्तकात तुम्ही त्यांचा उल्लेख वाचल्याचे तुम्हांला आठवते ना? आजच्या काळात, ही मते बरोबर होती की चूक यापेक्षा महत्त्वाचे आहे, ते ही मते मांडण्यामागचे या तत्त्वज्ञांचे चिंतन! हा पाश्चात्त्य तत्त्वचिंतनाचा अगदी आरंभीचा काळ होता. सुमारे अडीच हजार वर्षांपूर्वी या तत्त्वज्ञांनी विश्वाचे जे निरीक्षण केले, त्यावर चिंतन केले त्याचा परिपाक म्हणजे ही मते.

मागील वर्षी सत्तामीमांसेची ओळख करून घेताना आपण नित्य आणि अनित्य या सत्‌संबंधीच्या दोन संकल्पना जाणून घेतल्या आहेत. वर उल्लेखलेल्या तत्त्वज्ञांपैकी पारमेनिडिसने नित्यत्वाला 'सत्' चे व्यवच्छेदक लक्षण मानले. ज्या कशाबद्‌दल आपण ते 'नाही', 'नव्हते' किंवा 'नसेल' असे म्हणू शकतो, ते खरेखुरे अस्तित्व नाही असे त्याचे मत होते. जे 'आहे' ते सदैव, निरंतरपणे अस्तित्वात असते. त्याच्यासंबंधी 'नसणे' या क्रियापदाचा वापरच शक्य नाही. या भूमिकेमुळे पारमेनिडिसने गती, बदल, काळ, भेद यांपैकी काहीच सत् नाही असे प्रतिपादन केले. बदल होताना जे नसते ते अस्तित्वात येते, तर जे असते, ते नाहीसे होते. बदल 'नसण्याशी' संबंधित असल्यामुळे त्याला खरे अस्तित्व नाही. काळाची कल्पना बदलाशी निगडित आहे. परिवर्तन शक्य नसलेल्या विश्वात काळही असणे शक्य नाही.




**कालमापनाच्या विविध पद्धती**

गती असेल, तर गतीमुळे वस्तू आपल्या जागा बदलतात. आपण वस्तू एका ठिकाणावरून दुसरीकडे हलवतो व स्वतःही इकडेतिकडे जात असतो. तर्कदृष्ट्या पाहिले तर हालचालीसाठी रिकाम्या जागेची, म्हणजे पोकळीची गरज असते. पण पोकळी म्हणजे जिथे काहीही नाही/नसते अशी जागा. हे लक्षात घेता, पोकळी किंवा रिकामे अवकाश अस्तित्वात असू शकत नाही. पोकळी नाही, तर गती नाही, गती नाही तर बदल नाही. वस्तू–वस्तूंमधला भेद असणे म्हणजे काय याचे याचप्रमाणे विश्लेषण केले, तर भेदही वास्तविक नाहीत असे म्हणावे लागते. कारण दोन वस्तूंमध्ये भेद असणे, म्हणजे त्यांमध्ये साम्य नसणे. पेन आणि पेन्सिल यांत आपण फरक करतो, कारण पेन जसे असते, तशी पेन्सिल नसते आणि पेन्सिल जशी असते, तसे पेन नसते.

या प्रकारच्या युक्तिवादांचा वापर करून पारमेनिडिसने असे प्रतिपादन केले, की जे सत् आहे, अंतिम मूलतत्त्व आहे ते एकमात्र आहे; संपूर्ण आहे. त्यामध्ये कुठेही पोकळी नाही, 'नसतेपण' नाही. ते नित्य आणि शाश्वत आहे. ते निर्माण झालेले नाही, ते नष्टही होणार नाही. म्हणजेच त्याला आरंभही नाही आणि अखेरही नाही. केवळ

तर्कबुद्धीचा उपयोग करून एखादा सिद्धांत कसा रचता येतो याचे पारमेनिडिसचे चिंतन हे उत्कृष्ट उदाहरण आहे.

हेरॅक्लिटस या तत्त्वज्ञाने मात्र पारमेनिडिसच्या पूर्ण विरुद्ध भूमिका घेतली. त्याच्या मते, 'सत्'चे मूळ लक्षण परिवर्तन हेच आहे. सत् हे सतत परिवर्तनशील असते. विश्व हे अनित्य स्वरूपाचे आहे. अग्नीची ज्वाला सतत लवलवत असते. एकीकडे इंधन 'स्वाहा' करतानाच धूर, राख उत्पन्न करते. अग्नीच्या या अशा स्वरूपामुळेच त्याने अग्नीला मूलद्रव्य मानले.




'एकाच नदीत दोन वेळा पाऊल टाकता येत नाही' हे त्याचे वचन सुप्रसिद्ध आहे. याचा अर्थ असा, की विश्वात सातत्य असले तरी शाश्वतता, नित्यता नाही. विरोधी तत्त्वांच्या संघर्षामधून, ताणांमधून विश्वाला काहीशी स्थिरता लाभते.

हा विचार स्पष्ट करण्यासाठी हेरॅक्लिटस धनुष्याचे उदाहरण देतो. तुम्ही कधी खेळातले धनुष्य तयार केले आहे? निदान हाताळले तरी आहे? धनुष्याच्या दोरीच्या दोन्ही टोकांवर जोपर्यंत समान ताण असतो, तोपर्यंत त्याचा वक्राकार टिकून राहतो. ताण कमी-जास्त झाला, की दोरी तुटते आणि धनुष्य सरळ होते. म्हणजे धनुष्याचा वक्राकार दोन विरुद्ध, पण समान ताणांमुळे अस्तित्वात येतो आणि टिकतो. अनित्यता आणि संघर्षातून येणारे स्थैर्य हे 'सत्' चे गुणधर्म आहेत. पारमेनिडिसप्रमाणे हेरॅक्लिटसही एकतत्त्ववादी असला, तरी अंतिम 'सत्'च्या स्वरूपाबद्दल मात्र त्यांची मते पूर्ण विरोधी आहेत.

जगात प्रत्यक्ष अनुभवायला येणारी अनित्यता आणि सत्‌ला नित्यत्व असायलाच हवे या मताचा प्रभाव यांचा मेळ घालण्याचे अनेक प्रयत्न झाले. सॉक्रेटिसपूर्व काळात या संदर्भात एम्पिडोक्लिस आणि डेमॉक्रिटस यांचा अनेकतत्त्ववाद लक्षणीय आहे. एम्पिडोक्लिसने पृथ्वी, जल, अग्नी आणि हवा असे चार मूलघटक मानले. आकर्षण आणि विकर्षण या दोन बलांमुळे हे घटक एकत्र येतात आणि दूर जातात. यांमधूनच जगाची जडणघडण होते असे त्याचे मत होते.

डेमॉक्रिटस आणि त्याचे गुरू ल्युसिपस जडवादी होते. जड वस्तूंचे विभाजन करण्याच्या प्रक्रियेची परिणती भौतिक द्रव्याच्या अविभाज्य कणापर्यंत म्हणजे अणूपर्यंत पोहचण्यात होईल हे त्यांच्या लक्षात आले. विश्वात असे मोजता येणार नाहीत एवढ्या संख्येने अणू असतात. अणू मुळातच गतिशील असतात. विश्वाच्या पोकळीत ते सतत भिरभिरत असतात. ते वेगवेगळ्या आकारांचे आणि लहान-मोठे असतात. त्यांच्यामध्ये मुळात गुणात्मक फरक नसतो. पण सततच्या गतिशीलतेमुळे आणि वेगवेगळे आकार असल्यामुळे ते एकमेकांशी जोडले जातात आणि त्यांमधून वस्तू निर्माण होतात. या वस्तूंचे मात्र निरनिराळे गुणधर्म असतात. अणू एकमेकांपासून यांत्रिक क्रिया-प्रतिक्रियांमुळे वेगळे झाले की वस्तू नष्ट होतात. विश्वातल्या या 'घडामोडी' कुठल्याही हेतूसाठी होत नाहीत, त्यामागे कुठलाही उद्देश नाही असे डेमॉक्रिटस मानत असे.



**चला लिहूया!**

वैशेषिकांची 'परमाणू' संकल्पना व डेमॉक्रिटसची 'अणु'संकल्पना यांची तुलना करा.

## प्लेटो

सॉक्रेटिसपूर्वीच्या पाश्चात्त्य तत्त्वज्ञानात 'सत्'च्या स्वरूपाबद्दल दोन मुख्य प्रवाह आढळतात. एका मतानुसार जे बदलते, अनित्य आहे ते अंतिम सत् नव्हे. अंतिम सत् अविकारी (न बदलणारे), अविनाशी (नष्ट न होणारे) आणि शाश्वत असते. दुसऱ्या मतानुसार, अनित्यता, निरंतर परिवर्तनशीलता हेच 'सत्'चे वास्तविक रूप आहे. हे विश्व अनित्य आहे, त्यात सतत बदल होत असतात. हे एकच न बदलणारे नित्य सत्य आहे. सॉक्रेटिसचा शिष्योत्तम प्लेटो याने आपल्या दोन जगांच्या उपपत्तीमध्ये या दोन्ही तत्त्वांची सांगड घालण्याचा प्रयत्न केला.

आपल्या सभोवतालचे जग हे सतत बदलत असते

ही आपल्या नेहमीच अनुभवाला येणारी गोष्ट आहे. ती कशी नाकारणार? त्यामुळे हे जग वास्तव आहे असेच मानले पाहिजे. पण प्लेटोच्या मते या दृश्य जगाचे अस्तित्व तो ज्याला आकारांचे (forms), सारतत्त्वांचे जग म्हणतो त्या जगावर अवलंबून असते. त्या जगात अनेक विशिष्ट वस्तूंमध्ये समान असणारी सारतत्त्वे, सामान्ये असतात. ही सारतत्त्वे अवकाश-काल यांच्या पलीकडे असतात. ती निर्माणही होत नाहीत आणि नष्टही होत नाहीत. ती नेहमीच अस्तित्वात असतात आणि त्यांच्यामध्ये काहीही बदल होत नाहीत. आपण ज्यांना वृक्ष म्हणतो, ते किती वेगवेगळ्या आकार-प्रकारांचे, गुणधर्मांचे असतात. त्या सगळ्या तऱ्हेतऱ्हेच्या विशिष्ट वृक्षांमध्ये काहीतरी समान असल्याखेरीज तर आपण त्यांना एका सामान्य नामाने संबोधणार नाही. कुठले 'सामान्य' त्या सगळ्यांमध्ये असते - वृक्षत्व.

**चला बोलूया!**

सामान्य वा सारतत्त्वाची उदाहरणे शोधा. प्लेटोच्या सारतत्त्वांच्या जगाची चर्चा करा.

आपल्या भाषेतल्या सगळ्या सामान्य नामांचा निर्देश अशा सारतत्त्वांकडे असतो ती बुद्धीने कळतात. पण ज्ञानेंद्रियांना त्यांचा अनुभव येत नाही. हे सारतत्त्वांचे जग हे अस्सल, खरेखुरे, वास्तविक असते, तर अनुभवाला येणारे हे रोजचे जग ही केवळ त्या जगाची अनुकृती आहे, सावली किंवा प्रतिबिंब आहे. तसे म्हटले तर सावली आणि प्रतिबिंबेही खरीच असतात. आपण आरशात बघताना आपले प्रतिबिंब खोटे आहे असे कधी तुम्हांला वाटले आहे का? पण सावली काय किंवा प्रतिबिंब काय त्यांचे अस्तित्व ज्याची ती सावली किंवा प्रतिबिंब आहे त्यावरच अवलंबून असते ना? त्याचप्रमाणे या जगाचे अस्तित्व त्या आकारांच्या जगावर अवलंबून असते असे प्लेटोचे म्हणणे आहे.

### ॲरिस्टॉटल

प्लेटोचा शिष्य ॲरिस्टॉटल याने मात्र त्या सारतत्त्वांच्या स्वतंत्र जगाची कल्पना पूर्ण नाकारली. आपण अनुभवतो ते जग हे एकमेव जग आहे, ते कायमच अस्तित्वात होते, आहे आणि असणार आहे, असे त्याला वाटते. जगात बदल होतात. या बदलांचे प्रकार आणि त्यांची कारणे यांची त्याने सविस्तर चर्चा केली आहे. ॲरिस्टॉटलचा कारणतासिद्धांत आपण नंतर अभ्यासणारच आहोत. ॲरिस्टॉटलच्या सत्तामीमांसेत 'द्रव्य' ही संकल्पना मध्यवर्ती आहे. निर्मिती आणि विनाश या दोन मूलभूत बदलांखेरीजचे इतर सर्व बदल हे द्रव्यात होतात असे त्याचे प्रतिपादन आहे. वैशेषिकांप्रमाणेच ॲरिस्टॉटलही 'सत्' चा अभ्यास करण्यासाठी वेगवेगळ्या कोटी मांडतो. जे जे काही अस्तित्वात असते त्याची विभागणी द्रव्य, गुण, परिमाण, संबंध, स्थळ, काळ, स्थिती, क्रियाशीलता, निष्क्रियता, परिग्रह या दहा कोटींमध्ये म्हणजे प्रकारांत करता येते. वैशेषिकांप्रमाणेच या सर्व कोटींमध्ये द्रव्य ही कोटी सर्वांत महत्त्वाची असे त्याचे मत आहे.




### आधुनिक तत्त्वज्ञान

#### देकार्त

मध्ययुगीन आणि आधुनिक तत्त्वज्ञानातही सत्तामीमांसेमध्ये द्रव्यसंकल्पना महत्त्वाची मानली गेली. आपण आधी पाहिल्याप्रमाणे द्रव्य ही कोटी इतर कशावर अवलंबून नसते, पण इतर कोटी मात्र त्यांच्या अस्तित्वासाठी द्रव्यावर अवलंबून असतात. आधीचेच उदाहरण घ्यायचे, तर नारिंगी रंग, गोल आकार, आंबट-गोड चव या सगळ्या गोष्टी संत्र्याच्या असतात. रंग, आकार, वस्तुमान, चव हे सगळे कशाचे तरी असल्याखेरीज अस्तित्वातच असू शकणार नाही.

'आधुनिक तत्त्वज्ञानाचा जनक' असे ज्याला म्हटले जाते, तो फ्रेंच तत्त्वज्ञ रेने देकार्त याने 'जे स्वयंभूपणे अस्तित्वात असते ते द्रव्य' अशी द्रव्याची व्याख्या केली.

गेल्या वर्षी तुम्ही देकार्तच्या संशयपद्धतीचा अभ्यास केलेलाच आहे. या संशय पद्धतीच्या आधारे देकार्त 'मी विचार करतो म्हणून मी आहे' या निःसंशयपणे सत्य असलेल्या निष्कर्षापर्यंत पोहोचला. मात्र हा 'मी' म्हणजे नक्की कोण याचा सखोल विचार करताना देकार्तने द्‌वितत्त्ववाद स्वीकारला. त्या काळात प्रचलित असलेल्या समजुतींनुसार विचार करणे आणि त्याच्याशी संबंधित क्रिया या शरीराच्या नव्हे तर मनाच्या असतात. बुद्‌धी, भावना, इच्छा या सगळ्यांचे मूळ मनात असते. याचा अर्थ असा, की ज्या 'मी' चे अस्तित्व देकार्तने निःसंशयपणे सिद्‌ध केले, तो 'मी' म्हणजे मन होते. प्रत्यक्षात मात्र आपण 'मी' हा शब्द वापरतो, तो शरीर आणि मन यांनी मिळून आपले जे अस्तित्व असते त्याच्यासाठी.

देकार्तने असे मत मांडले, की शरीर आणि मन ही दोन स्वतंत्रपणे अस्तित्वात असलेली द्रव्ये आहेत. शरीर हे जडद्रव्याचे बनलेले असते, भौतिक स्वरूपाचे असते. जडद्रव्य काल आणि अवकाश दोन्हींमध्ये अस्तित्वात असते, ते ज्ञानेंद्रियांच्याद्‌वारे अनुभवाला येते. हे जडाचे गुणविशेष आहेत. याउलट, चैतन्य हे ज्याचे स्वरूप आहे ते मन किंवा आत्मा मात्र अवकाशात नसते, तसेच ते बाह्यइंद्रियांच्या अनुभवाला येत नाही. विश्वात जडद्रव्य आणि चेतनद्रव्य अशी दोन परस्परविरोधी गुणधर्म असणारी स्वतंत्र द्रव्ये अस्तित्वात आहेत असा देकार्तचा निष्कर्ष होता. मात्र मानवाच्या ठिकाणी ती परस्पर आंतरक्रियेने एकत्र नांदतात. इथे हे ध्यानात घ्यायला हवे की जडद्रव्य आणि चेतनद्रव्य ही एकमेकांपासून स्वतंत्र आहेत. त्यांचे अस्तित्व एकमेकांवर अवलंबून नाही. मात्र ती स्वयंभू नाहीत. या दोन्हींची निर्मिती ईश्वराने केलेली आहे. त्यामुळे वर देकार्तने दिलेली द्रव्याची व्याख्या पाहिली तर केवळ ईश्वरालाच ती लागू पडते. ईश्वर निर्मित विश्वात मात्र परस्परांपासून स्वतंत्र या मर्यादित अर्थाने जड आणि चेतन यांना 'द्रव्ये' म्हणून संबोधता येते. देकार्तची सत्तामीमांसा द्‌वितत्त्ववाद आणि वास्तववाद मानणारी आहे.

### स्पिनोझा

देकार्तनंतर त्याच बुद्‌धिवादी पठडीतील स्पिनोझा या तत्त्वज्ञाने मात्र देकार्तचा द्‌वितत्त्ववाद नाकारून एकतत्त्ववादाची मांडणी केली. त्यासाठी त्याने जो युक्तिवाद केला, तो देकार्तने द्रव्याची जी व्याख्या केली, तिच्यावरच आधारित होता. स्पिनोझाने असे मत मांडले की द्रव्याचे अस्तित्व जर इतर कशावरही अवलंबून नसते, तर त्याचे पूर्ण ज्ञान मिळवण्यासाठी इतर कशाचेही ज्ञान असण्याची आवश्यकता भासता कामा नये. आपल्या अनुभवाला मात्र असे येत असते, की कुठल्याही एका वस्तूची पूर्ण माहिती घ्यायची असेल, तर तिच्याशी संबंधित इतर वस्तूंचीही माहिती मिळवावी लागते. पेन म्हणजे काय, हे आपल्याला जाणून घ्यायचे असेल, तर पेन ज्यावर लिहिते तो कागद, जे लिहिले जातात ते शब्द किंवा भाषा, ते वाचू शकणारे लोक हे सगळे आपल्याला ठाऊक असावे लागते. ही यादी कितीही लांबवता येऊ शकते.

थोडक्यात, जगातील सर्व वस्तू प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरित्या एकमेकांशी संबंधित असतात असे दिसते. त्याचप्रमाणे त्या एकमेकींवर अवलंबूनही असतात. या सर्व वस्तू, किंबहुना जे जे काही अस्तित्वात आहे, ते एकाच मूळ, अमर्याद, अनादी, अनंत अशा सत् तत्त्वाचे किंवा द्रव्याचे अंश आहेत, असे प्रतिपादन स्पिनोझाने केले. या मूळ द्रव्याला त्याने 'ईश्वर' किंवा 'निसर्ग' असे नाव दिले. हे एकच एक तत्त्व संपूर्ण विश्वात आणि त्यातील प्रत्येक गोष्टीत भरून राहिले आहे असे स्पिनोझाचे प्रतिपादन होते. हे मत सर्वेश्वरवाद म्हणूनही ओळखले जाते.

### लाईब्निझ

वर पाहिलेली द्रव्याची संकल्पना स्वीकारणारा तिसरा तत्त्वज्ञ म्हणजे लाईब्निझ. याने देकार्तचा द्‌वितत्त्ववाद आणि स्पिनोझाचा एकतत्त्ववाद हे दोन्ही नाकारून अनेकतत्त्ववादाची मांडणी केली. प्राचीन अणूवाद्यांप्रमाणे लाईब्निझनेही असा युक्तिवाद केला, की दृश्य वस्तूंचे विभाजन करत गेल्यास आपण ज्याचे पुढे विभाजन होऊच शकणार नाही अशा मूलद्रव्यांपर्यंत म्हणजे अणूंपर्यंत पोहचू. मात्र हे अणू पूर्णतः जड किंवा

भौतिक स्वरूपाचे नसून त्यामध्ये अगदी प्राथमिक पातळीवरची जाणीव/चैतन्यही असते असे मत त्याने मांडले. या अणूंना त्याने *monad* असे नाव दिले. 'मोनाड' या शब्दाला मराठीत 'चिदणू' हा प्रतिशब्द वापरला जातो.

जगात असे असंख्य 'चिदणू' आहेत आणि सर्व निर्जीव आणि सजीव या चिदणूंच्या एकत्र येण्यातून तयार होतात. सगळे विश्वच या चिदणूंची एक श्रेणीबद्ध रचना आहे. यात सर्वश्रेष्ठ स्थान हे परमेश्वराचे आहे. त्यानेच सर्व चिदणूंची निर्मिती केली आहे. एवढेच नव्हे, तर गणिती नियमानुसार या असंख्य चिदणूंच्या तत्वतः असंख्य रचना शक्य असतानाही जी सर्वोत्तम रचना आहे, ती ईश्वराने या विश्वाच्या रूपात साकारली आहे असे लाईब्निझने प्रतिपादन केले. अशा प्रकारे लाईब्निझ अनेकतत्त्ववाद आणि चिद्‌वादाची सांगड घालतो असे म्हणता येईल.

### हेगेल

पारमेनिडिस आणि स्पिनोझा यांच्याप्रमाणे हेगेलने देखील एकतत्त्ववादाचा पुरस्कार केला. पण त्याचा एकतत्त्ववाद त्या दोघांपेक्षा वेगळ्या स्वरूपाचा आहे. पारमेनिडिसच्या अंतिम सत्‌मध्ये गती, बदल, काल यांना स्थानच नाही. स्पिनोझाचे मत असे होते, की मूलतत्त्वाचे असंख्य गुणधर्म आहेत आणि त्या सगळ्यांचे ज्ञान मनुष्याला होणे अशक्य आहे; कारण माणसाच्या बुद्धीला मर्यादा आहेत. विश्वातील सगळ्या गोष्टी एकमेकांशी संबंधित आणि एकमेकांवर अवलंबून आहेत. कारण त्यांच्या मुळाशी एकच सत् तत्त्व आहे. सगळे विश्व या सत् तत्त्वापासूनच निर्माण झाले आहे, असे हेगेलही मानतो. या तत्त्वाला तो 'केवल' असे संबोधतो.

'केवल' म्हणजे ज्याचे अस्तित्व इतर कशाच्याही सापेक्ष नसते, जे निरपेक्षपणे असते ते! हे 'केवल' जड नसून चेतन आहे असेही हेगेलचे मत आहे; त्याला तो बुद्धिरूपही मानतो. थोडी वेगळी भाषा वापरून सांगायचे तर हे 'केवल' म्हणजे जणू, जी बुद्धिरूप आहे किंवा बुद्धिशील आहे अशी मूळ शक्ती किंवा ऊर्जा आहे. ती स्वभावतःच गतिशीलही आहे. त्यामध्ये अनेक क्षमता, शक्यता सुप्त अवस्थेत आहेत. या क्षमतांचे पूर्ण प्रगटीकरण करून स्वतःलाच संपूर्णपणे जाणून घेणे हे या 'केवला'चे साध्य आहे. त्यासाठीच्या खटाटोपापासून अवघे विश्व आकाराला आले आहे. हे चैतन्यच जडाचे रूप घेऊन प्रगट होते आणि नंतर क्रमाक्रमाने विश्वाचा विकास होत जातो. या विकासाचा एक विशिष्ट आराखडा असतो. त्याला 'द्वंद्वविकास' असे म्हणतात. म्हणजे दोन विरोधी तत्त्वांच्या संघर्षातून एक तिसरे, अधिक चांगले तत्त्व निष्पन्न होते. त्यानंतर त्या तत्त्वाच्या विरुद्ध स्वरूपाचे तत्त्व निर्माण होऊन पुन्हा या दोन तत्त्वांचा संघर्ष होतो आणि नवे तत्त्व जन्म घेते. याच नमुन्यानुसार विश्वाचा विकास होत राहतो असे हेगेलचे मत आहे.

**चला बोलूया!**

अद्वैत वेदांत आणि हेगेलच्या एकतत्त्ववादी आणि चिद्‌वादी सत्तामीमांसेतील साम्य व भेदांची चर्चा करा.

### वैज्ञानिक दृष्टिकोन

माणसाने जग समजावून घेण्याचा प्रयत्न पूर्वीपासून केला. जग अनेकविध वस्तुमात्रांनी भरलेले आहे. परंतु त्यांच्यात काही साम्य आहे का? भेद असेल तर तो कशाने उद्‌भवतो? वरवर वेगळ्या दिसणाऱ्या वस्तुमात्रांचे मूळ एक असेल का? असे प्रश्न सुरुवातीच्या काळात निर्माण झाले. विश्वासंबंधीच्या अपार कुतूहलातून हे प्रश्न निर्माण झाले होते. याची उत्तरे शोधताना वेगवेगळ्या पद्धती वापरल्या गेल्या. अनेकदा स्वानुभवातून ती उत्तरे शोधण्याचा प्रयत्न झाला, तर कधी अनुभवाला कल्पनेची जोड देऊन ही उत्तरे शोधली गेली. काही वेळा प्रत्यक्ष प्रयोग केले गेले. आपण आताच्या काळातही करतो असे अगदी साधे साधे प्रयोग. म्हणजे पारा वापरून वायुभारमापक बनवणे, उंचावरून पडणाऱ्या वस्तूंचा वेग मोजणे इत्यादी. यातून प्रयोगाधिष्ठित उत्तरे मिळू लागली. प्रयोग केल्याने जे निष्कर्ष हाती आले ते सर्वांना पडताळून बघता येतील असे होते. त्यामुळे असे ज्ञान वस्तुनिष्ठ म्हणून गणले जाऊ लागले.

यथावकाश, या प्रयोगांच्या साधनांत अधिकाधिक अचूकता येत गेली. वस्तुनिष्ठ ज्ञान मिळवण्यासाठी साधने आणि प्रयोग अनिवार्य ठरले. अशा तऱ्हेने

वस्तुनिष्ठ सत्याचा अभ्यास करण्याच्या पद्धतीला विज्ञान किंवा विज्ञानाची पद्धती म्हणून ओळखले जाऊ लागले. 'काय आहे त्याचा शोध' हे मूळ उद्दिष्ट कायम होते, परंतु विज्ञानाची वाटचाल जशी पुढे चालू राहिली त्यात प्रश्न अधिक नेमके होत गेले. एका प्रश्नाचे उत्तर शोधताना पुढचे प्रश्न समोर येत राहिले. स्थूल पदार्थांचे वर्तन तपासताना अणुपातळीवर वेगळी घडामोड चालते असे दिसून आले.

साधने जशी बदलली तसे त्याबरोबर समोर येणारे विश्वाचे रूप नवनवीन दर्शन घडवत राहिले. यातल्या प्रत्येक नव्या वस्तू (entity) अथवा घटिताला पूर्वीपासून काही नाव असणे शक्यच नव्हते. हे नवीन ज्ञान होते. त्यासाठी नव्या परिभाषेची गरज होती. उदाहरणार्थ, अणुकेंद्रक असे काही प्रत्येक अणूच्या आत असते याची सूक्ष्मदर्शक आणि अन्य साधनांखेरीज कल्पना करणे अशक्य होते. अशी नवी परिभाषा विज्ञानाने वेळोवेळी स्वीकारलेली आहे. काही वेळा मूळच्या परिभाषेशी तिचे तंतोतंत साम्य दिसते. तर काही वेळा शब्द तोच राहिला असला तरी अर्थाच्या छटेत फरक पडलेला असतो. कण, अणू हे शब्द फार पूर्वीपासून वापरले गेले आहेत परंतु आता आपण त्याचा जो अर्थ जाणतो तो आणि आधीचा अर्थ यांत तपशिलाचा फरक मोठा आहे. काही वेळा आधीची परिभाषा कालबाह्य झाली आहे. 'इथर' *(ether)* हे त्याचे एक उदाहरण. आपण ज्याला मन किंवा कधीकधी हृदय म्हणतो तेव्हा खरे म्हणजे मेंदूबद्दल बोलत असतो. या प्रकारचे बदल विज्ञानाने स्वीकारले. या कारणाने परिभाषा वापरताना जुन्यानव्याची गल्लत होऊ शकते. त्यामधून वैचारिक गोंधळ होऊ शकतो. म्हणून अशी चुकीची तुलना करणे आपण टाळले पाहिजे.



**चला लिहूया!**

सत्तामीमांसेतील जे प्रश्न विज्ञानाने सोडवलेले नाहीत असे तुम्हांला वाटते अशा प्रश्नांची यादी सहाध्यायींच्या मदतीने तयार करा.

"काय आहे"? या प्रश्नाचे उत्तर विज्ञानात आताच्या काळात कसे दिले जाते? आपल्या सभोवतालचे विश्व सूक्ष्म कणांचे (molecule, atom, ion, photon) बनलेले आहे. त्यांच्या अस्तित्वामुळे चार प्रकारची बले किंवा forces उद्भवतात. ती बले आहेतः गुरूत्वाकर्षण बल, विद्युतचुंबकीय बल व दोन केंद्रकीय बले. पदार्थांचे गुणधर्म व त्यांच्यातील प्रक्रिया, सजीवांची वाढ व वर्तणूक यांवर या बलांचा प्रभाव दिसून येतो. आपण यंत्रे व उपकरणे तयार करतो व वापरतो. त्यांचे कार्य देखील निसर्ग नियमांना अनुसरूनच चालते. म्हणूनच निसर्ग आणि त्यांचा मानवी जीवनावर होणारा परिणाम समजून घेणे महत्त्वाचे आहे. या बलांमुळे सूक्ष्म कणांची हालचाल होते. या हालचालींस आपण ऊर्जा म्हणतो. या परिभाषेत सध्याचे विज्ञान सत्तामीमांसेतील मूळ प्रश्नाचे उत्तर देते.

अर्थात ही केवळ ओळख आहे. विज्ञानाच्या अनेक शाखा 'काय आहे' या प्रश्नाचा मागोवा घेत आहेत. त्यातून काही महत्त्वाचे नियम आपल्या हाती लागले आहेत. यांना आपण वैश्विक निसर्गनियम असे संबोधतो. असे नियम हाती लागणे ही विज्ञानाची मोठी झेप आहे.

'काय आहे' या संदर्भातील विज्ञानविचार आपण पाहिला. या विचाराचा परामर्श, यासंबंधीच्या नीतीविषयक परामर्शाशिवाय अपूर्ण आहे.

प्रश्न असा आहे, की माणसाचा उत्तरे मिळवण्याचा खटाटोप नेमका कधी थांबतो, थांबतो की नाही, आपल्याला हवे ते उत्तर मिळाले असे त्याला केव्हा वाटते याविषयी प्रश्न पडावेत अशी स्थिती विज्ञानाच्या वाटचालीत निर्माण होताना दिसते. भौतिक द्रव्य आणि ऊर्जा यासंबंधात महत्त्वाचे नियम हाती आलेले असताना त्यांचा मानवी जीवनावर नेमका कसा प्रभाव पडतो याची चर्चा फारशी होताना दिसत नाही. त्याऐवजी विश्व कोणत्या स्फोटापासून निर्माण झाले आणि ते कधी पूर्ण प्रसरण पावणार आहे हा जास्त कुतूहलाचा विषय ठरतो. केवळ विचारांच्या पातळीवर हे कुतूहल असते तर प्रश्न निर्माण झाले नसते. परंतु यासाठी साधने वापरली जातात. फार मोठ्या प्रमाणावर संसाधनांची गरज भासते आणि मग मर्यादित असलेली संसाधने खर्च करण्यात प्राधान्य कसे ठरवावे असे प्रश्न निर्माण होऊ लागतात. ज्या माहितीचा आताच्या मानवी जीवनाला फारसा उपयोग नाही ती मिळवण्यावर संसाधने खर्च करावीत की नाही

अशांसारखे प्रश्न उपस्थित होतात. हे नीतिमीमांसेतील प्रश्न विज्ञानाच्या वाटचालीत महत्त्वाचे आहेत. वैज्ञानिकदेखील त्यासंदर्भात वेगवेगळी भूमिका घेतात. यातून योग्य काय ते पुढे चालत राहण्याची शक्यता वाढते. पण विज्ञानात काय चालू आहे याची माहिती केवळ विज्ञानसमुदायातील सदस्य नव्हे तर इतरांनीही घेतली तर वैज्ञानिक दृष्टिकोन जीवनात अधिक चांगल्याप्रकारे स्वीकारता येईल. विज्ञानाच्या नैतिक पैलूंची वैज्ञानिकांनी आणि समाजाने केलेली चर्चा विज्ञानाची वाटचाल सर्वांसाठीच हितकर पद्धतीने व्हावी यासाठी उपयुक्त ठरते.

## शब्दसूची

परिभाषा - Terminology
भौतिकद्रव्य - Material substance
चेतनद्रव्य/चैतन्य - Consciousness
शाश्वत - Eternal
नित्य - Permanent
अविनाशी - Indestructible
सोपाधिक - Conditional
भाव - Existence
सामान्य - Generality
द्रव्य - Substance
अभाव - Non-existence
अपरिवर्तनीय - Non-changing
आकर्षण - Attraction
विकर्षण - Repultion
आकारांचे जग - World of ideas/forms
स्वयंभू - That which exists by itself
अणुवादी- Atomism
घटित - Phenomenon

## स्वाध्याय

**प्रश्न १ कंसातील योग्य पर्याय निवडून पुढील विधाने पूर्ण लिहा.**

(१) ........ वस्तूंचा अनुभव वस्तूचे रूप, रंग, आकार, प्रकार इ. या स्वरूपाचा असतो.
(भौतिक, काल्पनिक, तात्त्विक)

(२) अस्तित्वात असणाऱ्या सर्व गोष्टींचे वर्गीकरण ........ दर्शनाने जीव-अजीव या प्रकारात केले.
(सांख्य, जैन, न्याय)

(३) ........ ज्ञान मिळवण्यासाठी साधने आणि प्रयोग अनिवार्य ठरले.
(व्यक्तिनिष्ठ, आंतरव्यक्तिनिष्ठ, वस्तुनिष्ठ)

(४) प्लेटोच्या मते, दृश्य जगाचे अस्तित्व ........ जगावर अवलंबून असते.
(आकारांच्या, प्रतिबिंबांच्या, भौतिक वस्तूंच्या)

(५) देकार्तच्या मते, विश्वात जडद्रव्य आणि चेतनद्रव्य अशी दोन ........ गुणधर्म असणारी स्वतंत्र द्रव्ये अस्तित्वात आहेत.
(परस्परविरोधी, परस्परावलंबी, परस्परसंबंधी)

**प्रश्न २ गटातील वेगळा शब्द/जोडी ओळखून लिहा.**

(१) थेलिस, अनॉक्झिमिनस, हेराक्लिटस, देकार्त

(२) जडवाद, वास्तववाद, असत्कार्यवाद, चिद्वाद

**प्रश्न ३ पुढील विधाने सत्य की असत्य ते सकारण सांगा.**

(१) लाईब्निझ हा एकतत्त्ववादी होता.


(२) पारमेनिडिसच्या मते सत् परिवर्तनशील आहे.

(३) चार्वाक जडवादाचे पुरस्कर्ते आहेत.


(४) शंकराचार्य प्रातिभासिक सत्‌ला अंतिम सत् मानत नाहीत.

**प्रश्न ४ संकल्पनाचित्र/तक्ता/ओघतक्ता पूर्ण करा.**


(१)



(२)




(३)




**प्रश्न ५ पुढील प्रश्नांची २० ते २५ शब्दांमध्ये उत्तरे लिहा.**

(१) सूक्ष्म कणांमुळे विश्वात कोणती बले उद्‌भवतात?

(२) वैशेषिकांनी किती द्रव्ये सांगितली? ती कोणती?

(३) हेगेलने सांगितलेली द्वंद्‌वविकासपद्‌धती काय आहे?

(४) डेमॉक्रिटसने सांगितलेली अणूची वैशिष्ट्ये सांगा?

**प्रश्न ६ टीपा लिहा.**

(१) अभाव

(२) एकतत्त्ववाद

(३) हेरॅक्लिटसची सत्‌ची कल्पना

(४) वैशेषिकांनी सांगितलेले अणूंचे स्वरूप

(५) हेगेलची 'केवल' ही संकल्पना.

**प्रश्न ७ खालील विधानांचे उदाहरणासहित स्पष्टीकरण करा.**

(१) एकाच नदीत दोन वेळा पाऊल टाकता येत नाही.

(२) चार्वाक जडवाद व अनेकतत्त्ववाद स्वीकारतात.

**प्रश्न ८ फरक स्पष्ट करा.**

(१) जडवाद व चैतन्यवाद

(२) द्‌वितत्त्ववाद व अनेकतत्त्ववाद.

**प्रश्न ९** देकार्तचा द्‌वितत्त्ववाद आणि स्पिनोझाचा एकतत्त्ववाद यांचे सविस्तर स्पष्टीकरण करा.

**प्रश्न १०** सांख्यांचा सत्‌विषयीचा विचार पूर्णपणे स्पष्ट करा.

**प्रश्न ११ पुढील प्रसंगावर संवाद लिहा.**

स्वप्नात अनुभवाला येणाऱ्या गोष्टी खऱ्या असतात असे मानणाऱ्या सहाध्यायीला 'प्रातिभासिक सत्'ची संकल्पना समजावून सांगणे.

**उपक्रम**

जडवाद व चैतन्यवाद यांतील तत्त्वचर्चेवर आधारित नाट्यप्रवेश तयार करा व त्याचे वार्षिक स्नेहसंमेलनात सादरीकरण करा.




प्रस्तुत कालरेषा पाश्चात्त्य तत्त्वज्ञानाच्या इतिहासाची कालरेषा आहे. या कालरेषेत काही प्रमुख तत्त्वज्ञ आणि काही महत्त्वाचे कालखंड कालक्रमाने दिलेले आहेत. पाश्चात्त्य तत्त्वज्ञानाचा इतिहास समजावून घेण्यासाठी या कालरेषेची मदत होईल.

# २. कारण म्हणजे काय?

- प्रस्तावना
- कारण संकल्पना
- भारतीय तत्त्वज्ञानातील 'कारण'विचार
- पाश्चात्त्य तत्त्वज्ञानातील 'कारण'विचार
- वैज्ञानिक दृष्टिकोन

## प्रस्तावना

या पाठाचे शीर्षक वाचून तुम्ही कदाचित म्हणाल, "हे तर सगळ्यांनाच माहिती आहे. मग हा प्रश्न विचारण्याचे कारण काय"? हा प्रश्न विचारण्याचे कारण असे, की अनेक शब्द आपण रोजच्या संभाषणात अनेकदा वापरतो. पण त्या शब्दाने जी संकल्पना व्यक्त झालेली असते, ती नक्की काय आहे असा प्रश्न केला तर आपण जरा गडबडतो व त्यासंबंधी विचार करायला लागतो. तत्त्वज्ञानाच्या तुमच्या आजपर्यंतच्या अभ्यासातून हे तुमच्या एव्हाना लक्षात यायला लागलेच असेल, की या विषयात, अशा सहजपणे वापरल्या जाणाऱ्या, ज्या समजल्या आहेत असे वाटते, त्याच संकल्पनांबाबत प्रश्न निर्माण केले जातात आणि या प्रश्नांचा जेवढा सखोल विचार करावा, तेवढा आपल्या ज्ञानाचा परीघ विस्तारला जातो. 'कारण' ही अशीच एक संकल्पना आहे. सत्तामीमांसेत जसे या संकल्पनेला महत्त्व आहे, तसेच ज्ञानमीमांसेत आणि नीतिमीमांसेतही आहे. एवढे कारण पुरेसे आहे ना या संकल्पनेचा, तिच्यात दडलेल्या अर्थाचा अभ्यास करायला?

## कारण संकल्पना

कुतूहल ही माणसाला निसर्गाकडून मिळालेली फार सुंदर देणगी आहे. माणसाचे कुतूहल, जगण्यासाठी आवश्यक असलेल्या किंवा त्याच्या व्यतिरिक्तही उपयोगी असणाऱ्या गोष्टींपुरते मर्यादित नसते. त्याची झेप त्याहीपलीकडे असते. आपल्यासाठी लाभदायक काय – हानिकारक काय, उपयोगी काय – निरुपयोगी काय एवढ्याच विचारांशी ते थांबत नाही. या कुतूहलातूनच या विश्वात आहे तरी काय काय असा प्रश्न पडतो. एवढेच नाही, तर जे काही आहे, ते तसेच का आहे? त्यामध्ये बदल होतात, ते का? असेही प्रश्न या स्वाभाविक कुतूहलामुळे माणसाला पडतात. एकदा प्रश्न पडले की उत्तरे शोधल्याशिवाय माणसाची बुद्धि स्वस्थ थोडीच बसणार आहे? या शोधातूनच सुरू होतो प्रवास – वस्तूंचे स्वरूप जसे आहे तसे असण्यामागची आणि निसर्गात, समाजात, मनात घडणाऱ्या घटना घडण्यामागची कारणे जाणून घेण्यासाठीचा!

हे प्रश्न काही फक्त तत्त्वज्ञांनाच पडतात असे नाही, ते तुम्हांलाही पडतातच. घरातले रोजच्या वापरातले एखादे यंत्र, उदाहरणार्थ, रेडिओ किंवा दूरचित्रवाणी संच नीट काम करेनासा होतो आणि आपण विचारतो, "का बरे"? अचानक अवकाळी पाऊस धो धो बरसतो आणि प्रश्न पडतो, "असे का"? धडधाकट वाटणारा माणूस एकदम आजारी पडतो आणि आश्चर्य वाटते, "का झाले असेल असे"? ही सगळी अनपेक्षितपणे कधीतरी घडणाऱ्या घटनांची उदाहरणे आहेत. पण अपेक्षेप्रमाणे गोष्टी घडतात, तेव्हाही आपल्या कळत नकळत 'कारण' संकल्पना असतेच आपल्या सोबतीला! वर्गात नियमितपणे न येणारी मैत्रिण परीक्षेच्या वेळी रडकुंडीला येते आणि तुम्ही म्हणता, 'याच कारणासाठी सांगत होतो की तासाला येत जा'. पावसात मनसोक्त भिजल्यावर ताप आला, की आई म्हणते, 'दुसरेतिसरे काही नाही तुझे पावसात हुंदडणेच कारणीभूत आहे ताप येण्याला'. आपल्याला जे काही 'होते', ते काही कारणानेच, त्याचप्रमाणे आपण जाणीवपूर्वक जे 'करतो' तेही काही कारणांमुळेच करतो. आपले हेतू, इच्छा, प्रेरणा इत्यादी ही आपल्या वर्तनामागची, कृतीमागची कारणे असतात.

**चला बोलूया!**

व्यक्तीच्या कृती/वर्तनामागची कारणे व घटनांमागची वैज्ञानिक कारणे यांतील फरकांची गटांमध्ये चर्चा करा.

विज्ञानासाठीही कारणांचा शोध खूपच महत्त्वाचा असतो. घटनांचे स्पष्टीकरण आणि प्राक्कथन (पूर्वसूचन) ही विज्ञानाची प्रमुख कार्ये मानली जातात. ही दोन्ही कार्ये पार पाडण्यासाठी विज्ञान कार्यकारणसंबंधांचा शोध घेते. कार्यकारणांचा संबंध बदलाशी असतो. ज्यामुळे बदल होतो ते कारण आणि त्या बदलातून जे उत्पन्न होते ते कार्य किंवा परिणाम म्हणून ओळखले जाते. कुठल्या घटनेचा परिणाम काय होतो, किती नियमितपणे होतो हे विज्ञान शोधून काढते. दोन घटनांचा नियमितपणे आढळून येणारा सहसंबंध सांगणे हेच वैज्ञानिक नियमांचे कार्य असते. हा सहसंबंध अनेकदा कार्यकारण स्वरूपाचा असतो. 'उष्णतेने सर्व धातू प्रसरण पावतात' हा नियम आठवून पहा. 'उष्णता' या कारणाने 'धातूंचे प्रसरण' हे कार्य घडते असे हा नियम सांगतो. निसर्गविज्ञान निसर्गात घडणाऱ्या घटनांचे स्पष्टीकरण अशा कार्यकारण संबंधांचे नियम सांगून करते; त्याचप्रमाणे सामाजिक विज्ञान सामाजिक घडामोडींचे स्पष्टीकरण सामाजिक वर्तनासंबंधींचे कार्यकारण संबंध सांगून करते. जो नियम स्पष्टीकरणासाठी वापरला जातो तोच भाकिते करण्यासाठीही वापरला जातो. तापमापकातील पारा का प्रसरण पावला याचे उत्तर जसे वरील नियमाने दिले जाते, तसे ताप असेल, तर पारा चढेल या निष्कर्षाचा आधार तोच नियम असतो.

विज्ञानाप्रमाणेच धर्मविचारातही कारणे सांगितली जातात. काही धर्म विश्वाच्या अस्तित्वामागचे कारण शोधतात. तसेच विश्वाच्या स्वरूपाचे कारणही शोधतात. माणसांच्या आयुष्यात सहजपणे स्पष्ट न करता येणाऱ्या ज्या घटना घडतात, त्यांचेही कारणसंबंधी स्पष्टीकरण धर्म देतात. पाप-पुण्य, कर्म आणि त्याचे फल या कल्पना त्याच्याच द्योतक आहेत. चांगले कर्म केले तर स्वर्ग मिळेल आणि वाईट केले तर नरकात जाल अशा समजुती, कर्म आणि त्यांची फळे/परिणाम यांच्यात कार्यकारण संबंध आहे असे मानण्याच्या आधारावरच केली जातात.

**चला शोधूया!**

ज्यामध्ये कार्यकारण संबंध आहे असे वाटते पण तसा तो नसतो, अशी उदाहरणे शोधा व वर्गात त्यांचे सादरीकरण करा.

थोडक्यात काय, तर कार्यकारणाचा हा विचार आपल्या जीवनाची, ज्ञानाची अनेक क्षेत्रे व्यापून राहिला आहे. तत्त्वज्ञानात तो महत्त्वाचा ठरतो यात काहीच नवल नाही. इथे हे लक्षात ठेवायला हवे, की तत्त्वज्ञानाला रस आहे तो 'कारण' ही संकल्पना आणि तिच्याशी निगडित तत्त्वे समजून घेण्यात. अस्तित्वामागची कारणे प्रत्यक्ष शोधण्याचे कार्य तत्त्वज्ञानाचे नाही. प्राचीन काळी त्या प्रकारचे जे प्रयत्न तत्त्वज्ञानाने केले, तेही वैचारिक पातळीवरच. तत्त्वज्ञांच्या अभ्यासाचे मुख्य प्रश्न असे होते : कार्यकारण संबंध म्हणजे नेमके काय? कार्य आणि कारण एकमेकांपेक्षा पूर्ण वेगळे असतात का? कार्यकारण संबंध प्रत्येक घटनेला लागू होतो का? तो अनिवार्य असतो का? हे प्रश्न आणि त्यांना तत्त्वज्ञानात दिली गेलेली प्रमुख उत्तरे यांचा आता अभ्यास करूया.

हा अभ्यास करताना ज्या काळात ही उत्तरे दिली गेली आहेत त्यांचेही भान ठेवायला हवे. कारण? कारण हे की तत्त्वचिंतनाच्या अगदी आरंभी विचारले गेलेले प्रश्न आणि त्यांना मिळालेली उत्तरे, ही जणू ज्ञानाच्या मनोऱ्याच्या ज्या टोकावर आपण आज उभे आहोत, त्यांचा पाया आहेत. प्रश्नउत्तरे, त्यांमधून निर्माण होणारे नवे प्रश्न नवी उत्तरे अशा क्रमाने चढत चढत आपण आज जिथे आहोत तिथे पोहचलो आहोत. तुम्ही दहीहंडी फोडताना पाहिले आहे? त्या मानवी मनोऱ्याच्या खालच्या थरांमधील व्यक्तींचा हात हंडीपर्यंत पोहचत नाही हे खरेच, पण त्यांच्यामुळेच सगळ्यांत वरचा खेळाडू हंडी फोडू शकतो. आले ना लक्षात?

## भारतीय तत्वज्ञानातील 'कारण'विचार

### पार्श्वभूमी

भारतीय तत्वज्ञानात कार्यकारण संबंधविषयक जे मुख्य सिद्धांत मांडले गेले, त्यांची चर्चा कुठल्या संदर्भात केली गेली आहे हे आधी समजून घेऊया. याचे कारण असे, की भारतीय आणि पाश्चात्त्य दोन्ही परंपरांमध्ये या संबंधांची चर्चा झालेली असली, तरी त्यांची सांस्कृतिक पार्श्वभूमी वेगवेगळी आहे. तत्त्वज्ञान आणि संस्कृती परस्परांवर प्रभाव टाकत असतात हे आपण मागच्या वर्षी पाहिलेच आहे. त्या दृष्टीने पाहता असे दिसते, की सांस्कृतिक पार्श्वभूमीची जाण, आपल्याला विशिष्ट संस्कृतीमध्ये निर्माण झालेले

तत्त्वज्ञान अधिक चांगल्या प्रकारे समजून घेण्यासाठी खूप उपयोगी असते.

भारतीय तत्त्वज्ञानाचे एक प्रमुख वैशिष्ट्य असे सांगितले जाते, की हे तत्त्वज्ञान प्रत्यक्ष जगण्यात आपल्याला सामोरे येणाऱ्या प्रश्नांशी संबंधित आहे. या तत्त्वज्ञानाच्या अभ्यासाने जसे बौद्धिक कुतूहल शमते, तसेच कसे जगावे यासंबंधीचे मार्गदर्शनही मिळते. याचा अर्थ दैनंदिन जीवनात पडणाऱ्या विशिष्ट व्यावहारिक प्रश्नांना त्यामधून विशिष्ट उत्तर मिळते असे नाही, तर त्यामुळे एक व्यापक जीवनदृष्टी आपल्यामध्ये विकसित होते. ही जीवनदृष्टी मुख्यतः मनुष्यजीवनाची साध्ये काय असावीत यांच्याशी निगडित आहे. या साध्यांसंबंधी भारतीय परंपरेत जो पुरुषार्थविचार सांगितला गेला आहे, त्याची माहिती आपण नंतर घेणारच आहोत.

बहुतेक सर्व भारतीय दर्शनांनी दुःखाच्या समस्येसंबंधी चिंतन मांडले आहे. दुःख कुणालाच नको असते, पण ते जीवनाचा अपरिहार्य भाग असते हे लक्षात घेऊन या दुःखाचे कारण शोधण्याचा प्रयत्न या दर्शनांनी केला आहे. त्याचबरोबर अर्थातच दुःखापासून कायमची मुक्ती मिळवण्यासाठीचे मार्गही सुचवलेले आहेत. जडवादी चार्वाकांचा अपवाद वगळता सर्व प्रमुख भारतीय दर्शने पुनर्जन्माची कल्पना मान्य करतात. जन्म झाला, की दुःखभोग अटळ आहेत या जाणिवेतून जन्म-मरणाच्या चक्रातून सुटका करून घेणे हे जीवनाचे सर्वोच्च ध्येय आहे असे ही दर्शने मानतात. या सुटकेला मोक्ष, मुक्ती, कैवल्य, अपवर्ग, निर्वाण अशी निरनिराळी नावे निरनिराळ्या दर्शनांमध्ये मिळाली. पण एका बाबतीत या दर्शनांचे एकमत होते, ते म्हणजे माणसाचे स्वतःविषयीचे, जगाविषयीचे अज्ञान हेच जन्म-मरणाच्या दुःखद फेऱ्यामध्ये बांधले जाण्याचे मूळ कारण आहे. साहजिकच, हे अज्ञान दूर करून, स्वतःचे आणि जगाचे स्वरूप नेमकेपणाने जाणले पाहिजे, एवढेच नव्हे तर त्यानुसार योग्य तऱ्हेने जीवन जगले पाहिजे असे या दर्शनांनी प्रतिपादन केले आहे. विश्वाचे आणि त्यामध्ये असणाऱ्या गोष्टींचे अस्तित्व, त्यांचे स्वरूप आणि त्यांचे परस्परसंबंध यांचा अभ्यास करताना कार्यकारणसंबंधाची चर्चा केली गेली आहे.

चार्वाक, जैन, सांख्य, अद्वैत वेदान्त या दर्शनांची अंतिम सत्तेच्या स्वरूपांबद्दलची जी मते आपण मागच्या पाठात पाहिली, ती या संदर्भात लक्षात घ्यायला हवीत. अंतिम सत्संबंधी विवेचन, 'स्व'विषयक कल्पना आणि कार्यकारण संबंधांचे आकलन या तिन्हींची चर्चा आपण सोयीसाठी म्हणून वेगवेगळ्या पाठात करत असलो, तरी मुळात हे सत्तामीमांसेतले, एकमेकांत गुंतलेले प्रश्न आहेत हे विसरता येणार नाही. एवढेच नव्हे तर सत्तामीमांसा, ज्ञानमीमांसा आणि नीतिमीमांसा यांचे परस्परसंबंधही लक्षात ठेवायला हवेत. माणसाच्या ज्ञानविषयक, नीतिविषयक आणि कलाविषयक क्षमता त्याच्या स्वरूपाचाच एक भाग असतात. माणूस आणि विश्व यांच्यातील नाते काही प्रमाणात तरी या क्षमतांच्या आधारावरच निश्चित होत असते. या पुस्तकातील वेगवेगळ्या पाठांमध्ये आपण वरवर पाहता वेगळे विषय अभ्यासत असलो, तरी या सगळ्यांना एकत्र गुंफणारा जो धागा आहे, त्याचे भान सतत ठेवून भारतीय परंपरेतील कार्यकारणसंबंधी सिद्धांतांच्या अभ्यासाकडे वळूया.

या परंपरेत उपादानकारण आणि निमित्तकारण असे कारणांचे दोन मुख्य प्रकार मानले गेले आहेत. आपण हे पाहिलेच आहे, की 'कारण' संकल्पना बदलाशी संबंधित आहे - ज्यामध्ये बदल होतो, त्याला उपादान कारण म्हटले जाते. कार्याची, म्हणजे परिणामाची उत्पत्ती उपादान कारणामधून होते. ही उत्पत्ती होण्यासाठी गतीची आवश्यकता असते. ज्याच्यामधून/ज्याच्यामुळे ही गती मिळते, ते म्हणजे निमित्तकारण. लाकूड हे क्रिकेटच्या बॅटचे उपादानकारण असते आणि लाकडाला बॅटचा आकार देणारा कारागीर/सुतार हा तिचे निमित्तकारण असतो. उपादानकारणापासून कार्याची निर्मिती करणारे ते निमित्तकारण. कार्य म्हणजे परिणाम अस्तित्वात येण्यासाठी दोन्ही प्रकारच्या कारणांची गरज असते असेच सहसा मानले जाते.

**चला करूया!**

विविध वस्तुंची उपादानकारणे व निमित्तकारणे स्पष्ट करणारे भित्तीचित्र तयार करा.

मात्र, परिणामाच्या निर्मितीत त्यांचा तुलनात्मक सहभाग किती आणि कोणता हे ठरवताना मात्र भारतीय दर्शनांमध्ये मतभेद असल्याचे दिसते. हे मतभेद दोन प्रश्नांच्या अनुषंगाने होतात. (१) बदलाच्या प्रक्रियेपूर्वी

कार्य कोणत्या ना कोणत्या स्वरूपात उपादानकारणात अस्तित्वात असते का? आणि (२) कार्य हे कारणापेक्षा स्वतंत्र आणि वेगळे असते का? या प्रश्नांना दिल्या गेलेल्या उत्तरांमधून सत्कार्यवाद आणि असत्कार्यवाद अशा कार्यकारणविषयक मुख्य दोन उपपत्ती मांडल्या गेल्या. सांख्य दर्शनाने सत्कार्यवाद स्वीकारला आहे. न्याय दर्शन असत्कार्यवादाचा पुरस्कार करते.

### सत्कार्यवाद

'सत्' हा शब्द अस्तित्वाचा निर्देशक आहे. ज्या उपपत्तीनुसार कार्याचे अस्तित्व त्याच्या प्रकट स्वरूपाच्या आधीपासूनच उपादानकारणामध्ये असते, त्या उपपत्तीला 'सत्कार्यवाद' म्हणतात. सांख्यांनी या उपपत्तीच्या समर्थनासाठी अनेक प्रभावी युक्तिवाद मांडले आहेत. कारणात कार्य मुळात नसते आणि नंतर निर्माण होते असे मानले तर अभावामधून किंवा नसतेपणामधून/अनस्तित्वातून; भाव किंवा असतेपण/अस्तित्व निर्माण होते असे मानावे लागेल. पण असे घडणे तर शक्य नाही. शून्यातून काहीच निर्माण होऊ शकत नाही. कार्य काही प्रक्रियांमधून, निमित्तकारणाच्या मदतीने निर्माण होऊ शकते. याचा अर्थच ते आधीच उपादानकारणामध्ये अंतर्भूत असते. फक्त तेव्हा ते सुप्त क्षमता या स्वरूपात असते. त्यामुळे त्याचे उपादानकारणापेक्षा असलेले भिन्नत्व लक्षात येत नाही. विशिष्ट कार्य निर्माण व्हायला हवे असेल, तर ज्या उपादानकारणात ते सुप्त रूपाने उपस्थित आहे, तेच उपादानकारण निवडावे लागते. पाण्याला विरजण लावून दही तयार होत नाही कारण पाण्यात ती क्षमता नसते. विरजण या निमित्तकारणाने दुधातली क्षमता प्रत्यक्षात येते.

सांख्यांच्या सत्कार्यवादाला परिणामवाद म्हणूनही ओळखले जाते कारण कार्याची निर्मिती होताना कारणच परिणामामध्ये बदलत असते. अद्‌वैत वेदान्त दर्शनही सत्कार्यवादाचा स्वीकार करते, पण त्यांची उपपत्ती 'विवर्तवाद' म्हणून ओळखली जाते. अद्‌वैत वेदान्त मतानुसार कारणाचे कार्यात होणारे रूपांतर हा केवळ भास असतो, माया असते. सापासारखी दिसणारी/साप वाटणारी दोरी साप झालेली नसते, ती साप भासते. त्याचप्रमाणे ब्रह्मातून जगाची निर्मिती होत नाही. जगाचा फक्त भास होतो, पण अस्तित्व फक्त ब्रह्माचेच असते.

क्षमता आणि प्रत्यक्षता यांचा असा संबंध नसता, तर कुठल्याही उपादानकारणांमधून कशाचीही निर्मिती करता आली असती. पण प्रत्यक्षात तसे होत नाही. हवेत हात फिरवून कुंकू किंवा एखादी मौल्यवान गोष्ट काढल्याचे जर आपल्याला दाखवले गेले, तर आपण म्हणतो ही हातचलाखी आहे. ही हातचलाखी नाही असे मानणे म्हणजे अंधश्रद्‌धा आहे.

कार्यनिर्मिती उपादानकारणाशिवाय होऊ शकत नाही, तसेच ते उपादान विशिष्ट क्षमता अंतर्भूत असणारे असावे लागते. 'पेरावे तसे उगवते' या म्हणीतून हेच सत्य सांगितले जाते. आंबे हवे असतील तर चिक्कूची बी मातीत रुजवून चालणार नाही. याचा अर्थ असा, की कार्य आणि कारण गुणात्मकदृष्ट्या वेगवेगळे नाहीत, त्या एकाच गोष्टीच्या अव्यक्त आणि व्यक्त अवस्था आहेत. कार्य अव्यक्त शक्तीरूपाने कारणातच असते आणि योग्य परिस्थितीत ते व्यक्तावस्थेत येते. आपण बटण दाबून दिवा लावतो तेव्हा त्या दिव्यात अव्यक्त असणारी विद्युत ऊर्जा प्रकाशरूपाने व्यक्त होते. कारण ती मुळात तिथे असते. ज्या बल्ब किंवा ट्यूबची ती क्षमता नष्ट झालेली असते, तो बल्ब किंवा ट्यूब जोडलेली असली, तरी बटण दाबल्यावर प्रकाशमान होत नाही.

असदकरणात् उपादानग्रहणात् सर्वसंभवाभावात्।
शक्तस्य शक्यकरणात्, कारणभावाच्च सत्कार्यम्।
(सांख्यकारिका-९)

### असत्कार्यवाद

न्याय दर्शनाचा असत्कार्यवाद सांख्य मताच्या विरुद्ध मत मांडतो. बदलाच्या प्रक्रियेपूर्वी कार्य असत् असते म्हणजे कारणामध्ये त्याचा अभाव असतो. ते उपादानकारणामध्ये आधीपासून अस्तित्वात नसते; बदलाच्या प्रक्रियेमध्ये ते नव्याने निर्माण होते असे नैय्यायिकांचे म्हणणे आहे. यासाठी त्यांनीही त्यांचे युक्तिवाद मांडले आहेत. कार्य उपादानकारणात आधीपासूनच असेल, तर निमित्तकारणाची आवश्यकताच भासणार नाही. दुधाचे विरजणाशिवाय आपोआपच दही होईल आणि कारागिराशिवायच लाकडाची बॅट तयार होईल. पण तसे कधीच होत नाही.




निमित्तकारणाच्या सहयोगातूनच उपादानकारणातून कार्याची निर्मिती होते. कार्य मुळातच कारणात अस्तित्वात असेल, तर त्याची निर्मिती होते या म्हणण्याला काहीच अर्थ उरत नाही. कार्य निर्माण होते असे म्हणताना जे आधी नव्हते, ते अस्तित्वात आले असेच सांगायचे असते. ते कार्य कारणापेक्षा भिन्न असते. त्याचे गुणधर्म, आकार किंवा रूप हे कारणाच्या गुणधर्म, आकार किंवा रूपापेक्षा वेगळे असते. कारण आणि कार्यामधून साध्य होणारी उद्दिष्टेही वेगवेगळी असतात; त्यांची कार्ये वेगवेगळी असतात. ओबडधोबड दगडातून शिल्पकार जे शिल्प निर्माण करतो, ते पाहून जसा आनंद होतो; तसा आनंद तो दगड पाहून होत नाही. वेड्यावाकड्या आकाराच्या लाकडाने चौकार किंवा षट्कार मारता येत नाहीत. याखेरीज असेही दिसते, की एकाच प्रकारच्या उपादानकारणापासून वेगवेगळ्या वस्तू तयार करता येतात. लाकडापासून कितीतरी वस्तू तयार होऊ शकतात.

या सगळ्या वस्तूंचे गुणधर्म, रंगरूप, प्रयोजन सगळे वेगवेगळे असते. ही सगळी कार्ये उपादानकारणात आधीपासूनच अस्तित्वात असतात असे म्हणण्यात काहीच अर्थ नाही असे नैय्यायिकांचे प्रतिपादन आहे. निर्मितीच्या प्रक्रियेमध्ये कार्याच्या अस्तित्वाची सुरुवात होते म्हणून या मताला 'आरंभवाद' असेही म्हणतात.

**चला करूया!**

परिणामवाद व आरंभवादातील फरकांची दोन गटांत चर्चा करा व चर्चेतून येणाऱ्या मुख्य मुद्द्यांचे वादसभा रूपात वर्गात सादरीकरण करा.

सांख्यांचा सत्कार्यवाद त्यांच्या सत्तामीमांसेचा महत्त्वाचा भाग आहे. जगात अस्तित्वात असणाऱ्या सर्व वस्तू जड प्रकृतीपासून तयार होतात. सत्त्व, रज आणि तम या तीन गुणांचे कमीजास्त प्रमाणात असलेले मिश्रण या सगळ्या वस्तूंमध्ये असते. कारण हे गुण मुळात प्रकृतीचे घटक असतात. आडात नसेल तर पोहऱ्यात कुठून येणार"? या उक्तीप्रमाणे प्रकृतीमध्ये हे घटक नसते तर प्रकृतीपासून निर्माण होणाऱ्या वस्तूतही ते आढळले नसते. प्रकृती हे जगाचे आद्य म्हणजे पहिले कारण आहे असे सांख्य मानतात. प्रकृती जगाचे उपादानकारण आहे, तर ज्याच्या अस्तित्वामुळे ती गतिशील होते, तो पुरुष निमित्तकारण आहे.

न्याय दर्शनाच्या सत्तामीमांसेनुसार विश्वातल्या बहुतेक वस्तू विभाज्य असतात. त्यांचे अनेक अंशात विभाजन होऊ शकते. या वस्तू या कुठल्यातरी कारणांमधून निर्माण होतात, म्हणजेच 'कार्य' हे त्यांचे स्वरूप असते. जडद्रव्यांच्या अणूंपासून या वस्तू तयार होतात. मात्र, वस्तूंच्या निर्मितीसाठी जडद्रव्ये पुरेशी नसतात. या वस्तू आणि विश्वात त्यांची असणारी व्यवस्था यांच्या निर्मितीसाठी जडद्रव्यांना पूर्णपणे जाणणारा ईश्वर आवश्यक असतो. असत्कार्यवादाच्या भाषेत सांगायचे तर पृथ्वी, जल, अग्नि आणि वायू यांचे अणू हे वस्तूंचे उपादानकारण आहे आणि ईश्वर हे जगाचे निमित्तकारण आहे. ईश्वराच्या बुद्धितत्त्वाखेरीज केवळ अणूंपासून जगाची निर्मिती होणे शक्य नाही.

आधी पाहिल्याप्रमाणे कार्यकारण संबंधांचे विवेचन हा जगाचे, स्वतःचे वास्तविक स्वरूप जाणून त्याआधारे मोक्ष मिळवण्याच्या उद्देशाने मांडलेल्या तत्त्वचिंतनाचा महत्त्वपूर्ण भाग आहे.

## पाश्चात्त्य तत्त्वज्ञानातील 'कारण'विचार

पाश्चात्त्य तत्त्वचिंतनात आरंभीच्या काळात सत्‌विषयक जे चिंतन झाले, त्याला 'विश्वरचनाशास्त्र' म्हटले जाते. आरंभी असणाऱ्या एका मूलतत्त्वापासून अनेक वस्तू कशा निर्माण झाल्या, हा एकतत्त्ववादाशी संबंधित महत्त्वाचा प्रश्न होता. अंतिम सत् असणारे विश्वाचे मूळ घटक, त्यांमध्ये होणारे बदल आणि त्यासाठी आवश्यक असणारी गती या तीन मुद्द्यांचा या काळात ऊहापोह केला गेला. या विश्वाचे मूळ

घटक मुळातच गतिशील असतात की त्यांना बाहेरून गती मिळते या प्रश्नाचा विचार सॉक्रेटिसपूर्व तत्त्वज्ञानात पारमेनायडिस आणि हेरॅक्लिटस यांच्यानंतर होऊ लागला. आपण आधी अभ्यासल्याप्रमाणे, चार महाभूतांच्या अणूंना आकर्षण आणि विकर्षण या दोन बलांनी गती मिळते. या गतीमुळे अणूंचे संघटन आणि विघटन होत राहते असे मत एम्पिडोक्लिसने मांडले. डेमॉक्रिटसच्या विचारानुसार अणू मुळातच गतिशील असतात. पोकळ अवकाशात भ्रमण करत असताना त्यांच्या वेगवेगळ्या आकारांमुळे ते एकत्र होतात आणि गतीमुळेच पुन्हा दूर जातात. संघटन-विघटनाची प्रक्रिया निरुद्देश आणि यांत्रिक पद्धतीने होत राहते, असे अणूवादी मानत.

नंतरच्या काळात परिवर्तनाची प्रक्रिया यांत्रिक नसते असे मानण्याकडे तत्त्वज्ञांचा कल होता. प्लेटोच्या दोन जगांच्या सिद्धांतानुसार आकारांच्या जगात काहीच बदलत नाही. आकारांच्या जगालाच सर्वोच्च वास्तव मानणाऱ्या प्लेटोसाठी परिवर्तनाची समस्या फारशी महत्त्वाची नव्हती. विशिष्टे बदलतात, नष्ट होतात हे त्यांना अंतिम सत् न मानण्याचे मुख्य कारणच होते. प्लेटोच्या दुसऱ्या बुद्धिगम्य जगात असणाऱ्या आकारांना प्लेटोने विशिष्टांचे आदर्श रूप मानले आहे. या आदर्शापर्यंत पोहोचण्याची धडपड प्रत्येक विशिष्ट वस्तू करत असते असे त्याचे मत होते. आदर्शापर्यंत पोहोचण्याची इच्छा ही परिवर्तनामागची मुख्य प्रेरणा असते. विशिष्टांच्या जगाला अंतिम सत् मानत नसल्यामुळे, त्या जगात होणाऱ्या बदलांचा सखोल विचार करण्याची गरज त्याला भासलेली दिसत नाही.

### ॲरिस्टॉटल

अनुभवाला येणारे जग हे एकमेव जग आहे असे मत असणाऱ्या ॲरिस्टॉटलला मात्र परिवर्तनाचा विचार करणे भाग होते. निसर्गात होणारे परिवर्तन कुठल्यातरी हेतूने, उद्देशाने होते असा प्रयोजनवादी दृष्टिकोन ॲरिस्टॉटलने स्वीकारला. बदल हा या जगातील प्रत्येक गोष्टीचा गुणधर्म आहे. बदलासाठी गतीची आवश्यकता आहे हे तो जाणत होता. त्यामुळे त्याच्या सत्तामीमांसेत बदल आणि गतीचा विचार महत्त्वाचा आहे. या विचारांच्या संदर्भातच त्याचे कारणविषयक विचार मांडले गेले आहेत. एखादी वस्तू बदलते, तेव्हा तिची बदलापूर्वीची आणि बदलानंतरची स्थिती वेगळी असते. या वेगळेपणानुसार ॲरिस्टॉटल बदलांचे चार प्रकारांत वर्गीकरण करतो. गुणात्मक, संख्यात्मक किंवा परिमाणात्मक, स्थानसंबंधी आणि द्रव्यात्मक हे ते चार प्रकार!

आंबा पिकतो तेव्हा त्याचा हिरवा रंग बदलून तो केशरी-पिवळा होतो, त्याचा आंबटपणा कमी होऊन गोडी वाढते, स्पर्श नरम होतो हे गुणात्मक बदल. छोटी कैरी मोठ्या आंब्यात बदलते हा परिमाणात्मक बदल किंवा एकाच वडाच्या झाडाला अनेक पारंब्या फुटतात हा संख्यात्मक बदल. झाडावरचा आंबा जमिनीवर, मग पेटीत आणि शेवटी घरात येतो हा आंब्याच्या स्थानात, ठिकाणात झालेला बदल असतो. मोहोरापासून आंबा तयार होतो आणि खाल्ल्यावर नष्ट होतो हे द्रव्यात्मक बदल असतात. पहिल्या तिन्ही प्रकारचे बदल द्रव्यात होतात; पण शेवटचा बदल द्रव्याची निर्मिती किंवा नाश या प्रकारचा असतो. द्रव्य हा अस्तित्वात असलेल्या सर्व गोष्टींमधला सर्वांत महत्त्वाचा, मूलभूत प्रकार किंवा कोटी आहे हे तुम्ही विसरला नाहीत ना? पहिल्या तीनही प्रकारचे बदल झाले तरी, ज्या द्रव्यात ते होतात, त्याचे सातत्य टिकून राहिलेले असते. द्रव्यात्मक बदलात मात्र सातत्य टिकून राहत नाही.



बदल कुठल्याही प्रकारचा असला, तरी तो कुठल्या ना कुठल्या कारणानेच होत असतो. 'कारण' हा शब्द ॲरिस्टॉटलच्या काळातील ग्रीक भाषेत बऱ्याच व्यापक अर्थाने उपयोगात आणला जात असे. एखाद्या वस्तूच्या अस्तित्वाला जे कुठले घटक जबाबदार असतात, त्या सर्वांना 'कारण' म्हणून संबोधले जात असे. इथे जबाबदारीचा नैतिक किंवा कायदेशीर अर्थ अभिप्रेत नाही. ज्या घटकांशिवाय वस्तूचे, घटनेचे अस्तित्व असू शकत नाही, ते घटक त्या वस्तूच्या किंवा घटनेच्या

अस्तित्वाला जबाबदार असतात. वाचनालयात एखादे पुस्तक जर फाटले, तर त्याला जबाबदार कोण, म्हणजे ते कोणी फाडले किंवा कुणाकडून फाटले याचा शोध घेतला जातो. हा 'जबाबदार' या शब्दाचा सहसा घेतला जाणारा 'उत्तरदायित्व' असा अर्थ आहे. पण मुळात फाटण्यासाठी पुस्तक असावे लागते. हे पुस्तक कशापासून तरी तयार होते, त्याला विशिष्ट आकार असतो. ते कुणीतरी तयार केलेले असते. ते कुठल्या तरी हेतूने तयार केलेले असते. म्हणजेच कागद, त्यांच्या बांधणीचा आकार, त्याला तो आकार देणारी व्यक्ती आणि ज्या उद्देशाने ते तयार केले जाते तो उद्देश हे चार घटक पुस्तकाच्या अस्तित्वाला जबाबदार असतात. म्हणजेच त्याच्या अस्तित्वामागची कारणे असतात.


ॲरिस्टॉटलचा चतुर्विध कारणता सिद्धान्त कारणांचे चार प्रकार सांगतो. हे चार प्रकार पुढीलप्रमाणे :

**(१) उपादान कारण** : ज्यामध्ये बदल घडून वस्तू निर्माण होते ते द्रव्य. उदा. दगडाचे शिल्प. येथे दगड हे उपादान कारण आहे.

**(२) आकारिक कारण** : मनातील कल्पना अथवा चित्र ज्यामुळे वस्तुचा आकार निर्धारित होतो ती कल्पना अथवा चित्र म्हणजे आकारिक कारण. उदा. शिल्पकाराच्या मनातील शिल्पाची कल्पना.

**(३) निमित्त कारण** : उपादानकारणाला विशिष्ट आकार देणारी शक्ती/व्यक्ती. उदा. शिल्पकार.

**(४) अंतिम कारण** : वस्तूच्या निर्मितीमागचा हेतू वा उद्दिष्ट. उदा. शिल्प बनविण्यामागचा हेतू.



**चला लिहूया!**

'कारण' शब्दाचे विविध अर्थ व त्यांची उदाहरणे लिहा.

ॲरिस्टॉटलचे हे विवेचन मनुष्यनिर्मित वस्तूंना चांगल्या प्रकारे लागू पडते, पण निसर्गनिर्मित वस्तू आणि त्यातील बदल यांचे स्पष्टीकरण करण्यासाठी पुरेसे ठरत नाही. वनस्पतींपासून मनुष्यापर्यंत सर्व सजीवांना आत्मा असतो असे ॲरिस्टॉटलचे मत आहे. हा आत्मा किंवा ग्रीक भाषेत 'सायके' ***(psyche)*** हे मूलत: गतीचे तत्व आहे. हे तत्व सजीवांच्या स्वरूपातच अंतर्भूत असल्यामुळे ते हालचाल करू शकतात. निर्जीव वस्तू बाह्य बलाशिवाय हलू शकत नाहीत. हालचालीसाठी त्यांना बाहेरून ऊर्जा पुरवावी लागते. सजीवांमध्ये मात्र त्याची गरज नसते. त्यांच्या शरीरामध्येच त्यांचा विकास घडवून आणणारे एक बल कार्यरत असते. त्या बलामुळेच अनुकूल स्थिती मिळाल्यावर बीजातून अंकुर फुटतो. अंकुराचे रोप, रोपाचा वृक्ष होतो. वृक्षाला फुले-फळे येतात आणि पुन्हा बीजांची निर्मिती होते. सजीवांमध्ये होणारे या प्रकारचे बदल या अंतर्गत बलामुळे होतात. या बलासाठी ॲरिस्टॉटल 'एन्टिलेची' ***(entelechy)*** हा ग्रीक शब्द वापरतो.

सजीव असोत वा निर्जीव, गतीखेरीज त्यांच्यामध्ये बदल घडू शकत नाहीत. निर्जीव वस्तूंना दुसरी कुठली तरी वस्तू बाहेरून गती पुरवते. ती वस्तूही निर्जीवच असेल, तर तिला गती देणारी तिसरी वस्तू असावी लागते. याच प्रकारे वस्तूंना गती कोण पुरवते याचा शोध आपल्याला त्या शोधात सतत आणखी मागे मागे नेतो. हा शोध अंतहीन असला तर तो कधीच पूर्ण होणार नाही. तार्किकदृष्ट्या याला 'अनवस्था प्रसंग' म्हणतात. तो टाळण्यासाठी ॲरिस्टॉटलने 'अचल चालक' या स्वरूपात ईश्वर ही कल्पना मांडली. या कल्पनेप्रमाणे ईश्वरामध्ये जडाचा अंशही नाही. तो शुद्ध आकार आहे. त्याच्यामध्ये कुठल्याही सुप्त क्षमता नाहीत. त्याच्या साऱ्या शक्ती प्रकटपणे अस्तित्वात आहेत. त्यामुळे त्याला काही कृती करण्याची, हालचाल करण्याची आवश्यकताच नाही. तो स्वत: 'अचल' काहीही क्रिया न करणारा आहे. पण त्याच्या या स्वरूपामुळे जडद्रव्य आणि आकार यांमधून तयार झालेले जग आणि त्यातील वस्तू त्याच्याकडे आकर्षिल्या जातात, ओढल्या जातात. या प्रकारे स्वत: स्थिर असतानाही ईश्वर 'गतिदाता' होतो. मात्र ॲरिस्टॉटलचा ईश्वर जगाचा निर्माता नाही. ईश्वराप्रमाणेच जग कायमच अस्तित्वात असते, त्याला गती मात्र ईश्वराकडून मिळते.

## आधुनिक तत्वज्ञान

ॲरिस्टॉटलच्या विश्वनिर्मितीशास्त्राचा प्रभाव मध्ययुगीन तत्वज्ञानावर फार मोठ्या प्रमाणात होता. आधुनिक विज्ञानाच्या उदयानंतर विश्वाच्या उत्पत्तीविषयीचा ॲरिस्टॉटलचा विचार मागे पडला. विश्वाचे स्वरूप जाणण्यासाठी केले जाणारे चिंतन फक्त

तार्किक दृष्टीने सुसंगत असणे पुरेसे नाही, त्याला अनुभवाचा भक्कम आधार असावा लागतो हे तथ्य विज्ञानाने अधोरेखित केले. याच तथ्याला ध्यानात ठेवून अनुभववादाची मांडणी आधुनिक तत्त्वज्ञानात केली गेली. अनुभववाद आणि बुद्‌धिवाद हे या तत्त्वज्ञानातले ज्ञानमीमांसेसंबंधीचे दोन मुख्य प्रवाह आहेत. यांचा अभ्यास आपण नंतर करणारच आहोत. या पाठात आपण डेव्हिड ह्यूम या अनुभववादी तत्त्वज्ञाचे कार्यकारणसंबंधांबद्‌दलचे विचार समजून घेऊया.

ॲरिस्टॉटलचे विश्वाबद्‌दलचे मत मुख्यत: त्याच्या चिंतनामधून निर्माण झाले होते. त्याला अनुभवाचा भक्कम आधार नव्हता. त्याचा विश्वाबद्‌दलचा दृष्टिकोन प्रयोजनवादी होता. प्रत्येक बदलामागचा हेतू किंवा अंतिम कारण त्याच्यासाठी महत्त्वाचे होते. त्याचप्रमाणे निमित्तकारणाला त्याने महत्त्वाचे मानले होते. त्याची कारणमीमांसा मनुष्यनिर्मित वस्तूंच्या संदर्भात अतिशय उपयुक्त होती. मात्र निसर्गातील बदल समजावून घेताना अंतिमकारण आणि निमित्तकारण या संकल्पना लागू करणे शक्य नव्हते. निसर्गातील बदल 'कुणीतरी' (निमित्तकारण), 'कशासाठी तरी' (अंतिमकारण / प्रयोजन) घडवून आणते हे आधुनिक काळात मान्य होण्यासारखे नव्हते.

प्रबोधन काळात विज्ञानाचा उदय झाला. आधुनिक विज्ञान विश्वाकडे एक अवाढव्य यंत्र म्हणून बघते. या विश्वातील घटनाक्रम हे यांत्रिकपणे होतात, निर्सगनियमांनुसार होतात असे हा दृष्टिकोन मानतो. ॲरिस्टॉटलच्या प्रयोजनवादाची जागा विज्ञानाच्या यांत्रिक दृष्टिकोनाने आधुनिक काळात घेतली. या काळात विज्ञानाने जी झेप घेतली तिचा आधुनिक ज्ञानमीमांसेवर खोलवर परिणाम झाला. या ज्ञानमीमांसेचा परिचय आपण नंतर करून घेणारच आहोत. बुद्‌धिवादावर गणिताच्या पद्‌धतीचा प्रभाव आहे, तर अनुभववादावर विज्ञानाच्या पद्‌धतीचा प्रभाव आहे. अनुभववादाचा पुरस्कार करणारा एक अतिशय महत्त्वाचा तत्त्वज्ञ म्हणजे डेव्हिड ह्यूम होय. त्याचे कार्यकारणसंबंधाबद्‌दलचे विचार अत्यंत लक्षणीय आहेत.

## डेव्हिड ह्यूम

ह्यूम इंद्रियानुभवाला ज्ञानाचा प्राथमिक स्त्रोत मानतो. आपल्या मनात अनेक प्रकारच्या कल्पना असतात. या सर्वच प्रकारच्या कल्पनांमधून आपल्याला ज्ञान मिळू शकत नाही. ज्या कल्पना अनुभवातून निर्माण होतात त्याच जगाविषयीच्या ज्ञानप्राप्तीसाठी उपयोगाच्या असतात असे ह्यूम मानतो. अनुभवाचा आधार नसणाऱ्या कल्पना, खऱ्या समजून, त्यांच्यामधून ज्ञान निर्माण करण्याचा प्रयत्न आपण केला तर आपली फसगत होते. अशा कल्पना कितीही प्रभावी असल्या, कितीही मान्यताप्राप्त असल्या, तरी त्यांचा स्वीकार करता कामा नये याबद्‌दल ह्यूम ठाम आहे. कारणतेसंबंधी ह्यूमच्या पूर्वीच्या काळातले जे आकलन होते, त्याची अनुभवाधारित चिकित्सा ह्यूमने केली.

या काळात ज्याला 'कारण' समजले जाते, त्यात कार्य निर्माण करण्याची शक्ती असते अशी सर्वसाधारण समजूत होती. या शक्तीमधून कार्य निर्माण होत असल्यामुळे कार्य कारणापेक्षा अधिक शक्तिशाली असू शकत नाही, या विचाराला विज्ञानाचीही मान्यता होती. देकार्तसारख्या बुद्‌धिवादी तत्त्वज्ञावरही या मताचा प्रभाव होता. या मताशी संबंधित दुसरा विचार असा होता, की कारण आणि कार्य यांच्यातील संबंध अनिवार्य असतात. म्हणजेच कारण उपस्थित असेल, तर कार्य उत्पन्न व्हायलाच हवे. कारणाशिवाय कार्य नाही हे जसे खरे, तसेच कार्याशिवाय कारण नाही हेही खरेच! बुद्‌धिवाद्यांनी कार्यकारणसंबंध अनिवार्य मानला आहे. ह्यूमने कार्यकारणसंबंधाचे विश्लेषण करून हा संबंध अनिवार्य आहे हे मत पूर्णपणे नाकारले.

एखादी घटना, दुसऱ्या घटनेचे कारण आहे असे म्हटले जाते तेव्हा त्याचा अर्थ नक्की काय असतो हे ह्यूमने आपल्या विश्लेषणातून मांडले. 'अ' हे 'ब'चे कारण आहे असे म्हणताना आपल्याला पुढील गोष्टी सामान्यतः अभिप्रेत असतात (१) 'अ' आणि 'ब' स्थल-कालदृष्ट्या एकमेकांच्या समीप आहेत. (२) 'अ' आणि 'ब' यांच्यामध्ये क्रमबद्‌धता आहे. 'अ' कायमच 'ब'पूर्वी अस्तित्वात असते. (३) 'अ' आणि 'ब' यांचे नित्य म्हणजे नेहमीच साहचर्य किंवा सहसंबंध असतात. 'अ' आणि 'ब' नियमितपणे एकमेकांबरोबर असतात. (४) 'अ' आणि 'ब'मध्ये अनिवार्य संबंध असतो.

कार्यकारणसंबंधाच्या आपल्या आकलनाच्या या चारही घटकांचा विचार ह्यूम अनुभववादी पद्‌धतीने

करतो. त्याचा निष्कर्ष असा आहे, की समीपता, क्रमबद्धता, नियमित साहचर्य या पहिल्या तीनही कल्पना आपल्या मनात इद्रिंयानुभवांच्या आधारे निर्माण होतात. पण कार्यकारणसंबंधाच्या अनिवार्यतेची कल्पना मात्र आपल्या अनुभवाला कधीच येत नाही. जे अनुभवाला येत नाही, ते अस्तित्वात नाही या अनुभववादी भूमिकेला अनुसरून ह्यूम कार्यकारणसंबंध अनिवार्य नसतात असे प्रतिपादन करतो.

एक उदाहरण घेऊन ह्यूमचे मत स्पष्ट करूया. कडक उन्हात मेणबत्ती बराच वेळ ठेवली, तर मेण वितळते हा आपला अनुभव असतो. 'ऊन्ह' या कारणाने 'मेण वितळणे' हे कार्य घडून येते, असे आपण या अनुभवाचे स्पष्टीकरण देतो. ऊन्ह आणि मेण एकमेकांच्या संपर्कात असल्याखेरीज मेण वितळत नाही. हा अनुभव कार्यकारणाच्या समीपतेच्या कल्पनेला पुष्टी देतो. आधी मेण वितळले आणि नंतर मेणबत्ती उन्हात ठेवली अशी या क्रमाची उलटापालट कधीच होत नाही. क्रमबद्धतेच्या कल्पनेनुसार मेणबत्ती उन्हात ठेवल्यानंतरच वितळते. आपण कितीही वेळा मेणबत्ती कडक उन्हात ठराविक काळ ठेवली, तरी प्रत्येक वेळी ती वितळते, यातून नियमित साहचर्याची कल्पना यथार्थ ठरते. पण मेणबत्ती उन्हात वितळताना पाहताना अनिवार्यतेचा अनुभव मात्र कधीच येत नाही. या घटनेची पुनरावृत्ती केली, तरी अनिवार्यतेचा अनुभव येत नाही.

**चला विचार करूया!**

कारणकार्यसंबंध अनिवार्य नाही हे सुचविणाऱ्या उदाहरणांचा विचार करा. या उदाहरणांची सहाध्यायींबरोबर चर्चा करा. निवडक उदाहरणे वर्गात सादर करा.

अशा निरीक्षणांवरून ह्यूम असा निष्कर्ष काढतो की अनिवार्यता ही कल्पना आपल्या मनात खोलवर रुजली असली, तरी तिला वास्तवात आधार नाही. प्रश्न असा निर्माण होतो की मग ही कल्पना एवढी मान्यताप्राप्त कशी? ह्यूम या प्रश्नाचे उत्तर मानसशास्त्रीय भूमिकेतून देतो. त्याच्या मते, अनेक वेळा कारण आणि कार्य यांचे नियमित साहचर्य आपण बघतो. कार्य कारणाशिवाय घडत नाही हा अनुभवही आपण घेतो. कारण-कार्याच्या या साहचर्याच्या अनुभवामुळे, या दोहोंतील संबंध अनिवार्य आहेत असे आपण समजू लागतो. पण वस्तुस्थिती तशी नाही. कुठलाही संबंध अनिवार्य असेल, तर तो नाकारणे व्याघाती ठरते. एखादी आकृती त्रिकोणी आहे, पण तिला तीन नव्हे तर दोनच बाजू आहेत असे म्हणणे व्याघाती आहे. पण मेणबत्ती उन्हात ठेवली तरी ती वितळली नाही असे म्हणणे खोटे असले तरी व्याघाती नाही. उन्हातही न वितळणाऱ्या मेणबत्तीची कल्पना करणे आपल्याला शक्य आहे. पण दोन बाजू असणाऱ्या त्रिकोणाची कल्पना येईल का करता तुम्हाला?

कार्यकारणसंबंधाच्या ह्यूमच्या या चिकित्सेने तत्वज्ञान आणि विज्ञान या दोन्ही क्षेत्रांमध्ये खळबळ माजवली. कार्यकारणसंबंध आणि विगमन यांची ह्यूमने जी चिकित्सा केली, तिची दखल त्याच्यानंतरच्या सर्व तत्वज्ञांना घ्यावी लागली. तिचा प्रतिवाद करण्याच्या प्रयत्नांमधून तत्वज्ञानाचा, खास करून ज्ञानमीमांसेचा आणि पद्धतीशास्त्राचा विकास होण्यास मदत झाली.

## वैज्ञानिक दृष्टिकोन

तत्वज्ञानाच्या इतिहासात विविध परंपरा आणि चिंतक यांनी कार्यकारणभावाचा विचार कसा केला हे आपण जाणून घेतले. लक्षात घेण्यासारखी गोष्ट अशी की हे सर्व विवेचन मूलतः वैचारिक प्रयोगांवर आधारित होते. तत्वज्ञानाच्या वाटचालीत जेव्हा वैचारिक प्रयोगांच्या बरोबरीने साधने वापरून वस्तुनिष्ठ सत्याचा शोध घेतला जाऊ लागला तेव्हा 'विज्ञानाचा' वेगळा प्रवास सुरू झाला असे म्हणता येते. विज्ञान कार्यकारण या विषयाकडे कसे बघते हे आता पाहूया.

आपण पाहिले, की विज्ञान निसर्गनियमांचा अभ्यास करते. असे नियम जे विश्वव्यापी आहेत, सार्वकालिक आहेत. हे नियम माणसाच्या कसे लक्षात आले? माणसांनी निरीक्षणे केली, प्रयोग केले. त्या निरीक्षण/प्रयोगांच्या माध्यमातून हाती आलेल्या निष्कर्षातील रचनाबंध त्यांच्या लक्षात आले. समान परिस्थितीतील निरीक्षणात सुसंगती दिसते हे त्यांना आढळले. यातून नियम लक्षात आला. नियम तेव्हाच सिद्ध होतो जेव्हा नियमाच्या विपरीत निरीक्षणे नसतात. उदाहरणार्थ, ऊर्जा

आणि द्रव्याच्या अविनाशित्वाचा नियम.

या साऱ्या प्रक्रियेत महत्त्वाची गोष्ट अशी की हे सारे वस्तुनिष्ठ सत्याच्या संदर्भात घडत असते. कार्यकारणभावाच्या संदर्भात एखादी गोष्ट अशी का होते याचे उत्तर विज्ञान तेव्हाच देऊ शकते जेव्हा ती गोष्ट विज्ञान-नियमाच्या म्हणजे पर्यायाने वस्तुनिष्ठ सत्याच्या परिघातली असते. हवेतून अंगठी का काढून दाखवता येत नाही किंवा बसल्या ठिकाणी सोने दुप्पट का होऊ शकत नाही हे विज्ञान नियमाच्या साहाय्याने दाखवता येते. परंतु व्यक्तिनिष्ठ आणि आंतरव्यक्तिनिष्ठ वास्तवाच्या परिघातील सर्व गोष्टींचे स्पष्टीकरण विज्ञानाच्या म्हणजे वस्तुनिष्ठ वास्तव जाणण्याच्या पद्धतीतून देता येत नाही. उदा. कलेच्या प्रांतातील अनेक गोष्टी व्यक्तिनिष्ठ आणि आंतरव्यक्तिनिष्ठ असतात. त्यांचे स्पष्टीकरण वस्तुनिष्ठ सत्यशोधनाच्या पद्धतीने होऊ शकत नाही. एखादी कलावस्तू एखाद्याला सुंदर वाटते, एखाद्याला नाही. याबाबतीत वस्तुतः ती कलावस्तू सुंदर आहे की नाही हा प्रश्न गैरलागू ठरतो.

**चला करूया!**

ज्यांचे स्पष्टीकरण वस्तुनिष्ठ सत्यशोधनाच्या पद्धतीने होऊ शकत नाही अशा व्यक्तिनिष्ठ व आंतरव्यक्तिनिष्ठ वास्तवातील उदाहरणांची गटांमध्ये चर्चा करा. त्यांचे वस्तुनिष्ठ स्पष्टीकरण देण्यातील अडचणी समजून घ्या.

एखाद्या घटिताकडे कार्य म्हणून बघितले की त्याचे कारण काय असावे असा प्रश्न लगेच मनात येतो. अवकाळी पाऊस पडला, तर तो का बरे पडला? याप्रमाणे. समजा, याचे स्पष्टीकरण असे कळले, की दूर समुद्रात कुठेतरी कमी दाबाची प्रणाली तयार झाली आहे तर आपल्याला उत्तर समजते. निदान आपल्याला उत्तर समजल्यासारखे वाटते. कार्य कारणात आधीपासून असते किंवा नसते याची चर्चा जशी आधीच्या तत्त्वचिंतकांनी केली ती विचाराची चौकट आताच्या विज्ञानाला तंतोतंत लागू होते असे नाही. एखादी गोष्ट कारण म्हणून समजावून घेताना विज्ञान संभाव्यतेची परिभाषा वापरते. उद्या सूर्य उगवणार की नाही (म्हणजे खरेतर पृथ्वी फिरणार की नाही) या प्रश्नाचे उत्तरसुद्धा संभाव्यतेच्या परिभाषेतच विज्ञान देते. फक्त या विशिष्ट उदाहरणात ती संभाव्यता इतकी जास्त असते की संभाव्यता न वाटता ती खात्रीची गोष्ट वाटू लागते. ढग आहेत परंतु पाऊस पडणार की नाही ही संभाव्यता सूर्य उगवणार का नाही या संभाव्यतेपेक्षा पुष्कळ कमी असते. कारण पावसासाठी अन्य बरेच घटक प्रभावी ठरू शकतात.

हे नियम कुणी बनवले? असा प्रश्न विचारता येऊ शकतो. याबाबतीत विज्ञान असे मानते, की कोणीतरी ते जाणूनबुजून घडविले असे मानण्यासाठी वस्तुनिष्ठ पुरावे कोणतेही नाहीत. एक उदाहरण घेऊ. कल्पना करा, आपण नदीच्या किनाऱ्याने चालतो आहोत. आपल्याला नदीचा उघडा पडलेला काठ दिसतो. त्या काठाचे चित्र असे दिसते. खाली मोठे मोठे धोंडे, त्यावर छोट्या आकाराचे दगड, त्यावर अजून छोट्या आकाराचे आणि वर मऊ माती. आपल्यातील कोणी विचारतो, हे असे सुसंगत कुणी मांडून ठेवले असेल? आपण म्हणतो, हे काही कुणी मांडून ठेवले असण्याची गरज नाही. हे निसर्गनियमांनुसार चालणाऱ्या भौगोलिक प्रक्रियांमुळे झाले आहे. हे चित्र असेच कायमस्वरूपी राहील असेही नाही. त्यात बदल सतत चालू राहणार आहे. हा बदल काही वाटेल तसा होत नाही. त्यामागे देखील निसर्गनियम कारणीभूत असतात. आणि हीच गोष्ट अखिल विश्वाला लागू पडते.



नदीकाठ - मोठे दगड ते मऊ माती ही स्तरीय रचना 'करण्यासाठी' कोणाची आवश्यकता नसते. असे स्तर निर्माण होण्यामागे भूवैज्ञानिक नियम कारणीभूत आहेत.

कार्यकारणसंबंधाचे तत्त्वज्ञानाच्या परंपरेतील आकलन आणि आजचे वैज्ञानिक आकलन यांच्यातील संबंध आणि फरक आता तुमच्या लक्षात आले असतील.

## शब्दसूची

कारण - Cause
स्पष्टीकरण - Explanation
प्राक्कथन - Prediction
उपादानकारण - Material cause
निमित्तकारण - Efficient cause
विभाज्य - Divisible
प्रयोजनवादी - Teleological
विश्वरचनाशास्त्र/विश्वनिर्मितीशास्त्र - Cosmology
आकारिककारण - Formal cause
अंतिम कारण - Final cause
अनवस्था प्रसंग - Absurdity
अचल चालक - Unmoved mover
प्रबोधन युग - Renaissance
अनुभववाद - Empiricism
बुद्धिवाद - Rationalism
अनिवार्यता - Necessity
वैचारिक प्रयोग - Thought experiment
संभाव्यता - Probability

## स्वाध्याय

**प्रश्न १ गटातील वेगळा शब्द/जोडी ओळखून लिहा.**


(१) पृथ्वी, जल, ईश्वर, अग्नी
(२) उपादानकारण, आकारिककारण, अंतिम कारण, विचारकारण
(३) निरीक्षण, परिवर्तन, प्रयोग, निष्कर्ष.

**प्रश्न २ फरक स्पष्ट करा.**


(१) सत्कार्यवाद व असत्कार्यवाद
(२) कार्य व कारण.

**प्रश्न ३ संकल्पनाचित्र/तक्ता/ओघतक्ता पूर्ण करा**

(१)




(२)




**प्रश्न ४ टीपा लिहा.**

(१) 'एन्टिलेची'
(२) ॲरिस्टॉटलचा चतुर्विध कारणता सिद्धांत
(३) सत्कार्यवाद.

**प्रश्न ५ पुढील प्रश्नांची २० ते २५ शब्दांत उत्तरे लिहा.**

(१) भारतीय परंपरेत कार्यकारणाशी निगडित दोन महत्त्वाचे प्रश्न कोणते?
(२) सांख्यांच्या सत्कार्यवादाला परिणामवाद का म्हणतात?
(३) अद्वैत वेदांताच्या सत्कार्यवादाला विवर्तवाद का म्हणतात?

(४) आरंभवाद म्हणजे काय?

**प्रश्न ६ पुढील विधाने सत्य की असत्य हे सकारण सांगा.**

(१) ॲरिस्टॉटलने 'अचल गतिदाता' या स्वरूपात ईश्वरकल्पना मांडली.

(२) क्षमता आणि प्रत्यक्षता यांचा संबंध असतो.

**प्रश्न ७ खालील विधानांचे उदाहरणासहित स्पष्टीकरण द्या.**

(१) आडात नसेल तर पोहऱ्यात कुठून येणार?

(२) ह्यूमच्या मते कार्यकारणसंबंध अनिवार्य नसतो.

प्रश्न ८ असत्कार्यवाद म्हणजे काय? सोदाहरण स्पष्ट करा.

प्रश्न ९ ॲरिस्टॉटलने बदलांचे चार प्रकारांत केलेले वर्गीकरण स्पष्ट करा.

प्रश्न १० डेव्हिड ह्यूमची कारणविषयक कल्पना पूर्णतः स्पष्ट करा.

**प्रश्न ११ पुढील प्रसंगावर संवाद लिहा.**

एखादा खेळाचा सामना हरल्यानंतर खेळाडू वा प्रेक्षकांच्या गटाची 'सामना का हरला' याची कारणमीमांसा करणारी चर्चा.

**उपक्रम**

विविध वस्तू वा घटनांची कारण-कार्य मालिका चित्रकथारूपाने तयार करा व या चित्रकथांचे प्रदर्शन भरवा.

# ३. मी कोण आहे? मी काय आहे?

- प्रस्तावना
- भारतीय तत्त्वज्ञान
- पाश्चात्त्य तत्त्वज्ञान
- वैज्ञानिक दृष्टिकोन

## प्रस्तावना

'मी कोण?' हा प्रश्न आपण स्वतःला क्वचितच विचारतो किंवा खरे तर विचारतच नाही. अनोळखी व्यक्तीशी भेट झाल्यावर अर्थातच 'हे कोण?' असा प्रश्न पडतो. आपण त्या व्यक्तीला 'तू / तुम्ही कोण?' असे विचारतोसुद्धा! ती व्यक्तीही आपल्याला तोच प्रश्न विचारते. पण या प्रश्नांनी ना आपण गोंधळतो, ना ती व्यक्ती! आपण एकमेकांना आपापली ओळख करून देतो. ही ओळख नाव, गाव, शिक्षण, व्यवसाय, आवडीनिवडी, छंद अशी लांबलचकही असू शकते किंवा फक्त नाव सांगून संपूही शकते. आपल्याकडे महाविद्यालयाचे ओळखपत्र असते, आधारकार्डही असते. त्या ओळखपत्रावर आपली काही विशिष्ट माहिती आणि छायाचित्रही असते.



काही ठिकाणी प्रवेश मिळवण्यासाठी किंवा बँका, सरकारी कचेऱ्या यांमधील कामासाठी ही ओळख आवश्यकही असते आणि पुरेशीही. मात्र, दोन व्यक्तींमधील संबंधांसाठी एवढी औपचारिक ओळख सहसा पुरी पडत नाही. अगदी प्रवासात एकमेकांना भेटणाऱ्या व्यक्तींमध्येही जे नाते तयार होते, त्यात या औपचारिक ओळखीखेरीज परस्परांचे स्वभावविशेष, मते, सवयी, व्यक्त होण्याच्या पद्धती इत्यादींचाही वाटा असतो.

कित्येकदा छोट्याशा भेटीतही एखाद्या व्यक्तीशी आपला दाट परिचय झाला असे वाटते. काही वेळा खूप वर्षे ज्या व्यक्तीशी आपला संबंध आहे त्या व्यक्तीला आपण खरे म्हणजे ओळखलेच नाही की काय असे वाटायला लावणारे क्षण येतात. एवढेच काय, आपण स्वतःलाच स्वतःच्या वागण्या-बोलण्याने कधीकधी चकित करून टाकतो. 'मी असे करू शकेन / वागू शकेन असे मलाच कधी वाटले नव्हते' असे उद्‌गार आपण काढतो. हो ना? असे असेल तर त्याचा अर्थ असा नाही का होत की आपण स्वतःलाच पूर्णतः ओळखलेले नाही? आपली आपल्याशीच नीटशी ओळख नाही? 'तू कोण'? या प्रश्नाला समोरच्याला समजेल, पटेल, पुरेसे होईल असे उत्तर आपण देऊ शकतो हे खरेच, पण एका दृष्टीने पाहता त्या व्यक्तीला करून दिलेली ही ओळख तशी वरवरचीच असते. कारण 'मी कोण'? हा प्रश्न स्वतःलाच विचारून त्याचे उत्तर आपण शोधलेलेच नसते.

तसे बघायला गेले, तर व्याकरणदृष्ट्या 'मी' हे प्रथमपुरुषी, एकवचनी सर्वनाम आहे हे आपल्याला सगळ्यांना माहिती आहे. प्रत्येकजण स्वतःबद्दल बोलताना 'मी' हे सर्वनाम वापरतो/वापरते. म्हणजे प्रत्येकाचा 'मी' हा इतरांच्या 'मी'पेक्षा वेगळा असतो, एकमेवाद्वितीय असतो. 'मी म्हणजे काही तू नव्हेस असे बोलायला/करायला/वागायला' असे आपण कुणाला ना कुणाला सुनावलेलेच असते. आपला 'मी'पणा हा इतरांपासूनचा 'वेगळेपणा' असतो. ओळखपत्रात असलेली आपली माहिती, बहुसंख्य वेळा जात, धर्म, वय, लिंग, वर्ग, शिक्षण यांच्या संदर्भात आपली ओळख करून देते. त्यामधून आपले सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक स्थान स्पष्ट होते. आपल्याच

आर्थिक–सामाजिक स्तरांवर अनेक व्यक्ती असू शकतात. म्हणजेच आपण आणि इतर अनेक व्यक्ती आधी पाहिलेल्या निकषांनुसार एकसारख्या असू शकतात. मात्र, आपल्या वागण्या बोलण्याच्या, विचार करण्याच्या पद्धती, आपल्या लकबी, सवयी, आपल्या भाव–भावना, मते, मूल्ये, विचार हे जास्त करून व्यक्तिगत, वैयक्तिक स्वरूपाच्या असतात. ज्याला आपण इतरांपेक्षा वेगळा 'मी' समजतो तो या सगळ्या घटकांचे वैशिष्ट्यपूर्ण रसायन असते. यांमधील कित्येक घटक हे बदलणारे, बदलू शकणारे असतात, बदलतही असतात.

**चला करूया!**

तुमच्या लहानपणापासूनच्या फोटोंचे कोलाज तयार करा. सर्वांनी बनवलेले कोलाज एकत्र करून त्याचे वर्गात प्रदर्शन भरवा.


आपली मात्र अशी समजूत असते, की हे सर्व बदल 'माझ्यात' झाले आहेत. म्हणजे सत्तामीमांसेची परिभाषा वापरायची तर असे म्हणता येते, की 'मी' हे असे एक द्रव्य आहे ज्या संबंधात हे बदल होतात.

**चला करूया!**

'मी'चे स्वरूप स्पष्ट करणारे संकल्पनाचित्र गटात तयार करा.

'मी'ला द्रव्य मानले की अर्थातच हा 'मी' कशावरही अवलंबून नसणारा, स्वयंभूपणे अस्तित्वात असणारा असा ठरतो. पण मुळात असे काही द्रव्य आहे का? असले, तर त्याचे स्वरूप काय आहे? जड का चेतन? असे अनेक प्रश्न तत्त्वज्ञानात निर्माण होतात. मुळात तत्त्वज्ञानात 'मी कोण'? किंवा 'कोऽहम्'? असा प्रश्न विचारला जातो त्याचा निर्देश व्यक्तिविशिष्ट 'मी'कडे नसतो. आपण वर पाहिल्यानुसार प्रत्येकाचा 'मी' इतरांच्या 'मी'पेक्षा वेगळा, वैशिष्ट्यपूर्ण असतो. त्या वैशिष्ट्यपूर्णतेच्या पातळीवर 'मी कोण' या प्रश्नाचे सर्वसाधारण उत्तर असणे शक्य नाही हे सरळच आहे. तत्त्वज्ञान ज्या 'मी'चे स्वरूप जाणून घ्यायला उत्सुक असते तो 'मी' सगळ्यांमध्ये म्हणजे सर्व माणसांमध्ये आढळणारा असतो. एका अर्थी तो मानवजातीचा 'मी' असतो. माणसाचा 'स्व' असतो म्हणूनच 'मी कोण'? या प्रश्नाचे उत्तर माणसाला स्वस्वरूपाची ओळख करून देत असते.

आपण मागच्या वर्षी हे पाहिलेच आहे, की ज्या चार संबंधांचा अभ्यास तत्त्वज्ञान प्रामुख्याने करते, त्यात माणसाचा स्वतःशी असलेल्या संबंधाचाही समावेश आहे.




एक चांगले जीवन जगण्यासाठी हा अभ्यास खूप महत्त्वाचा आहे. आपण कोण आहोत, काय आहोत, आपल्या क्षमता आणि मर्यादा काय आहेत, आपल्याला काय हवे आहे, काय नको आहे, आपण काय करायला हवे, काय करायला नको हे सगळे नीटपणे ध्यानात येण्यासाठी आधी आपण 'माणूस' आहोत म्हणजे नेमके काय आहोत हे कळायला हवे. तत्त्वज्ञानाच्या सत्तामीमांसा या शाखेत या प्रश्नाला खूप महत्त्व आहे. या प्रश्नाची जी उत्तरे दिली जातात, त्यांचा थेट प्रभाव ज्ञानमीमांसा, नीतिमीमांसा, सौंदर्यमीमांसा या इतर शाखांमधील समस्यांवर, संकल्पनांवरही पडतो. साहजिकच, भारतीय आणि पाश्चात्त्य या दोन्ही परंपरांमध्ये या प्रश्नावर केलेले मौलिक चिंतन आढळते.

### भारतीय तत्त्वज्ञान

**चार्वाक दर्शन :** आपल्याला हे माहितीच आहे की चार्वाक जडवादी आहेत. साहजिकच जड देहापासून स्वतंत्र असे कुठले चैतन्य किंवा चेतनद्रव्य असते हे ते नाकारतात. याचा अर्थ असा नाही, की ते चैतन्याचे किंवा जाणिवेचे अस्तित्व नाकारतात. जोपर्यंत आपण जिवंत असतो, तोपर्यंत आपले शरीर हे अर्थातच चैतन्याने युक्त असते. हा चैतन्ययुक्त देह म्हणजेच 'मी' असे चार्वाकांचे

'मी कोण'? या प्रश्नाचे उत्तर आहे. दुसऱ्या शब्दात सांगायचे म्हणजे चार्वाक आत्म्याचे स्वतंत्र अस्तित्व नाकारतात.

'आत्मा' म्हणजे जे शरीराबरोबर नष्ट होत नाही असे चैतन्य आहे असे सहसा मानले जाते. चिद्‌वादी आणि वास्तववादी तत्त्वज्ञ चैतन्याचे असे स्वतंत्र अस्तित्व मानतात. जडवादी मात्र चैतन्य जडामधूनच/भौतिक द्रव्यांमधूनच निर्माण होते असे प्रतिपादन करतात. जडद्रव्य मुळात चेतनारहित असताना त्यापासून चैतन्य कसे निर्माण होते असा प्रश्न इथे साहजिकच उपस्थित होतो. काही उदाहरणे देऊन चार्वाक त्याचे उत्तर देतात. ज्याप्रमाणे हिरव्या रंगाचे विड्याचे पान, पांढरा चुना, तपकिरी कात असे पदार्थ एकत्र खाल्ले, की त्यांच्यामध्ये मुळात नसलेल्या लाल रंगाची उत्पत्ती होते, त्याचप्रमाणे वेगवेगळी जडद्रव्ये विशिष्ट प्रमाणात एकत्र आली की त्यांच्यामधून चैतन्याची निर्मिती होते. 'चैतन्य ज्यामध्ये आहे तो देह म्हणजेच आत्मा' अशी चार्वाकांची आत्म्याची व्याख्या आहे. "चैतन्यविशिष्ट देह एवं आत्मा" असे ते म्हणत. आत्मा अमर असतो, देह नष्ट झाल्यावर तो स्वर्गात किंवा नरकात जातो अथवा त्याला पुनर्जन्म मिळून तो नवीन देहात प्रवेश करतो, या आणि अशा त्या काळातील रूढ समजुती आणि तात्त्विक विचार त्यांनी पूर्णपणे नाकारले. चार्वाकांची ही भूमिका 'भूतचैतन्यवाद' किंवा 'देहात्मवाद' म्हणून ओळखली जाते. प्रत्यक्ष किंवा इंद्रियानुभव हे एकच प्रमाण मानणाऱ्या चार्वाकांच्या ज्ञानमीमांसेच्या दृष्टिकोनाशी ही भूमिका तार्किकदृष्ट्या अतिशय सुसंगत आहे. त्यांच्या ज्ञानमीमांसेचा अभ्यास आपण पुढे करणारच आहोत.

**चला शोधूया!**

'चेतनारहित जडद्रव्यातून चैतन्य निर्माण होते' हे सुचवणारी उदाहरणे शोधा.

## जैन दर्शन

वास्तववादी असणारे जैन, प्रत्येक सजीव, जडदेह आणि चैतन्य या दोन स्वतंत्र द्रव्यांनी मिळून बनलेला असतो असे मत मांडतात. जैनांच्या मते, फक्त प्राणिमात्रांनाच नव्हे, तर वनस्पतींमध्ये, एवढेच नव्हे तर सूक्ष्म धूलिकणांमध्येही आत्मा असतो; मात्र त्यांच्यामधील जाणिवेची किंवा चेतनेची पातळी वेगवेगळी असते. या आत्म्यालाच ते 'जीव' असे नाव देतात. जीव हालचाल करू शकतात की नाही, किती ज्ञानेंद्रियांच्यामार्फत ते जगाचा अनुभव घेतात, ते बद्‌ध असतात की मुक्त या निकषांच्या आधारे जैनांनी जीवांचे पद्‌धतशीर वर्गीकरण केले आहे.

### जीवांचे वर्गीकरण : जैन दर्शन

- जीव
  - संसारी जीव/बद्‌ध जीव
    - त्रस
    - स्थावर
      - एकेंद्रिय
        - पृथ्वीकाय जलकाय अग्निकाय वायुकाय वनस्पतीकाय
  - मुक्त जीव
    - सिद्‌ध जीव
    - तीर्थंकर/अर्हत

त्रस:

| इंद्रिय संख्या | इंद्रिय नावे | उदाहरणे |
|---|---|---|
| द्विंद्रिय | स्पर्श, रसना | गांडूळ इ. |
| त्रिंद्रिय | स्पर्श, रसना, घ्राण | मुंगी, ढेकूण इ. |
| चतुरिंद्रिय | स्पर्श, रसना, घ्राण, चक्षू | डास, मधमाशी इ. |
| पंचेंद्रिय | स्पर्श, रसना, घ्राण, चक्षू, श्रवण | गाय, घोडा इ. प्राणी व मनुष्य |

सर्व जीवांमध्ये चेतनेच्या पातळीवरचे असे फरक असले, तरी प्रत्येक जीव चैतन्यस्वरूप असतो. हा जीवच ज्ञाता, कर्ता, भोक्ता असतो. सर्व जीवांमध्ये अमर्याद ज्ञान, अंतर्दृष्टी, शक्ती आणि सुख/आनंद मिळवण्याची क्षमता असते. मात्र त्यामध्ये येणारे अडथळे दूर करण्याची गरज असते. जीव ज्या जडदेहाशी जोडलेला असतो, त्यामुळे हे अडथळे उत्पन्न होतात. जैन दर्शनात ज्याला पुद्‌गल म्हणतात, अशा जडाच्या अतिसूक्ष्म कणांपासून जडदेह तयार होतो. पुद्‌गल याचा अर्थ ज्यांचे संघटन किंवा विघटन होऊ शकते असे कण किंवा अणू. जिवाच्या किंवा आत्म्याच्या पूर्वकर्मांमुळे त्याच्यामध्ये ज्या वासना, इच्छा असतात, त्यांना अनुसरून विशिष्ट प्रकारचे कण त्या जिवांकडे आकृष्ट होतात आणि विशिष्ट आकार धारण करतात. देहाच्या या प्रत्येक कणात चैतन्याचे अस्तित्व असते. म्हणजेच जीवाच्या शरीर, इंद्रिये, मन हे सगळे आत्म्याच्या परिपूर्णतेच्या मार्गातले अडथळे मानले जातात. ही परिपूर्णता साध्य करेपर्यंत जीव जडाशी बांधलेला राहतो. एका देहाच्या मरणानंतर दुसरा देह धारण करत राहतो. या पुनर्जन्माच्या चक्रातून सुटून मुक्त होण्यासाठी श्रद्‌धा, ज्ञान आणि चारित्र्य यांची आवश्यकता असते असे जैनांचे मत आहे. 'मी कोण' या प्रश्नाचे जैनांचे उत्तर, जो मुक्त होऊन अनंत ज्ञान, अनंत दर्शन, अनंत शक्ती (वीर्य) आणि अनंत सुख मिळवू शकतो तो जीव असे आहे.

## बौद्‌ध दर्शन

भारतीय परंपरेत चार्वाकांव्यतिरिक्त आत्म्याचे अस्तित्व नाकारणारे दर्शन म्हणजे बौद्‌ध दर्शन. त्यामागची त्यांची कारणे चार्वाकांपेक्षा खूप वेगळी आहेत. बौद्‌ध दर्शन कुठल्याही प्रकारचे नित्य, शाश्वत द्रव्य मानत नाही हे आपण पाहिले आहे. अनित्यता हा सत्‌चा आवश्यक गुणधर्म आहे असे ते मानतात. 'मी' किंवा 'स्व'च्या संदर्भात याचा अर्थ असा होतो, की हा 'स्व' सतत बदलतो. जन्मापासून मृत्यूपर्यंत तेच किंवा तसेच राहणारे असे काहीच आपल्यामध्ये नसते. आपण क्षणोक्षणी वेगळे असतो. पण आपल्याला तर हा क्षणोक्षणी होणारा बदल जाणवत नसतो. आपण बदलतो हे खरेच, पण प्रत्येक क्षणी आपण काही पूर्णपणे वेगळे होत नाही. किती वेळा खूप महिन्यांनी भेटलेले मित्र-मैत्रिण म्हणतात, 'तू तर होतीस तशीच आहेस. काहीच बदल नाही तुझ्यात.' आपल्या खूप लहानपणापासूनच्या आठवणी, अनुभव आपल्याला असेच सांगतात की 'मी', 'तीच' किंवा 'तोच' आहे. जरी आपण सतत बदलत असलो तरी हा 'तेच' असण्याचा, तदेवतेचा अनुभव आपल्याला का बरे येतो?

बौद्‌धांचे या प्रश्नाला उत्तर असे, की आपल्या अनुभवाला येते ते सातत्य, एक प्रकारचे अखंडत्व. पण सातत्य म्हणजे शाश्वतता किंवा नित्यता नव्हे. एखाद्या तेलाच्या भांड्यातून आपण तेल सावकाश ओतले तर आपल्याला तेलाची एक सलग धार दिसते. पण प्रत्यक्षात ती अनेक थेंबांनी तयार झालेली असते. त्या थेंबांमधल्या सलगपणामुळे त्यांचे वेगळेपण आपल्याला दिसत नाही. प्रत्येक क्षणी वेगळे थेंब पेल्याबाहेर येत असतात, पण आपण मात्र त्यांना एका संततधारेच्या रूपातच बघत असतो. तसेच आपले अस्तित्व असते. अनेक परिवर्तनशील घटक मिळून ते तयार होते. त्यात कायम, सतत उपस्थित असणारा असा एकही घटक नसतो, एकही द्रव्य नसते. या घटकांची रचनाही बदलत असते; पण त्यामध्ये खंड पडत नसल्यामुळे त्यांची सलगता, सातत्य टिकून राहते. त्यामुळे आपल्याला आपल्यामध्ये काहीतरी अपरिवर्तनीय, नित्य तत्त्व आहे असे वाटू लागते. हे अधिक स्पष्ट करण्यासाठी बौद्‌ध दिव्याच्या ज्योतीचे उदाहरण देतात. दिव्याची जळती ज्योत दर क्षणी वेगळी असते. कारण प्रत्येक क्षणी तेलाचा निराळा थेंब, कापसाच्या निराळ्या कणाबरोबर हवेतला प्राणवायू वापरून जळत असतो. पण हे सतत होत असल्यामुळे आपल्याला एकच ज्योत जळत असल्याचा अनुभव येतो. याप्रमाणेच आपले अस्तित्व पाच घटकांचे मिळून तयार झालेले असते, असे बौद्‌धांचे मत आहे.

**चला बोलूया!**

परिवर्तनातील सातत्य आणि त्यातून जाणवणारी सलगता यांवर आपल्या सहाध्यायींशी चर्चा करा.

## सांख्य दर्शन

सांख्यांच्या मते, 'स्व' म्हणजे आत्मा. शरीर, मन, बुद्‌धी या सगळ्यांपेक्षा तो पूर्णपणे वेगळा असतो.

आत्मा म्हणजे पुरुष आणि शरीर, मन, बुद्धी म्हणजे प्रकृती. ही दोन्ही मनुष्यांमध्ये एकत्र आलेली असतात. आपले शरीर म्हणजेच आपण असे आपल्याला सामान्यतः वाटते. चार्वाकांनाही तसेच वाटते हे आपण पाहिलेच. सांख्य मात्र असे प्रतिपादन करतात, की शरीराला 'स्व' समजणे हे अज्ञान आहे. आपला 'स्व' वास्तविकपणे आपला आत्मा आहे. आत्मा चैतन्यस्वरूप आहे. तो कधीच बदलत नाही, विनाश पावत नाही. त्याला कुठलेही सुखदुःख होत नाही. तो कुठलीही कृती करत नाही. परिवर्तन, कृतिशीलता, सुखदुःख, आसक्ती, द्वेष हे सगळे देह-मनामध्ये असतात. म्हणजेच ते प्रकृतीचे गुणधर्म असतात.

**बुद्धांची पंचस्कंध ही संकल्पना**

(१) रूपस्कंध : शरीर

(२) वेदनास्कंध : सुखात्मक, दुःखात्मक आणि असुखदुःखात्मक संवेदना

(३) संज्ञास्कंध : त्या अनुभवास ठराविक नाव देणे.

(४) संस्कारस्कंध : नामनिर्धारणानंतर तत्संबंधीचे पूर्वसंस्कार जागृत होणे.

(५) विज्ञानस्कंध : पदार्थाची ज्ञानेंद्रियांना होणारी जाणीव.

रूपस्कंध भौतिक तर वेदनास्कंधादी चार मानसिक स्वरूपाचे असतात. 'स्व' म्हणजे आत्मा, जिवात्मा, परमात्मा नव्हे. खरेतर पंचस्कंधाच्या समुदायास 'स्व' असे म्हटले जाते इतकेच. या मताचा उलगडा करण्यासाठी मिलिंदराजा व बौद्ध भिख्खू नागसेन यांच्यातील संवाद सांगता येतो.

**मिलिंद** : आपले नाव .....?

**नागसेन** : मला नागसेन म्हणतात. म्हणतात खरं, पण 'नागसेन' असा काही नसतो.

**मिलिंद** : 'नागसेन' जर नसतो, तर मग प्रार्थना कोण करतो, वेष कोण धारण करतो, कोण खातो, राहतो, नीतीचे पालन करतो, ध्यानमग्न असतो, निर्वाण प्राप्त करतो? पुण्य नसते, पाप नसते, कर्ता नसतो नि पाप-पुण्य घडवून आणणारा कोणी नसतो, शुक्लकृष्ण कर्मांची फळं, परिणाम नसतात. तर मग नागसेन म्हणजे काय फक्त देहावरील केस असतात काय...?

**नागसेन** : "मी तसे म्हटलेले नाही राजा".

**मिलिंद** : तर मग काय नखे, दात, त्वचा, मांस, मज्जा, मेंदू म्हणजे नागसेन की यांपैकी एक की हे सर्व...?

नागसेनने या सर्व शक्यता नाकारल्या.

**मिलिंद** : "तर मग या सर्व स्कंधांचा समुदाय म्हणजे नागसेन का"?

**नागसेन** : "नाही राजा..."

**मिलिंद** : "पण स्कंधांव्यतिरिक्त नागसेनात काही असते का?"

याचेही उत्तर त्याने नकारात्मकच दिले आणि मग तो म्हणाला,

**नागसेन** : "राजा, तू पायी आलास की रथातून..."?

**मिलिंद** : "मी रथातून आलो".

**नागसेन** : "मग रथ म्हणजे काय ते सांग. रथ म्हणजे आरे, आस, सांगाडा, जोखड...? अर्थातच नाही. मग त्या सगळ्यांचा मिळून जो असतो, तो रथ का? तर तसेही नाही. रथ या सगळ्यांव्यतिरिक्त असतो का? तर तसेही नाही. पण या सगळ्यांनी मिळून जे तयार होते, त्याला 'रथ' म्हणण्यात येते. म्हणजे 'रथ' नामक कायमस्वरूपी पदार्थ नसून या घटकपदार्थांच्या समुदायास 'रथ' म्हटले जाते, सर्वसामान्यपणे तसे नाव दिले जाते. रथ हा जसा कायमस्वरूपी पदार्थ नसतो, तसा आत्मा कायमस्वरूपी नसतो. पंचस्कंधांच्या संघातास आत्मा किंवा 'स्व' (self) म्हटले जाते".




आत्मा कर्ता, भोक्ता नसला, तरी ज्ञाता मात्र असतो. प्रकृतीमधून निर्माण होणारे सगळे काही ज्ञानाचा विषय होऊ शकते, पण प्रकृतीपेक्षा स्वतंत्र असणारा पुरुष मात्र कधीच ज्ञानविषय किंवा ज्ञेय नसतो. प्रत्येकाचा आत्मा वेगळा असतो. तो शरीराबरोबर नष्ट होत नाही. बदलणारे, नष्ट होणारे शरीर म्हणजे आपण नसून शुद्ध चैतन्य असलेला अमर आत्मा हे आपले खरे 'स्व' रूप आहे असे सांख्यांचे मत आहे.

### अद्‌वैत वेदान्त दर्शन

जैन आणि सांख्य दर्शने जडवादी नसल्यामुळे आत्म्याचे स्वतंत्र अस्तित्व मान्य करतात, पण त्याच वेळी जडाचे अस्तित्व नाकारत नाहीत. अद्‌वैत वेदान्त दर्शन चिद्‌वादी असल्यामुळे फक्त आत्म्याचेच अस्तित्व मान्य करते आणि भौतिक द्रव्याचे अस्तित्व नाकारते. त्याचप्रमाणे एकतत्त्ववादी असल्याने सांख्यांप्रमाणे ते आत्म्याचे अनेकत्व स्वीकारत नाहीत. त्यांच्या मते, ब्रह्म हे एकमेव सत् आहे हे आपण पाहिलेलेच आहे. ज्याला आपण 'आपला' आत्मा समजतो, तो खरे तर ब्रह्मच आहे. 'मी कोण'? ('कोऽहम'?) या प्रश्नाचे उत्तर 'मी ब्रह्म आहे' ('अहम् ब्रह्मास्मि'।) असे आहे. ब्रह्माप्रमाणेच मी निर्गुण, निराकार, अविनाशी, अविचल, अपरिवर्तनीय आहे. केवळ अज्ञानामुळे आपण स्वतःला शरीर समजतो, इतरांपेक्षा वेगळे समजतो. व्यावहारिक सत्तेच्या पातळीवर त्याप्रमाणे आपला व्यवहार, वागणे असते, हे खरेच. पण आत्मज्ञान म्हणजेच ब्रह्मज्ञान झाल्यावर आपण शुद्‌ध चैतन्य आहोत, पूर्ण विश्वात भरून आहोत असे आपल्या अनुभवाला येते असे अद्‌वैताचे सांगणे आहे.

**चला करूया!**

आत्म्याचे जड स्वरूप व चैतन्य स्वरूप मानणाऱ्या दोन भूमिकांचे 'वादसभा पद्‌धती' च्या साहाय्याने सादरीकरण करा.

### पाश्चात्त्य तत्त्वज्ञान

सॉक्रेटिसपूर्व काळापासून पाश्चात्य तत्त्वज्ञानात माणसाच्या 'स्व'चे किंवा 'मी'चे स्वरूप काय आहे याचा विचार केला गेलेला दिसतो. तुम्ही सर्वांनी भूमितीमध्ये पायथागोरसचा सिद्‌धांत अभ्यासलाच आहे. पण पायथागोरस हा प्राचीन ग्रीक तत्त्वज्ञ होता हे तुम्हांला माहिती आहे का? पायथागोरस तत्त्वज्ञानाला जीवन जगण्याचा मार्ग मानत असे. त्या मार्गाने वाटचाल करणाऱ्यांचा त्याने एक पंथही स्थापन केला होता. त्याचे आणि त्या पंथाचे तत्त्वज्ञान पायथागोरिअन तत्त्वज्ञान म्हणून ओळखले जाते.

या तत्त्वज्ञानाने भारतातील सांख्य परंपरेप्रमाणे मनुष्य हा शरीर आणि आत्मा या दोन्हींचा संघात असतो असे मत मांडले होते. आत्म्याचे अमरत्व आणि पुनर्जन्म या दोन्ही कल्पनाही त्यांना मान्य होत्या. शरीर म्हणजे जणू आत्म्याला अडकवून ठेवणारा पिंजरा आहे आणि या पिंजऱ्यातून मुक्त होणे हे आत्म्याचे साध्य असते असे त्यांचे मत होते. याउलट, जडवादी असणारा डेमॉक्रिटस आत्माही जड स्वरूपाचाच आहे असे मानत असे. त्याच्या मतानुसार, आत्मा अग्निच्या गोल, मुलायम अणुंपासून तयार होतो. मात्र, आत्म्याचे अमरत्व त्याला मान्य नाही.

### प्लेटो

शरीर आणि आत्मा ही दोन स्वतंत्र द्रव्ये आहेत या मताचा प्रभाव प्लेटोवरही होता. पाश्चात्त्य तत्त्वज्ञानाच्या मुख्य प्रवाहात पायथागोरस आणि प्लेटो याच दोन तत्त्वज्ञांनी पुनर्जन्माची आणि मुक्तीची कल्पना मान्य केलेली दिसते. सत्‌चे विभाजन अमूर्त सामान्य

आकारांच्या आणि मूर्त विशिष्ट वस्तूंच्या दोन स्वतंत्र जगांत प्लेटोने केले हे आपण पाहिले. आत्मा हा आकारांच्या जगाचा रहिवासी असतो, तर शरीर हे विशिष्टांच्या जगात असते. इतर सर्व विशिष्टांप्रमाणे शरीर निर्माण होते, बदलते, नष्ट होते. आत्मा मात्र कधीही बदलत नाही, निर्माणही होत नाही आणि नष्टही होत नाही. आकारांच्या जगात असताना त्याला सामान्यांचे, आकारांचे ज्ञान असते. पण आत्मा शरीराशी जेव्हा जोडला जातो, तेव्हा त्याला त्या ज्ञानाचा विसर पडतो. विशिष्ट वस्तू त्याला त्या जगातल्या आकारांची आठवण करून देत असल्या, तरी तत्त्वज्ञानाच्या अभ्यासातूनच त्याला त्या ज्ञानाची पुन्हा प्राप्ती होते. आत्मा मुळात अविभाज्य असतो. मात्र, शरीरामध्ये बद्ध असलेला आत्मा बुद्धी, इच्छा-प्रेरणा आणि सहज-प्रेरणा हे तिन्ही मिळून होतो. या तिन्हींमध्ये संतुलन असायला हवे आणि इच्छा-प्रेरणा आणि सहज-प्रेरणांवर नेहमी बुद्धिचे नियंत्रण असायला हवे असे प्लेटोचे प्रतिपादन होते.




### ॲरिस्टॉटल

ॲरिस्टॉटलच्या दृष्टीने फक्त विशिष्टांचे जगच अस्तित्वात आहे. आकार किंवा सारतत्त्वे ही वेगळ्या जगात नव्हे, तर विशिष्टांमध्येच समाविष्ट असतात. प्रत्येक विशिष्ट वस्तू जडतत्त्व आणि आकार दोन्ही मिळून तयार होते. आकाररहित जडतत्त्व किंवा जडतत्त्वरहित आकार आपल्या अनुभवाला कधीच येत नाहीत. सजीवांमध्येही जडतत्त्व आणि आकार यांची सांगड आपल्याला दिसते. सजीवांना निर्जीवांपेक्षा वेगळे करणारे वैशिष्ट्य म्हणजे ते गतिशील असतात, स्वतःच हालचाल करू शकतात. त्यांच्यामध्ये गतितत्त्व समाविष्ट असते. या तत्त्वानुसार त्यांचा विकास होतो. प्रत्येक सजीवात काही विशिष्ट कार्ये करण्याच्या क्षमता असतात. या क्षमता प्रत्यक्षात येणे म्हणजे विकास. सजीवांच्या देहाची रचना, त्यांना जी विशिष्ट कार्ये करण्याच्या क्षमता असतात त्यानुसार असते. देह हा जडभौतिक तत्त्व आणि त्याची विशिष्ट रचना किंवा आकार एकत्र येऊन तयार होतो. हा आकार म्हणजेच आत्मा असे ॲरिस्टॉटलचे मत आहे. त्याच्या मतानुसार सर्व सजीवांना आत्मा असतो.

**ॲरिस्टॉटलने श्रेष्ठता क्रमानुसार केलेले आत्म्यांचे वर्गीकरण**

| प्रकार | कार्ये/क्षमता |
|---|---|
| (१) मानव | पोषण, पुनरुत्पादन, इंद्रियसंवेदन, गमनशक्ती, कल्पनाशक्ती, बुद्धी |
| (२) प्राणी | पोषण, पुनरुत्पादन, इंद्रियसंवेदन, गमनशक्ती |
| (३) वनस्पती | पोषण, पुनरुत्पादन |

सजीवांच्या क्षमतांनुसार वनस्पती, मनुष्येतर प्राणी आणि माणूस अशी त्यांची श्रेणीबद्ध वर्गवारी तो करतो. आत्मा हा देहाचा आकार असल्यामुळे शरीराबरोबरच नष्ट होतो. म्हणून ॲरिस्टॉटल आत्म्याच्या अमरत्वाची कल्पना स्वीकारत नाही. बुद्धिशीलता हा माणसाच्या आत्म्याचा सारभूत गुण आहे. प्राणी आणि वनस्पती बुद्धिशील नसतात. त्यामुळेच बुद्धीच्या आधारे किंवा बुद्धिनिष्ठ जीवन जगणे हेच माणसासाठी श्रेयस्कर आहे असे तो सांगतो.

मध्ययुगीन तत्त्वज्ञानावर मुख्यतः ख्रिश्चन धर्म-कल्पनांचा प्रभाव होता. या कल्पनांनुसार माणूस जडदेह आणि चैतन्यरूप आत्मा यांनी मिळून झालेला असतो. देह नश्वर तर आत्मा अमर असतो; म्हणजेच देह नष्ट झाल्यावरही आत्मा अस्तित्वात असतो. मात्र बहुतेक मध्ययुगीन तत्त्वज्ञ पुनर्जन्म मानत नाहीत. हे सगळे विश्व ईश्वराने शून्यातून उत्पन्न केले आणि ईश्वराची यांतील सगळ्यांत लाडकी निर्मिती म्हणजे माणूस असे त्यांचे मत आहे. माणसाला ईश्वराने स्वतःच्या प्रतिमेनुसार

घडवले अशी त्यांची समजूत आहे. ईश्वर सर्व मानवांचा पिता आहे आणि त्याच्या आज्ञेनुसार, त्याला आवडेल, रुचेल अशा पद्धतीने जीवन जगणे हे माणसाच्या आयुष्याचे ध्येय असायला हवे अशी त्यांची धारणा आहे. माणसाचे हे द्वैती रूप, काही अपवाद वगळता पाश्चात्य विचारधारेने अलीकडच्या काळापर्यंत स्वीकारलेले दिसते.



**चला लिहूया!**

चार्वाक व ॲरिस्टॉटल यांचा 'स्व'संकल्पनेतील साम्य-भेद लिहा.

### रेने देकार्त

वास्तववाद आणि द्वितत्त्ववाद या दोन्हींचा स्वीकार करणाऱ्या सर्वच तत्त्वज्ञांनी माणसाचे द्वैती रूप स्वीकारले आहे. देकार्तही त्याला अपवाद नाही. जड आणि चेतन ही दोन स्वतंत्र द्रव्ये माणसात एकवटतात असे त्याचे मत होते हे आपण पाहिलेच आहे. शरीर जडद्रव्याचे असते, 'विस्तार' हा जडाचा गुणविशेष देहात असतो. मन किंवा आत्मा मात्र अवकाशापलीकडे असतो आणि बुद्धिशीलता किंवा विचारशीलता हा आत्म्याचा सारभूत गुण असतो. ही दोन्ही स्वतंत्र द्रव्ये एकत्र येतात ती अर्थातच ईश्वरामुळे. पण एकत्र आल्यानंतर त्या दोन्हींमध्ये कुठल्या प्रकारचे संबंध येतात याचा विचार करावा लागतो. शरीर आणि मन या दोन्हींमध्ये सतत काही ना काही आंतरक्रिया घडून येतात हा आपला दैनंदिन जीवनातला अनुभव असतो. आजारी असताना कशातच मन लागत नाही, तर मन निराश, उदास असताना अन्नावरची वासना उडते. प्रफुल्लित मन आजाराचा विसर पाडते, तर शारीरिक व्यायामानेही मनःस्थिती सुधारते, हे आपण पाहतो.



**चला बोलूया!**

दैनंदिन जीवनात अनुभवास येणाऱ्या शरीर-मन यांच्यातील आंतरक्रियांच्या उदाहरणांची चर्चा करा.

अशा अनुभवांच्या आधारे देकार्त 'शरीर-मन आंतरक्रियावाद' अशी उपपत्ती मांडतो. देह आणि मन पूर्णपणे भिन्न असले तरी एकमेकांवर प्रभाव टाकू शकतात, त्यांच्यामध्ये कार्यकारणसंबंध घडून येतात हे देकार्तचे मत सत्तामीमांसेत खूप वादग्रस्त ठरले.

देकार्तनंतर शरीर-मन संबंध अशा एका नव्याच समस्येचा उद्भव सत्तामीमांसेत झाला.

**शरीर-मन यांच्या संबंधांबद्दलच्या उपपत्ती आणि त्या मांडणारे तत्त्वज्ञ/विचारवंत**

| उपपत्ती | तत्त्वज्ञ |
|---|---|
| (१) आंतरक्रियावाद | रेने देकार्त |
| (२) प्रसंगवाद | ग्यूलिंक्स, मालब्रान्श |
| (३) समांतरवाद | स्पिनोझा |
| (४) पूर्वसंस्थापित सुसंवाद | लाईब्निझ |
| (५) तटस्थ एकतत्त्ववाद | अर्न्स्ट माख, विल्यम जेम्स |
| (६) वर्तनवाद | जेम्स वॅटसन, बी. एफ.स्किनर |

### डेव्हिड ह्यूम

अनुभववादी ब्रिटिश तत्त्वज्ञ डेव्हिड ह्यूमने मांडलेले विचार आधुनिक तत्त्वज्ञानात अतिशय वैशिष्ट्यपूर्ण ठरतात. ह्यूमला संशयवादी मानले जाते. त्याच्या काळात सर्वमान्य असणाऱ्या काही महत्त्वाच्या संकल्पनांबद्दल त्याने मूलभूत शंका उपस्थित केल्या. त्यांतील एक महत्त्वाची संकल्पना म्हणजे द्रव्य. अनुभववादाच्या मांडणीनुसार आपल्या ज्ञानेंद्रियांच्या अनुभवाला जे येऊ शकते, तेवढेच सत् असते. अनुभवातीत 'सत्' असे काहीच असू शकत नाही, असे त्यांचे मत आहे. या मताला अनुसरून ह्यूमने असे प्रतिपादन केले, की द्रव्य नावाने निर्देश होणारे, सर्व गुणधर्मांना आधारभूत असणारे असे काहीही आपल्या अनुभवाला येत नाही, त्यामुळे द्रव्यांचे अस्तित्व स्वीकारण्याची गरज नाही. भौतिक वस्तूंचे निरनिराळे गुणधर्म, त्यांची परिमाणे, त्यांच्यामधील आंतरक्रिया एवढेच आपल्या अनुभवाचे विषय असतात. त्यापलीकडील 'जडद्रव्य' असे काहीच आपण अनुभवू शकत नाही.

त्याचप्रमाणे, आपण आपल्या आंतरिक विश्वाचा धांडोळा घेऊन 'मी' किंवा 'स्व' शोधायचा प्रयत्न केला, तर आपल्याला सापडतात फक्त अनेक विचार, भावना, संवेदना, कल्पना इत्यादी. आपली जाणीव म्हणजे जणू या सगळ्यांचा एक सततचा वाहता प्रवाह असते. या सगळ्या सतत बदलत्या ओघात कायमस्वरूपी, न बदलणारे, नित्य असे 'आत्मा' नावाचे चेतनद्रव्य आपण कधीच अनुभवत नाही. या सगळ्या वेगवेगळ्या घटकांना आपली स्मृती जणू एका साखळीत गुंफत असते, त्यामुळे आपल्याला 'मी'च्या सातत्याचा अनुभव येतो. पण सातत्य म्हणजे नित्यत्व नव्हे हे आपण पाहिलेच आहे.

आपण एखादा चित्रपट पाहतो तेव्हा तो सतत बदलणाऱ्या प्रतिमांचा, ध्वनींचा एकसंध असा ओघच असतो. ते एकच 'चित्र' नसते, तर अनेक चित्रांना एकत्रपणे सादर करणारा 'पट' असतो. ते चलत-चित्र असते. आपला 'स्व' म्हणजेही असाच जणू अनेक विचार, कल्पना, भावना, वासना, प्रेरणा यांचे एक गाठोडे असते असे ह्यूमचे मत आहे.

**चला शोधूया!**

Animation films कशा तयार करतात ते शोधा.

पाश्चात्त्य तत्त्वज्ञानातील 'स्व'/'मी'संबंधी विचारांचा सर्वांत अलीकडचा टप्पा गेल्या काही दशकांमध्ये कृत्रिम प्रज्ञा, मेंदूविज्ञान इत्यादी आधुनिक विज्ञानांनी केलेल्या संशोधनाच्या प्रभावामधून निर्माण झाला आहे.

### वैज्ञानिक दृष्टिकोन

माणसाच्या 'स्व'विषयक जाणिवांचा, भावनांचा, विचारांचा वेध घेण्याचा प्रयत्न विचारवंतांनी, तत्त्वज्ञांनी केला. पुढे वैज्ञानिकांनी विज्ञानाच्या पद्धतीने हा शोध घेण्याचा प्रयत्न केला. विज्ञानाची पद्धती म्हणजे वस्तुनिष्ठ वास्तवाची कुणालाही करता येईल अशी पडताळणी. उत्क्रांतीविज्ञान आणि मेंदूविज्ञान या दोन जैवविज्ञानशाखांनी 'स्व'विषयक जाणिवांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. इतर सजीवसृष्टीशी माणसाची तुलना करताना असे दिसून आले, की इतर जीवांपाशी जाणीव असावी परंतु माणसाला जाणिवेचीही जाणीव आहे. या निकषावर माणसाच्या प्रजातीचे नाव 'होमो सेपियन सेपियन' असे ठेवले गेले. परंतु सगळे कोडे अजून उलगडलेले नाही. मेंदूविज्ञान याचा पाठपुरावा करते आहे की जाणीव म्हणजे नेमके काय? भावना, संवेदना, विचार यांच्या समुच्चयाला जाणीव म्हणता येते का? भावना, संवेदना, विचार ज्याच्या ठायी अनुभवाला येते तो 'स्व' असल्यामुळे 'स्व'ची चर्चा करताना जाणिवेची ओळख करून घेणे गरजेचे ठरते. आजचे विज्ञान 'स्व'विषयक काय विचार सांगते हे बघताना माणसाच्या प्रजातीय इतिहासातून काही महत्त्वाचे मुद्दे समोर येतात.

माणसाच्या उत्क्रांतीचा इतिहास असे सांगतो की माणूस हा सामाजिक प्राणी आहे. निसर्गातील शक्ती आणि हिंस्त्र श्वापदे यांचा सामना करताना त्याला कळपाने राहण्याचा फायदा झाला. परंतु त्याची सामाजिकता मुंग्यांसारखी नाही. मुंग्यांचे वारूळ तुम्ही पाहिले असेल. मुंग्यांच्या वसाहतीतील एक एक मुंगी सुटी सुटी दिसत असली तरी ती एका वसाहतीचा भाग असते, जिथे तिचे निहित कार्य कोणते ते ठरलेले असते. एकट्या राणी मुंगीला प्रजननाचा अधिकार असतो. मुंग्यांच्या या वर्तनामुळे मुंग्यांना अतिसामाजिक प्राणी असे संबोधले जाते. मुंग्यांच्या वसाहतीला महाजीव किंवा 'सुपरऑरगॅनिजम' म्हटले जाते. माणसे कळपाने राहत असली तरी ती मुंग्यांप्रमाणे अतिसामाजिक नाहीत, महाजीव नाहीत.

**चला शोधूया!**

समूह/कळपाने राहणाऱ्या इतर प्राण्यांविषयी माहिती मिळवा. त्यांच्या सामूहिक जीवनातील वैशिष्ट्यांची वर्गात चर्चा करा.

आपण असे मानतो, की प्रत्येक माणसाला आपापल्या इच्छाआकांक्षा आहेत, त्या पूर्ण करण्याचे (स्थलकालपरिस्थितीनुसार) स्वातंत्र्य आहे. प्रजननाचा अधिकार आहे. माणसाच्या बाबतीत व्यक्ती आणि समुदाय यांतील नातेसंबंध हा 'स्व'विषयक आकलनातील महत्त्वाचा मुद्दा आहे असे दिसून येते. आधुनिक

यंत्रयुगात, तंत्रज्ञानातील जटीलतेमुळे माणसांना कृत्रिमरित्या एकत्र यावे लागते. यातून ताणतणाव, तडजोडी यांना सतत सामोरे जावे लागते. याची चर्चा आपण विज्ञान, तंत्रज्ञानाच्या संदर्भात पुढे करणार आहोत.

आत्मा, मन, हृदय ('हृदय हेलावले' अशा वाक्प्रचारात), चैतन्य अशा विविध नामांनी ज्या 'स्व'ची तत्त्वज्ञानाच्या प्राचीन इतिहासात चर्चा केली गेली ती नामे बहुतेक वेळा एकाच अवयवाकडे अंगुलीनिर्देश करतात असे शरीरविज्ञानाच्या अभ्यासातून लक्षात आले. तो अवयव म्हणजे अर्थातच मेंदू. मेंदू हे जाणिवेचे अधिष्ठान आहे. लहान मूल ते मोठा माणूस या प्रवासात मेंदूमध्ये बदल होतात. विविध रसायने, संप्रेरके यांमुळे मेंदूत विविध हालचाली चालतात. या सर्वांचा मानवी वर्तनावर परिणाम होतो हे मेंदूविज्ञानाच्या अभ्यासाने दिसून आले.

'स्व'चा विचार करताना पुढचा महत्त्वाचा प्रश्न असा, की जाणीव आणि बुद्धिमत्ता या सारख्याच गोष्टी आहेत की वेगवेगळ्या? जाणीव असे म्हणताना आपण संवेदना, भावभावना आणि विचार यांचा निर्देश करत असतो. बुद्धिमत्ता असे म्हणताना रचनाबंध ओळखणे, गणिती/तार्किक प्रक्रिया करणे, विविध वस्तू/उपकरणे/अवजारे बनविण्यासाठी लागणारी बुद्धिमत्ता असे वेगवेगळे प्रकार केले जातात. जाणीव सर्वच जीवमात्रांच्या ठायी आहे. परंतु माणसाकडे विशिष्ट बुद्धिमत्ता आहे, याचा अर्थ असा की बदल घडवून आणण्याची क्षमता आहे. बुद्धिमत्तेच्या जोरावर माणसाने वनस्पती/प्राण्यांना माणसाळवले.

२०व्या शतकाच्या उत्तरार्धात संगणकाचा आधुनिक अवतार अस्तित्वात आला आणि मग त्याचा वेगाने विकास होत राहिला. आज बुद्धिमत्तेच्या बाबतीत, म्हणजे मोठ्या प्रमाणावर माहिती हाताळण्याच्या बाबतीत, माहितीवर प्रक्रिया करण्याच्या बाबतीत, संगणक माणसापेक्षा कितीतरी वेगवान आणि सक्षम असल्याचे दिसून येते. असे असताना जाणीव आणि बुद्धिमत्ता यांची फारकत होऊन केवळ बुद्धिमत्तेच्या आधारावर संगणक माणसाचे काय करू शकतो ही विचारवंतांना चिंतेची गोष्ट वाटते. आपण कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात प्रवेश करतो आहोत. या नव्या युगात 'स्व'विषयक कल्पना पार बदलून जातील अशी चिन्हे दिसत आहेत. यांतील काही प्रश्नांची चर्चा आपण शेवटच्या पाठात करणार आहोत.

## शब्दसूची

द्रव्य - Subtance
जड - Matter
चेतन - Conscious/living
शरीर-मन आंतरक्रियावाद - Body-mind interactionism
प्रसंगवाद - Occasionalism
समांतरवाद - Parallelism
पूर्व-संस्थापित सुसंवाद - Pre-established harmony
तटस्थ एकतत्त्ववाद - Neutral Monism
वर्तनवाद - Behaviorism
संशयवाद - Skepticism
तदेवता - Identity

# स्वाध्याय

**प्रश्न १ कंसातील योग्य पर्याय निवडून पुढील विधाने पूर्ण लिहा.**

(१) विज्ञानाच्या दृष्टीने ........ हे जाणीवेचे अधिष्ठान आहे.

(मन, मेंदू, भावना)

(२) चार्वाक मतानुसार विविध जडद्रव्ये विशिष्ट प्रकारे एकत्र आली की त्यातून ........ निर्माण होते.

(चैतन्य, बुद्धिमत्ता, अंर्तदृष्टी)

(३) ........ दर्शनाने आत्म्याचे अमरत्व आणि पुर्नजन्म स्वीकारले नाही.

(जैन, चार्वाक, अद्वैत)

(४) बौद्ध दर्शनाच्या मते ........ हा सत्चा आवश्यक गुणधर्म आहे.

(शुद्धत्व, अनित्यता, नित्यता)

(५) 'शरीर-मन आंतरक्रियावाद' ही उपपत्ती ........ तत्त्वज्ञाने मांडली.

(देकार्त, प्लेटो, ह्यूम)

**प्रश्न २ सत्य की असत्य ते सांगा.**


(१) ॲरिस्टॉटल आत्म्याच्या अमरत्वाची कल्पना स्वीकारतो.

(२) अद्वैत वेदान्त अनेकतत्त्ववादी आहे.

(३) चार्वाकांच्या मते चैतन्य हे जडातूनच निर्माण होते.

(४) ह्यूमच्या मते, आपली जाणीव हा विचार, भावना, संवेदना, कल्पना यांचा सततचा वाहता प्रवाह असतो.

**प्रश्न ३ संकल्पनाचित्र/तक्ता/ओघतक्ता पूर्ण करा.**




**प्रश्न ४ खालील विधानांचे उदाहरणासहित स्पष्टीकरण द्या.**

(१) माणूस मुंग्यांप्रमाणे अतिसामाजिक प्राणी नाही.

(२) माझा 'मी'पणा हा इतरांपासूनचा वेगळेपणा असतो.

(३) आपल्या अनुभवाला येते ते सातत्य असते.

**प्रश्न ५ टीपा लिहा.**

(१) देहात्मवाद

(२) पंचस्कंध

(३) सांख्यांचे स्वविषयीचे मत

(४) बुद्धिमत्ता व जाणीव यांतील फरक

(५) प्लेटोची आत्म्याची कल्पना.

**प्रश्न ६ २० ते २५ शब्दांत उत्तरे लिहा.**

(१) डेमॉक्रिटसच्या मते आत्म्याचे स्वरूप काय आहे?

(२) देकार्तची 'शरीर-मन आंतरक्रियावाद' उपपत्ती काय आहे?

(३) ॲरिस्टॉटलने केलेले आत्म्याचे वर्गीकरण सांगा.

(४) शरीर-मनसंबंधाबद्दलच्या कोणत्याही चार उपपत्ती व त्या मांडणारे तत्त्वज्ञ सांगा.

(५) महाजीव म्हणजे काय?

**प्रश्न ७** बौद्धांची 'स्व'विषयीची कल्पना सविस्तर स्पष्ट करा.

**प्रश्न ८** प्लेटोने सांगितलेली 'स्व'ची कल्पना स्पष्ट करा.

**उपक्रम**

'स्व'विषयक जाणीव, 'स्व'-प्रतिमा या विषयांवरील कथा, कविता मिळवा. त्यांची तत्वज्ञानातील 'स्व'च्या संदर्भात आपल्या सहाध्यायींबरोबर चर्चा करा.

# ४. कळते कसे?

- प्रस्तावना
- भारतीय ज्ञानमीमांसा
- पाश्चात्त्य ज्ञानमीमांसा
- वैज्ञानिक दृष्टिकोन

## प्रस्तावना

प्राचीन काळापासून माणूस ज्ञान मिळवण्यासाठी धडपडत राहिला आहे. गेल्या काही हजार वर्षांमध्ये मनुष्यजातीने प्रचंड प्रमाणात ज्ञान संपादन केले आहे. तरीही माणसाची ज्ञान मिळवण्याची भूक मिटण्याची काही चिन्हे नाहीत. खरेतर काही ना काही प्रकारचे ज्ञान मिळवण्याचे सामर्थ्य सगळ्याच सजीवांना असते. त्यांच्या जगण्यासाठी ते गरजेचेच असते. पण प्रत्येक मानवेतर जीवजात जे ज्ञान मिळवते त्यात मोठे गुणात्मक बदल होताना दिसत नाहीत, तसेच त्यात वृद्धिही होताना दिसत नाही. मनुष्यजातीचे ज्ञान मात्र काळाबरोबर अधिकाधिक सखोल, विस्तृत, सूक्ष्म होत जाते. त्यात सतत नवीन भर पडत राहते.

आपण आतापर्यंत पाहत आलो त्याप्रमाणे माणसाला असणारी जाणीवेची जाणीव त्याला इतर सजीवांपेक्षा वेगळा ठरवणारा मुख्य घटक आहे. या द्विस्तरीय जाणीवेमुळेच माणसाला इतर सजीवांप्रमाणे ज्ञान तर असतेच, पण त्याचबरोबर ज्ञान असण्याची जाणीवही असते. त्यामुळे 'ज्ञान' ही संकल्पनाच त्याच्या ज्ञानाचा विषय होऊ शकते. आपले भक्ष्य कुठे मिळेल? आपल्याला धोका कुठे आहे? याचे उपजत आणि अनुभवातून येणारे ज्ञान कुत्रा-मांजरांसारख्या पाळीव प्राण्यांत असते याचा अनुभव आपण घेतोच. पण "मला हे ज्ञान कसे बरे होते? हे ज्ञान अचूक होण्यासाठी काय करायला हवे"? असे प्रश्न पडतात का कधी त्यांना? तसे जाणवत तरी नाही. पण माणसाला मात्र हे आणि असे प्रश्न गेली शेकडो वर्षे पडत आले आहेत.

आपण मागच्या वर्षी अभ्यासल्याप्रमाणे तत्त्वज्ञानाची ज्ञानमीमांसा ही शाखा ज्ञानासंबंधीच्या अशा अनेक प्रश्नांचा सविस्तर, चिकित्सक ऊहापोह करते. ज्ञान म्हणजे काय? ज्ञान आणि त्याच्याशी संबंधित अशा; मत, समजूत, विश्वास, माहिती इत्यादी संकल्पनांमध्ये नक्की काय फरक आहे? ज्ञान मिळवण्याची साधने किंवा प्रमाणे कोणती? ज्ञानाचे समर्थन कसे करायचे? सत्य म्हणजे काय? अशा अनेक प्रश्नांचा जो विचार भारतीय आणि पाश्चात्त्य परंपरांमध्ये केला गेला आहे, त्याचा परिचय या पाठात काही प्रमुख संकल्पनांच्या संदर्भात करून घेऊया.

## भारतीय ज्ञानमीमांसा

रोजच्या जीवनात आपण 'ज्ञान' हा शब्द खूप काटेकोरपणे वापरत नाही. आपली मते, धारणा, समजुती यांनाही आपण 'ज्ञान' ही संज्ञा वापरतो. जे आपल्या ओळखीचे, परिचयाचे आहे, जे आपल्याला समजले आहे असे आपल्याला वाटते, त्यासाठीही आपण ज्ञान हाच शब्द वापरतो. पण तात्त्विक दृष्टिने बघता हा वापर प्रत्येक वेळी योग्य ठरत नाही. याचे महत्त्वाचे कारण असे, की आपल्याला ज्ञान आहे असे वाटणे आणि खरोखरच ज्ञान असणे यांत फरक आहे. आपल्याला जे 'वाटते', 'समजते' ते खरे असतेच असे नाही. ते जर खरे नसेल, तर त्याला ज्ञान म्हणणे चुकीचे ठरेल. तत्त्वज्ञानाला सत्याच्या कसोटीला जे ज्ञान उतरते, त्या ज्ञानामध्ये रस असतो. त्या प्रकारच्या ज्ञानाची साधने, प्रकार जाणून घेण्यात रस असतो.

सत्याच्या कसोटीला उतरणाऱ्या अशा ज्ञानाला भारतीय तत्त्वज्ञानात 'प्रमा' ही संज्ञा वापरली जाते. 'ज्ञान' हा शब्द आपण जे काही ग्रहण करतो, आत्मसात करतो, त्याच्यासाठी उपयोगात आणला जातो. इंद्रियानुभव, बुद्धि, स्मृती, शब्द अशा अनेक मार्गांनी आपण जगाला जाणून घेत असतो. पण प्रत्येक वेळी आपल्याला जग जसे जाणवते, दिसते, कळते तसेच ते असते असे नाही.

**चला बोलूया!**

ज्ञानाच्या विविध उदाहरणांची यादी तयार करा. त्यांतून कोणती उदाहरणे सत्य ज्ञानाची अर्थात प्रमेची आहेत हे नक्की करा. या विविध उदाहरणांची गटांत चर्चा करा.

गेल्या वर्षी “दिसते तसे नसते” हे आपण शिकलेलेच आहोत. पण जे काही कळले आहे; ते खरे की खोटे, सत्य की असत्य याची पडताळणी, तपासणी केलेली नसली, तरी भारतीय परंपरेत त्याला ‘ज्ञान’ म्हटले जाते. अशा तपासणीनंतर ज्याची सत्यता प्रस्थापित होते, त्याला ‘प्रमा’ म्हणतात. एखादी वस्तू जशी आहे तशी कळणे, त्या आकलनात कुठल्याही चुका नसणे म्हणजे त्या वस्तूची ‘प्रमा’ असणे. ज्या व्यक्तीला ‘प्रमा’ प्राप्त होते किंवा जी व्यक्ती ‘प्रमा’ प्राप्त करून घेते, त्या व्यक्तीला ‘प्रमाता’ म्हणतात. ज्या साधनांनी ‘प्रमे’ची प्राप्ती होते, त्यांना ‘प्रमाण’ म्हटले जाते. ज्याचे ज्ञान होते त्याला ‘प्रमेय’ म्हणतात.

मनुष्येतर सजीव आणि मनुष्य यांमधील फरकांची जी चर्चा आपण सुरुवातीला केली, तिच्या आधारे असे म्हणता येईल, की मनुष्याखेरीज इतर सर्वच सजीवांना ‘ज्ञान’ होते, कारण त्यांना इंद्रियसंवेदन होते. पण मिळालेले ज्ञान चूक की बरोबर, सत्य की असत्य याचे मूल्यमापन केवळ मनुष्यालाच करता येते. म्हणजेच ‘प्रमे’ची प्राप्ती फक्त मनुष्यालाच होते. मर्यादित अर्थाने सर्वच सजीवांना ‘ज्ञाता’ म्हणता येईल, पण केवळ मनुष्यालाच ‘प्रमाता’ असे संबोधता येऊ शकते. मनुष्याला असणाऱ्या जैविक, बौद्धिक, भाषिक क्षमतांमुळे त्याला इंद्रियसंवेदन, तर्क, शब्द अशा विविध ज्ञानसाधनांद्वारे किंवा प्रमाणांद्वारे ‘प्रमे’ची प्राप्ती करून घेता येते.

## प्रमाणविचार

भारतीय परंपरेत प्रमाणविचार ज्ञानमीमांसेच्या केंद्रस्थानी आहे. योग्य ती ज्ञानसाधने वापरल्याशिवाय ‘प्रमे’ची प्राप्ती हे साध्य गाठता येणे शक्य नाही. त्यामुळे ज्यामधून ‘प्रमे’ची निष्पत्ती होते, अशी साधने कोणती आहेत? अशी साधने किती आहेत? त्यांचे स्वरूप काय असते? त्यांचा परस्परांशी काय संबंध असतो याचे सखोल चिंतन भारतीय दर्शनांमध्ये आढळते.

‘प्रमाण’ ही संकल्पना वाटते त्यापेक्षा अधिक सखोल आहे. ‘प्रमे’चे साधन म्हणजे ‘प्रमाण’ हा या संकल्पनेचा केवळ एक अर्थ आहे. त्याव्यतिरिक्त तिचे आणखी किमान दोन अर्थ आहेत. त्यातील एका अर्थानुसार प्रमाण म्हणजे ‘प्रमे’चा प्रकार. बौद्ध आणि जैन दर्शनांनी ‘प्रमाण’ या संकल्पनेचा हा अर्थ स्वीकारला आहे. त्यांच्या मते आपल्या ज्ञानाच्या प्रक्रियेत, साधन आणि त्याचे फल असा फरक करता येत नाही. त्यापेक्षा आपल्याला जे ज्ञान मिळते त्याचे, त्याच्या वेगवेगळ्या स्वरूपांनुसार वर्गीकरण केल्यास ज्ञान म्हणजे काय ते अधिक सुस्पष्टपणे समजेल. या वर्गीकरणातून ज्ञानाचे अथवा ‘प्रमे’चे जे प्रकार प्राप्त होतात तीच प्रमाणे. प्रत्यक्ष, अनुमान, शब्द इत्यादी जी प्रमाणे भारतीय परंपरेने स्वीकारली आहेत, ती केवळ ‘प्रमे’ची साधनेच नव्हेत, तर ‘प्रमे’चे प्रकार आहेत असे मानण्याकडे जैन आणि बौद्ध दार्शनिकांचा कल आहे.

‘प्रमाण’ या संकल्पनेचा तिसरा अर्थ म्हणजे पुरावा, समर्थन किंवा ज्ञानाच्या अधिकृतपणाची हमी. आपल्या नेहमीच्या बोलण्यातही ‘तुम्ही म्हणता त्याला प्रमाण काय’? असा प्रश्न विचारला जातो त्या वेळी आपण त्या गोष्टीचा पुरावा काय? जे म्हटले आहे ते खरे कशावरून? हे जाणून घ्यायचा प्रयत्न करत असतो. ‘प्रमाण’ संकल्पनेचा हा मूलभूत अर्थ वरील दोन्ही अर्थांशी संबंधित आहे. ‘प्रमाण’ म्हणजे ‘प्रमेचे’ साधन असे आपण जेव्हा म्हणतो, तेव्हा त्याचा अर्थ ज्याच्या साहाय्याने ‘प्रमा’ प्राप्त होते, असे खात्रीशीर किंवा अधिकृत साधन असा असतो. ‘प्रमाण’ म्हणजे ‘प्रमे’चा प्रकार असे आपण म्हणतो, तेव्हा त्याचा अर्थ पुरावाप्राप्त किंवा खात्रीशीर ज्ञानाचा प्रकार असा असतो.

**चला करूया!**

‘प्रमाण’ चे विविध अर्थ स्पष्ट करणारे संकल्पनाचित्र तयार करा.

## न्याय दर्शनातील प्रमाणविचार


भारतीय प्रमाणविचारात न्याय दर्शनाचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. ज्ञान, प्रमा, अप्रमा, प्रमाणे इत्यादी मूलभूत संकल्पनांची सर्वप्रथम सुव्यवस्थित मांडणी करण्याचे काम न्याय दार्शनिकांनी केले. त्यांचा प्रमाणविचार थोडक्यात समजावून घेऊया.

न्याय मतानुसार दिव्याचा प्रकाश ज्याप्रमाणे वस्तूंना उजेडात आणतो, त्याप्रमाणे ज्ञान, ज्ञानविषयांना प्रकाशात आणते. ढोबळमानाने ज्ञानाचे वर्गीकरण अनुभव आणि

स्मृती या दोन प्रकारांमध्ये केले जाते. अनुभवात वस्तूची साक्षात जाणीव किंवा बोधन होत असते, तर स्मृतीने होणारे बोधन हे अनुभवाची आठवण या प्रकारचे असते. या दोन्ही ज्ञान प्रकारांचे वर्गीकरण पुन्हा यथार्थ आणि अयथार्थ या उपप्रकारांत केले जाते. ज्या ज्ञानामध्ये वस्तू आहे तशीच कळते, त्या ज्ञानाला यथार्थ ज्ञान असे म्हणतात. ज्या ज्ञानामध्ये वस्तू जशी आहे तशी कळत नाही, त्याला अयथार्थ ज्ञान म्हणतात. यथार्थ अनुभव म्हणजे प्रमा. अयथार्थ अनुभव म्हणजे अप्रमा. न्याय दर्शनानुसार प्रत्यक्ष, अनुमान, उपमान आणि शब्द या चार साधनांच्याद्‌वारे प्रमेची प्राप्ती होते. या प्रमाणांची ओळख आता करून घेऊ.

**प्रत्यक्ष**

प्रत्यक्ष याचा अर्थ आपल्याला ज्ञानेंद्रियांमार्फत होणारे संवेदनज्ञान. डोळे, कान, नाक, जीभ व त्वचा ही पाच ज्ञानेंद्रिये व मन यांना अनुक्रमे रंग, शब्द, गंध, रस, स्पर्श व आनंद-दुःख या भावना यांचे जे संवेदन होते त्याला प्रत्यक्ष असे म्हणतात. सर्व प्रमाणांमधील, हे सर्वांनी स्वीकारलेले, प्राथमिक महत्त्वाचे प्रमाण होय. न्याय दर्शनातील एका व्याख्येनुसार ज्ञानेंद्रिय आणि विषय यांच्या संपर्कामधून होणारे निश्चित, दोषमुक्त आणि सत्य ज्ञान म्हणजे प्रत्यक्षज्ञान. न्याय दर्शन असे मानते, की माणसाचा आत्मा हा ज्ञाता असतो. विषय-ज्ञानेंद्रिये-मन अशा संपर्क साखळीने हे ज्ञान आत्म्याला होते.



दृश्य वस्तू, तसेच त्या वस्तूचे गुणधर्म - रंग, रूप, पोत, चव, वास इत्यादींचे संवेदन आपल्याला विशिष्ट ज्ञानेंद्रियांद्‌वारे होते. एखाद्या विषयाचे प्रत्यक्षज्ञान होण्यासाठी त्याकडे आपले अवधान असणे, भान किंवा लक्ष असणे आवश्यक असते. समजा, आपण एकाग्र मनाने अभ्यास करत असलो तर त्या वेळी आपल्या कानावर आवाज पडत असतात, पण त्यांचे प्रत्यक्ष ज्ञान आपल्याला होत नाही. कारण आपले अवधान तिकडे नसते. म्हणजेच आवाज आणि कान यांचा संबंध येतो, पण 'मन' दुसरीकडे असते. ते 'कान' या इंद्रियाशी खऱ्या अर्थाने जोडलेले नसते. अशा रीतीने विशिष्ट विषयासंबंधी अवधान किंवा भान असणे हे मनाचे कार्य आहे. इंद्रियसंवेदनांमार्फत असे ज्ञान होणे ही आपल्या अनुभवाची गोष्ट आहे.

**चला करूया!**

'पुस्तक' या वस्तुसाठीची ज्ञानसंपर्क साखळी गटामध्ये तयार करा.

न्याय दर्शनाने या प्रत्यक्ष प्रमाणाचे सखोल विवेचन करताना त्याचे व्यवस्थित वर्गीकरण केले आहे. प्रत्यक्षाचे मुख्य वर्गीकरण लौकिक म्हणजे सर्वसाधारण आणि अलौकिक म्हणजे असाधारण या दोन प्रकारांमध्ये केलेले आहे. आपली पाच ज्ञानेंद्रिये आणि मन यांच्या कक्षेत येणाऱ्या सर्व वस्तूंचे ज्ञान लौकिक प्रत्यक्षात मोडते. ज्ञानेंद्रियांच्या साक्षात अनुभवाला येऊ न शकणाऱ्या विषयाचे ज्ञान सर्वसाधारण मार्गाने न होता, असाधारण मार्गाने होते, म्हणून त्याला अलौकिक प्रत्यक्ष म्हटले जाते. लौकिक प्रत्यक्षाचे वर्गीकरण बाह्य प्रत्यक्ष आणि आंतर/मानस प्रत्यक्ष यांमध्ये केले जाते. डोळे, नाक, कान, त्वचा, जीभ या बाह्य ज्ञानेंद्रियांकडून होणारे ज्ञान म्हणजे बाह्य प्रत्यक्ष; तर मनाद्‌वारे होणारे ज्ञान म्हणजे मानस प्रत्यक्ष. मन हे न्याय मतानुसार आंतरइंद्रिय आहे. सुख-दुःख, इच्छा-द्वेष इत्यादींचे ज्ञान या आंतरेंद्रियांद्‌वारे किंवा अंतःकरणाद्‌वारे होते.

अलौकिक प्रत्यक्षाचे सामान्यलक्षण प्रत्यासत्ती, ज्ञानलक्षण प्रत्यासत्ती आणि योगजलक्षण प्रत्यासत्ती असे तीन प्रकार होतात. एखाद्या विशिष्ट प्रकारातील अनेक वस्तूंमध्ये जो समान गुणधर्म असतो, त्याला सामान्य असे म्हटले जाते. न्याय दर्शन असे मानते, की जेव्हा आपण एखाद्या फुलाचा अनुभव घेतो, तेव्हा आपल्याला फक्त त्या विशिष्ट फुलाचेच नाही तर 'फूलपणाचे', 'पुष्पत्व' या सामान्याचे ज्ञान होते. तसेच या सामान्याच्याद्‌वारा एकंदरीत 'फूल' असणे म्हणजे काय ते कळले, असे सगळ्या फुलांचे सामान्यरूपाने

ज्ञान होते. हे ज्ञान सामान्यलक्षण प्रत्यासत्तीने झाले असे न्याय दर्शन मानते. त्याचप्रमाणे गाभुळलेल्या चिंचा पाहून त्या आंबटगोड आहेत हे आपल्याला त्यांची चव न घेताच समजते. आपल्या डोळ्यांना तर चवीचे ज्ञान नसते, तरीही ते ज्ञान आपल्याला होते ते ज्ञानलक्षण प्रत्यासत्तीमुळे. तसेच एखाद्या योग्याला भूतकाळाचे, भविष्यकाळाचे ज्ञान असते असे जे समजले जाते, ते ज्ञानही ज्ञानेंद्रियांद्वारे होणे शक्य नसते. हे ज्ञान योग्याला योगजलक्षण प्रत्यासत्तीने होते असे म्हटले जाते.

**चला करूया!**

अलौकिक प्रत्यक्षाच्या प्रकारांची उदाहरणे मिळवा. गटांमध्ये त्यावर भित्तिपत्रके तयार करा.

## अनुमान

आपल्याला असलेल्या ज्ञानाचा मोठा भाग प्रत्यक्ष प्रमाणामधून मिळवलेल्या ज्ञानाचा असतो हे खरे असले, तरी सगळेच ज्ञान त्यामधून मिळत नाही हेही तितकेच खरे आहे. म्हणूनच इतर ज्ञानसाधनांची आवश्यकता भासते. यांतील एक महत्त्वाचे साधन म्हणजे तर्कबुद्धी. तर्कबुद्धीचा उपयोग करून, ज्ञानेंद्रियांच्या प्रत्यक्ष अनुभवाला न येणाऱ्या अनेक गोष्टींचे ज्ञान आपण रोजच्या जीवनापासून विज्ञानापर्यंतच्या ज्ञानाच्या सर्व क्षेत्रांत मिळवत असतो. एखाद्या बंद सभागृहात असताना दार थोडे उघडले गेल्यावर आत येणाऱ्या हवेतला मृद्गंध आपल्या नाकाला जाणवतो आणि प्रत्यक्ष न बघताही आपण शेजारच्या व्यक्तीला सांगतो, 'पाऊस आला'. लोखंडाचे कण एखाद्या वस्तूकडे आकर्षित झाले तर आपण असा निष्कर्ष काढतो, की त्या वस्तूमध्ये चुंबकशक्ती आहे. जे प्रत्यक्ष अनुभवाला येते त्याच्या आधारे जे साक्षात अनुभवाला येत नाही त्याबद्दल तर्काने निष्कर्ष काढणे म्हणजे अनुमान.

'अनुमान' या पदाचा शब्दशः अर्थ आहे, "एखाद्या ज्ञानानंतर येणारे वेगळे ज्ञान". आपल्याला जे अनुभवाला येते ते, जे अनुभवाला येत नाही त्याचे लिंग म्हणजे खूण असते. रानवाटांनी जाताना मातीवर जे पायांचे ठसे दिसतात, ते कुठला प्राणी तिथे येऊन गेला आहे, याची खूण असते. न्याय दर्शनातील सुप्रसिद्ध उदाहरण म्हणजे, जेव्हा आपल्याला डोंगरावरून धूर येताना दिसतो, तेव्हा धूर ही अग्नीची खूण असल्यामुळे आपण "डोंगरावर कुठेतरी आग लागली आहे", असे अनुमान काढतो. थोडक्यात, ज्ञात गोष्टीच्या आधारावर होणारे अज्ञाताचे ज्ञान म्हणजे अनुमान असे म्हणता येते.

अनुमान प्रक्रियेत पक्ष, हेतू आणि साध्य असे तीन घटक असतात. ज्याबद्दल आपण तर्क किंवा अनुमान करतो, त्याला 'साध्य' असे म्हणतात. ज्या ठिकाणी किंवा जिथे साध्य आहे असा निष्कर्ष आपण काढतो त्याला 'पक्ष' म्हटले जाते. ज्याच्या आधारे आपण साध्य सिद्ध करतो, त्याला 'हेतू' असे म्हणतात. हेतू हा पक्ष आणि साध्य यांना जोडणारा दुवा असतो. वरील उदाहरणामध्ये डोंगर हा पक्ष आहे, जिथे धूर म्हणजे हेतू आहे. या हेतूवरून किंवा पुराव्यावरून आपण तिथे आग आहे हे सिद्ध करतो. 'अग्नी' हे या उदाहरणातील साध्य आहे.

हेतू पक्षावर असणे याला 'पक्षधर्मता' म्हणतात. हेतू आणि साध्य यांमध्ये जो एकत्र असण्याचा म्हणजे साहचर्य संबंध असतो, त्याला 'व्याप्ती' म्हणतात. हेतू नेहमीच साध्याबरोबर नसेल, तर हेतूच्या अस्तित्वावरून, साध्याच्या अस्तित्वासंबंधी आपण अनुमान करू शकणार नाही. धूर अग्नीपासून उत्पन्न होतो. अग्नीखेरीज धुराचे अस्तित्व शक्य नसते. धूर आणि अग्नी यांमध्ये व्याप्तीसंबंध असतो. "जेथे जेथे धूर आहे, तेथे तेथे अग्नी आहे". (यत्र यत्र धूमः, तत्र तत्र वन्हिः।) हे वाक्य, हा व्याप्तीसंबंध सूचित करणारा आहे.

**चला विचार करूया!**

अनुमानाची उदाहरणे शोधून, त्या उदाहरणातील पक्ष, हेतू, साध्य कोणते हे स्पष्ट करा.

अनुमान प्रक्रियेचा तुम्ही बारकाईने विचार केलात, तर तुमच्या हे लक्षात येईल, की ही प्रक्रिया गुंतागुंतीची आहे. तिची सुरुवात पक्षावर हेतू आहे असे ज्ञान प्रत्यक्ष प्रमाणामधून मिळण्याने होते. नंतर हेतू आणि साध्य यांच्यातील पूर्वी अनुभवलेला किंवा माहिती असलेला जो व्याप्तीसंबंध असतो, त्याचे स्मरण होते. प्रत्यक्ष

अनुभवलेली पक्षधर्मता आणि हेतू व साध्यातील व्याप्तीची स्मृती यांच्या आधारे साध्याचे अनुमान केले जाते.

न्याय दर्शनातील अनुमानविचार अत्यंत व्यापक व सखोल आहे. त्यांपैकी एक महत्त्वाचा, लक्षात घेण्याजोगा मुद्दा म्हणजे, नैय्यायिकांनी अनुमानाकडे प्रमेचे साधन आणि युक्तिवाद अशा दोन्ही दृष्टिंनी पाहिले. व्यक्तीला स्वतःला जेव्हा अनुमानाच्या साहाय्याने प्रमेची प्राप्ती होते, तेव्हा त्या अनुमानाला 'स्वार्थानुमान' म्हणतात. इथे अनुमान हे अर्थातच प्रमेचे साधन असते. आपण जो निष्कर्ष काढला आहे, तो दुसऱ्या व्यक्तीला सिद्ध करून दाखवण्यासाठी युक्तिवाद म्हणूनही अनुमानाचा वापर आपण करतो. अशा अनुमानाला 'परार्थानुमान' म्हटले जाते.

**परार्थानुमान :** न्याय दर्शनाने परार्थानुमान सांगताना, त्याच्या पाच घटकांची सुव्यवस्थित मांडणी केली आहे. प्रतिज्ञा, हेतू, उदाहरण, उपनय आणि निगमन हे ते पाच घटक आहेत. 'पर्वतावर अग्नी आहे' हे सिद्ध करण्यासाठी परार्थानुमान खालीलप्रमाणे उपयोगात आणले जाते.

(१) प्रतिज्ञा : पर्वतावर अग्नी आहे.

(२) हेतू : कारण पर्वतावर धूर आहे.

(३) उदाहरण : जेथे जेथे धूर असतो, तेथे तेथे अग्नी असतो. जसा, स्वयंपाकघरात.

(४) उपनय : पर्वतावर धूर आहे.

(५) निगमन : म्हणून पर्वतावर अग्नी आहे.

### उपमान

उपमान प्रमाण म्हणजे साधर्म्याच्या साहाय्याने होणारे ज्ञान. आपल्याला आधीपासून माहिती असलेल्या वस्तूशी असणाऱ्या साम्याच्या आधारे जेव्हा आपण एखाद्या नवीन वस्तूचे ज्ञान मिळवतो, तेव्हा आपण उपमान प्रमाण वापरत असतो. यामध्ये दोन वस्तूंमध्ये किती बाबतीत साम्य आहे यापेक्षा असलेले साम्य महत्त्वाच्या बाबतीत आहे का याला महत्त्व असते.

'उपमिती' म्हणजे उपमान प्रमाण वापरून होणारे ज्ञान हे तुलनेवर आधारित असते. न्याय दर्शनाने केलेल्या मांडणीनुसार, उपमिती म्हणजे शब्द आणि त्याने निर्देशित केलेली वस्तू यांच्या संबंधाचे ज्ञान. मागच्या वर्षीच्या पुस्तकातील 'शेकरू' या प्राण्याचे वर्णन तुम्हांला आठवते का? "शेकरू एखाद्या खारीप्रमाणे दिसणारा, पण खारीपेक्षा मोठा प्राणी आहे". हे वर्णन ठाऊक असणारी व्यक्ती, पहिल्यांदाच जेव्हा शेकरू बघेल, तेव्हा "समोरचा प्राणी शेकरू आहे" हे ज्ञान त्या व्यक्तीला होईल. 'शेकरू' या शब्दाचे जाणकार व्यक्तीने केलेले वर्णन, दिसणारा प्राणी, त्या वर्णनाचे स्मरण आणि त्याआधारे केलेली तुलना या सर्वांच्या संयोगाने "हा प्राणी शेकरू आहे" असे ज्ञान त्या व्यक्तीला मिळेल. हे ज्ञान केवळ प्रत्यक्षामधून किंवा निव्वळ स्मृतीच्या आधारे होऊ शकत नाही. 'उपमान' हे स्वतंत्र प्रमाण आहे असे नैय्यायिक मानतात.



**चला लिहूया!**


'शेकरू' प्रमाणे उपमान प्रमाणाची विविध उदाहरणे मिळवा व गटांत त्यांचे वर्गीकरण लिहा.

### शब्द

बोलताना, लिहिताना आपण सतत शब्द वापरत असतो. पण 'शब्द' म्हणजे नक्की काय याचा कधी विचार केला आहे का तुम्ही? अक्षरांपासून शब्द तयार होतो हे आपल्याला सगळ्यांना माहिती आहे. पण शब्द म्हणजे फक्त अक्षरांचा समूह असतो का? शब्द उच्चारल्यावर कानांवर पडणारे ध्वनी किंवा शब्द वाचताना कागदावर उमटलेल्या आकृत्या म्हणजेच शब्द का? अर्थातच नाही. आपल्याशी एखादी व्यक्ती अपरिचित भाषेत बोलू लागली, तर कानांवर शब्द तर पडतात, पण 'शब्दही कळत नाही' असे आपण म्हणतो. तुम्ही चिनी भाषेची चित्रलिपी 'पाहिली' असेल, पण 'वाचता' येते का? नाही ना? कारण निव्वळ ध्वनी किंवा चिन्ह म्हणजे शब्द नाही. शब्द हा भाषेचा एक असा महत्त्वपूर्ण घटक आहे, जो अर्थपूर्ण असतो. कुठलाही ध्वनी किंवा दृश्य चिन्ह म्हणजे शब्द नव्हे. शब्दाला अर्थ असतो. अनेक अर्थपूर्ण शब्द विशिष्ट

रीतीने एकत्र आले, की वाक्य तयार होते. आपल्याला ज्ञान असते, त्यातील मोठा भाग ऐकलेल्या, वाचलेल्या वाक्यांमधून मिळालेल्या ज्ञानाचा असतो, भाषेतून मिळवलेल्या ज्ञानाचा असतो.

मात्र हे लक्षात ठेवणे आवश्यक आहे, की ऐकलेल्या किंवा वाचलेल्या प्रत्येक वाक्यामधून आपल्याला प्रमेची प्राप्ती होईल असे नाही. प्रमा म्हणजे सत्य ज्ञान हे आपण पाहिलेलेच आहे.



**चला करूया!**

माध्यमांनी दिलेल्या चुकीच्या/असत्य बातम्या किंवा माहिती यांची उदाहरणे गोळा करून त्यांच्या दुष्परिणामांची चर्चा करा.

साहजिकच शब्दांमधून जर असत्य आपल्या समोर येत असेल तर त्या शब्दाला 'प्रमाण' म्हणजे प्रमेचे साधन मानता येणार नाही. यासाठीच न्याय दर्शनाने 'शब्द म्हणजे आप्तवाक्य' असे प्रतिपादन केले आहे. इथे 'आप्त' या शब्दाचा अर्थ 'नातेवाईक' असा नसून 'विश्वसनीय व्यक्ती' असा आहे. जी व्यक्ती ज्ञानी किंवा जाणकार आहे, जी विश्वास ठेवण्याच्या योग्यतेची आहे त्या व्यक्तीला 'आप्त' म्हणतात. अशी व्यक्ती अज्ञानी नसते, त्याचप्रमाणे असत्य भाषण करणारी नसते, त्यामुळेच ती व्यक्ती 'विश्वासपात्र' असते, अशा व्यक्तीच्या शब्दांमधून प्रमेची प्राप्ती होऊ शकते. माध्यमांचा विशेषकरून समाजमाध्यमांचा प्रचंड प्रभाव असणाऱ्या सध्याच्या काळात 'आप्त' या शब्दाची व्याख्या नेहमी लक्षात ठेवणे अतिशय महत्त्वाचे आहे. माध्यमांमधून आपल्यापर्यंत जे पोहोचत आहे ते विश्वसनीय आहे की नाही हे बघणे जेवढे आवश्यक आहे, तेवढेच माध्यमांचा वापर करताना आपण स्वत: विश्वसनीय जाणकार व्यक्ती आहोत का याचा विचार करणेही गरजेचे आहे. अशा विचारांमधूनच आपण माध्यमांचा उपयोग जबाबदारीने करायला शिकू.



**चला लिहूया!**

'माध्यमांची विश्वसनीयता' या विषयावर चिकित्सक निबंध लिहून वर्गात सादर करा.

नैय्यायिकांनी शब्दाची काही वर्गीकरणेही सांगितली आहेत. ज्या शब्दांमधून दृश्य वस्तूंचे ज्ञान होते, त्यांना दृष्टार्थ म्हणतात. ज्या शब्दांमधून दिसू न शकणाऱ्या गोष्टींचे ज्ञान होते, त्यांना अदृष्टार्थ असे म्हणतात. दुसऱ्या वर्गीकरणानुसार शब्दांचे वैदिक आणि लौकिक असे दोन प्रकार होतात. वेदवाङ्‌मयातील शब्द मानवाने लिहिलेले शब्द नसून ईश्वराचे असल्याने सत्य आणि दोषरहित असतात असे न्याय दर्शन मानते. लौकिक शब्द मानवाचा असतो आणि तो खरा किंवा खोटा असू शकतो, म्हणूनच सर्व शब्द प्रमाण नसतात. विश्वसनीय मानवाचा लौकिक शब्द आणि परमआप्त अर्थात परमविश्वसनीय ईश्वराचा वैदिक शब्द हेच प्रमाण असतात.

**वाक्यार्थाच्या अटी**

अर्थपूर्ण शब्दांमधून वाक्य तयार होत असले तरी वाक्य अर्थपूर्ण होण्यासाठी तेवढे पुरेसे नसते. न्याय दार्शनिक वाक्याची रचना अर्थपूर्ण करण्यासाठी चार अटींची पूर्तता व्हायला हवी असे सांगतात. त्या चार अटी अशा :

**(१) आकांक्षा :** एकाच शब्दातून सहसा संपूर्ण अर्थ व्यक्त होऊ शकत नाही. त्यासाठी त्या शब्दाचा इतर शब्दांशी संबंध जुळावा लागतो. समजा, वर्गात शिक्षक 'लिहा' एवढेच म्हणाले, तर अर्थातच तुम्ही विचाराल 'काय लिहू'? शिक्षक जेव्हा सांगतील 'शब्द आणि अर्थ यांचा संबंध काय असतो ते लिहा', तर ते पूर्ण वाक्य अर्थपूर्ण होते. सुट्या, एकट्या शब्दाला अर्थपूर्ण होण्यासाठी इतर शब्दांची जी अपेक्षा असते, तिला 'आकांक्षा' म्हणतात.

**(२) योग्यता :** वाक्य अर्थपूर्ण होण्यासाठी अनेक शब्दांची गरज असतेच, पण त्या शब्दांमध्ये योग्य संबंधही असावे लागतात. परस्परविसंगत शब्दांमधून अर्थनिष्पत्ती होऊ शकत नाही. "आग अगदी बर्फासारखी गारगार आहे" या वाक्यातून काहीच अर्थबोध होत नाही; कारण आग आणि बर्फासारखा गार स्पर्श या दोन गोष्टी योग्य पद्धतीने एकत्र आणल्या गेलेल्या नाहीत.

**(३) सन्निधी :** सन्निधी याचा अर्थ समीपता.

वेगवेगळ्या शब्दांमधून एकत्रितपणे अर्थ निर्माण होण्यासाठी शब्द, काल आणि अवकाशात एकमेकांच्या समीप म्हणजे जवळ हवेत. एकमेकांशी बोलताना आपण दोन-दोन मिनिटांच्या अंतराने शब्द उच्चारले, तर पहिल्या दोन अटी पूर्ण झाल्या असल्या, तरीही अर्थनिष्पत्ती होणार नाही. त्याचप्रमाणे लिहिताना शब्द सुटेसुटे वेगवेगळ्या ओळीत लिहिले, तर ते अर्थ निर्माण करू शकणार नाहीत.

**(४) तात्पर्य :** काही वेळा एकाच शब्दाचे एकापेक्षा जास्त अर्थ असतात. एखाद्या वाक्यात असा अनेकार्थी शब्द नक्की कुठल्या अर्थाने वापरला आहे हे ठरवण्यासाठी त्या शब्दाच्या वापरकर्त्याचा उद्देश काय होता किंवा त्याला अभिप्रेत अर्थ काय होता हे विचारात घ्यावे लागते. ज्या संदर्भात तो शब्द उपयोगात आणला गेला आहे, तो संदर्भ त्यासाठी महत्त्वाचा असतो. उदाहरणार्थ, 'मला पदाचा मोह नाही' असे विधान कोणी केले, तर 'पद' या शब्दाचा अर्थ इथे 'सामाजिक स्थान' असा घ्यायचा असतो. 'शब्द', 'गीत', 'पाय' हे त्याचे जे इतर अर्थ आहेत, त्यांपैकी कुठलाही अर्थ इथे गैरलागू आहे.

**चला शोधूया!**

Think-Pair-Share

ज्यामध्ये वाक्यार्थ्याच्या चारही अटी पूर्ण होतात अशी विधाने शोधा व त्यांची तुमच्या सहाध्यायीकडून तपासणी करून घ्या. दोघांकडून नक्की झालेली विधाने वर्गासमोर सादर करा.

आपण मागील वर्षी या गोष्टींची नोंद घेतली होती, की प्रत्येक दर्शनाने मानलेली प्रमाणांची संख्या वेगवेगळी आहे. न्याय दर्शनाने मानलेल्या चार प्रमाणांव्यतिरिक्त आणखी दोन प्रमाणे मीमांसा दर्शन मानते, त्यांचीही थोडक्यात ओळख करून घेऊ.

### अर्थापत्ती

कधीकधी आपल्याला ज्ञात असलेल्या दोन गोष्टींमध्ये विसंगती असते, आपण आपल्या एखाद्या मैत्रिणीला कधीच अभ्यास करताना बघितलेले नसते. तिला खूप कमी गुण मिळणार असे आपल्याला वाटते. प्रत्यक्षात तिला उत्तम गुण मिळतात. अभ्यास न करणे आणि उत्तम गुण मिळणे यांत वरकरणी विसंगती आहे. पण या विसंगतीचे असे स्पष्टीकरण देता येते, की ही मैत्रिण नियमितपणे रात्री अभ्यास करत असली पाहिजे. या ज्ञानानंतर मूळ विसंगती राहत नाही. या प्रकारे दोन ज्ञानांमधील विसंगती दूर करून तिसरे ज्ञान मिळते, ते अर्थापत्ती या साधनाने होय.

### अनुपलब्धि

आतापर्यंत पाहिलेली सर्व प्रमाणे अस्तित्वातील वस्तूंचे किंवा ज्ञानविषयांच्या अस्तित्वाचे ज्ञान करून देतात. अनुपलब्धि प्रमाण मात्र अभावाचे किंवा एखादी वस्तू नसण्याचे ज्ञान करून देते. एखाद्या मित्राला भेटण्यासाठी आपण महाविद्यालयाच्या उपहारगृहात जातो, पण तिथे गेल्यावर कळते की तो तिथे नाही. तो तिथे असता, तर दिसला असता, पण तो तिथे नाही किंवा त्याचे तिथे नसणे दिसू शकत नाही, तरीही ते आपल्याला कळते, त्याच्या तिथे नसण्याचे ज्ञान अनुपलब्धि प्रमाणाने होते.

**चला करूया!**

प्रमाणांबद्दल अधिक माहिती मिळवून उपमान, अर्थापत्ती आणि अनुपलब्धि यांना स्वतंत्र प्रमाणे मानावे का याबद्दल वादसभा भरवून चर्चा करा.

प्रमाणविचार हा भारतीय ज्ञानमीमांसेच्या केंद्रस्थानी आहे. प्रमेयाचे ज्ञान प्रमाणांद्वारे होते हे लक्षात घेता, विश्वात काय आहे हे निश्चित करण्यासाठीही प्रमाणविचार महत्त्वाचा आहे. ज्ञानमीमांसा आणि सत्तामीमांसा यांच्यातील आंतरसंबंध यामधून लक्षात येतो. कुठले दर्शन किती आणि कोणती प्रमाणे मान्य करते याचा आणि त्या दर्शनाची सत्तामीमांसा यांत अन्योन्यसंबंध आढळून येतो.

### पाश्चात्त्य परंपरेतील ज्ञानविचार

ज्ञानमीमांसा आणि सत्तामीमांसा यांच्यातील गुंतागुंतीचे आंतरसंबंध पाश्चात्त्य तत्त्वपरंपरेतही दिसतात. या परंपरेच्या अगदी प्रारंभीच्या काळात 'काय आहे?' हा सत्तामीमांसेतील प्रश्न मध्यवर्ती होता. पण काय आहे?

किंवा काय नाही? हे ठरवण्यासाठी ते आपल्याला कळते कसे? या प्रश्नाकडे अपरिहार्यपणे वळावेच लागते.

पाश्चात्त्य तत्त्वज्ञानाच्या विकासक्रमात ज्ञानमीमांसा तत्त्वज्ञानाच्या केंद्रस्थानी आली ती आधुनिक तत्त्वज्ञानाच्या कालखंडात पण ज्ञानसाधनांसंबंधीचा विचार सॉक्रेटिसपूर्व काळातच सुरू झाला. 'विश्व नित्य आणि शाश्वत आहे, परिवर्तन हा भ्रम आहे' असे सांगणारा पारमेनायडिस आणि 'अनित्यता हेच विश्वाचे स्वरूप आहे, नित्यता हा भ्रम आहे' असे म्हणणारा हेरॅक्लिटस या दोघांचेही एका बाबतीत एकमत होते. ते म्हणजे इंद्रियजन्य ज्ञान फसवे असते, वास्तवाचे ज्ञान बुद्‌धिनेच होते.

या काळात तत्त्वज्ञांनी विश्वाच्या स्वरूपाबद्‌दल परस्पर विसंगत मते मांडली. या पार्श्वभूमीवर सोफिस्ट तत्त्वज्ञांनी संशयवादाची मांडणी केली. ज्ञान मिळवण्याच्या मानवी क्षमतांच्या सामर्थ्यावर सोफिस्टांचा विश्वास नव्हता. त्यामुळे वस्तुनिष्ठ ज्ञानाच्या शक्यतेबद्‌दलच शंका घेणाऱ्या संशयवादाचा त्यांनी पुरस्कार केला. जे वास्तवात असते, ते ज्ञानेंद्रियांच्या किंवा बुद्‌धिच्या मर्यादित स्वरूपामुळे माणसाला जसे आहे तसे कधीच कळू शकत नाही असा संशयवाद्यांचा युक्तिवाद असतो. आपल्या क्षमतांच्या मर्यादांच्या कक्षेतच माणसाला जगाचे ज्ञान होते, एवढेच नव्हे; तर प्रत्येक व्यक्तीला आपापल्या वैयक्तिक मर्यादांमध्येच असे ज्ञान होते असे त्यांचे मत होते. त्यामुळे 'ज्ञान व्यक्तिसापेक्ष असते' असे सांगणारा सापेक्षतावादही त्यांनी स्वीकारला. या संदर्भातले प्रोटॅगोरस या सोफिस्ट तत्त्ववेत्याचे 'माणूस हाच सर्व गोष्टींचे परिमाण आहे' हे वचन सुप्रसिद्‌ध आहे.

पाश्चात्त्य ज्ञानमीमांसेची बहुतांशी जडणघडण, संशयवाद आणि सापेक्षतावाद या दोन भूमिकांचा प्रतिवाद करण्याच्या प्रयत्नांमधूनच झाली आहे, हे लक्षात ठेवायला हवे.

**चला बोलूया!**

संशयवाद आणि सापेक्षतावाद या भूमिकांची संवादपद्‌धतीचा वापर करून मांडणी करा. या संवादांचे वर्गासमोर सादरीकरण करा.

प्लेटोचे ज्ञानविषयक चिंतन हे याचे एक उत्कृष्ट उदाहरण आहे. ज्ञान हे जे आहे त्याचे असायला हवे म्हणजेच सत्य असायला हवे. ज्ञान वस्तुनिष्ठ, दोषरहित, सार्वत्रिक आणि सर्वकाळी सत्य असते असे प्लेटोचे ठाम मत होते. त्याच्या या ज्ञानविषयक भूमिकेचा त्याच्या सत्तामीमांसेतील आकाराच्या जगाच्या सिध्दांताशी जवळचा संबंध आहे. ज्ञानविषय अपरिवर्तनीय आणि शाश्वत असल्याशिवाय ज्ञान सर्वदा सत्य असू शकणार नाही ही प्लेटोला असलेली जाणीव आकारांच्या जगाच्या सिद्‌धातांच्या मुळाशी आहे. ज्ञान म्हणजे केवळ इंद्रियसंवेदन नव्हे, ज्ञान म्हणजे मत नव्हे, ज्ञान म्हणजे निव्वळ विश्वास नव्हे अशा भूमिका मांडत ज्ञानासंबंधी जो ऊहापोह प्लेटोने केला, त्यामधूनच पाश्चात्त्य परंपरेतील 'ज्ञान म्हणजे समर्थनीय सत्य विश्वास' ही व्याख्या रूढ झाली.

## ज्ञानसंकल्पना

कोणीही व्यक्ती आपल्याला काही ज्ञान असल्याचा दावा करते, तेव्हा तो तसाच्या तसा स्वीकारून चालत नाही. त्याची तपासणी करावी लागते. ती तपासणी ज्या निकषांच्या आधारे करायची असते ते निकष, ही व्याख्या पुरवते. ज्ञान विधानांमधून व्यक्त केले जाते. विधान म्हणजे ज्याला सत्यता मूल्य आहे असे वाक्य. जी वाक्ये एकतर सत्य किंवा असत्य असतात, त्यांना सत्यता मूल्य असते. ज्ञानाच्या वरील व्याख्येत समाविष्ट असलेले निकष हे विधानाला लावून बघितले जातात. या निकषांची पूर्ती ते विधान करत असेल, तरच त्याला ज्ञानाचा दर्जा दिला जातो. अन्यथा ती केवळ समजूत किंवा धारणा असते.

**चला शोधूया!**

सत्यता मूल्य नसणाऱ्या म्हणजे विधाने नसणाऱ्या वाक्यांची उदाहरणे शोधून त्यांचे वर्गीकरण करा. वर्गीकरणासाठी व्याकरणाच्या नियमांची मदत घ्या.

ज्ञानाचा दावा करताना 'क्ष' चे मला ज्ञान आहे, या स्वरूपात तो केला जातो. इथे 'क्ष' म्हणजे ज्ञान व्यक्त करणारे एखादे विधान. उदाहरणार्थ, 'शनी ग्रहाभोवती कडी आहेत' याचे मला ज्ञान आहे. ज्ञानासंबंधी हा दावा केव्हा योग्य मानता येईल हे आता पाहूया. ज्याचे ज्ञान आपल्याला आहे असे आपण म्हणतो, त्यावर आपला विश्वास हवा, तशी आपली पक्की समजूत किंवा धारणा हवी. 'शनीभोवती कडी आहेत हे मी जाणतो, पण माझा त्याच्यावर विश्वास नाही'

असे म्हणणे आत्मविसंगत आहे. ज्ञान वस्तुनिष्ठ असले, तरी व्यक्तीची त्यासंबंधीची धारणा हा ज्ञानाचा व्यक्तिनिष्ठ पैलू असतो असे म्हणता येईल.

एखाद्या गोष्टीवर विश्वास असणे म्हणजे त्या गोष्टीचे ज्ञान असणे नव्हे, हे तुम्हांला माहिती आहेच. 'शनी हा पृथ्वीच्या सर्वांत जवळ असणारा ग्रह आहे' असा कुणाचा विश्वास असला तरी त्याला ज्ञान म्हणता येणार नाही; कारण हे खरे नाही. ज्ञान असत्य असूच शकत नाही. त्यामुळेच 'सत्यता' हा ज्ञानाचा दुसरा निकष आहे. एखादे विधान सत्य आहे की असत्य हे कशाच्या आधारे ठरवायचे यासंबंधीचे निकष आपण पुढे बघणारच आहोत.

इथे भारतीय आणि पाश्चात्त्य परंपरेत 'ज्ञान' हा शब्द ज्याप्रकारे उपयोगात आणला जातो. त्यातील फरक लक्षात घ्या. इंग्लिश भाषेतील knowledge या शब्दाचा मराठीतील प्रतिशब्द म्हणून आपण 'ज्ञान' हा शब्द पाश्चात्त्य तत्वज्ञानाच्या चर्चेत वापरतो. भारतीय परंपरेनुसार ज्ञान सत्य किंवा असत्य असू शकते. पाश्चात्त्य परंपरेनुसार धारणा सत्य किंवा असत्य असू शकते. मात्र, ज्ञान सत्यच असते. 'असत्य ज्ञान' असा शब्दप्रयोग व्याघाती आहे. पाश्चात्त्यांची ज्ञानसंकल्पना भारतीय परंपरेतील 'प्रमा' या संकल्पनेला जवळची आहे. प्रमा ही सत्यच असावी लागते. 'असत्य प्रमा' असू शकत नाही.

ज्ञानाचा 'समर्थनीयता' हा तिसरा निकष असे सांगतो, की व्यक्तीला एखाद्या गोष्टीचे ज्ञान आहे हे मान्य करण्यासाठी त्या व्यक्तीची तशी धारणा असणे आणि ती धारणा सत्य असणे पुरेसे नाही. त्या धारणेचे समर्थनही करता यायला हवे. त्याच्या सत्यतेचा पुरावा देता यायला हवा. समजा 'शनीभोवती कडी आहेत' असा विश्वास असणाऱ्या व्यक्तीला आपण विचारले की 'हे खरे कशावरून'? आणि त्या व्यक्तीने असे उत्तर दिले, की 'कारण मी ती कडी स्वप्नात पाहिली आहेत' तर त्या व्यक्तीला ज्ञान आहे असे आपण निश्चितच म्हणणार नाही. सत्यधारणेचे योग्य प्रकारे समर्थन करता येत नसेल, तर ज्ञानाचा दावा चुकीचा ठरतो. योग्य समर्थन याचा अर्थ वस्तुनिष्ठ पद्धतीने केलेले समर्थन. 'स्वप्न पडणे' हे आपली धारणा सत्य आहे असे मानण्यामागचे कारण व्यक्तिनिष्ठ आहे. व्यक्तिनिरपेक्ष, वस्तुनिष्ठ समर्थन नाही. कुणालाही पडताळून बघता येतील असे पुरावे ज्यात दिले जातात, ते समर्थन वस्तुनिष्ठ असते.

जेव्हा आपण ज्ञानाच्या समर्थनाविषयी बोलत असतो तेव्हा केवळ वस्तुस्थिती/तथ्ये आणि विधान यांतील संबंध पाहणे पुरेसे नसते, ज्ञान विधानांमधील परस्परसंबंधाचे स्वरूप पाहणे ही आवश्यक असते. ज्ञानव्यवस्थेसाठी सत्यता आणि वैधता हे दोन्हीही गुणधर्म महत्त्वाचे असतात. ज्ञानव्यवस्थेतील एक विधान त्याच व्यवस्थेतील दुसऱ्या विधानाच्या आशयाला छेद देणारे असेल तर ज्ञान विधानांतून व्यवस्था विकसित करणे अवघड होईल. तर्कशास्त्रात म्हणूनच विचारप्रक्रियेची मांडणी युक्तिवाद या स्वरूपात केली जाते. युक्तिवादाचे आधारविधाने आणि निष्कर्ष असे दोन भाग असतात.

वस्तुनिष्ठ समर्थनाची चर्चा म्हणजे एका अर्थी प्रमाणांची म्हणजेच ज्ञानसाधनांचीच चर्चा असते. कुठल्या मार्गाने, साधनाने हे ज्ञान आपल्याला मिळाले, ते साधन योग्य आहे का हे यामध्ये विचारात घ्यावे लागते. पाश्चात्त्य परंपरेतील ज्ञानसाधनांच्या किंवा ज्ञानाच्या स्रोतांच्या चर्चेकडे वळण्यापूर्वी, सत्यतेच्या निकषांविषयीच्या तीन उपपत्तींची थोडक्यात चर्चा करूया.

**चला करूया!**

ज्ञानाचे निकष लक्षात घेऊन त्याचे उदाहरणांसह संकल्पनाचित्र गटांत तयार करा.

या संकल्पनाचित्रांचे वर्गात प्रदर्शन भरवा.

## सत्यताविषयक सिद्धांत

ज्ञानाच्या संकल्पनेच्या आपण पाहिलेल्या व्याख्येत सत्याचे स्थान मध्यवर्ती आहे हे तुमच्या लक्षात आलेच असेल. ज्ञान विधानांमधून व्यक्त केले जात असले तरीपण प्रत्येक विधानामधून ज्ञान व्यक्त होतेच असे नाही. केवळ सत्य विधानांमधूनच ज्ञान व्यक्त होऊ शकते. सत्यत्व किंवा सत्यता ही ज्ञानाची एक पूर्वअट असल्यामुळे सत्य कशाला म्हणायचे हा प्रश्न ज्ञानमीमांसेसाठी अतिशय महत्त्वाचा आहे. तीन वेगवेगळ्या सिद्धान्तांनी यासाठी तीन वेगळे निकष सुचवले आहेत.

### सत्यतेचा अन्वय किंवा अनुरूपता सिद्धान्त

या सिद्धान्तानुसार एखादे विधान आणि त्या विधानात वर्णिलेली वस्तुस्थिती यांमध्ये जेव्हा अन्वय किंवा अनुरूपता

असते, तेव्हा ते विधान सत्य असते. 'गंगटोक ही सिक्कीमची राजधानी आहे' हे विधान गंगटोकबद्दल जी माहिती देते, ती वस्तुस्थितीला धरून आहे. त्यामुळे हे विधान सत्य आहे. विधानांचे सत्यत्व, ते ज्या परिस्थितीचे वर्णन करतात त्या परिस्थितीशी संबंधित असते. विधानातील वर्णन वस्तुस्थितीनुरूप नसेल तर विधान असत्य ठरते. 'शुक्र हा तारा आहे' हे विधान या निकषाप्रमाणे असत्य आहे, कारण वास्तवात शुक्र हा ग्रह आहे.

दैनंदिन जीवनात कळतनकळत आपण या निकषाचा उपयोग अनेकदा करत असतो. कुणीतरी आपल्याला येऊन सांगते, की 'महाविद्यालयाला उद्या सुट्टी आहे असे सूचनापत्रक सूचनाफलकावर लागले आहे'. तुम्हांला शंका येते म्हणून तुम्ही स्वत: जाऊन पाहिल्यावर असे सूचनापत्रक दिसत नाही. खोटे सांगितले म्हणून तुम्ही मित्रावर रागावता. विज्ञानाच्या क्षेत्रातही अनुरूपता सिध्दान्ताला खूप महत्त्व आहे. विधान वस्तुस्थितीनुरूप आहे की नाही हे निश्चित करण्यासाठीच विज्ञान निरीक्षण आणि प्रयोगपद्धतीचा उपयोग करते.

**चला शोधूया!**

सत्यतेच्या अनुरूपतेच्या निकषाची दैनंदिन जीवनातील उदाहरणे शोधा.

हा निकष कुठल्या विधानाला सत्य मानायचे याबद्दलच्या सर्वसाधारण आकलनाला जवळ जाणारा आहे. तरीही या सिध्दान्तामध्ये काही त्रुटी असल्यामुळे त्याच्यावर आक्षेप घेतले जातात.

विधाने आणि वस्तुस्थिती यांच्यामधील संबंध तपासून बघणे प्रत्येक वेळी शक्य नसते. भूतकाळाविषयी किंवा भविष्यकाळाविषयी केलेली विधाने वस्तुस्थितीशी पडताळून बघता येत नाहीत, कारण ती स्थिती वर्तमानात अस्तित्वातच नसते. 'शंभर वर्षांनंतर पृथ्वीवर हिमयुग येईल', अशा विधानाचा, वर्णन केलेल्या स्थितीशी अन्वय आहे की नाही, हे आपण आज सांगूच शकणार नाही. त्याचप्रमाणे सामान्य विधाने सत्य आहेत की असत्य हे ठरवणेही शक्य होत नाही. 'सर्व मानव मर्त्य आहेत', हे विधान भूत-वर्तमान-भविष्यातील सर्वच मानवांना लागू होते. त्याची तपासणी अन्वय निकषानुसार करता येत नाही. विज्ञानातील नियम हे सामान्य विधानांच्या स्वरूपाचेच असले तरी सत्य असतात. पण या निकषानुसार त्यांचे सत्यत्व प्रस्थापित करता येणार नाही. गणित किंवा तर्कशास्त्र यांमधील विधानांना आकारिक मानले जाते. ही विधाने अनुभवाला येणाऱ्या जगाचे वर्णन करत नाहीत. ती गणिती किंवा तार्किक संबंध स्पष्ट करत असतात. साहजिकच त्यांना अन्वय सिध्दान्त लागू होत नाही.

### सत्यतेचा सुसंवाद/सुसंगती सिध्दान्त

अन्वय सिध्दान्तानुसार विधानाची सत्यता त्याचा वस्तुस्थितीशी जो संबंध आहे, त्यावर अवलंबून असते. याउलट सुसंवाद सिध्दान्त असे प्रतिपादन करतो की विधानाची सत्यता त्याचा इतर विधानांशी काय संबंध आहे यावर अवलंबून असते. अनेक सत्यविधानांच्या रचनेतून ज्ञानप्रणाली तयार होते. कुठल्याही विषयाचे ज्ञान म्हणजे त्या विषयासंबंधीच्या सत्य विधानांचा केवळ एक गट किंवा समूह नसतो. ज्ञान ही त्या विधानांची एक व्यवस्था असते. ती सर्व विधाने एकमेकांशी सुसंगतपणे जोडलेली असतात. ज्या विधानाचे सत्यता मूल्य ठरवायचे असेल ते त्याच ज्ञानक्षेत्रातल्या इतर मान्यताप्राप्त सत्यांशी सुसंगत असेल, तर सत्य ठरते. 'अ' या संख्येला शून्याने गुणले, तर त्याचे उत्तर 'अ' असे येते असे विधान केले तर ते असत्य ठरते. कारण 'कुठल्याही संख्येला शून्याने गुणले असता, उत्तर शून्यच येते' या गणितातील मान्यताप्राप्त सत्याशी ते सुसंगत नाही. कुणी आपल्याला सांगितले, की माझ्या आईचे जन्मवर्ष १९९५, माझ्या वडिलांचे जन्मवर्ष १९९३ आणि माझे जन्मवर्ष १९९० तर आपण अर्थातच निष्कर्ष काढू की शेवटचे विधान असत्य असले पाहिजे. आधीच्या दोन विधानांशी ते सुसंगत नाही कारण कुणाचाही जन्म स्वत:च्या आईवडिलांच्या जन्माआधी होऊ शकत नाही. या उदाहरणांवरून हे लक्षात येते की सुसंगती किंवा सुसंवाद हा सत्याचा महत्वाचा निकष आहे.

तरीही या निकषाच्या संबंधानेही काही समस्या निर्माण होतात. समजा, परस्परांशी सुसंगत अशा विधानांची प्रणाली तयार केली तरी ती संपूर्ण प्रणाली खरी कशावरून असेल? तुम्ही हॅरी पॉटरच्या गोष्टी वाचल्या आहेत? किंवा त्यावरचे चित्रपट पाहिले आहेत? अशा काल्पनिक कथा, मग त्या परीकथा असोत वा विज्ञानकथा, त्यांमध्ये अंतर्गत सुसंगती असते, तरीही त्या सत्य ठरत नाहीत. असे का होते? कारण या कथा वास्तविक नसतात वस्तुस्थितीला धरून नसतात. अनुभवाधारित विज्ञानांमधे सुसंगती महत्वाची असते, तशीच वस्तुस्थितीशी अनुरूपताही महत्त्वाची असते. अशा अनुरूपतेखेरीज वास्तवाचे वर्णन करणारी विधाने सत्य असूच शकत नाहीत.

**चला पाहूया!**

पूर्णतः सुसंगत परंतु असत्य अशा कल्पनारम्य कथांवर आधारित चित्रपट पहा व सत्याच्या अनुरूपता आणि सुसंगती सिद्धांतांच्या संदर्भात त्यांची चर्चा करा.

## सत्यतेचा फलप्रामाण्यवादी सिद्धांत

सत्यतेचा हा सिध्दान्त वरील दोन सिध्दान्तांपेक्षा खूप वेगळा आहे. या सिध्दान्तानुसार, ज्या विधानाच्या आधारे केलेली कृती यशस्वी किंवा फलदायी होते, इच्छित परिणाम साध्य करते, ते विधान सत्य असते. म्हणजेच विधानाची सत्यता, विधानाचा वस्तुस्थितीशी किंवा इतर विधानांशी असलेल्या संबंधांवर अवलंबून नसते. ती विधानावर आधारित कृतीच्या परिणामांवर अवलंबून असते. कृती उपयुक्त किंवा फलदायी परिणाम घडवून आणत असेल, तर मूळ विधान सत्य असते. पण विधानावर आधारित कृती अयशस्वी ठरली तर ते असत्य असते. रंगहीन द्रवपदार्थाने भरलेली बाटली पाहून 'हे पाणी आहे' असे विधान केले, तर ते खरे की खोटे हे ठरवण्याचा एक मार्ग म्हणजे तो द्रव पिऊन बघणे. त्या द्रवाने तहान भागली, तर ते पाणी आहे हे विधान खरे ठरते, अन्यथा नाही. ज्ञानाचा उपयोग प्रत्यक्ष जीवनात जगताना होत असतो. फलप्रामाण्यवाद ज्ञानाच्या या उपयुक्ततेला महत्त्व देतो. विज्ञानातील प्रयोगपद्धतीही मुख्यत: या दृष्टिकोनावर आधारित असते, की एखादे विधान सत्य असेल, तर त्यापासून निष्पन्न होणारी कृती यशस्वीपणे करता यायला हवी. तिचे अपेक्षित परिणाम मिळायला हवेत. उदाहरणार्थ, एखादे द्रावण आम्ल आहे या विधानाचे सत्यत्व ठरवण्यासाठी त्यात लिटमस कागद टाकून बघितले जाते. लिटमस कागदाचा रंग बदलणे हा अपेक्षित परिणाम मिळाला, तर विधान सत्य ठरते.

या सिध्दान्ताबाबत येणारी मुख्य समस्या म्हणजे एखाद्या समजुतीमुळे, धारणेमुळे अपेक्षित परिणाम साधणारी कृती करता येत असली, तरी कृतीची यशस्विता धारणेच्या सत्याची ग्वाही देऊ शकत नाही. गिरीभ्रमणासाठी विद्यार्थ्यांचा एखादा गट जातो, तेव्हा एखादा नवखा विद्यार्थी खूप दमून जातो. 'मी यापुढे येऊ शकत नाही, मी इथेच थांबतो' असे म्हणू लागतो, अशा वेळी त्या विद्यार्थ्याला असे सांगितले, की या ठिकाणी थांबणे धोकादायक आहे, कारण इथे वन्यप्राणी येतात तर तो विद्यार्थी तिथे न थांबता मुक्कामाच्या ठिकाणापर्यंत चालत जातो. पण या परिणामांमुळे 'इथे वन्यप्राणी येतात' हे विधान खरे ठरत नाही. त्या विद्यार्थ्याला चालण्याची प्रेरणा देण्यासाठी असत्य सांगितलेले असू शकते. अर्थात, ही युक्ती सगळ्यांच्या बाबतीत लागू पडतेच असेही नाही, त्यामुळे जेव्हा हे विधान अपेक्षित परिणाम साधेल तेव्हा सत्य आणि परिणाम साधला नाही, तर असत्य असे म्हणावे लागेल. म्हणजेच फलप्रामाण्यवाद मान्य केला तर सत्य परिस्थितीसापेक्ष ठरेल, वस्तुनिष्ठ असणार नाही.

**चला करूया!**

इच्छित परिणाम साधूनही विधानांची सत्यता सिद्ध होत नाही अशा प्रसंगांचे नाट्यरूपांतर वर्गात सादर करा.

सत्यता सिध्दान्तांच्या विवेचनातून हे स्पष्ट होते, की यातील प्रत्येक सिध्दान्त सत्याच्या एका महत्त्वाच्या पैलूवर प्रकाश टाकत असला तरी कुठलाच सिध्दान्त परिपूर्ण आणि दोषरहित नाही, त्यामुळे कुठलाही एक सिध्दान्त सत्यतेचे संपूर्ण आकलन करून देऊ शकत नाही, प्रत्यक्षात वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये ज्या ज्ञानव्यवस्था अस्तित्वात असतात, त्यांमध्ये आणि वास्तवामध्ये अन्वय असतो, त्यामधील विधाने परस्परसुसंगत असतात आणि त्यामधून सफल कृती निष्पन्नही होतात. त्यामुळे सत्यतेचा विचार करताना कुठल्यातरी एका पैलूवर भर न देता, समग्रतेने विचार करावा लागतो.

## ज्ञानाचे स्रोत

पाश्चात्त्य परंपरेतील ज्ञानसंकल्पना आणि सत्यताविषयक सिध्दान्त पाहिल्यानंतर आता या परंपरेतील ज्ञानसाधने किंवा ज्ञानाच्या स्रोतांविषयीच्या चर्चेची ओळख करून घेऊया. या आधी पाहिल्यानुसार, प्रबोधनयुगानंतर युरोपमधील तत्त्वज्ञानात ज्ञानमीमांसेची खऱ्या अर्थाने उभारणी झाली. हा काळ आधुनिक विज्ञानाच्या अचंबित करणाऱ्या वाढीचा आणि विकासाचा होता. अनुभवाला येणाऱ्या जगाच्या ज्ञानाचे नवे मापदंड विज्ञानाने प्रस्थापित केले होते. यापूर्वी तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात कुठलाच सिध्दान्त, मत किंवा दृष्टिकोन सर्वमान्य नव्हता. विज्ञानाने शोधून काढलेली सत्ये मात्र सार्वत्रिक, सार्वकालिक आणि वस्तुनिष्ठ होती. त्यांमध्ये सापेक्षतेला वाव नव्हता. या नव्या ज्ञानप्रकाराची दखल घेताना तत्त्वज्ञांनी ज्ञानप्रक्रियेचा आणि ज्ञान-साधनांचा सखोल विचार केला.

आपण मागच्या वर्षी पाहिल्याप्रमाणे, बुद्धी, इंद्रियानुभव, स्मृती, अंत:प्रज्ञा, अधिकार प्रामाण्य या सगळ्यांचा ज्ञानसाधने म्हणून विचार केला जाऊ शकतो. पाश्चात्त्य परंपरेतील आधुनिक तत्त्वज्ञानाच्या कालखंडातील ज्ञानाच्या साधनांच्या चर्चेत मात्र बुद्धि आणि इंद्रियानुभव यांनाच मध्यवर्ती स्थान मिळाले आहे. एवढेच नव्हे, तर या काळातील तत्त्वज्ञानाचे दोन प्रमुख प्रवाह बुद्धिवाद आणि अनुभववाद याच नावाने ओळखले जातात. हे दोन प्रवाह सहसा परस्परविरोधी समजले जातात. ज्ञानाचा उगम मुळात बुद्धीमधून होतो की अनुभवामधून याबद्दल त्यांच्यामध्ये मूलभूत फरक आहेत. बुद्धी आणि अनुभव यांचे ज्ञानप्रक्रियेमधले

नेमके स्थान काय आहे? त्यांच्यापैकी कोणते साधन प्राथमिक आहे? या साधनांपासून निष्पन्न होणाऱ्या ज्ञानाचे स्वरूप कसे असते? या प्रकारच्या प्रश्नांसंबंधी महत्त्वपूर्ण चर्चा या काळात झाली. या सगळ्या चर्चेला विज्ञानाच्या प्रगतीची पार्श्वभूमी जशी होती, तशीच त्या काळात लोकप्रिय असलेल्या संशयवादाचीही होती. या काळातील तत्त्वज्ञ संशयवादाचे निराकरण करण्याचा प्रयत्न करत होते. ज्ञानप्रक्रियेच्या विश्लेषणातून वस्तुनिष्ठ ज्ञानाची शक्यता त्यांना प्रस्थापित करायची होती. असे वस्तुनिष्ठ ज्ञान कुठल्या साधनाने मिळते याची चिकित्सा त्यासाठी महत्त्वाची होती. या संदर्भात बुद्धिवाद आणि अनुभववाद यांच्यामधील मतभेदाचा एक महत्त्वाचा मुद्दा, सर्व ज्ञान अनुभवातून निष्पन्न होते की अनुभवाशिवायही बुद्धीला ज्ञानाची प्राप्ती होते यासंबंधी होता.

ज्ञानाच्या एका वर्गीकरणाच्या साहाय्याने हा मुद्दा समजावून घेऊ. हे वर्गीकरण याच काळात प्रामुख्याने केले गेले. जे ज्ञान बुद्धीला कुठलाही अनुभव येण्यापूर्वी होते, त्याला अनुभवपूर्व ज्ञान असे म्हणतात. जे ज्ञान अनुभवावर आधारित असते, अनुभवानंतर निर्माण होते, त्या प्रकारच्या ज्ञानाला अनुभवोत्तर किंवा आनुभविक ज्ञान म्हणतात. बुद्धिवादानुसार, बुद्धी हेच ज्ञानाचे उगमस्थान आहे. ज्ञानप्राप्तीचा आरंभ बुद्धीपासून होतो. अनुभवाशिवाय किंवा अनुभव येण्याआधीच काही सत्ये जाणण्याची क्षमता बुद्धीमध्ये असते. या मतामुळे बुद्धिवादी तत्त्वज्ञ अनूभवपूर्व ज्ञानाची कल्पना स्वीकारतात. अनुभववादी मात्र ती कल्पना पूर्णपणे नाकारतात. कारण त्यांच्या मतानुसार दृश्य जगाचे सर्व ज्ञान अनुभवावर आधारित असते. अनुभवाशिवाय नुसती बुद्धी जगाबद्दल काहीही जाणू शकत नाही. त्यांच्या मते ज्ञान अनुभवोत्तर किंवा आनुभविक असते.

या दोन प्रवाहांची थोडी अधिक ओळख करून घेण्याआधी हे लक्षात घेऊ या, की या सर्व चर्चेत 'अनुभव' हा शब्द इंद्रियानुभवाचा निर्देश करतो. अनुभव अनेक प्रकारचे असू शकतात. पण ज्ञानस्त्रोत म्हणून ज्याची चर्चा केली जाते तो अनुभव हा ज्ञानेंद्रियांमार्फत येणारा अनुभव असतो.

**चला बोलूया!**

ज्यांना आपण अनुभव म्हणतो पण जे इंद्रियानुभव नसतात अशा अनुभवांची वर्गात चर्चा करा.

दुसरा लक्षात घेण्याजोगा मुद्दा म्हणजे, बुद्धिवाद आणि अनुभववाद यांच्यातील मतभेद ज्ञानाच्या स्रोताच्या प्राथमिकतेबद्दल आहेत. बुद्धी आणि इंद्रियानुभव या दोन्हींनाही ज्ञानप्रक्रियेत महत्त्वाचे स्थान आहे, हे दोन्ही मतप्रवाह मान्य करतात. ज्ञानाची सुरुवात बुद्धीमधून होते आणि मग अनुभवाचे कार्य सुरू होते असे बुद्धिवादी मानतात. तर अनुभववादी असे प्रतिपादन करतात, की ज्ञान अनुभवातून जन्म घेते आणि त्यानंतर बुद्धी त्यावर प्रक्रिया करते.

## बुद्धिवाद

रेने देकार्त, बेनेडिक्ट स्पिनोझा आणि लाईब्निज हे तीन तत्वज्ञ बुद्धिवादी म्हणून ओळखले जातात. गेल्या वर्षी आपण देकार्तच्या संशयपद्धतीची ओळख करून घेताना हे पाहिले आहे, की देकार्तला संशयवाद पूर्णपणे चुकीचा आहे हे सिद्ध करायचे होते. त्यासाठी ज्या सत्याबद्दल संशय घेता येणे शक्य नाही असे सत्य शोधायचा त्याने प्रयत्न केला. देकार्त स्वत: तत्वज्ञानाबरोबरच गणित आणि विज्ञानाचा अभ्यासक होता. त्याच्यावर गणिती पद्धतीचा खूप प्रभाव होता. गणितातील सत्ये ही वस्तुनिष्ठ आणि व्यक्तिनिरपेक्ष, सार्वत्रिक असतात. ही सत्ये, स्थळ, काळ, संस्कृती, व्यक्ती यांनुसार कधीच बदलत नाहीत, बुद्धिवादी गणिती ज्ञानाला आदर्श ज्ञान मानत. गणिताच्या पद्धतीचे अनुकरण केल्यास इतर क्षेत्रांतही त्याच प्रकारचे ज्ञान मिळविणे शक्य होईल असा त्यांना विश्वास होता.

गणिती सत्यांचा एक विशेष असा असतो, की ही सत्ये अनुभवातून मिळालेली नसतात, अनुभवावर आधारित नसतात. त्यांची सत्यता अनुभवाच्या आधारे सिद्ध करता येत नाही. गणिती ज्ञानाचा स्रोत बुद्धी असते आणि त्याचे समर्थनही बुद्धीद्वारेच करता येते याउलट अनुभवाच्या आधारे मिळणारे ज्ञान अनेक वेळा कालसापेक्ष, परिस्थितीसापेक्ष, व्यक्तिसापेक्ष असते. गेल्या वर्षी 'जाणण्याविषयी जाणून घेताना' या पाठात आपण त्याची बरीच उदाहरणे पाहिली आहेतच. या सापेक्षतेमुळे अनुभवजन्य ज्ञान निश्चित आणि सार्वत्रिक होऊ शकत नाही. यामुळे बुद्धिवाद्यांनी निश्चित, सार्वत्रिक आणि वस्तुनिष्ठ ज्ञानाचे साधन म्हणून बुद्धिला जास्त महत्त्व दिले. ज्ञानप्रक्रियेत बुद्धिचे कार्य नेमके काय असते याबद्दलची बुद्धिवाद्यांची भूमिका मुख्यतः देकार्तच्या विचारांच्या संदर्भात समजावून घेऊया.

सर्व माणसांच्या मनामध्ये काही प्रत्यय किंवा कल्पना या जन्मतःच असतात असे देकार्तचे प्रतिपादन होते. या कल्पनांना अंतर्निहित/उपजत कल्पना असे म्हणतात. याचा अर्थ, या कल्पना ज्ञानेंद्रियांना येणाऱ्या अनुभवापासून मिळवलेल्या नसतात. त्यामुळेच त्यांचे सत्यत्व अनुभवावर अवलंबून नसते. त्या आपल्याला निश्चित स्वरूपाचे ज्ञान

देतात. स्वतःचे अस्तित्व, ईश्वराचे अस्तित्व आणि जडद्रव्याचे अस्तित्व ही अशा प्रकारच्या कल्पनांची देकार्तने दिलेली प्रमुख उदाहरणे आहेत. संशयपद्धतीचा उपयोग करून देकार्त 'स्व'चे अस्तित्व कसे सिद्ध करतो हे आपण बघितलेच आहे. 'मी विचार करतो म्हणून मी आहे' हे सत्य आपल्याला स्पष्टपणे आणि निःसंदिग्धपणे कळते. स्पष्टता आणि विविक्तता ही सत्य विधानांची लक्षणे आहेत. 'चौरसाच्या चारी बाजू समान असतात'. या विधानामधून चौरसाची संकल्पना जशी स्पष्ट होते, त्याचप्रमाणे आयताला चौरस म्हणता येत नाही हे देखील समजते. म्हणजेच चौरस आणि आयत यांमधली विविक्तता म्हणजे भेद स्पष्टपणे कळतो.

**चला शोधूया!**

ज्यामधून मूळ संकल्पना तर समजतेच पण तिचे इतरांपासून असणारे वेगळेपणही समजते अशी दैनंदिन जीवनातील उदाहरणे शोधून लिहा. उदा. लाल रंग ही संकल्पना समजते तेव्हा लाल रंग म्हणजे गुलाबी किंवा निळा रंग नाही हे ही समजते.

अशा सत्यांची प्राप्ती करून घेण्यासाठी देकार्तने सुचवलेली पद्धत भूमितीमध्ये वापरली जाणारी आहे. भूमितीमध्ये ज्याप्रमाणे गृहितांच्या आधारे बुद्धी प्रमेये सिद्ध करते, त्याप्रमाणे इतर ज्ञानक्षेत्रातही प्रत्येक विधानाची सत्यता निःसंशयपणे आणि निश्चितपणे सिद्ध व्हायला हवी. मात्र, त्यासाठी सुरुवात गृहितांपासून न करता ज्यांचे सत्य निर्विवाद, निःसंशय आहे अशा सत्य विधानांपासून करायला हवी. अशी सत्ये स्वयंसिद्ध असतात. त्यांना बाह्य समर्थनाची गरज नसते.

**चला बोलूया!**

'मी विचार करतो, म्हणून मी आहे' यांसारखी निर्विवाद सत्य असणारी विधाने गटांमध्ये चर्चा करून शोधा व त्यांची वर्गात सर्वांबरोबर चर्चा करा.

'मी विचार करतो, म्हणून मी आहे' हे असे स्वतः सिद्ध सत्य आहे. हे आणि अशी इतर सत्ये आपल्याला अंतःप्रज्ञेने कळतात. अंतःप्रज्ञेने जाणलेली सत्ये आणि अशा सत्यांपासून नैगमनिक पद्धतीने जी विधाने सिद्ध करता येतात, तीच ज्ञानव्यवस्थेचा भाग होतात असे देकार्त मानतो. इथे 'अंतःप्रज्ञा' या शब्दात देकार्तला कुठल्याही प्रकारची गूढ किंवा आध्यात्मिक क्षमता किंवा अनुभूती सुचवायची नाही. त्याच्या दृष्टिने अंतःप्रज्ञा हे जणू बुद्धीलाच होणारे एक साक्षात दर्शन किंवा ज्ञान आहे. अशी बौद्धिक अंतःप्रज्ञा आणि निगमन/सिद्धता यांच्या आधारे ज्ञाननिर्मिती होते. इंद्रियानुभव नेहमी विशिष्ट वस्तू, गुणधर्म, संबंध, घटना यांचा असतो. पण तो जाणून घेण्यासाठी आवश्यक असलेली सामान्य आणि सार्वत्रिक तत्त्वे बुद्धीकडूनच मिळतात. मानवी मनात जन्मजात असणाऱ्या प्रत्ययांमुळे, बुद्धीचे कार्य अनुभवाच्याही आधी सुरू होते आणि त्यामुळे अनुभवपूर्व ज्ञान मिळते असे देकार्तचे मत होते.

स्पिनोझा आणि लाईब्निझ यांनी या भूमिकेला पुष्टी देऊन देकार्तच्या मतात भर घातली. तत्त्वतः सर्वच ज्ञान बुद्धिद्वारे प्राप्त होऊ शकते असे स्पिनोझाने प्रतिपादन केले. अर्थात मानवी बुद्धीच्या मर्यादा त्याला मान्य होत्या. अशा मर्यादा नसत्या, तर केवळ बुद्धीने सर्व काही जाणता आले असते असे त्याचे मत होते. लाईब्निझने असे मत मांडले की केवळ 'स्व' किंवा 'ईश्वर' यांचे प्रत्ययच जन्मजात नसतात, तर गणिती किंवा तार्किक तत्त्वेही जन्मजात किंवा अंतर्निहितच असतात. तसे नसेल, तर तार्किक विचार करणे शक्य होणार नाही असे तो मानी. सर्वच ज्ञान मानवी मनात एकप्रकारे अंतर्निहित असते असे त्याचे मत होते.

ज्ञानप्रक्रियेतील अनुभवाचे कार्य या संपूर्ण बुद्धिवादी परंपरेत एक प्रकारे दुय्यम मानले गेले आहे.

**चला विचार करूया!**

'सर्व ज्ञान मानवी मनात एकप्रकारे अंतर्निहित असते', या लाईब्निझच्या मतात तुम्हांला काही अडचण जाणवते का? याची वर्गात चर्चा करा.

## अनुभववाद

जॉन लॉक, बिशप बर्कले आणि डेव्हिड ह्यूम हे तीन तत्त्वज्ञ अनुभववादाचे प्रणेते म्हणून ओळखले जातात. अनुभववादी, अनुभवपूर्व ज्ञानाची शक्यता नाकारतात. कारण, इंद्रियानुभवाशिवाय ज्ञान उत्पन्न होऊच शकत नाही असे त्यांचे ठाम मत आहे. इंद्रियानुभवातून जी विद्या किंवा

माहिती आपल्यापर्यंत पोहोचते, त्यावर बुद्धि प्रक्रिया करते आणि त्यामधून ज्ञानाची निष्पत्ती होते. अनुभव नसेल, तर बुद्धिला प्रक्रिया करण्यासाठी काहीच उपलब्ध नसते, त्यामुळेच निव्वळ बुद्धि आपल्याला जगाचे ज्ञान देऊ शकत नाही. आपल्या जाणिवेला बाह्य जगाशी जोडण्याचे कार्य ज्ञानेंद्रिये करत असतात. जाणीव अशी जोडली गेल्याखेरीज जगाचे ज्ञान होणे शक्य नाही अशी त्यांची भूमिका आहे.

देकार्तचा अंतर्निहित/उपजत कल्पनांचा सिद्धांत लॉकने पूर्णपणे नाकारला. त्याच्या मते, सर्व माणसांच्या मनात अस्तित्वात असणाऱ्या अशा कुठल्याच जन्मजात कल्पना नसतात. उदाहरणार्थ, ईश्वरकल्पना ही लहान मुलांच्या मनात मुळातच असते असे दिसत नाही. सामाजिकीकरणाच्या प्रक्रियेत ती कल्पना मुलांना शिकवली जाते. नास्तिक ईश्वराचे अस्तित्व नाकारतात. तसेच ईश्वराचे अस्तित्व मानणाऱ्यांमध्येही त्याच्या स्वरूपाबद्दल खूप मतभेद असतात.

लॉक असे मत मांडतो, की जन्मतः कुठलाही अनुभव येण्यापूर्वी मन 'टॅब्यूला रासा' म्हणजे एखाद्या कोऱ्या पाटीप्रमाणे असते. अशी पाटी, ज्यावर बुद्धिने मुळातच उमटवलेली कुठलीही अक्षरे नाहीत. अनुभवामधूनच या पाटीवर अक्षरे उमटायला सुरुवात होते. याचा अर्थ असा, की मनात असणारे सर्व प्रत्यय अनुभवातूनच निर्माण झालेले असतात. सभोवतालच्या जगाबद्दलचे प्रत्यय पाच बाह्येंद्रियांना येणाऱ्या संवेदनांमधून निर्माण होतात, तर आपल्या आंतरिक विश्वाबद्दलचे प्रत्यय मनाला होणाऱ्या जाणिवांमधून निर्माण होतात. इंद्रियसंवेदन आणि अंतर्निरीक्षण हेच ज्ञानाचे मूळ स्रोत आहेत. ज्ञानप्रक्रियेची सुरुवात होताना मन निष्क्रिय असते, ते या स्रोतांमधून फक्त प्रत्यय ग्रहण करते. प्रत्यय निर्माण झाल्यानंतर मन सक्रिय होऊन त्यावर प्रक्रिया करते. प्रत्ययांचा परस्परांशी असलेला संबंध जाणून घेते. बाह्य आणि आंतरिक संवेदने जणू ज्ञानासाठी लागणारा कच्चा माल पुरवतात. या मालावर बुद्धिने प्रक्रिया केल्यानंतर ज्ञानाची निर्मिती होते. अनुभवातून निर्माण होणाऱ्या ज्ञानाचे समर्थनही अनुभवाच्या आधारेच करावे लागते, हे लॉकचे मत आजच्या विज्ञानपद्धतीशी सुसंगतच आहे.

लॉकच्या ज्ञानमीमांसेतील आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे इंद्रियानुभवातून आपल्याला वस्तूंच्या फक्त गुणधर्मांचे, संबंधांचे आणि क्रियांचे ज्ञान होऊ शकते, पण या सगळ्यांना आधारभूत असणाऱ्या द्रव्याचे साक्षात ज्ञान आपल्याला कधीच होऊ शकत नाही, ही त्याची भूमिका. आपल्या समोरच्या पेनाच्या अनुभवाचे विश्लेषण आपण केले, तर आपल्याला लक्षात येते, की अनुभव खरे तर पेनाचा रंग, रूप, आकार, पोत इत्यादींचाच असतो. त्यापलीकडे, 'पेन' या वस्तूचा वेगळा असा अनुभव आपल्याला येत नाही. अर्थात हे सगळे गुणधर्म 'पेनाचे' आहेत असे आपण मानतो, पण या मानण्याला अनुभवाचा आधार नाही. तर्काच्या आधारे तसे मानावे लागते.

लॉक वस्तूच्या गुणधर्मांचे प्राथमिक गुणधर्म आणि गौण किंवा दुय्यम गुणधर्म असे वर्गीकरण करतो. रंग, रूप, वास, चव, स्पर्श, ध्वनी हे गुणधर्म तो दुय्यम मानतो. कारण त्यांचे अस्तित्व त्यांचा अनुभव येण्यावर अवलंबून असते. तसेच त्यांचे ज्ञान व्यक्तिपरत्वे बदलू शकते. याउलट, वस्तूचे आकारमान, घनता, वस्तुमान या प्रकारचे गुणधर्म वस्तुगत आहेत. म्हणून त्यांना तो प्राथमिक म्हणतो. या प्राथमिक गुणधर्मांचे ज्ञान वस्तुनिष्ठरित्या होऊ शकते. कारण त्यांचे अस्तित्व व्यक्तीला त्यांचा अनुभव येण्यावर अवलंबून नसते. मात्र प्राथमिक गुणधर्मांचे ज्ञानही दुय्यम गुणधर्मांच्या मार्फतच मिळते. याचा अर्थ असा, की जगाचे जे ज्ञान आपल्याला होते त्यापैकी साक्षात अनुभव फक्त दुय्यम गुणधर्मांचाच येतो.

**चला करूया!**

वस्तूच्या गुणधर्मांवर आधारित संकल्पनाचित्र तयार करा. यासाठी विविध वस्तूंच्या उदाहरणांचा विचार करा.

त्यामधून निर्माण झालेले प्रत्यय हेच आपल्या साक्षात ज्ञानाचे विषय असतात. या प्रत्ययांपलीकडे अस्तित्व असणाऱ्या द्रव्याचे ज्ञान मात्र आपल्याला होऊ शकत नाही; कारण ते आपल्या प्रत्यक्ष अनुभवाला कधीच येत नाही. असे असूनही लॉक द्रव्याचे अस्तित्व मान्य करतो.

अनुभववादाचा दुसरा प्रणेता बर्कले मात्र लॉकच्याही पुढे जाऊन असे मत मांडतो, की जे अनुभवाला येत नाही, त्याचे अस्तित्व मानणे हे अनुभववादाच्या ज्ञानशास्त्रीय भूमिकेशी सुसंगत नाही. बर्कले असा युक्तिवाद करतो, की प्राथमिक गुणधर्मांचे ज्ञानही दुय्यम गुणधर्मांच्या अनुभवाद्वारे

येत असल्यामुळे, प्राथमिक गुणधर्मांचे ज्ञानही व्यक्तिनिष्ठ असते. आपल्या अनुभवातून निर्माण होणारे प्रत्यय आणि हे प्रत्यय अनुभवणारे मन यांनाच सत् मानता येते. जे अनुभवाला येत नाही, त्याचे अस्तित्व, सत्तत्त्व मानायला ज्ञानशास्त्रीय आधार नाही. त्यामुळे बर्कले जडद्रव्याचे अस्तित्व नाकारतो. त्याच्या मते, आपण ज्याला भौतिक वस्तू समजतो, तो फक्त आपल्या अनुभवाला येणाऱ्या प्रत्ययांचा एक संघात असतो. ज्या गुणधर्मांचा प्रत्यय आपल्याला येत असतो, त्या गुणधर्मांचा आधार असे 'जडद्रव्य' नावाचे काहीही अस्तित्वात नसते.

डेव्हिड ह्यूम या तिसऱ्या अनुभववादी तत्त्वज्ञाच्या काही विचारांचा परिचय आपण मागील काही पाठांत करून घेतलाच आहे. त्यामागची त्याची ज्ञानमीमांसाविषयक भूमिका आता समजावून घेऊया. लॉक आणि बर्कले यांच्याप्रमाणे ह्यूमदेखील सर्व प्रत्यय अनुभवांमधून निर्माण होतात असे प्रतिपादन करतो. आपल्या अनुभवाचे वर्गीकरण तो संस्कार किंवा ठसे आणि कल्पना किंवा प्रत्यय यांमध्ये करतो. इंद्रियसंवेदनांमधून आपल्या मनावर जणू वेगवेगळे ठसे उमटत असतात. या ठशांच्या आधारावर मन प्रत्यय/कल्पना तयार करते. मात्र, मन प्रत्ययांची निर्मिती करताना फक्त अनुभवाचाच उपयोग करते असे नाही. कित्येक वेळा या प्रत्ययांवर कल्पनाशक्तीचा प्रभावही असतो. कल्पनाशक्तीद्वारे वास्तवात अनुभवाच्या पातळीवर कधीही एकत्र न येणाऱ्या दोन किंवा अधिक प्रत्ययांचे मिश्रण करून मन नवीन कल्पना तयार करते. 'सुवर्ण पर्वत' हे याचे उत्तम उदाहरण आहे. आपण सुवर्ण आणि पर्वत यांचा अनुभव घेतलेला असतो, पण 'सुवर्ण पर्वत' आजपर्यंत कोणीच पाहिलेला नाही. मन मात्र सुवर्ण पर्वताची कल्पना करू शकते. या उदाहरणामधून ह्यूम असे स्पष्ट करतो, की ज्या ज्या कल्पना किंवा जे जे प्रत्यय आपल्या मनात असतात, त्यांच्याशी जुळणारे, त्यांनी निर्देशित होणारे असे काही बाह्य जगात अस्तित्वात असतेच असे नाही. त्यामुळे मनातील कल्पनांचे काटेकोर परीक्षण करणे ज्ञानमीमांसेसाठी अत्यावश्यक असते.

ज्ञानाचे वर्गीकरण ह्यूमने ज्ञानाच्या विषयांनुसार 'प्रत्ययांचे संबंध' आणि 'तथ्ये' या दोन प्रकारांमध्ये केले आहे. यांपैकी पहिल्या प्रकारातील कल्पना या बुद्धिने स्वतःच निर्माण केलेल्या असतात. त्यांचे सत्यत्व अनुभवावर अवलंबून नसते, ते बुद्धिने प्रमाणित केलेले असते. या प्रकारातले ज्ञान हे अनिवार्य, सार्वत्रिक, निश्चित सत्य असते. हे सत्य कुठल्याही बाह्य उपाधीवर अवलंबून नसते. ते सर्वकाळी, सर्वांना मान्य असते. गणित आणि तर्कशास्त्र ही या प्रकारच्या ज्ञानाची उदाहरणे आहेत. दुसऱ्या प्रकारचे ज्ञान हे बाह्य जगातील तथ्यांविषयीचे असते. अनुभव हा या ज्ञानाचा मूळ स्रोत असतो. स्थळ-काळ-व्यक्तिनुरूप अनुभवाचे स्वरूप बदलत असल्यामुळे या प्रकारचे ज्ञान निश्चित नसते. त्याचे सत्यत्व अनिवार्य नसते, तर फक्त संभाव्य असते. विज्ञान या प्रकारचे ज्ञान असते. वैज्ञानिक सत्ये संभाव्य असतात, अनिवार्य नव्हे.

कारणताविषयक आणि स्वविषयक कल्पना या ज्ञानाच्या 'तथ्ये' या प्रकारात मोडतात. या प्रकारातील ज्ञानाची सत्यता, समर्थनीयता, त्यात समाविष्ट असणारे सर्व प्रत्यय अनुभवजन्य आहेत ना याची खात्री करून घ्यावी लागते. ते तसे नसतील, तर त्यांना ज्ञानव्यवस्थेत स्थान देता कामा नये अशी ह्यूमची भूमिका आहे. ज्या प्रत्ययांचे मूळ आपल्याला अनुभवांनी मनात उमटवलेल्या ठशात/संस्कारात सापडत नाहीत, ते प्रत्यय ज्ञानशास्त्रीयदृष्ट्या त्याज्य आहेत, ते त्यागायलाच हवेत असे ह्यूमचे ठाम मत आहे. ह्यूमने 'कारणता' आणि 'स्व' या संकल्पनांची जी चिकित्सा केली आहे, ती या पार्श्वभूमीवर समजून घ्यायला हवी. या ज्ञानशास्त्रीय भूमिकेमुळेच ह्यूमने बर्कलेच्याही पुढे जाऊन केवळ जडद्रव्याचेच नव्हे, तर चेतनद्रव्याचे अस्तित्व आणि कार्यकारणसंबंधांची अनिवार्यता नाकारली, त्याबद्दल संदेह निर्माण केले. त्यामुळेच ह्यूमला संशयवादी म्हटले जाते. अर्थात ह्यूम गणिती आणि तार्किक सत्ये निश्चित स्वरूपाची असतात हे मान्य करतो. म्हणजेच तो निश्चित ज्ञानाची शक्यता पूर्णपणे नाकारत नाही, त्यामुळे त्याचा संशयवाद सौम्य मानला जातो.

## बुद्धिवाद आणि अनुभववाद यांच्या मर्यादा

आधुनिक तत्त्वज्ञानात, देकार्तपासून सुरू झालेला ज्ञानमीमांसेचा प्रवास ह्यूमपर्यंत एका टप्प्यापाशी येऊन पोहोचतो. संशयवादाचे कायमचे निराकरण करण्याच्या उद्देशाने जरी या प्रवासाची सुरुवात झाली असली, तरी ते कार्य किती कठिण आहे, हे ह्यूमच्या संशयवादी भूमिकेतून लक्षात येते. भारतीय तत्त्वज्ञानाच्या परंपरेत पाहिलेले ज्ञानमीमांसा आणि सत्तामीमांसा यांच्यातील परस्परसंबंध

आपल्याला या परंपरेतही आढळतात. बुद्धिवादाने निश्चित आणि निःसंशय सत्याची शक्यता मांडली. पण केवळ बुद्धिने प्राप्त केलेल्या ज्ञानाचा ताळमेळ बाह्य विश्वाशी कसा जुळतो हे स्पष्ट करण्यात बुद्धिवाद यशस्वी ठरत नाही. आपण आधी पाहिल्याप्रमाणे, गणिती आणि तार्किक सत्ये ही या प्रकारच्या सत्यांची उदाहरणे आहेत. पण ही सत्ये आपल्याला जगाबद्दल काहीच सांगत नाहीत. त्यामुळे बाह्य जगाचे ज्ञान अनुभवातूनच मिळवायला हवे या अनुभववादी भूमिकेला एक प्रकारचे समर्थनच मिळाले. पण अनुभववादाचा विकास पुन्हा एकदा संशयवादाकडे घेऊन जाणारा ठरला. ह्यूमने ज्ञानाची जी मूलगामी चिकित्सा केली, त्यामुळे अनुभवजन्य ज्ञान अनिवार्य सत्य असू शकत नाही, ते संभाव्यच असते यावर जणू शिक्कामोर्तब झाले. बुद्धिने प्राप्त होणारे ज्ञान निश्चित असले तरी बाह्य जगाला अनुरूप असेल याची खात्री नाही आणि अनुभवातून मिळणारे बाह्य जगाचे ज्ञान कधीच निश्चित असू शकणार नाही असा विलक्षण पेच ज्ञानमीमांसेत उभा राहिला.

या पेचाला प्रतिसाद देण्याच्या प्रयत्नामधून इमॅन्युएल कांटचे चिकित्सक तत्त्वज्ञान निर्माण झाले. कांटने बुद्धिवाद आणि अनुभववाद यांची अतिशय मूलगामी चिकित्सा करून असे दाखवून दिले, की बुद्धी आणि इंद्रियानुभव या दोन्ही ज्ञानसाधनांची योग्य प्रकारे सांगड घातल्याशिवाय ज्ञाननिर्मिती होऊ शकत नाही. ज्ञानाचा आकार किंवा आराखडा पुरविण्याचे काम बुद्धी करते, तर अनुभव त्यामध्ये आशय भरतो. आकार आणि आशय यांच्या एकत्र जडणघडणीतून ज्ञान निर्माण होते. बुद्धिच्या सहयोगाखेरीज निव्वळ इंद्रियसंवेदने ज्ञान निर्माण करू शकत नाहीत हे जेवढे खरे, तेवढेच इंद्रियसंवेदनाच्या पलीकडे जाऊन अनुभवातीत असे विश्व बुद्धिही जाणून घेऊ शकत नाही, हेही खरेच! कांटने या प्रकारे ज्ञानप्रक्रियेतील बुद्धी आणि अनुभव या स्रोतांचे परस्परावलंबित्व स्पष्ट केले. कांटचे ज्ञानप्रक्रियेचे विश्लेषण, आज मेंदू-विज्ञानात जे संशोधन सुरू आहे, त्याला जवळ जाणारे आहे.

## वैज्ञानिक दृष्टिकोन

आपण तत्त्वज्ञानाच्या ऐतिहासिक परंपरेतील ज्ञानमीमांसेचा आढावा घेतला. आपण हे बघत आलो आहोत, की ज्या काळात तत्त्वज्ञांनी आपल्याला ज्ञान कसे होते या प्रश्नाचा विचार केला तेव्हा त्यांच्या हाती आजची विज्ञानाची साधने नव्हती. आपला अनुभव प्रमाण मानून आणि व्यापक निरीक्षणातून तत्त्वज्ञांनी आपला विचार मांडला. विज्ञान कुणालाही पडताळणी करता येईल अशा वस्तुनिष्ठ सत्यतेचा शोध घेते. ही पद्धत ज्ञान कसे होते याविषयी काय सांगते?

ज्ञान कसे होते याची चिकित्सा विज्ञानाच्या पद्धतीत करताना व्यक्तीसाठी ज्ञान आणि समूहासाठी ज्ञान या दोन वेगळ्या प्रक्रिया आहेत हे लक्षात घ्यावे लागते. विज्ञानाला सामूहिक प्रयत्नांतून आणि साधने वापरून जेव्हा एखादा नियम सापडतो तेव्हा त्याचे आकलन व्यक्तीला नेमके कसे होते याच्याशी त्याचा संबंध नसतो. उदाहरणार्थ, अणुचे वर्तन साधने वापरून जसे समजते तसे व्यक्तीला केवळ इंद्रियांच्या साहाय्याने समजेल असे नाही. व्यक्तीच्या आकलनाच्या मर्यादा ओलांडण्यासाठी सामूहिक आकलन आणि साधने माणसाच्या उपयोगाला आली.

ज्ञान कसे होते या बाबतीत शरीरविज्ञान आणि मेंदू विज्ञान यांची पद्धती संवेदना कशा ग्रहण केल्या जातात, त्या अनुषंगाने शरीरांतर्गत प्रक्रिया कशा चालतात हे प्रयोग, उपकरणांच्या माध्यमातून दाखवून देणे अशी असते. सजीवांची उत्पत्ती निर्जीव जगातील घटकांपासून झालेली असल्याने जैविकविज्ञानाला भौतिकविज्ञानाचे कोंदण असते. भौतिकविज्ञानाच्या पातळीवर ज्ञान कसे होते याचे स्पष्टीकरण कसे मिळते? व्यक्तीला आपल्या पंचेंद्रियांनी बाह्य परिस्थितीचे ज्ञान सूक्ष्म कणांमार्फत होते. उदा. फोटॉनमार्फत दिसते, वायुकणांमुळे ऐकू येते, सूक्ष्म वस्तुकणांमुळे वास येतो, चव कळते, स्पर्श व तापमान समजते इत्यादी. विखुरणामुळे सर्वच्या सर्व सूक्ष्मकण मूळ स्वरूपात आपल्यापर्यंत पोहोचू शकत नाहीत. वाटेत काही गायब होतात, तर काहींचे स्वरूप बदलते. त्यामुळे बाह्य परिस्थितीच्या 'यथार्थ' दर्शनाचा दावा करणे अवैज्ञानिक असते.

**चला समजून घेऊया!**

ज्ञानेंद्रियांमार्फत आपल्याला होणाऱ्या ज्ञानाची प्रक्रिया भौतिकशास्त्राच्या शिक्षकांकडून समजून घ्या.

साधने किंवा उपकरणे वापरून मोजमापे करतानाही याचे भान ठेवावे लागते. मोजमापांसाठी प्रमाणीकरण करून

त्याच्या तुलनेत अचूकता व्यक्त करावी लागते. प्रकाशाच्या वेगापेक्षा अधिक काही माहीत नसताना त्या वेगाच्या मोजणीतील अचूकतेविषयी साधनांची मर्यादा मान्य करावी लागते.

विज्ञानाच्या पद्धतीत असे दिसून येते, की 'अंतिम सत्या'च्या यथार्थ ज्ञानाबाबत विज्ञान दावा करीत नाही. एखादे विधान अथवा विचारव्यवस्था ज्ञान म्हणून स्वीकारताना विज्ञान संभाव्यतेची परिभाषा वापरते. गुरूत्वाकर्षण हा निसर्ग नियम आहे असे जेव्हा म्हटले जाते तेव्हा अशा प्रकारचे बल असावे अशी संभाव्यता अतिशय जास्त असते आणि त्या संभाव्यतेचा स्वीकार केल्यानंतरच वास्तव जगातील प्रयोग किंवा तंत्रज्ञानाचे उपयोजन शक्य होते.

## शब्दसूची

लौकिक प्रत्यक्ष - Ordinary perception
अलौकिक प्रत्यक्ष - Extraordinary perception
अनुमान - Inference
प्रमा - Knowledge
प्रमाता - Knower
प्रमेय - Known
प्रमाण - Source of knowledge
व्याप्ती - Invariable concommitance
निकष - Criterion
समर्थनीयता - Justification
सत्यता - Truth
सत्यतेचा अनुरूपता सिद्धांत - Correspondence theory of Truth
सत्यतेचा सुसंवादी सिद्धांत - Coherence theory of Truth
सत्यतेचा फलप्रामाण्यवादी सिद्धांत - Pragmatist theory of Truth
फलप्रामाण्यवाद - Pragmatism
अंतर्निहित कल्पना - Innate ideas
स्वयंसिद्ध - Self-evident
तथ्ये - Matters of fact
प्रत्ययांचे संबंध - Relations of ideas

## स्वाध्याय

**प्रश्न १ कंसातील योग्य पर्याय निवडून पुढील विधाने पूर्ण लिहा.**

(१) सत्यतेच्या कसोटीला उतरणाऱ्या ज्ञानाला भारतीय तत्त्वज्ञानात ........ म्हणतात.
(धारणा, प्रमा, स्मृती)

(२) न्याय दर्शनानुसार माणसाचा ........ हा ज्ञाता असतो.
(आत्मा, जीव, अनुभव)

(३) सापेक्षतावादानुसार ज्ञान ........ असते.
(वास्तव, व्यक्तिसापेक्ष, भ्रमात्मक)

(४) देकार्तला ........ चूक आहे हे सिद्ध करायचे होते.
(बुद्धिवाद, फलप्रामाण्यवाद, संशयवाद)

**प्रश्न २ खालील शब्दसमूहासाठी पारिभाषिक संज्ञा लिहा.**

(१) ज्याचे ज्ञान होते ते.


(२) जी ज्ञानी असून विश्वास ठेवण्याच्या पात्रतेची आहे अशी व्यक्ती.

(३) ज्ञानेंद्रिय आणि वस्तू यांच्या संपर्कातून होणारे निश्चित, दोषमुक्त आणि सत्य ज्ञान.


(४) आपण काढलेला निष्कर्ष अन्य व्यक्तीला सिद्ध करून दाखविण्यासाठी वापरलेले अनुमान.

**प्रश्न ३ संकल्पनाचित्र/तक्ता/ओघतक्ता पूर्ण करा.**

(१)




(२)




**प्रश्न ४ खालील विधानांचे उदाहरणासहित स्पष्टीकरण करा.**

(१) स्पष्टता आणि विवक्तता ही सत्य विधानाची लक्षणे आहेत.

(२) इंद्रियानुभवाशिवाय ज्ञान होऊ शकत नाही.

(३) एखाद्या गोष्टीवर विश्वास असणे म्हणजे ज्ञान असणे नव्हे.

**प्रश्न ५ पुढील विधाने सत्य की असत्य हे सकारण सांगा.**

(१) केवळ मनुष्यालाच 'प्रमाता' असे संबोधता येते.

(२) ज्या अनुमानाचा वापर इतरांसाठी युक्तिवाद म्हणून केला जातो त्याला स्वार्थानुमान असे म्हटले जाते.

(३) सत्यतेच्या अनुरूपता सिद्धांतानुसार सर्व विधाने एकमेकांशी सुसंगतपणे जोडलेली असतात.

**प्रश्न ६ फरक स्पष्ट करा.**

(१) स्वार्थानुमान - परार्थानुमान

(२) बुद्धिवाद - अनुभववाद

(३) प्राथमिक व दुय्यम गुणधर्म

**प्रश्न ७** न्याय दर्शनाच्या प्रमाण विचारातील 'अनुमान' प्रमाणाची सविस्तर चर्चा करा.

**प्रश्न ८** सत्यतेचा फलप्रामाण्यवादी सिद्धांत सांगून त्याच्या समस्या सोदाहरण स्पष्ट करा.

**प्रश्न ९ पुढील प्रसंगावर संवाद लिहा.**

काल्पनिक चित्रपटकथा वा परीकथांमध्ये असणारी अंतर्गत सुसंगतता आणि वास्तवापासून दिसणारी फारकत.

**उपक्रम**

'अध्ययन कसे होते' याविषयी पूरक माहिती मिळवा व अध्ययनासंबंधी सिद्धांताची माहिती देणाऱ्या भित्तिपत्रकांचे प्रदर्शन भरवा.

# ५. काय करावे आणि का?

- प्रस्तावना
- नीतिमीमांसेचे स्वरूप
- भारतीय परंपरेतील नीतिविषयक संकल्पना
- पाश्चात्त्य परंपरेतील नीतिविषयक संकल्पना
- वैज्ञानिक दृष्टिकोन

## प्रस्तावना

सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंतचा आपला जागेपणीचा सगळा वेळ काही ना काही करण्यात जात असतो. फक्त झोपेतच काही काळ आपण पूर्ण निष्क्रिय असतो; नाहीतर सतत आपण काहीतरी करत असतो. पण आपण नक्की काय करतो आहोत? कशासाठी करतो आहोत? कशा पद्धतीने करतो आहोत? हा जाणीवपूर्वक विचार आपण क्वचितच करतो. आपल्या काही कृती केवळ सवयीने केल्या जातात, काही कोणीतरी सांगितले आहे म्हणून, तर काही आपण ठरवून करतो. कधी आपल्या उपजत प्रेरणा आपल्या वर्तनाला कारणीभूत असतात, तर कधी आपल्या भावभावना. गेल्या वर्षी आपण क्रिया आणि कृती यांमधील फरक पाहिलाच आहे. क्रिया यांत्रिकपणे होतात, त्यांच्यावर आपले पूर्ण नियंत्रण नसते. कृती मात्र इच्छास्वातंत्र्यामधून, मूल्यांच्या आधारे निवडता येतात. त्यामुळेच त्या चांगल्या किंवा वाईट, योग्य किंवा अयोग्य असू शकतात. बहुतेक वेळा नीतीच्या दृष्टिने काय बरोबर आहे, काय चूक आहे याबद्दलचे नियम आपल्याला शिकवलेले असतात, त्यांना अनुसरून कृती करण्याचा प्रयत्न आपण करतो. नीतिनियमांची आवश्यकताही आपण समजावून घेतलीच आहे.

स्वतःच्या वागण्याचे तुम्ही जर ठरवून निरीक्षण केले, तर तुमच्या लक्षात येईल, की काही वेळा तुम्ही तुम्हांला जी शिकवण मिळाली आहे, तुमच्यावर जे संस्कार झाले आहेत, त्यानुसार वागता. बसमधून प्रवास करताना एखादे आजोबा उभे असलेले दिसले, तर तुम्ही चटकन उठून त्यांना बसायला जागा देता. कधीकधी मात्र मैत्रिणीबरोबर चित्रपटाला जाण्यासाठी 'अभ्यासाला जातो' असे चक्क खोटे सांगता. अशा वेळी आपण फार काही चुकीचे केले आहे असे त्या क्षणी तरी तुम्हांला वाटत नाही. काही वेळा मात्र आपण नक्की काय केले तर ते बरोबर असेल? किंवा आपला मित्र करतो आहे ते बरोबर आहे की चूक असे प्रश्न आपल्याला पडतात.



आपला अगदी जवळचा मित्र आपल्याला परीक्षेत एखाद्या प्रश्नाचे उत्तर दाखवायला सांगतो आणि आपल्याला पेच पडतो की मैत्रीचे मूल्य मोठे की परीक्षेचे नियम न मोडण्याचे? आपली आई आजारी आहे या कारणासाठी एखादी मैत्रीण नापास असतानाही आईला आपण पास आहोत असे खोटेच सांगते आणि आपण विचारात पडतो हे बरोबर की चूक? यांसारख्या प्रसंगात नक्की कसा विचार करावा? कशाच्या आधारे योग्य निर्णय घ्यावेत याचे मार्गदर्शन आपल्याला नीतिमीमांसेत मिळते.

## नीतिमीमांसेचे स्वरूप

कृती नैतिकदृष्ट्या चांगल्या की वाईट, योग्य की अयोग्य याचे मूल्यमापन कसे करायचे यासंबंधी विवेचन करणे हे नीतिमीमांसेचे कार्य असते. आपल्या किंवा इतरांच्या कृतीचे मूल्यमापन कुठल्या निकषांच्या आधारे करावे याचा विचार नीतिमीमांसेत केला जातो. मुख्यतः दोन निकष यासाठी विचारात घेतले जातात. एक म्हणजे कृती किंवा कर्म करण्यामागचा हेतू, प्रयोजन आणि

दुसरा म्हणजे कृतीचे परिणाम. जाणीवपूर्वक केलेली प्रत्येक कृती कुठल्या ना कुठल्या उद्दिष्टाने केलेली असते आणि प्रत्येक कृती कुठल्या ना कुठल्या परिणामांना जन्म देते. हेतू आणि परिणाम एकमेकांशी निगडित असतातच असे नाही. ते निगडित असले, तर इच्छित परिणाम साधले गेले आहेत असे म्हणता येते. पण कित्येक वेळा कर्त्याच्या ध्यानीमनी नसलेले, त्याला अपेक्षित नसलेले परिणामही घडून येतात.

उदाहरणार्थ, काही वेळा अपघातात सापडलेल्या लोकांना मदत करण्याच्या इच्छेने धावून जाणारे लोक, अशा प्रसंगी नक्की काय करायला हवे हे माहिती नसल्याने, त्यांच्या कृतींमधून अपघातग्रस्तांना नकळत इजा पोचवतात. हेतूच्या दृष्टीने पाहिले, तर हे कृत्य योग्य असते, पण परिणामांच्या दृष्टीने मात्र अयोग्य!

**चला बोलूया!**

वरील प्रकारचे तुम्हांला आलेले किंवा तुम्हांला माहिती असलेले अनुभव वर्गात सांगून त्यांची चर्चा करा.




अनेक वेळा 'काय करावे'? हा प्रश्न आपण नैतिक नियमांच्या आधारे सोडवतो. हे नियम अनेक वर्षांचा अनुभव, त्यावरचे चिंतन यांमधून तयार होतात. पण काही वेळा नियमांना अपवाद करणेच योग्य होईल अशी परिस्थिती निर्माण होते, तर काही वेळा दोन नियम, दोन परस्परविरुद्ध कृतींचा पुरस्कार करतात. भुकेल्याला अन्न द्यावे असे नियम सांगतो, पण काही विशिष्ट आजारात उपचारांदरम्यान भूक लागली तरीही रुग्णाला अन्न न देणे हेच रुग्णाच्या हिताचे असते. त्यामुळे नियमाला अपवाद करावा लागतो. खोटे कधी बोलू नये आणि एखाद्याचा जीव वाचवणे शक्य असेल तर वाचवावा असे नियम सांगतात. पण एखाद्या अपवादात्मक प्रसंगात खोटे बोलण्याखेरीज एखाद्याचा जीव वाचवताच येणार नसेल तर काय करावे असा प्रश्न निर्माण होतो.

**चला करूया!**

नीतिनियम दोन विरोधी कृत्ये करायला सुचवतात या प्रकारच्या प्रसंगांवर आधारित संवाद लिहा आणि वर्गात सादर करा.

विशिष्ट समाजात, विशिष्ट काळी जे नियम समाजहितासाठी केले जातात, त्यांना एक ऐतिहासिक संदर्भ असतो. त्या त्या काळात, विशिष्ट परिस्थितीत ते नियम पाळणे व्यक्तीच्या आणि समाजाच्या भल्याचे असते. मात्र कित्येक वेळा परिस्थिती मोठ्या प्रमाणात बदलली तरी नियम बदलले जात नाहीत. अशा वेळी ते हितकारक ठरत नाहीत. परंपरेने सांगितलेले रीतीरिवाज आणि रूढी, धर्माने सांगितलेले विधिनिषेध (म्हणजे काय करावे व काय करू नये यासंबंधीचे नियम), सरकारने तयार केलेले कायदे हे सगळे बहुतांशी समाजाच्या भल्यासाठी तयार केलेले नियमच असतात. त्यांची वेळोवेळी नीतीच्या दृष्टिकोनातून चिकित्सक चर्चा करण्याची गरज असते. नियमांचा डोळे झाकून केलेला स्वीकार समाजासाठी घातक ठरू शकतो. नीतिमीमांसेच्या अभ्यासातून कृतींची, नियमांची, मूल्यांची चिकित्सा कशी करावी, त्यासाठी कुठले घटक, कुठल्या कारणांसाठी विचारात घ्यायला हवेत यासंबंधी मार्गदर्शन मिळते. चांगल्या जीवनासाठी नीतिनुसार आचरण जितके महत्त्वाचे, तेवढेच नीतिविषयक चिकित्सक चिंतन महत्त्वाचे आहे. तत्त्वज्ञान या विषयाचे हे वैशिष्ट्यच आहे, की असे चिंतन आणि त्यावरची चर्चा याच विषयात केली जाते. आपल्या सगळ्यांसाठी नीतिमीमांसेचा अभ्यास खूप महत्त्वाचा आहे. कारण आपल्याला सगळ्यांनाच चांगले जीवन हवे आहे. त्यासाठी भारतीय आणि पाश्चात्त्य तत्त्वज्ञानात नीतिविषयक ज्या संकल्पना, सिद्धांत मांडले त्यांची ओळख आता करून घेऊया.

## भारतीय परंपरेतील नीतिविचार

तुम्हांला ठाऊकच आहे की ज्ञात परंपरेनुसार ऋग्वेदाला आद्य ग्रंथ समजले जाते. भारतीय

नीतिविचारातील एक पायाभूत संकल्पना म्हणजे ऋत. या संकल्पनेचा उल्लेख ऋग्वेदात आढळतो. मूळ 'ऋ' या धातूपासून म्हणजे क्रियापदापासून तयार झालेला हा शब्द गती किंवा हालचाल आणि व्यवस्था यांचा निर्देशक आहे. विश्वात गतिशीलता आणि त्या गतीमध्ये आढळणारी एक प्रकारची व्यवस्था किंवा क्रमबद्धता आहे असे ऋतसंकल्पना सुचवते. उन्हाळा-पावसाळा-हिवाळा असे भारतात आढळणारे ऋतुचक्र, दिवस-रात्रीचे चक्र ही ऋताचीच उदाहरणे आहेत. मात्र ऋत-संकल्पना फक्त निसर्गातील क्रमबद्धतेशी संबंधित नाही. त्याबरोबर एक नैतिक व्यवस्थाही अस्तित्वात आहे असे ऋतसंकल्पना सुचवते. या कल्पनेनुसार माणसाचे वर्तन आणि त्याचे परिणाम यांमध्येही एक व्यवस्था अनुस्यूत असते. त्यामुळेच चांगल्या कृतींचे परिणाम चांगले, तर वाईट कर्मांचे परिणाम वाईट होतात. हे लक्षात घेऊन माणसाने आचरण करायला हवे. चांगले-वाईट कशाला म्हणावे, यासंबंधीची सुस्पष्ट चर्चा यासंदर्भात केलेली नसली, तरी माणसाला चांगले आचरण करण्याची प्रेरणा देण्याचा यामागचा हेतू मात्र स्पष्ट आहे. या ऋतसंकल्पनेचीच परिणती आपल्याला नंतर कर्मसिद्धांतात झालेली दिसते.



**चला लिहूया!**

तुम्ही कुणाकुणाचे ऋण मानता आणि त्याची परतफेड कशी कराल यावर टिपण लिहा.

## कर्मसिद्धांत


कर्म या शब्दाचा शब्दशः अर्थ कृती असा आहे हे तुम्हांला माहितीच आहे. नीतिचा संबंध इच्छापूर्वक केलेल्या कृतींशी असतो हेही आपण गतवर्षी शिकलोच आहोत. कर्मसिद्धांतानुसार, अशा इच्छापूर्वक केलेल्या कृती म्हणजेच ऐच्छिक कर्मे अटळपणे काही परिणामांना जन्म देतात. या परिणामांना 'कर्मफल' असे म्हटले जाते. आपल्या कर्मांची फळे म्हणजे परिणाम प्रत्येक व्यक्तीला कधी ना कधी भोगावीच लागतात, असे कर्मसिद्धांत सांगतो. एका अर्थी कर्म आणि त्याचे फल यांमधील संबंध हा निसर्गात आढळणाऱ्या कार्यकारणसंबंधाचा

**ऋणसंकल्पना :** 'ऋण' ही भारतीय नीतिविचारातील एक मौलिक संकल्पना आहे. 'ऋण' याचा शब्दशः अर्थ कर्ज किंवा देणे असा होतो. आपले जीवन आणि आपल्याला जीवनात लाभलेल्या अनेक गोष्टी या कुणाकडूनतरी लाभलेल्या असतात; त्यामुळे आपल्यावर त्यांचे ऋण असते असे भारतीय परंपरा मानते. या ऋणाची योग्य त्या प्रकारे परतफेड करून आपण ऋणमुक्त व्हावे असे सांगितले जाते. ज्यांच्यामुळे आपल्याला काही लाभते, त्यांच्याबद्दलची कृतज्ञता, दायित्वाची भावना ऋणमुक्तीच्या कल्पनेच्या मुळाशी आहे.

देवऋण, ऋषीऋण, पितृऋण हे ऋणांचे तीन मुख्य प्रकार भारतीय परंपरेत सांगितले आहेत. निसर्गातील शक्ती या देवदेवतारूप आहेत. त्यांच्यामुळे आपल्याला जीवन आणि जीवनासाठी आवश्यक असलेले सर्वकाही मिळते असे परंपरा मानते. आपले मातापिता आणि पूर्वज यांच्यामुळे आपल्याला जन्म मिळतो. ऋषी आपल्याला ज्ञान देतात. त्यामुळे आपण या सर्वांचे ऋणी असले पाहिजे. यज्ञ-याग आणि इतर कर्मकांडे यथासांग करणे हा देवऋणातून मुक्त होण्याचा मार्ग आहे. अपत्ये जन्माला घालणे हा पितृऋणातून मुक्त होण्याचा मार्ग आहे. ऋषीऋण फेडण्यासाठी योग्य प्रकारे विद्याभ्यास करावा असे सांगितले आहे. याखेरीज मनुष्यऋणाचा उल्लेखही परंपरेत आढळतो. आपण जे काही असतो, जे काही प्राप्त करतो, त्यामध्ये समाजाचे योगदान फार मोठे असते. हे ऋण फेडण्यासाठी दान आणि सहकार्य यांचा अवलंब करावा असे सुचवले आहे.

ऋणसंकल्पना यासाठी महत्त्वाची आहे, की कृतज्ञतेची भावना माणसांचे परस्परसंबंध अधिकाधिक स्नेहशील, अर्थपूर्ण बनवते. असे संबंध व्यक्ती आणि समाज या दोन्हींसाठी हितकर असतात. परंपरेने सांगितलेल्या ऋणांच्याही पलीकडे जाऊन आपल्या कृतज्ञतेचा परीघ विस्तारणे शक्य आहे. आज आपण निसर्गऋण मानून निसर्गाप्रती कृतज्ञ राहिलो, तर मानव-निसर्ग संबंधांतील समस्या कमी होण्याला मदत होईल, असे नाही वाटत का तुम्हांला?

मानवी आचरणाच्या क्षेत्रात केलेला विस्तार आहे. कर्म हे कारण तर फल हे कार्य आहे. कारण आणि कार्य यांचा संबंध अटळ आहे. कारणातून अटळपणे कार्य निर्माण होते, तसेच कर्मापासून फळ निर्माण होणार असे कर्मफलाचा नियम सांगतो, एवढेच नव्हे, तर त्यापुढे जाऊन कर्माची फळे कर्त्याला त्याची इच्छा असो वा नसो, मिळतातच असेही सांगतो. 'जैसी करनी, वैसी भरनी', 'Reap as you sow', 'पेरावे तसे उगवते' अशांसारख्या निरनिराळ्या भाषांमधील म्हणी हे कर्म सिद्धांताचेच व्यावहारिक रूप आहे. सर्वसामान्य माणूसही 'भोगा आपल्या कर्माची फळं' असे म्हणताना त्याला कर्मसिद्धांताची असलेली जाणीवच व्यक्त करत असतो. अशी जाणीव भारतीय परंपरेत वाढलेल्या सर्वांमध्ये मुरलेली असली, तरी या परंपरेने सांगितलेले कर्माचे प्रकार आणि त्यांचे महत्त्व, कुठल्या प्रकारचे कर्म चांगल्या जीवनासाठी आवश्यक आहे यासंबंधीचे विचार हे मात्र सगळ्यांना माहिती नसतात. आपण आता त्यांची माहिती करून घेऊया.




**कर्माचे वर्गीकरण**


कर्माचे सगळ्यांत मूलभूत प्रकार म्हणजे ऐच्छिक कर्म आणि अनैच्छिक कर्म. यांचे अर्थ तुम्ही गेल्या वर्षी शिकलाच आहात.

**चला करूया!**

वेगवेगळ्या कर्मांची उदाहरणे घेऊन त्यांचे वरील प्रकारांत वर्गीकरण करा.

भारतीय विचारपरंपरेनुसार ऐच्छिक कर्मांमागे असणाऱ्या दोन मुख्य प्रेरणा म्हणजे राग आणि द्वेष. इथे 'राग' या शब्दाचा अर्थ क्रोध, संताप असा मात्र नाही हे नीट लक्षात ठेवा. राग याचा अर्थ इथे आकर्षण, ओढ, हवेसे असणे असा आहे. द्वेष म्हणजे नकोसे असणे. आपली सगळी कृत्ये काहीतरी 'हवे' आणि काहीतरी 'नको' याच मूलभूत प्रेरणांमधून केली जातात.

कर्त्याचे कर्म आणि त्याला त्याचे मिळणारे फळ यांचा संबंध आणखी विस्ताराने सांगता येतो. कर्मसिद्धांताचे पुरस्कर्ते असे मानतात, की हा संबंध दुहेरी स्वरूपाचा आहे. आताच्या कर्माकडून नंतरच्या फलाकडे आणि आताच्या फलाकडून पूर्वीच्या कर्माकडे. पहिल्या संबंधानुसार कोणतेही बरेवाईट कर्म आपण करतो, त्याचा सुखदु:खात्मक परिणाम कर्त्याला भोगावा लागणारच. दुसऱ्या संबंधानुसार आज आपण जे सुखदु:खात्मक अनुभव घेत आहोत, ते पूर्वी कधीतरी केलेल्या बऱ्यावाईट कर्माचे फलच असले पाहिजे.




भारतीय परंपरेत कर्मसिद्धांताचा सांधा पुनर्जन्माच्या संकल्पनेशी नेहमीच जुळलेला दिसतो. यामागचे कारण आपण समजून घेऊया. कर्मसिद्धांतानुसार चांगल्या कर्मांची फळे चांगली तर वाईट कर्मांची फळे वाईट असतात. एखाद्या व्यक्तीच्या वाट्याला खूप सुख-समाधान आले, तर त्याची पुण्यकर्मे फळाला आली असे समजले जाते. तसेच ज्या व्यक्तीला दु:खांना, वेदनांना सामोरे जावे लागते, त्यांनी काहीतरी पापे म्हणजे वाईट कर्मे केल्यामुळेच असे झाले अशी समजूत असते. प्रत्यक्षात असे अनेक वेळा अनुभवाला येते की वाईट,

चुकीची किंवा अनैतिक कृत्ये करणारे सुख उपभोगत असतात, तर चांगली, योग्य, नैतिक कृत्ये करणाऱ्या व्यक्ती दुःख भोगत असतात. कर्मसिद्धांतानुसार तर असे होणे शक्यच नसते. पुनर्जन्माची कल्पना या गोष्टीचे स्पष्टीकरण करते. माणसे भोगत असलेल्या सुखदु:खांचे कारण त्यांच्या आयुष्यात सापडले नाही, तर ते पूर्वजन्मांमधील कर्मांचे फल आहे असे या कल्पनेनुसार मानले जाते. त्याचबरोबर आता चांगली कर्मे केल्याने या जन्मी नाही तरी पुढच्या जन्मी चांगली फळे नक्की मिळणार याची एक प्रकारे खात्री देऊन व्यक्तींना चांगली कर्मे करण्यासाठी उद्युक्त करते.

तसे पाहिले तर, चांगल्या वर्तनाचे परिणाम चांगले तर वाईट वर्तनाचे परिणाम वाईट होतात ही समजूत सर्वत्र आढळते. पण भारताबाहेरील परंपरांमध्ये सहसा पुनर्जन्माची कल्पना आढळत नाही. मग आपण आता पाहिलेल्या विसंगतीचे स्पष्टीकरण या परंपरा कशा देतात? याचे उत्तर असे, की ख्रिश्चन आणि इस्लाम धर्मानुसार देहाचा मृत्यू झाला तरी आत्मा नष्ट होत नाही. आपल्या सर्व बऱ्या-वाईट कर्मांचा हिशोब परमेश्वराजवळ असतो. 'अंतिम निवाड्याच्या दिवशी', (final day of Judgement) या हिशोबानुसार चांगल्या आत्म्यांना स्वर्गात तर पापी आत्म्यांना नरकात पाठवले जाते. म्हणजेच पुनर्जन्म नसला तरी कर्माचे फळ भोगावेच लागते असे या परंपराही मानतात. पण त्यांच्या संस्कृतीला अनुसरून त्याबद्दल वेगळ्या कल्पना मांडतात.

**चला शोधूया!**

'कर्म आणि त्यांची फळे भोगावी लागणे' या स्वरूपाची अन्य काही उदाहरणे आहेत का ते शोधा.

भारताच्या संदर्भात बोलायचे तर 'भारतीय परंपरा' असा एकच शब्द आपण सरसकटपणे वापरत असलो, तरी ही परंपरा **विविधतेने नटलेली आणि समृद्ध** आहे, हे आपण प्रतिज्ञेत अभिमानाने सांगतोच. या परंपरेत आत्मा, ईश्वर पुनर्जन्म नाकारणारे चार्वाक दर्शन आहे. तसेच आत्मा, ईश्वर, पुनर्जन्म मानणारी सांख्य, योग, न्याय, वैशैषिक आणि काही वेदान्त दर्शनेही आहेत. यामध्ये आत्मा नाकारूनही पुनर्जन्म मानणारे, ईश्वर नाकारणारे बौध्द दर्शन आहे, त्याप्रमाणे ईश्वर नाकारून आत्मा आणि पुनर्जन्म मानणारे जैन दर्शनही आहे. चार्वाकांच्या जडवादी तत्वज्ञानाचा अपवाद वगळता इतर सर्व दर्शनांनी पुनर्जन्म आणि कर्मसिद्धांत यांना मान्यता दिली आहे. या सर्व दर्शनांचे याबाबतही एकमत आहे, की पुन्हापुन्हा वेगवेगळ्या देहात जन्म होणे हे सजीवासाठी बंधनकारक आहे आणि सजीवाचे सर्वोच्च ध्येय या बंधनापासून, म्हणजेच पुनर्जन्माच्या चक्रातून सुटका मिळवण्याचे आहे. ही सुटका, मुक्ती म्हणजे मोक्ष किंवा निर्वाण! ही सर्व दर्शने मोक्षाला परमपुरुषार्थ मानतात. पुरुषार्थविचार भारतीय नीतिमीमांसेत महत्वाचा आहे, तो आता समजावून घेऊया.

## पुरुषार्थविचार

'पुरुषार्थ' या शब्दाची फोड "पुरुषैः अर्थ्यते इति पुरुषार्थ"। अशी करतात. अर्थ हा शब्दच अनेकार्थी आहे. इथे या शब्दाचा अर्थ ध्येय किंवा उद्‌दिष्ट असा आहे. पुरुषार्थ म्हणजे व्यक्तीने (फक्त पुल्लिंगी नव्हे) मिळवायची साध्ये किंवा गाठायची ध्येये अथवा उद्‌दिष्टे. चांगले जीवन जगण्यासाठी व्यक्तीची ही उद्‌दिष्टे असायला हवीत, असे पुरुषार्थ सिद्‌धांत सुचवतो. सुरूवातीच्या काळात धर्म, अर्थ आणि काम अशी तीन उद्‌दिष्टे सुचवण्यात आली होती. याला 'त्रिवर्ग सिद्‌धांत' म्हणून ओळखले जाते. नंतरच्या काळात या तिन्हींबरोबर मोक्षाचाही समावेश ज्याला 'चतुर्वर्ग सिद्‌धांत' म्हणून ओळखले जाते, त्यात केला गेला. या चारी पुरुषार्थांची ओळख करून घेऊया.

### काम

शब्दार्थानुसार काम शब्द माणसाच्या कामना किंवा इच्छा यांच्याकडे निर्देश करतो. पुरुषार्थाच्या चौकटीत काम शब्द शारीरिक सुखांशी संबंधित आहे. त्यामध्ये लैंगिक सुखाबरोबरच इंद्रियांच्या इतर सुखांचा, तसेच कला व सौंदर्य यांच्या आस्वादाचाही समावेश आहे. या सुखांची इच्छा असणे हे निसर्गाला धरूनच असल्याने कामाला पुरुषार्थ मानले आहे.

### अर्थ

अर्थ या शब्दाने धन, संपत्ती, मालमत्ता यांचा निर्देश केला जात असला, तरी दैहिक सुखाच्या इच्छेच्या पूर्ततेसाठी आवश्यक असलेली भौतिक साधने असा त्याचा व्यापक अर्थ इथे अभिप्रेत आहे. म्हणजेच अर्थाला साधनमूल्य आहे. या साधनाखेरीज काम या साध्याची पूर्ती होत नाही, यासाठी अर्थाचा समावेश पुरुषार्थामध्ये करण्यात आला आहे.

### धर्म

धर्म हा शब्द अतिशय अर्थसमृद्ध आहे. त्याच्या अनेक अर्थछटा आधी समजून घेऊन मग पुरुषार्थ म्हणून त्याचे स्वरूप काय आहे याचा विचार करू. सर्वप्रथम हे लक्षात घ्यायला हवे, की हिंदू, इस्लाम, ख्रिश्चन, ज्यू, शीख, पारशी यांना आपण ज्या अर्थाने 'धर्म' म्हणतो तेवढा परंपरेनुसार धर्म या शब्दाचा अर्थ संकुचित नाही. आज आपण religion या इंग्रजी शब्दाला पर्याय म्हणून 'धर्म' शब्द अनेकदा वापरतो. इथे धर्म म्हणताना आपल्याला समान आचार,विचार,मूल्ये, उपासनापद्धती इत्यादी मानणाऱ्या लोकांचा संप्रदाय अभिप्रेत असतो. वास्तवात धर्म या संकल्पनेमध्ये संप्रदाय, रूढी, रीतीरिवाज, कायदा, नियम, नीती, कर्तव्य अशा अनेक अर्थछटा समाविष्ट आहेत. याही पलीकडे जाऊन आपण 'जाळणे हा अग्नीचा धर्म आहे' किंवा 'वाहणे हा पाण्याचा धर्म आहे' अशी विधाने करतो, तेव्हा आपण वस्तूंच्या नैसर्गिक सारभूत गुणधर्मांबद्दल बोलत असतो.

**चला लिहूया!**

'धर्म'च्या विविध अर्थछटांचे संकल्पनाचित्र तयार करा.

धर्म शब्द 'धृ' या मूळ धातूपासून तयार झाला आहे. 'धृ' याचा अर्थ धरणे, धारण करणे, एकत्र धरून ठेवणे असा आहे. या मूळ अर्थानुसार सगळ्या विश्वाला एकत्र धरून ठेवणारे, धारण करणारे तत्त्व म्हणजे धर्म. धर्माचा हा अर्थ ऋत या शब्दाला जवळचा आहे. ऋत शब्दाप्रमाणेच धर्म शब्दाच्या अर्थालाही महत्वपूर्ण नैतिक पैलू आहे. समाजधारणेसाठी धर्माची आवश्यकता असते. वर उल्लेखिलेल्या कायदा, नियम, रूढी इत्यादींचे कार्य समाजाला एकत्र ठेवण्याचे असते, म्हणूनच व्यापक अर्थाने त्यांचा समावेश धर्मात होतो. समाजधारणेसाठी प्रत्येक व्यक्तीने आपापली कर्तव्ये प्रामाणिकपणाने पार पाडणे गरजेचे असते. ही कर्तव्ये कोणती? व्यक्तीने काय करावे आणि काय करू नये? याचे मार्गदर्शन धर्मशास्त्रांमधून मिळते. धर्मशास्त्रे माणसाने वैयक्तिक आणि सामाजिक जीवनात कुठले नीतिनियम पाळायला हवेत याचे ज्ञान देतात. धर्मशास्त्रांचे ग्रंथ म्हणजे जणू जुन्या काळातील कायद्याची पुस्तकेच आहेत. भारतीय परंपरेत नीती, कायदे, रूढी, रीतीरिवाज, कर्मकांडे या सगळ्यांचा विचार एकत्रितपणेच झाला आहे.

धर्म जी कर्तव्ये करण्याचे आदेश देतो त्यांची विभागणी साधारणधर्म आणि विशेषधर्म या प्रकारांमध्ये केली जाते. कुठल्याही वयाच्या, जातीच्या, लिंगाच्या, वर्गाच्या माणसांनी जी कर्तव्ये करणे अपेक्षित असते, त्यांना साधारणधर्म म्हटले जाते. सत्य (खरे बोलणे), अहिंसा (कुणालाही इजा न पोहचवणे), अस्तेय (चोरी न करणे), धैर्य, अक्रोध, इंद्रियनिग्रह (इंद्रियांवर ताबा असणे) इत्यादींचा साधारणधर्मामध्ये समावेश होतो. या धर्माचे स्वरूप सामाजिक असते. विशिष्ट व्यक्तीने आपल्या वर्णाश्रमानुसार म्हणजे आपले सामाजिक स्थान आणि वयानुसार असलेली आयुष्याची अवस्था यांना अनुसरून करण्याच्या कर्तव्यांना विशेषधर्म म्हटले जाते. शाळेमध्ये तुम्ही वर्णव्यवस्था आणि आश्रमव्यवस्था यांचा अभ्यास केलेलाच आहे.

**चला लिहूया!**

चार वर्ण आणि चार आश्रम आणि त्यांच्याशी निगडित कर्तव्ये यांचे तक्ते तयार करा.

भारतीय परंपरेने वर्णाश्रमधर्माला खूप महत्त्व दिलेले दिसते. महाभारतातील कौरव-पांडवांच्या युद्धाची कथा तुम्हांला माहिती असेलच. या युद्धाच्या सुरूवातीलाच रणांगणावर समोर आपलेच आप्त, गुरू, मित्र बघून अर्जुनाला असा नैतिक पेच पडला, की माझा आणि माझ्या भावांचा राज्यावरचा हक्क मिळवण्यासाठी या सगळ्या माझ्याच लोकांना मी मारणे योग्य आहे का? या वेळी श्रीकृष्णाने भगवद्गीतेत अर्जुनाला त्याचा स्वधर्म म्हणजेच त्याचा वर्णधर्म पाळायला सांगितले. अर्जुन क्षत्रिय असल्यामुळे लढणे हे त्याचे कर्तव्य आहे असे कृष्णाचे सांगणे होते.

**चला चर्चा करूया!**

'आजचा काळ आणि वर्णाश्रमधर्म' या विषयावर चर्चा करा.

धर्मपुरुषार्थामध्ये प्रामुख्याने साधारणधर्म आणि


विशेषधर्माचा समावेश होतो. अर्थ आणि काम या साध्यांची पूर्ती करताना ती धर्माने घालून दिलेल्या चौकटीमध्ये करायची असते. धर्माने सांगितलेली तत्त्वे, मूल्ये, कर्तव्य यांचे उल्लंघन करून पैसे मिळवण्याचा किंवा सुखोपभोग घेण्याचा प्रयत्न परंपरेला मान्य नाही. धर्माची म्हणजे नीतिची तत्त्वे माणसाचे निसर्गाशी, समाजाशी कसे नाते असावे या संबंधी मार्गदर्शन करतात. धर्मपालनाने माणूस-समाज-निसर्ग या नात्यात सुसंवाद, समतोल राहतो, अर्थ आणि कामाची प्राप्ती करताना धर्माचे नियंत्रण झुगारून दिले तर व्यक्ती आणि समाजाच्या हिताला बाधा पोहोचते. धर्माने केलेले आचरण भौतिक सुखसमृद्धीला कारणीभूत ठरते, तसेच आध्यात्मिक कल्याणासाठीही आवश्यक असते.

### मोक्ष


कर्मसिध्दान्ताचा अभ्यास करताना आपण हे पाहिले की चार्वाक सोडून इतर सर्व दर्शने पुनर्जन्माची कल्पना मान्य करतात. पुन्हापुन्हा जन्माला येणे हे पुन्हा पुन्हा दु:ख देते म्हणून जन्म हे बंधन आहे आणि पुनर्जन्मातून सुटका हे माणसाचे सर्वोच्च ध्येय आहे अशी परंपरेची धारणा आहे. धर्म, अर्थ, काम ही या जन्मात साधण्याची उद्दिष्टे आहेत पण परमपुरुषार्थ मोक्ष हा जन्ममरणाच्या फेऱ्यातूनच मुक्त करणारा आहे. या दृष्टिने पहिले तीन पुरुषार्थ भौतिक ध्येयांच्या स्वरूपाचे आहेत आणि मोक्ष आध्यात्मिक कल्याण साधणारा आहे. माणसाचे 'स्व'त्व भौतिक नसून आध्यात्मिक आहे या सत्तामीमांसेतील कल्पनेशी मोक्ष-पुरुषार्थासंबंधीची ही भूमिका सुसंगतच आहे.

आपण दुसऱ्या पाठात पाहिल्याप्रमाणे आपल्या स्वरूपाबद्दलचे अज्ञान हे जन्ममरणाच्या फेऱ्यांत पडण्याचे मुख्य कारण असते. त्यामुळे मुक्ती मिळवण्यासाठी ज्ञान आवश्यक आहे हे स्वाभाविकच आहे. पण ज्ञानाइतकेच महत्त्व नैतिक आचरणाला आहे. आध्यात्मिकता आणि नैतिकता यांची परंपरेने घातलेली सांगड लक्षणीय आहे. भौतिक सुखांचा हव्यास, ती सुखे मिळवण्यासाठी अनैतिक मार्गांचा वापर, फसवणूक, ढोंगीपणा, प्रसिद्धीची लालसा ही खऱ्या आध्यात्मिकतेची लक्षणे नाहीत. अनीतिमान व्यक्तीला ज्ञानप्राप्ती होत नाही कारण रागद्वेषाच्या प्रेरणांनी तिच्या विचारप्रक्रियेचा कब्जा घेतलेला असतो. अशा दूषित विचारप्रक्रियेतून ना विश्वाचे स्वरूप समजते ना स्वत:चे. ज्ञानप्राप्ती न झाल्यामुळे साहजिकच मोक्षप्राप्तीही होत नाही. व्यक्तीचे ज्ञान आणि नीतिमत्ता यांच्यामध्ये एक परस्परावलंबित्व असते. नीतीने, धर्माने वागणे म्हणजे आपल्या वासना, प्रेरणा, भावभावना यांचे नियमन करून स्वत:ला आणि इतरांना हितकर असे वागणे. अशा वागण्याने बुद्धीची पूर्वग्रह, पूर्वकल्पना यांपासून सुटका होते आणि ज्ञानप्राप्तीची तिची क्षमता वाढते. त्याचप्रमाणे ज्ञानाची खोली जशी वाढत जाईल, तसातसा नीतिमत्तेचा पाया भक्कम होत जातो.

मोक्षपुरुषार्थाविषयी सर्वांत महत्त्वाचा प्रश्न मोक्ष मिळवायचा कसा यासंबंधी आहे. जोपर्यंत माणूस जिवंत आहे, तोपर्यंत त्याला काही ना काही कर्म करत राहणे भाग आहे. कर्मे केली म्हणजे त्यांचे फळ भोगणेही कर्मसिद्धांतानुसार अनिवार्य आहे. असे असेल तर पुनर्जन्माच्या फेऱ्यांमधून मुक्तता होणारच कशी असा प्रश्न उद्भवतो. यासाठी कर्म कसे करावे, कुठले करावे यासंबंधीचे विवेचन महत्त्वाचे ठरते. भारतीय परंपरेतील नैतिक चिंतन या संदर्भचौकटीत प्रामुख्याने केले गेले आहे.



कर्माच्या एका वर्गीकरणानुसार कर्मांचे संचित, प्रारब्ध आणि संचीयमान किंवा क्रियमाण असे तीन प्रकार होतात. जी जी कर्मे आपण भूतकाळात केलेली आहेत (याच जन्मी नव्हे, पूर्वीच्या जन्मांमध्येही) आणि ज्यांची फळे अद्याप भोगलेली नाहीत, त्यांना संचित कर्मे म्हणतात. ज्या कर्मांची फले आता आपल्याला मिळणारच आहेत त्या कर्मांना प्रारब्ध म्हटले जाते. जी कर्मे आपण आत्ता वर्तमानात करतो, ती क्रियमाण किंवा संचीयमान कर्मे. ही कर्मे केल्यानंतर त्यांचे फल निश्चित होते. ही कर्मे विचारपूर्वक केली, धर्मानुसार केली तर त्यांची चांगली फले मिळतात. प्रारब्धकर्माच्या फलापासून मात्र सुटका नाही. प्रारब्धकर्माच्या फल निर्माण करण्याच्या क्षमता पक्व झालेल्या असतात, त्यामुळे ही फले भोगावीच लागतात. संचितकर्मांमधील क्षमता अजून पक्व झालेल्या नसल्यामुळे त्यांच्यापासून आपण सुटका करून घेऊ शकतो. अशी सुटका करून घेण्याचे निरनिराळे मार्ग वैदिक परंपरेत सुचवलेले आहेत. एका मतानुसार ज्ञानाची प्राप्ती होण्याने संचितकर्मांची फले भोगावी लागत नाहीत. मीमांसा दर्शनाच्या भूमिकेनुसार शास्त्रात सांगितलेली नित्य (नियमितपणे, रोज करण्याची) आणि नैमित्तिक (काही विशिष्ट प्रसंगी करण्याची) कर्मे सांगितलेल्या पद्धतीने करणे हा योग्य मार्ग आहे.



**चला लिहूया!**

नित्य आणि नैमित्तिक कर्मांची यादी तयार करा.

भगवद्गीतेने निष्काम कर्म करण्याच्या मार्गाचे प्रतिपादन केले आहे. आपण जे काही करतो, ते सकाम म्हणजे कुठल्या ना कुठल्या इच्छेमुळे केलेले असते. त्यातून आपल्याला काहीतरी परिणाम अपेक्षित असतो, म्हणजेच असे कर्म फलाच्या इच्छेने केलेले असते. निष्काम कर्म म्हणजे फलाची अपेक्षा न ठेवता केलेले कर्म. भगवद्गीतेतील विवेचनानुसार असे कर्म आपल्याला बांधून टाकणाऱ्या फलांना जन्म देत नाही. आपली सर्व कर्मे आपण निष्कामतेने केली, तर आपली जन्म-मरणाच्या फेऱ्यातून मुक्ती होते.

तुम्हांला असा प्रश्न नक्कीच पडला असेल की आपल्याला कुठलेच फल किंवा परिणाम मिळवायचे नसतील तर कर्म कशाला करायचे? फलाची अपेक्षा न करता कर्म करणे शक्य आहे का? याला गीतेचे उत्तर असे आहे की जे कर्म आपण केवळ ते आपले कर्तव्य आहे म्हणून करतो, त्यामधून कुठल्याही फलाची अपेक्षा करत नाही, असे कर्म करणे शक्य आहे. हेच निष्काम कर्म आहे. आपण पाठाच्या सुरूवातीला पाहिलेल्या उदाहरणाकडे वळायचे तर बसमध्ये वृद्ध व्यक्तीला बसायला जागा देणे हे आपले कर्तव्य आहे, एवढ्याच भावनेने जर तुम्ही आपली जागा त्या व्यक्तीला दिली, तर ते निष्काम कर्म असेल. पण ते आजोबा आपल्याला जागा दिल्याबद्दल काहीतरी बक्षिस देतील, अशी अपेक्षा ठेवून तुम्ही जागा दिली तर ते सकाम कर्म असेल. त्याचे फळ तुम्हांला भोगावेच लागेल. इथे हेही लक्षात ठेवायला हवे, की सकाम कर्मांची फळे चांगली असोत की वाईट, दोन्ही बंधनकारकच असतात, भोगावीच लागतात. म्हणूनच निष्काम कर्म करणे हाच मोक्ष मिळवण्याचा योग्य मार्ग आहे.

कर्मसिद्धांत कर्म आणि फळ यांचा संबंध सांगत असला, तरी कुठल्या कर्माला चांगले म्हणावे आणि कुठल्या कर्माला वाईट म्हणावे यासंबंधीचे मार्गदर्शन करत नाही. आतापर्यंतच्या विवेचनावरून तुमच्या हे लक्षात आले असेल की हे मार्गदर्शन करण्याचे काम धर्माचे म्हणजे नीतिचे आहे. धर्म आपल्याला आपली कर्तव्ये कोणती, ते सांगतो. या कृती ती कर्तव्ये आहेत एवढ्या एकाच कारणासाठी करणे म्हणजे निष्काम कर्म. त्याचबरोबर हेही ध्यानात घ्यायला हवे, की जी कर्मे नैतिक असतात, व्यक्ती आणि समाजासाठी श्रेयस्कर समजली जातात त्यांनाच कर्तव्यांचा दर्जा दिला जातो.

## अवैदिक परंपरा

बौद्ध आणि जैन ही नास्तिक, अवैदिक दर्शनेही जन्ममरणाच्या चक्राला बंधन मानतात आणि त्यातून मुक्तता हेच त्यांच्या मतानुसारही माणसाचे सर्वांत श्रेष्ठ साध्य असायला हवे. वैदिक परंपरेप्रमाणे ही दर्शनेदेखील ज्ञान आणि नैतिक आचरण यांना हे ध्येय प्राप्त करून घेण्यासाठी आवश्यक मानतात. मात्र त्यांचे जगाच्या आणि स्वतःच्या स्वरूपाबद्दलचे मत वैदिक परंपरेपेक्षा वेगळे आहे, हे आपण अभ्यासलेच आहे.

## जैन नीतिविचार

जैनांच्या सत्तामीमांसेनुसार जिवामध्ये किंवा आत्म्यामध्ये अनंत चतुष्टय म्हणजे अनंत ज्ञान, अनंत अंतर्दृष्टी, अनंत सामर्थ्य आणि अनंत सुख मिळवण्याची

क्षमता असते. पण शरीराच्या मर्यादांमुळे त्या क्षमता प्रत्यक्षात येऊ शकत नाहीत. जिवाच्या वासना, इच्छा यांमुळे त्यांकडे पुद्‌गल म्हणजे जडाचे कण आकृष्ट होतात आणि जीव शरीरात बद्‌ध होतो. त्यामुळे शरीरापासून मुक्ती मिळवण्यासाठी ज्या कणांचा आधीच संचय झाला आहे, त्यांपासून सुटका मिळवणे जेवढे गरजेचे असते, तेवढेच नवे पुद्‌गल स्वतःकडे आकर्षित होऊ न देणेही आवश्यक असते. या दोन्हींना क्रमशः निर्जरा आणि संवर असे म्हणतात. आत्म्याला शरीराचे बंधन असते हे खरेच, पण मुळात हे बंधन निर्माण होते ते इच्छा, वासना, प्रेरणांमुळेच. हे एक प्रकारचे आंतरिक बंधन असते, तर शरीराचे बंधन हे बाह्य असते. या बंधनातून मुक्त होण्यासाठी, जे मुक्त जीव आहेत, त्यांच्या शिकवणुकीवर श्रद्‌धा ठेवून जगाचे आणि स्वतःचे ज्ञान मिळवावे लागते. पण हे ज्ञान जोपर्यंत व्यक्तीच्या आचरणात उतरत नाही, तोपर्यंत ते मुक्तिदायी होत नाही. नीतिमान आचरणाने व्यक्ती जेव्हा आपले विचार, इच्छा, भावभावना, बोलणे, वागणे यांवर नियंत्रण ठेवते, तेव्हा निर्जरेची प्रक्रिया सुरू होते आणि आस्रव म्हणजे नवे पुद्‌गल स्वतःकडे आकर्षून घेणे थांबते. योग्य श्रद्‌धा, योग्य ज्ञान आणि योग्य आचरण यांना जैन परंपरेत त्रिरत्न म्हणून ओळखले जाते.

नीतीचा संबंध अर्थातच योग्य आचरणाशी आहे. यामध्ये पंचव्रतांना मध्यवर्ती स्थान आहे. अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य आणि अपरिग्रह ही ती पाच व्रते आहेत. अपरिग्रह याचा अर्थ गरजेपेक्षा जास्त वस्तूंचा साठा न करणे, जरूरीपुरत्याच गोष्टी जवळ बाळगणे. जैन नीतिशास्त्रात अहिंसेचे स्थान अतिशय महत्त्वाचे आहे. काया, वाचा अगर मनाने कुठल्याही जिवाला कुठल्याही प्रकारची इजा पोहोचवणे जैनांना अमान्य आहे. प्रत्येक जिवाला मुक्ती मिळवण्याचा अधिकार आहे, त्याच्या मुक्तीच्या मार्गात काहीही अडथळा आणणे हे नीतिला धरून नाही, असे जैन मानतात.

संन्यास न घेतलेल्या, गृहस्थाश्रमी, संसारी व्यक्तींसाठीही ही व्रते घेण्याची आवश्यकता आहे, त्याचप्रमाणे संन्यास घेतलेल्या साधू आणि साध्वींसाठीही. गृहस्थाश्रमींची व्रते कमी कठोर असतात, म्हणून त्यांना अणुव्रते म्हटले जाते. साधू-साध्वींसाठी या व्रतांचे नियम अतिशय कडक असतात, म्हणून त्यांना महाव्रते म्हणतात. या व्रतांच्या आणि इतर नीतिनियमांच्या पालनाने आचरण, ज्ञान आणि श्रद्‌धा निर्दोष व परिपूर्ण होतात आणि अनंत चतुष्टयाची प्राप्ती होते. जीव पुनर्जन्माच्या फेऱ्यांमधून मुक्त होतो.

**चला शोधूया!**

अणुव्रते व महाव्रतांची उदाहरणे मिळवा.

### चार्वाकांचा नीतिविचार

चार्वाकांचा नीतिविचार वैशिष्ट्यपूर्ण आहे. इतर दर्शनांप्रमाणे चार्वाकांचा नीतिविचारही त्यांच्या सत्तामीमांसेशी, 'स्व'विषयक आकलनाशी सुसंगत आहे. आत्मा, पुनर्जन्म, स्वर्ग, नरक इत्यादी सर्व कल्पना नाकारणाऱ्या चार्वाकांसाठी, मोक्ष हे जीवनाचे ध्येय अर्थातच असू शकत नाही. "मी म्हणजे माझा देह" अशी त्यांची भूमिका असल्यामुळे या देहाद्‌वारे मिळणारे सुख हेच त्यांच्या मते माणसाचे ध्येय असते. माणसाचे अस्तित्व देहाच्या मृत्यूबरोबरच नष्ट होते. त्यामुळे काल्पनिक अशा पुढच्या जन्मात मिळणाऱ्या सुखाच्या आशेने किंवा मोक्षप्राप्तीचा मार्ग म्हणून या जन्मात भौतिक सुखे नाकारणे चार्वाकांना शहाणपणाचे वाटत नाही. त्याचप्रमाणे ते असेही मानतात की सुख आणि दुःख हे दोन्ही माणसाच्या जीवनात अटळपणे येतच असतात. त्यामुळे बौद्‌ध ज्या संपूर्ण दुःखनिवृत्तीबद्‌दल बोलतात, तशी दुःखनिवृत्ती मृत्यूनंतरच शक्य होईल. सुखासाठी धडपडताना दुःख वाट्याला येऊ शकते म्हणून सुखाकडेच पाठ फिरवणे हे धान्याबरोबर साले, फोलपटे येतात म्हणून धान्यच फेकून देण्यासारखे आहे असे त्यांचे मत आहे.

चार्वाकांच्या या नीतिविषयक भूमिकेला पाश्चात्त्य नीतिशास्त्राच्या परिभाषेनुसार 'सुखवाद' म्हटले जाते. जी कृती आपल्याला सुख देते ती कृती योग्य असते असे सुखवाद मानतो. सुख हेच माणसाचे एकमेव प्राप्तव्य आहे. दुःख पूर्णपणे टाळणे शक्य नसले, तरी जेवढे सुख मिळवता येईल, तेवढे माणसाने मिळवायला हवे. चांगले जीवन म्हणजे सुखी जीवन असे सुखवादी चार्वाकांचे प्रतिपादन आहे. ते काम आणि अर्थ हेच दोन पुरुषार्थ मानतात. म्हणजेच सुख आणि सुख मिळवण्यासाठी लागणारे धन आणि इतर साधनसामग्री प्राप्त करून घेणे ही मानवी जीवनाची दोनच साध्ये आहेत असे त्यांचे मत आहे.

## बौद्ध नीतिविचार

मानवी जीवनातील दुःखाचा निरास हे बौद्ध दर्शनासाठी महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. गौतम बुद्धांनी सांगितलेली चार आर्यसत्ये दुःखाच्या अस्तित्वासंबंधीची आणि त्याचा नाश करण्याविषयीचीच आहेत. ती आर्यसत्ये अशी : (१) जीवनात सर्वत्र दुःख आहे. (२) दुःखाला कारण आहे. (३) दुःखाचा निरास शक्य आहे. (४) दुःख नष्ट करण्याचा मार्ग आहे. या मार्गात आठ घटक असल्याने याला आर्य अष्टांगिक मार्ग म्हटले जाते. बौद्ध दर्शनाचा नीतिविचार मुख्यतः या अष्टांगमार्गात समाविष्ट आहे. अष्टांगमार्गात आर्यसत्यांचे ज्ञान, त्यांचे सतत स्मरण ठेवून त्यानुसार जीवन जगायचे केलेले प्रयत्न आणि नीतिमान आचरणावर भर आहे. या आचरणाचा एक भाग भाषेचा किंवा वाचेचा सुयोग्य वापर हा आहे. वाणीचा उपयोग खोटे बोलणे, अपशब्द बोलणे, कुणाला दुखविणे, उथळ बोलणे यांसाठी करता कामा नये. आपला चरितार्थ प्रामाणिक मार्गाने पैसा मिळवून करायला हवा. निषिद्ध, चुकीच्या, अनैतिक मार्गाने धन मिळवणे योग्य नाही. आपले सर्वसाधारण वागणे शीलानुसार असायला हवे. शील याचा मूळ अर्थ आचरण, वर्तन. इथे तो सत्शील, म्हणजे चांगले, नीतिमान आचरण या अर्थाने वापरला आहे. बौद्ध दर्शन पंचशीलाचा म्हणजे सदाचरणाच्या पाच नियमांचा उल्लेख करते. खोटे बोलणे, चोरी करणे, हत्या किंवा इजा करणे, अनियंत्रित शरीरसुख किंवा लैंगिक सुख उपभोगणे आणि कुठल्याही मादकद्रव्यांचे सेवन ही पाच प्रकारची कृत्ये निषिद्ध आहेत. ती करता कामा नयेत. म्हणजेच दुसऱ्या शब्दात सत्य, अस्तेय, अहिंसा, ब्रह्मचर्य आणि अप्रमाद यांचे पालन केले पाहिजे. असे आचरण करण्याने शरीर, इंद्रिये यांच्यावर नियंत्रण राहते तसेच मन स्थिर, शांत राहते. शरीर-मनाला ही शिस्त लावणे हे निर्वाणप्राप्तीसाठी अत्यावश्यक असते. पुनर्जन्मांची साखळी ज्या स्थितीत पूर्णपणे संपते, त्या स्थितीला बौद्ध दर्शनात निर्वाण म्हणतात. निर्वाण म्हणजे सर्व दुःखांपासूनची कायमची मुक्ती आणि परम शांती. या स्थितीत पूर्वजन्मीचे सर्व संस्कार नष्ट होतात आणि म्हणून परत पंचस्कंधात्मक देहाची निर्मिती होत नाही.

**आर्य अष्टांगिक मार्ग**

(१) **सम्मादिठ्ठी (सम्यक् दृष्टी)** : चार आर्यसत्यांचे योग्य ज्ञान

(२) **सम्मासंकल्प (सम्यक् संकल्प)** : योग्य संकल्प. यामध्ये दुसऱ्यांबद्दल दुर्भावना न बाळगणे, त्यांना इजा न पोहोचवणे आणि विरक्ती यांचा समावेश होतो.

(३) **सम्मावाचा (सम्यक् वाचा)** : वाचेचा योग्य वापर. खोटे बोलणे, निंदा करणे, अपशब्द वापरणे, वायफळ बडबड करणे इत्यादी गोष्टी टाळणे.

(४) **सम्माकम्मान्त (सम्यक् कर्मान्त)** : योग्य आचरण, पंचशीलाचे पालन करणे.

(५) **सम्माआजीविका (सम्यक् आजीविका)** : उपजीविकेसाठी योग्य साधनांची निवड. प्रामाणिकपणे, निषिद्ध गोष्टी टाळून उदरनिर्वाह करणे.

(६) **सम्मावायाम (सम्यक् व्यायाम)** : योग्य प्रयत्न सतत करत राहणे. वाईट विचार, आचार, भावना यांपासून प्रयत्नपूर्वक दूर राहून चांगल्या, योग्य विचारांमध्ये मन गुंतवणे.

(७) **सम्मासती (सम्यक् स्मृती)** : आधी आत्मसात केलेल्या ज्ञानाचे स्मरण सतत जागते ठेवणे. अनित्यता, अनात्मता यांचे विस्मरण न होऊ देणे.

(८) **सम्मासमाधी (सम्यक् समाधी)** : या आधीच्या मार्गदर्शनानुसार योग्य जीवन व्यतीत करत असताना वासना, दुर्विचार इत्यादींपासून मुक्त होऊन दुःखमुक्त अवस्थेचा अनुभव घेणे.

## पाश्चात्त्य नीतिविचार

नीतिशास्त्र ही पाश्चात्त्य तत्त्वज्ञानाची एक मुख्य शाखा आहे. काय आहे? ते कळते कसे? त्याचा कृतीवर कसा परिणाम होतो? हे तत्त्वज्ञानातले जे तीन मुख्य प्रश्न आपण मागच्या वर्षी पाहिले, त्यांतील तिसऱ्या प्रश्नाशी ही शाखा संबंधित आहे. आपण सॉक्रेटिस आणि ॲरिस्टॉटलच्या

सद्गुणाधारित नीतिविचारांचा थोडक्यात परिचय करून घेतला आहेच. मध्ययुगीन नीतिशास्त्र प्रामुख्याने ईश्वरकेंद्री आणि ख्रिश्चन नीतिविचारांनी प्रभावित होते. आपण या पाठात आधुनिक तत्त्वज्ञानातील दोन प्रमुख उपपत्तींची ओळख करून घेणार आहोत.

आधी पाहिल्याप्रमाणे, कृतीचे नैतिक मूल्यमापन करण्याचे दोन मुख्य निकष म्हणजे कृती करण्यामागचा हेतू किंवा प्रेरणा आणि कृतीचे परिणाम. त्यानुसार पाश्चात्त्य नीतिशास्त्रात कर्तव्यवाद आणि फलवाद/ परिणामवाद अशा दोन प्रमुख उपपत्ती मांडल्या गेल्या आहेत. जी कृती केवळ कर्तव्य करण्याच्या प्रेरणेने केली गेली आहे, ती कृती नैतिकदृष्ट्या योग्य असते असे कर्तव्यवाद सांगतो. याउलट परिणामवादानुसार ज्या कृतीचे परिणाम चांगले असतात ती कृती नैतिक दृष्टिने चांगली असते.

## कांटचा कर्तव्यवाद

कर्तव्यवादासाठी कृती परिणामांच्या दृष्टीने चांगली असण्यापेक्षा तिला नैतिक मूल्य, दर्जा असणे जास्त महत्त्वाचे असते. विशिष्ट परिणामांच्या इच्छेने कृती करण्यापेक्षा कर्तव्यभावनेने केलेली कृती नैतिक दृष्टीने योग्य असते असे कर्तव्यवाद मानतो. भारतीय तत्त्वज्ञानात सांगितलेली निष्काम कर्माची महती कर्तव्यवादी भूमिकेतूनच येते हे तुमच्या लक्षात आलेच असेल. या भूमिकेसाठी 'कर्तव्य कशाला म्हणायचे'? हा प्रश्न महत्त्वाचा ठरतो. या प्रश्नाचे उत्तर ईश्वराने दिलेल्या आज्ञा, परंपरेने घालून दिलेले नियम, सामाजिक कायदे इत्यादींच्या आधारे दिले जाते. नियमाप्रमाणे असलेले आचरण नैतिक ठरते आणि नियमबाह्य वर्तन अनैतिक ठरते. भारतीय परंपरेत व्यक्तीचे कर्तव्य तिच्या वर्णाश्रमानुसार ठरते असे सांगितले आहे. पाश्चात्त्य परंपरेत सुप्रसिद्ध जर्मन तत्त्वज्ञ इम्यॅन्युएल कांट याने पूर्णपणे बुद्धिनिष्ठ पद्धतीने याचे उत्तर देण्याचा प्रयत्न केला आहे.

कांटच्या पूर्वी डेव्हिड ह्यूमने माणसाला काय हवे आहे, हे त्याच्या इच्छा, प्रेरणा, वासना याच ठरवतात आणि बुद्धी फक्त ते कसे मिळवायचे हे सांगते, बुद्धी या वासना प्रेरणांची गुलाम आहे असे मत मांडले होते. हे मत कांटला अमान्य होते. नीतिनियमांचे, कर्तव्यांचे स्वरूप सार्वत्रिक असले पाहिजे, सर्वांना समान असले पाहिजे असे सॉक्रेटिस, प्लेटो यांच्याप्रमाणेच त्याचे मत होते. काय बरोबर, काय चूक याचे आपले निष्कर्ष नि:पक्षपाती असले पाहिजेत. कृतीच्या नैतिक योग्यतेचा, ती कृती कोण करते आहे याच्याशी संबंध असता कामा नये असा त्याचा आग्रह होता. ह्यूमचे मत ग्राह्य धरले, तर नीती वस्तुनिष्ठ न राहता व्यक्तिसापेक्ष होईल, सार्वत्रिक राहू शकणार नाही. कांटच्या मते नीती सार्वत्रिक असणे आवश्यक आहे. यासाठी त्याने ह्यूमचे मत नाकारले.

जोपर्यंत भावना, प्रेरणा, इच्छा यांच्या आधारे नीतिमत्ता ठरवली जाईल तोपर्यंत ती व्यक्तिनिरपेक्ष होऊच शकणार नाही, कारण भावना, इच्छा इत्यादी व्यक्तिप्रमाणे बदलत असतात. त्यामुळे एका व्यक्तीसाठी जे योग्य, ते दुसऱ्या व्यक्तीसाठी अयोग्य ठरू शकते. यामधून नीतिच्या वस्तुनिष्ठतेला, सार्वत्रिकतेला धोका पोहोचतो. म्हणून कांटने त्याच्या नीतिशास्त्राची उभारणी बुद्धीच्या आधाराने केली. बुद्धी सगळ्या माणसांना असते आणि बुद्धी जी सत्ये शोधून काढते, जी तथ्ये स्वीकारते ती सगळ्यांना मान्य करावीच लागतात. त्याचप्रमाणे बुद्धी माणसाच्या वर्तनाबद्दल, जे काही आदेश देईल ते सर्वांनाच मान्य करावे लागतील असे कांटचे मत आहे. समजा, तुम्हांला महाविद्यालयाच्या मैदानावर कुणाचा तरी भ्रमणध्वनी सापडला, तर कुणाला तो स्वत:कडेच ठेवावासा वाटेल, कुणी 'नकोच काही कटकट'म्हणून तो न घेता पुढे जाईल, कुणाला तो गुपचूप विकावासा वाटेल. मात्र, विचार केल्यावर सगळ्यांचीच बुद्धी असा आदेश देईल की तो भ्रमणध्वनी महाविद्यालयाच्या कचेरीत जमा केला पाहिजे. भ्रमणध्वनी कुणालाही सापडला, ज्याला सापडला त्याची इच्छा, परिस्थिती काहीही असली तरी बुद्धिचा हा आदेश सगळ्यांसाठी योग्यच असेल, चांगलाच असेल.



चांगले कशाला म्हणावे हा नीतिशास्त्रातील एक महत्त्वाचा प्रश्न आहे. या प्रश्नाचे कांटचे उत्तर वैशिष्ट्यपूर्ण आहे. सर्वसाधारणपणे आरोग्य, संपत्ती, ज्ञान इत्यादींना चांगले समजले जाते. पण कांट असे प्रतिपादन करतो, की या आणि अशा चांगल्या समजल्या जाणाऱ्या गोष्टी निरपवादपणे चांगल्या नसतात, कारण त्यांचा गैरवापर केला जाऊ शकतो. चुकीच्या कारणासाठी जेव्हा ज्ञान, शक्ती, पैसा वापरले जातात, तेव्हा त्यांना 'चांगले' कसे म्हणणार?

**चला विचार करूया!**

ज्ञान, धन, शक्ती यांच्या गैरवापराच्या उदाहरणांची चर्चा करा. असा गैरवापर का होतो याबद्दल विचार करा.

मग याचा अर्थ असा घ्यायचा का, की जगात ज्याचा दुरूपयोग होऊ शकत नाही, असे निखळपणे चांगले काहीच नाही? कांट या प्रश्नाला नकारार्थी उत्तर देतो. तो ज्याला सत्संकल्प किंवा शुभसंकल्प म्हणतो, तो कुठल्याही परिस्थितीत, कधीही केवळ चांगलाच असतो. इथे 'सत्' या शब्दाचा अर्थ अस्तित्व दाखवणारा नाही. त्याचा अर्थ चांगला असा आहे. सत्संकल्प म्हणजे केवळ चांगली इच्छा नव्हे. संकल्प हा शब्द फक्त इच्छेशीच नाही, तर ती इच्छा पूर्ण करण्याच्या निश्चयाशी निगडित आहे. आपल्या इच्छा अनेक असतात. त्या प्रत्येक इच्छेसाठी आपण जीव तोडून प्रयत्न करत नाही. पण एखादी गोष्ट मिळवायचीच असा निश्चय आपण केला, तर आपण सर्वशक्तीनिशी त्यासाठी मेहनत घेतो. आपल्याला छान गाता यावे अशी अनेकांची इच्छा असते, पण "मी उत्तम गाणे गाईनच" असा निश्चय करणारी व्यक्ती त्यासाठी कठोर परिश्रम करते. संकल्पामध्ये इच्छेबरोबरच निश्चयाची शक्ती असते. सत्संकल्प म्हणजे कर्तव्य करण्याचा संकल्प किंवा निश्चय. हा संकल्प जर ज्ञान, सामर्थ्य, संपत्ती यांच्यामागे असेल, तर त्यांचा गैरवापर कधीच होणार नाही. म्हणूनच कांटच्या मताप्रमाणे सत् संकल्प नेहमी नैतिक नियमात प्रतिबिंबित होतो. पण आपले कर्तव्य काय आहे, हे आपल्याला कसे कळणार? हे कळण्यासाठी कांट आपल्याला एक युक्ती सांगतो. ती कोणती हे आता पाहू.

जेव्हा तुमचा मित्र परीक्षेत तुम्हांला तुमचे उत्तर दाखवायला सांगतो, तेव्हा तुम्ही काय करायला हवे? कुठली कृती करणे तुमचे कर्तव्य ठरेल, असा प्रश्न तुम्हांला पडतो ना? अशा वेळी हा विचार करायचा की मला तर मित्राला उत्तर दाखवावे असे वाटते आहे, पण प्रत्येकाने अशी आपापल्या मित्रमैत्रिणींना परीक्षेत मदत करावी का? कदाचित तुम्ही असे म्हणालही, की काय हरकत आहे असे करायला? थोडा खोलात जाऊन विचार केलात तर तुमच्या लक्षात येईल, की अशी एकमेकांना परीक्षेत मदत करणे हाच सर्वसाधारण नियम झाला, तर परीक्षापद्धतीलाच काही अर्थ उरणार नाही. कारण विद्यार्थी किती शिकला आहे? त्याला विषय किती आणि कसा कळला आहे हे तपासणे हे परीक्षांचे उद्दिष्ट असते. ते इथे अजिबातच साध्य होणार नाही. याचा अर्थ असा, की परीक्षापद्धतीचा उद्देश आणि स्वत:च्या अभ्यासातून उत्तरे लिहिण्याऐवजी दुसऱ्याच्या मदतीने ती लिहिणे यात विसंगती आहे. त्यामुळेच 'सर्वांनी या प्रकारे एकमेकांना मदत करावी' असा सर्वसाधारण नियम करताच येणार नाही.

कांट अशाच प्रकारचे, वचन मोडण्याचे उदाहरण देतो. 'वचन मोडता येणे शक्य असेल तर ते मोडावे' असा नियम केला, तर काही दिवसांतच 'वचन देणेघेणे' असा काही व्यवहार/रिवाज राहणारच नाही. यामधून कांटने असा निष्कर्ष काढला आहे, की ज्या कृतीचे किंवा कृतींमागील नियमांचे सार्वत्रिकीकरण करता येत नाही, ती कृती आपले कर्तव्य असू शकत नाही. ज्या कृतीचे साधारणीकरण करता येते, तीच कृती कर्तव्य असते. जेव्हा आपण एखाद्या कृतीबद्दल असे म्हणू शकतो, की मीच नव्हे, तर जे कोणी माझ्या जागी या परिस्थितीत असेल त्याने/तिने हीच कृती केली पाहिजे, अशी कृतीच सार्वत्रिक आणि म्हणून नैतिक असते.

आपल्या कृती जेव्हा व्यक्तिगत भावना, इच्छा यांवर आधारित असतात तेव्हा त्यांचे सार्वत्रिकीकरण करणे शक्य नसते. याउलट त्या बुद्धिवर आधारित असतात, तेव्हा त्यांचे सार्वत्रिकीकरण करता येते. आपण काय करावे, काय करू नये हे आपण भावना किंवा बुद्धी यांच्या जणू आदेशानेच ठरवतो. पण भावना, प्रेरणा इत्यादींकडून मिळणाऱ्या आदेशांचे स्वरूप 'जर-तर' या प्रकारचे असते. कांट यांना 'सोपाधिक' आदेश म्हणतो. 'उत्तम शरीरयष्टी कमवायची असेल तर नियमित व्यायाम करावा' हा आदेश ज्याला शरीर कमावण्याची इच्छाच नाही, त्याला लागू पडत नाही. याउलट 'प्रत्येकाने व्यायाम करायलाच हवा' हा आदेश कुणाच्या इच्छेवर अवलंबून नाही. तो आदेश 'निरूपाधिक' आहे. तो सर्वांनाच लागू होतो. कुठल्याही माणसाची बुद्धी हा नियम

ग्राह्य धरेल. त्यावर आधारलेली कृती नैतिक कर्तव्य ठरते कारण तिचे सार्वत्रिकीकरण करता येते.

**चला करूया!**

ज्यांचे सार्वत्रिकीकरण करता येईल (उदा खरे बोलावे) अशा कृतींची यादी करा व त्यावर आधारित प्रसंगाचे नाट्यरूपांतर वर्गात सादर करा.

निरूपाधिक आदेश हा नीतीचा कायदा आहे असे कांट म्हणतो. या कायद्याचे वैशिष्ट्य हे आहे, की तो आपल्यावर बाहेरून लादला जात नाही. कुठलीही बाहेरची व्यक्ती किंवा शक्ती, हा कायदा आपल्याला सांगत नाही. हा कायदा आपणच आपल्यासाठी तयार करतो. बुद्धीने जणू आपल्या इच्छा, भावना, प्रेरणा यांना नियंत्रित ठेवण्यासाठी हा आदेश दिलेला असतो. त्याचे पालन करणे हेच बुद्धिनिष्ठेने वागणे

**निरूपाधिक आदेश**

नैतिक नियमांद्वारे केलेल्या कृतीतून माणसाला नैतिकतेखेरीज इतर काही मिळवायचे नाही, तर नैतिक कृती कर्तव्यभावनेतून करणे हेच नैतिक कृतीचे पर्यायाने नीतीचे साध्य. जर मला परीक्षेत उत्तम गुण मिळवायचे असतील तर मला नियमित अभ्यास करावा लागेल या प्रकारचा मनाने केलेला संकल्प हा काहीतरी मिळवण्याच्या अपेक्षेने केला जातो.म्हणूनच त्याचे स्वरूप जर-तर या प्रकारचे म्हणजेच अटींचा स्वीकार करणारे असते, म्हणजेच सोपाधिक असते. नैतिक आदेश मात्र काही मिळवण्याच्या हेतूने केलेला नसल्यामुळे त्याचे स्वरूप निरुपाधिक आहे.

या निरुपाधिक आदेशाच्या चार मांडण्या कांटने सुचवल्या आहेत. यांनाच निरुपाधिक आदेश असे म्हटले जाते. निसर्गनियम ज्याप्रमाणे सार्वत्रिक आणि अनिवार्य स्वरूपाचे असतात त्याचप्रमाणे नैतिक नियमही सार्वत्रिक आणि आवश्यक स्वरूपाचे असावेत हे कांटला अभिप्रेत आहे. या आदेशाच्या कांटने केलेल्या मांडण्या पुढीलप्रमाणे आहेत.

**(१) ज्या तत्त्वांचे रूपांतर सार्वत्रिक नियमांत करण्याचा संकल्प कर्ता करू शकेल, अशाच तत्त्वाआधारे कृती करावी.**

या आदेशाद्वारे कांटला असे सुचवायचे आहे की, नैतिक कृती करताना व्यक्तीने स्वतःकडे अखिल मानवजातीचा प्रतिनिधी म्हणून पहावे. मी ज्या कृतीची निवड करेन त्याच कृतीची निवड कुठल्याही देशाची, धर्माची, वंशाची, जातीची, लिंगाची इ. व्यक्ती करु शकत असेल तर त्या निवडीवर आधारित कृती सार्वत्रिक म्हणून नैतिक ठरेल. म्हणजेच देश, धर्म इ. चौकटींच्या पलीकडे जाऊन जी सार्वत्रिक होऊ शकते त्या कृतीची निवड करावी.

**(२) अशा तत्त्वाच्या आधारे कृती करा, ज्यायोगे ती कृती जणू सार्वत्रिक निसर्गनियम बनेल.**

पहिल्या आदेशाद्वारे कांटने सार्वत्रिकता कशी साधता येईल ते सांगितले. दुसऱ्या आदेशाद्वारे कृती आवश्यक स्वरूपाची कशी बनेल हे कांटने अभिव्यक्त केले आहे. भावना, वासना, स्वार्थ यांच्या आहारी न जाता कर्तव्यासाठी कर्तव्य या बुद्धीने जर प्रत्येक नैतिककर्त्याने निवडलेली कृती केली तर ती कृती आवश्यक स्वरूपाची बनेल. ही कर्तव्यभावना नैतिक नियमाप्रती आहे. निसर्गनियम सार्वत्रिक व अनुल्लंघनीय असतात. नैतिक नियम मानवनिर्मित असतात. म्हणून ते मोडता येऊ शकतात. असे जरी असले तरी नैतिक कर्त्याने स्वतःला जणुकाही मानवी समाजातील नैतिक व्यवस्थेचा निर्माता या स्वरूपात पहावे असे कांटला वाटते. नैतिक नियमांची सार्वत्रिकता व अनिवार्यता या नैतिक व्यवस्थेचा आधार असेल. म्हणूनच कर्तव्यासाठी कर्तव्य या भावनेने जर प्रत्येक कर्त्याने कृती केली तर त्यातून सार्वत्रिक आणि अनिवार्य अशा नैतिक नियमांची व्यवस्था तयार होईल. नैतिक कर्त्याच्या ठिकाणी असणारी कर्तव्य भावना म्हणजे नैतिक नियमांप्रती त्याच्या मनात असलेला आदरभाव किंवा सन्मानाची वृत्ती. म्हणूनच वस्तुतः हे नियम जरी उल्लंघनीय असले तरी नैतिककर्ता नैतिक नियमांप्रती असणाऱ्या आदरभावातून त्यांना अनुल्लंघनीयतेचे जणु काही स्थान मिळवून देईल.

**(३) नैतिककर्त्याने स्वतःसकट प्रत्येक व्यक्तीकडे नेहमीच साध्य म्हणून पहावे, फक्त साधन म्हणून पाहू नये.**

नैतिक नियमांची सार्वत्रिकता आणि आवश्यकता प्राप्त करण्यासाठी प्रत्येक व्यक्तीने मानवी प्रतिष्ठेचे मूल्य जपले पाहिजे. व्यक्तीने व्यक्तीचा साधन म्हणून

वापर न करता प्रत्येक व्यक्तीचा मानव म्हणून असलेल्या प्रतिष्ठेचा सन्मान करावा.

**(४) अशा तत्त्वाच्या आधारे कृती करा, ज्यायोगे व्यक्तींची जीवनाविषयक ध्येये ही परस्परांना छेद देणारी, परस्परांच्या स्वातंत्र्याचा संकोच करणारी न होता परस्परांना पूरक अशा स्वरूपाची ठरतील आणि सर्व व्यक्तींची प्रतिष्ठा जपणाऱ्या समाजाची निर्मिती होऊ शकेल.**

एका अर्थाने आधीच्या तीनही आदेशांचे हे परिणत रूप आहे. आपल्या जीवनाचा आदर्श वा ध्येय निश्चित करताना दुसऱ्या व्यक्तीचे त्यामुळे अनहित होणार नाही याची काळजी प्रत्येकाने घ्यायची आहे. असे जर झाले तर समाजात ध्येयांची आदर्श व्यवस्था निर्माण होऊ शकेल.

असते. माणूस बुद्धिशील असतो. म्हणूनच तो नीतिमान होऊ शकतो. माणसाखेरीज इतर प्राणिमात्र आपल्या उपजत प्रेरणांवर नियंत्रण ठेवू शकत नाहीत, कारण त्यांना माणसाप्रमाणे बुद्धी नाही असे कांट मानतो. बुद्धिशीलता असल्यामुळे माणसाच्या अस्तित्वाला एक प्रतिष्ठा आहे. माणसाच्या प्रतिष्ठेचा विचार कांटला फार महत्त्वाचा वाटतो.


कांटचा नीतिविचार माणसाच्या बुद्धिशीलतेचा गौरव करणारा आणि तिच्यावरच आधारलेला आहे. सार्वत्रिकता आणि निःपक्षपातीपणा यांना नैतिकतेमध्ये त्याने दिलेले स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. त्याचप्रमाणे प्रत्येक माणसाला साध्यमूल्य देऊन त्याची प्रतिष्ठा जपणारी त्याची भूमिका सामाजिक जीवनासाठी अतिशय मोलाचे मार्गदर्शन करणारी आहे.

**चला बोलूया!**

माणसामाणसांमधील संबंधांचे साध्य-साधनांच्या दृष्टिकोनातून विश्लेषण करा. माणसाला निव्वळ साधन समजणे नैतिक दृष्टिने का चूक आहे याची चर्चा करा.

## उपयुक्ततावाद

कांटच्या कर्तव्यवादी नीतीत कृतीचे परिणाम चांगले आहेत की वाईट याला जरासुद्धा महत्त्व नाही. उपयुक्ततावाद हा परिणामवादाचा एक प्रकार असल्यामुळे, उपयुक्ततावादानुसार कृतीची नैतिकता फलाच्या म्हणजे परिणामांच्या चांगुलपणावर अवलंबून असते. परिणामवादासाठी महत्त्वाचा प्रश्न म्हणजे कुठल्या परिणामांना चांगले म्हणायचे? चांगुलपणाचा निकष कोणता? या प्रश्नांना दिलेल्या उत्तरांची वर्गवारी सुखवादी आणि सुखवादी नसणाऱ्या उपपत्तींमध्ये केली जाते. उपयुक्ततावाद हा सुखवादाचा एक प्रकार आहे. सुखवादाचेही दोन उपप्रकार आहेत. ते म्हणजे मानसशास्त्रीय सुखवाद आणि नीतिशास्त्रीय सुखवाद. मानसशास्त्र हे माणसाचे वर्तन आणि त्यामागचे घटक यांचे वर्णन करणारे, वर्तनाचे स्पष्टीकरण करणारे वर्णनात्मक विज्ञान आहे, तर नीतिशास्त्र मानवी वर्तनाचे मूल्यमापन करणारे, मूल्यमापनाच्या निकषांची, उपपत्तींची चिकित्सक चर्चा करणारे मूल्यात्मक शास्त्र आहे. मानसशास्त्रीय सुखवाद असे सांगतो, की प्रत्येक कृती करताना माणसाचे स्वाभाविक उद्दिष्ट सुख हेच असते. माणूस जे काही करतो ते सुख मिळविण्याच्या हेतूनेच करतो. हे माणसाच्या नैसर्गिक प्रवृत्तींचे वर्णन आजच्या विज्ञानविचाराच्या जवळचे आहे. नीतिशास्त्रीय सुखवाद असे प्रतिपादन करतो, की सुख मिळवणे हे माणसाच्या प्रत्येक कृतीचे साध्य असायला हवे. ज्या कृतीचे परिणाम सुखकारक असतात, ज्या कृतीतून सुखाची निर्मिती होते, ती कृती नैतिक असते. चार्वाकांचा सुखवाद हेच सांगतो.



कृतीचे उद्दिष्ट सुख असावे, एवढे म्हणून थांबता येत नाही, कारण लगेचच पुढचा प्रश्न निर्माण होतो, की कुणाचे सुख? आपले स्वत:चे? इतरांचे? की सर्वांचे? या तीन पर्यायांनुसार सुखवादाचे स्वसुखवाद, परसुखवाद आणि सार्वत्रिक सुखवाद असे उपप्रकार करता येतात. फक्त स्वत:च्या सुखाचाच विचार कृती करताना करावा असे मानणारा अहंकेंद्रवाद नीतिच्या सामान्य धारणेला धक्का पोहोचवणारा आहे. त्याचप्रमाणे नेहमी फक्त इतरांच्या सुखाचाच विचार करून वर्तन करणे सर्वसाधारण माणसांसाठी शक्य नाही. साहजिकच, सार्वत्रिक सुखाचा म्हणजे कृतीचा परिणाम ज्या कुणावर होतो, त्या सर्वांच्या सुखाचा विचार करावा असे मत मांडणारा सार्वत्रिक सुखवाद हा इतर दोन्ही पर्यायांपेक्षा जास्त व्यावहारिक आणि श्रेयस्कर वाटतो. उपयुक्ततावाद सार्वत्रिक सुखवादाचा पुरस्कार करतो.

## जेरेमी बेन्थॅम

जेरेमी बेन्थॅम आणि जॉन स्टुअर्ट मिल हे उपयुक्ततावादाचे दोन प्रमुख पुरस्कर्ते आहेत. बेन्थॅमच्या मते माणसाच्या वर्तनावर जणू सुख आणि दु:ख या दोन मालकांची सत्ता असते. म्हणजे सुख मिळवण्याची इच्छा आणि दु:ख टाळण्याची इच्छा याच मानवी वर्तनाचे नियमन करत असतात. बेन्थॅमचे वैशिष्ट्य म्हणजे प्राण्यांनाही सुखदु:खाच्या संवेदना असतात हे तो मान्य करतो. प्राण्यांच्या हक्काविषयी बोलताना बेन्थॅमचा हा विचार आधारभूत होतो.

मनुष्य स्वभावत:च सुखाच्या इच्छेने कृती करतो हे खरे असले, तरी नैतिकदृष्ट्या जी कृती जास्तीत जास्त लोकांसाठी जास्तीत जास्त सुख निर्माण करते ती योग्य असते असे प्रतिपादन तो करतो. हे तत्त्व 'अधिकांचे अधिकतम सुख' म्हणून प्रसिद्ध आहे. बहुतेक कृती सुखद आणि दु:खद अशा दोन्ही प्रकारच्या परिणामांना जन्म देतात. एकाच वेळी सहसा आपल्याला कृतींचे अनेक पर्याय उपलब्ध असतात. या उपलब्ध पर्यायांपैकी जी कृती अधिक प्रमाणात सुख आणि कमी प्रमाणात दु:ख निर्माण करेल ती निवडावी असे बेन्थॅमचे मत आहे. उपलब्ध पर्याय फक्त दु:खच निर्माण करणारे असतील, तर अर्थातच कमी दु:ख निर्माण करणारी कृती निवडावी.

बेन्थॅमवर त्याच्या काळातील गणित आणि विज्ञानाचा प्रभाव होता. सुख जरी व्यक्तिनिष्ठ असले तरी ते मोजता येऊ शकते असे त्याचे प्रतिपादन आहे. सुखाचे गणन/मोजमाप करण्याच्या शक्यतेमुळे सुखवाद वस्तुनिष्ठ निवडीला मदत करू शकतो. असे मोजमाप करण्यासाठी बेन्थॅमने सुखवादी कलन (hedonistic calculus) तयार केले. त्यातील निकष पुढीलप्रमाणे आहेत. (१) तीव्रता (२) कालावधी (३) निश्चितता (४) समीपता (५) निर्मिती-क्षमता (६) शुद्धता आणि (७) विस्तार. हे सात निकष वापरून आपण कृतींच्या पर्यायांचा सुखवादाच्या भूमिकेतून तौलनिक अभ्यास करू शकतो. यांतील पहिले सहा निकष व्यक्तींच्या सुखाशी संबंधित असले, तरी सातवा निकष, किती व्यक्तींचे सुख कृतीमधून निर्माण होते आहे यासंबंधीचा आहे. यामुळेच बेन्थॅमचा उपयुक्ततावाद अहंकेंद्रवादी न रहाता सार्वत्रिक होतो. बेन्थॅम समतेचे तत्त्व मानत असल्यामुळे प्रत्येक व्यक्तीच्या सुखदु:खांना समान मूल्यच असते हे आग्रहाने सांगतो. याचा अर्थ असा, की व्यक्तींचा सामाजिक, राजकीय, आर्थिक दर्जा काहीही असला, तरी सर्वांच्या सुखदु:खांचे मूल्य एकच असते. एखाद्या व्यक्तीचे स्थान कितीही उच्च असले, तरी त्याच्या सुख-दु:खाचे मूल्य त्यामुळे जास्त होत नाही.

**सुखवादी कलन :**

एखाद्या गोष्टीचा आकार आपण त्याची लांबी, रुंदी, उंची इत्यादींच्या साहाय्याने मोजतो. तसेच काही गुणधर्मांच्या साहाय्याने सुखाचे परिमाणही ठरवता येते असे बेन्थॅमचे म्हणणे आहे. हे गुणधर्म कायमच दोन कृतींमध्ये तसेच सुखांमध्ये तुलना करूनच लक्षात येतात.

सुखाचे मोजमाप करण्यासाठी बेन्थॅमने सांगितलेले सुखाचे गुणधर्म पुढीलप्रमाणे :

**(१) तीव्रता :** ज्या कृतीतून आपल्याला सुख अधिक तीव्रतेने जाणवेल ती कृती दुसऱ्या कृतीपेक्षा श्रेष्ठ. जसे, एखाद्या गायकाला गायनातून मिळणारे सुख पुस्तकवाचनातून मिळणाऱ्या सुखापेक्षा अधिक तीव्रतेने जाणवत असेल तर त्याच्यासाठी गायनातून मिळालेल्या सुखाचे परिमाण वाचनातून मिळणाऱ्या परिमाणापेक्षा निश्चितच जास्त आहे. थंडीत रात्री मेणबत्तीच्या ज्योतीवर हात शेकण्यापेक्षा शेकोटीसमोर बसणे जास्त सुखाचे. कारण शेकोटीच्या उष्णतेची तीव्रता मेणबत्तीपेक्षा निश्चितच जास्त आहे.

(२) **कालावधी :** दीर्घकाळ टिकणारे सुख निर्माण करणारी कृती नैतिकदृष्ट्या जास्त चांगली. हातावर अत्तर लावण्यापेक्षा अत्तराचा फाया कपड्यात ठेवून त्याचा सुगंध कपड्यांवर दीर्घकाळ राहिल तसे सुख दीर्घकाळ राहिले पाहिजे.

(३) **निश्चितता :** ज्या कृतीतून सुख मिळेलच याची खात्री देता येईल, ती कृती नैतिकदृष्ट्या चांगली. 'हातचे सोडून पळत्याच्या मागे लागणे योग्य नाही' ही म्हणही हाच अर्थ सांगणारी आहे.

(४) **समीपता :** ज्या कृतीतून लगेचच सुखाची निर्मिती होईल ती कृती चांगली. एक महिन्यानंतर ट्रिपला जाऊन मिळणाऱ्या सुखापेक्षा लगेचच्या सुट्टीत ट्रिपला जाऊन मिळणारे सुख चांगले.

पहिले चार गुणधर्म सुखाचे मूल्य दर्शवतात.

(५) **निर्मितीक्षमता :** जे सुख इतर सुखानांही निर्माण करते ते श्रेष्ठ. प्रदर्शनात मी स्टॉल घेतला तर तेथे माझ्या वस्तूंचा खप होईलच. ते ग्राहक नंतरही माझ्याकडे येत राहतील. इतरांना माझ्या वस्तूंबद्दलची माहिती देतील आणि माझ्या वस्तूंचा खप वाढत राहिल. त्यातून आर्थिक स्थैर्य, व्यवसाय वाढवणे अशा कितीतरी गोष्टी साध्य होतील.

(६) **शुद्धता :** सुख मिळवताना त्यात दुःख जितके कमी तितकी सुखाची शुद्धता जास्त. सुवासिक भाताचा आस्वाद घेताना खडा लागलाच तर तो बाजूला टाकून भाताचा आस्वाद घेणे चांगले.

हे दोन गुणधर्म सुखामुळे निर्माण होणाऱ्या परिणामांवर प्रकाश टाकतात.

(७) **विस्तार/व्यापकता :** ज्या कृतीमुळे फक्त मलाच नव्हे तर खूप लोकांना सुख मिळणार आहे ती कृती चांगली. मैफील भरवल्यामुळे केवळ गायकालाच नव्हे तर संगीत-चाहत्यांनाही ते सुख भरभरून घेता येते. 'जास्तीत जास्त लोकांचे जास्तीत जास्त सुख' हे उपयुक्ततावाद्यांनी सांगितलेले तत्त्व व्यापकता या गुणधर्मातून ठळकपणे दिसते.

## जॉन स्टुअर्ट मिल

निरनिराळ्या सुखांमध्ये गुणात्मक फरक नसतो, अशी बेन्थॅमची भूमिका होती. त्यामुळे फक्त मोजमाप करून सुखांमध्ये फरक करता येईल असे त्याचे मत होते. सुख ही एक अमूर्त भावना असल्यामुळे तिचे शास्त्रशुद्ध मोजमाप करणे अर्थातच फार कठीण आहे.



त्याशिवाय सर्वसाधारण समजूत अशी आहे, की सुखांमध्ये गुणात्मक फरक असतात. मिलला ही भूमिका मान्य आहे. सुखांमध्ये केवळ संख्यात्मक नव्हे तर गुणात्मक भेद असतात असे तो मानतो. यासंदर्भातले त्याचे पुढील वचन सुप्रसिद्ध आहे. "एखादे समाधानी डुक्कर असण्यापेक्षा असमाधानी माणूस असणे जास्त चांगले. एखादा समाधानी माणूस असण्यापेक्षा असमाधानी सॉक्रेटिस असणे जास्त चांगले". या वचनामधून मिल सुखांची त्यांच्या श्रेष्ठतेकनिष्ठतेनुसार श्रेणीबद्ध रचना करता येईल असे मानतो हे स्पष्ट होते.

बेन्थॅमप्रमाणे मिलही मानसशास्त्रीय सुखवाद मान्य करतो, एवढेच नव्हे, तर त्यांच्या आधारे नीतिशास्त्रीय सुखवादासाठी युक्तिवादही मांडतो. मिलच्या मते माणूस नेहमीच सुखाचीच इच्छा करत असतो. त्याच्या इच्छेचा एकमेव विषय सुख हाच आहे. वरकरणी त्याला सुखाखेरीज इतर गोष्टींचीही इच्छा असते असे दिसले, तरी त्या सर्व गोष्टी त्याला हव्या असतात त्या सुखाचे साधन किंवा सुखाचा भाग म्हणूनच. साध्यमूल्य फक्त सुखालाच असते. इतर ज्या ज्या गोष्टी मूल्यवान असतात त्यांना केवळ साधनमूल्य असते. मिल याहीपुढे जाऊन असे प्रतिपादन करतो, की प्रत्येकजण सुखाची इच्छा करतो, हेच सुख इष्ट किंवा वांछनीय आहे याचे प्रमाण आहे. ज्याअर्थी प्रत्येकालाच सुख हवे असते, त्याअर्थी ते चांगलेच असणार. व्यक्तीचे सुख ज्याप्रमाणे त्या विशिष्ट व्यक्तीसाठी चांगले असते,

त्याचप्रमाणे समाजाचे सुखही सर्वांसाठी चांगले असते. म्हणजेच प्रत्येक व्यक्तीसाठी ते चांगले असते असे मिलचे मत आहे. स्वसुखवाद आणि सार्वत्रिक सुखवाद यांत एक अंतर आहे असे सामान्यपणे मानले जात असले, तरी वास्तवात तसे अंतर नाही असे मिल या युक्तिवादातून ध्वनित करतो.

**चला बोलूया!**

बेन्थॅम आणि मिल यांच्या सुखवादातील साम्यभेदांची गटांत चर्चा करा. तुमच्या चर्चेतील महत्त्वाचे मुद्दे वर्गात सादर करा.

तुमच्या हे लक्षात आलेच असेल, की कर्तव्यवाद आणि परिणामवाद या दोन्ही उपपत्ती कृतींचे नैतिक मूल्यमापन करण्यासाठीचे भिन्न पण उपयुक्त निकष सुचवतात. हे निकष उपयोगात आणून आपल्या कृतीचे मूल्यमापन आपण करायचे असते. काय करावे आणि काय करू नये याचे विशिष्ट परिस्थितीत लागू होणारे आदेश देणे हे नीतिशास्त्राचे कार्य नाही. या पाठात आधी पाहिल्याप्रमाणे नैतिक निर्णय घेण्यासाठी आणि कृतींचे मूल्यमापन करण्यासाठी कशा प्रकारे विचार करावा याचे मार्गदर्शन नीतिशास्त्रातून मिळते. दोन्ही परंपरांमध्ये, त्या त्या संस्कृतीला अनुसरून उपलब्ध असलेले चिंतन आपण थोडक्यात पाहिले. त्यामधील मते, सिद्धांत, निकष यांचा विचार करून आपल्या कृतींची निवड करण्याचे काम अर्थातच आपले आहे. नीतिमीमांसा हा जेवढा सैद्धांतिक चिंतनाचा, चर्चेचा विषय आहे, तेवढाच तो प्रत्यक्ष जगण्याशी संबंधित आहे. जगण्यातील प्रत्यक्ष कृतींच्या कसोटीवर या सिद्धांतांची योग्यायोग्यता पडताळून पहात, त्यावर अधिक चिंतन करतच नीतिमीमांसेचा विकास होत गेला आहे.

## वैज्ञानिक दृष्टिकोन

आतापर्यंत आपण, तत्त्वज्ञानाच्या ऐतिहासिक परंपरेत कसे वागावे आणि का यांविषयी जो ऊहापोह झालेला आहे त्याचा परिचय करून घेतला. माणसाच्या जगण्याच्या दृष्टीने काय चांगले, काय वाईट याचे मार्गदर्शन करणाऱ्या वैचारिक भूमिका कशा आणि कोणत्या होत्या हे या परिचयातून समजते. गेल्या काही हजार वर्षांचा इतिहास या वैचारिक भूमिकांना आहे हे आपण लक्षात घेतले पाहिजे. या संपूर्ण काळात माणूस जसा जगत आला त्यात बदल होत गेले, पण ते सावकाश झालेले बदल होते आणि त्यात माणसाला प्रामुख्याने ज्या समस्यांचा सामना करावा लागला त्या समस्या सारख्या होत्या.

शेतीची सुरूवात झाली तेव्हापासून माणसांमध्ये वर्ग निर्माण झाले, स्त्री-पुरूषसंबंध शेतीच्या अनुषंगाने बदलले. याच काळात धर्माच्या चौकटी पक्क्या होऊ लागल्या. प्राप्त परिस्थितीत कसे वागावे याचे मार्गदर्शन धर्मातून मिळू लागले. उद्योगयुगाचा प्रारंभ दोन शतकांपूर्वी झाला. तेव्हांही यांत फार फरक पडलेला नव्हता. उपासमार, आजार, युद्धे हे माणसासमोरचे मोठे प्रश्न होते. वृद्धत्व आणि मृत्यू यांवर त्याच्याकडे काही इलाज नव्हता.

आज २१व्या शतकात मात्र परिस्थिती झपाट्याने बदलते आहे. उपासमार, आजार, युद्धे हे आजही महत्त्वाचे प्रश्न आहेतच, पण त्यांची तीव्रता गेल्या शतकांच्या तुलनेत कमी आहे. वृद्धत्व आणि मृत्यू ही आजही माणसासमोर असलेली कोडी आहेत परंतु आता त्याकडे माणसाच्या हातात नसलेली गोष्ट असे म्हणून बघण्याऐवजी 'सोडवण्यासारख्या समस्या' म्हणून बघण्याकडे तंत्रज्ञानाचा कल आहे.

उत्क्रांतीच्या सिद्धांताने पृथ्वीवर सजीव सृष्टी कशी निर्माण झाली असली पाहिजे आणि तिची वाटचाल कशी होते याचे वस्तुनिष्ठ पद्धतीने आकलन होऊ शकले. माणूस हे उत्क्रांतीचे अपत्य आहे हेदेखील लक्षात आले. तो जसा आहे, म्हणजे केवळ त्याची शरीररचना नव्हे तर त्याची वर्तणूकदेखील उत्क्रांतीच्या इतिहासाने प्रभावित असते हे लक्षात येऊ लागले. पुढे मेंदूच्या अभ्यासाने लक्षात आले की मज्जासंस्थेच्या रचनेमुळे, मेंदूच्या काम करण्याच्या वैशिष्ट्यपूर्ण पद्धतीमुळे माणसाच्या वागण्याच्या संदर्भातले धागेदोरे हाती येतात. माणसे जशी वागतात, तशी ती का वागतात हे कळण्यासाठी मेंदूची कार्यपद्धती समजावून घेतली पाहिजे हे लक्षात आल्यानंतर त्या दिशेने वेगाने घडामोडी सुरू झाल्या.

हा एक महत्त्वाचा बदल होता. आतापर्यंतचा इतिहास पाहिला तर तत्त्वज्ञान आणि धर्म यांनी माणसाने

कसे वागावे याची चर्चा केलेली आढळते. आता मात्र माणूस जसा वागतो, तसा तो का वागतो याच्या अभ्यासाकडे लंबक झुकला. यांतून काही महत्त्वाच्या गोष्टी नजरेसमोर आल्या. उदा. मेंदूच्या रचनेत आधी उत्क्रांत झालेला अमिग्डाला आणि नंतर उत्क्रांत झालेला नवमेंदू असे भाग असतात. वाढीच्या वयात सुरूवातीला अमिग्डालाचा प्रभाव जास्त असतो. पुढचामागचा विचार करणे, साकल्याने विचार करणे हे कार्य नवमेंदूचे आहे आणि त्याची वाढ सावकाश होते हे लक्षात आले. मेंदूतील पेशी नव्याने उत्पन्न होऊ शकत नाहीत आणि वृद्धापकाळी मेंदूच्या रचनेचे कार्य मंदावते हे लक्षात आले. अशा सगळ्या निरीक्षणातून माणूस जसा वागतो, तसा तो का वागतो हे बहुतांशी लक्षात येऊ लागलेच होते. परंतु आता हे विज्ञान स्वभावातील बारकाव्यांचे स्पष्टीकरणदेखील वस्तुनिष्ठ पद्धतीने देऊ शकते, निदान त्याची दिशा तशीच दिसते. जन्मजात गुणधर्म महत्वाचे की संस्कार, संगोपन? या सारख्या पारंपरिक प्रश्नाचे उत्तरदेखील आता वस्तुनिष्ठपणे शोधण्याचे प्रयत्न चालू आहेत.



**चला शोधूया!**

मानवी वर्तनाचे विश्लेषण करणाऱ्या मेंदूच्या कार्यपद्धतीची अधिक माहिती मिळवा.

कसे वागावे आणि का या प्रश्नांची उत्तरे आता उत्क्रांतीच्या नियमाच्या प्रकाशात शोधता येऊ शकतात. खाण्याच्या पदार्थांच्या निवडीपासून ते व्यवसायाच्या निवडीपर्यंत, अशी व्याप्ती असणाऱ्या प्रश्नांची उत्तरे धार्मिक आणि पारंपरिक दृष्टिकोनातून मिळवण्याचा प्रयत्न आतापर्यंत होत आला. आता या प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी आपल्याला जैविक वारसा आणि व्यक्ती म्हणून आपल्या आवडीनिवडी, क्षमता, मर्यादा यांचा विचार करण्याचा पर्याय उपलब्ध झालेला आहे. त्यामुळे आता धार्मिक आणि पारंपरिक दृष्टिकोनाचा अवलंब करण्याऐवजी प्रत्येकाला या पर्यायाचा उपयोग करता येऊ शकतो.

या सर्व घडामोडींनी काही प्रश्नदेखील उभे राहतात. उदाहरणार्थ, सुखाची, आनंदाची भावना माणसासाठी एखादी कृती करण्यासाठीचा निर्णय होण्यासाठी महत्त्वाची असते हे आताच्या संशोधनातून दिसून आले आहे. हा विचार तत्त्वज्ञानाला नवीन नाही. त्याचा प्रतिवादही केला गेला. बौद्ध तत्त्वज्ञानात हे सांगितले गेले, की आपण जितकी सुखसंवेदनांची इच्छा बाळगू तितके आपण अधिक तणावग्रस्त आणि असमाधानी होऊ. खरे समाधान हवं असेल तर मानवाने सुखद संवेदनांचा शोध घेण्याचा आपला प्रवास जास्त वेगाने नव्हे तर कमी वेगाने केला पाहिजे. असे जरी असले तरी जे होताना दिसते आहे ते मात्र त्वरित आणि अधिकाधिक सुख या दिशेने चालू आहे. आपल्या आजूबाजूला असलेले तंत्रज्ञान जणू याचसाठी निर्माण झाले आहे आणि होते आहे. यांतून अनेक प्रश्न निर्माण होत आहेत. त्यांची चर्चा आपण विज्ञान-तंत्रज्ञानविषयक पाठात करणार आहोत.

## शब्दसूची

कायदा – Law
सुखवाद – Hedonism
कर्तव्यवाद – Deontology
निरुपाधिक आदेश – Categorical imperative
परिणामवाद – Consequentialism
व्यक्तिसापेक्ष – Subjective
व्यक्तिनिरपेक्ष – Objective
सत्संकल्प – Goodwill
सार्वत्रिकीकरण – Universalisation
उपयुक्ततावाद – Utilitarianism
मानसशास्त्रीय सुखवाद – Psychological Hedonism
नीतिशास्त्रीय सुखवाद – Ethical Hedonism
स्वसुखवाद – Egoistic Hedonism
परसुखवाद – Altruistic Hedonism
सार्वत्रिक सुखवाद – Universal Hedonism
अहंकेंद्रवाद – Self-centeredness
उद्योगयुग – Industrial age/era

## स्वाध्याय

**प्रश्न १ गटातील वेगळा शब्द/जोडी ओळखून लिहा.**

(१) योग्य-अयोग्य, चांगले-वाईट, ऐच्छिक-अनैच्छिक, रीती-रिवाज.

(२) देवऋण, मित्रऋण, पितृऋण, ऋषीऋण.

(३) सत्य, सुख, अहिंसा, अस्तेय.

**प्रश्न २ २० ते २५ शब्दांत उत्तरे लिहा.**


(१) ऐच्छिक कर्मामागील राग व द्वेष या प्रेरणा काय आहेत?


(२) निर्जरेची प्रक्रिया केव्हा सुरू होते?


(३) बौद्धांची आर्यसत्ये कोणती?

(४) कृतीने नैतिक मूल्यमापन करण्याचे दोन मुख्य निकष कोणते?

**प्रश्न ३ संकल्पनाचित्र/तक्ता/ओघतक्ता पूर्ण करा.**




**प्रश्न ४ टीपा लिहा.**

(१) उत्क्रांती आणि नीतिमत्ता

(२) बेन्थॅमचा सुखवाद आणि सुखाचे परिगणन

(३) बौद्ध नीतिविचार

(४) पुरूषार्थ

**प्रश्न ५** भारतीय परंपरेत कर्मसिद्धांताचा सांधा पुनर्जन्माच्या संकल्पनेशी का जोडला गेला आहे?

**प्रश्न ६** बुद्धी वासना, प्रेरणांची गुलाम आहे हे ह्यूमचे मत कांटने का नाकारले?

**प्रश्न ७** जैन दर्शनातील नीतिविचारांची सविस्तर चर्चा करा.

**प्रश्न ८** **पुढील प्रसंगावर संवाद लिहा.**

सुखाच्या मागे लागणारी व्यक्ती नीतिमान असू शकते का? यावर संवाद लिहा.

**प्रश्न ९** सुखाच्या शोधातील तंत्रज्ञानाचे योगदान सांगा.

**उपक्रम**

तुमच्या घरातील ज्येष्ठांशी 'नैतिकता व व्यावहारिक अडचणी यांची सांगड ते कशी घालतात' या संदर्भात संवाद साधा.

# ६. कलेच्या वाटेने जाताना

- प्रस्तावना
- सौंदर्यवादी/कलावादी दृष्टिकोन
- सौंदर्यानुभव
- 'सौंदर्य' असते की भासते?
- कलेचे स्वरूप
- कलाप्रक्रिया आणि कलाप्रकार
- कलेची उद्‌दिष्टे
- वैज्ञानिक दृष्टिकोन

## प्रस्तावना

असे म्हणतात, की प्रत्येकाची सुखाची व्याख्या वेगळी असते. म्हणूनच सुख कशात असते या प्रश्नाचे सगळ्यांना पटेल असे उत्तर देता येत नाही. पण सगळ्यांनाच सुख हवे असते हे मात्र बहुतांशी सर्वमान्य आहे. सुख, आनंद, खुशी, समाधान हे सगळे शब्द आपल्याला सगळ्यांना हव्याशा वाटणाऱ्या अनुभवाचे, मानसिक स्थितीचे वर्णन करणारे आहेत. असे अनुभव किंवा मानसिक स्थिती कुठल्या प्रसंगी, काय केले म्हणजे वाट्याला येते आपल्या? सगळ्यांचे सुख कशात असते हा प्रश्न सोडूनच द्या, पण तुमचे सुख कशात आहे, ते कधी, कसे मिळते याचा विचार केला आहे कधी? सुखी व्हायचे असेल, तर हा विचार करायलाच हवा ना!

अनेक वाटांनी, अनेक प्रकारचे सुख आपल्याला मिळत असते. पावसाची सर पडून गेल्यावरच्या गारव्यात गरमागरम चटकदार पदार्थ खाणे सुखाचे असते. भारतीय संघ विश्वचषक जिंकतो तेव्हा खूप आनंद होतो. खूप दिवसांनी एखादा जवळचा मित्र भेटला की आपण खुश होतो. आपल्या शेजारी राहणाऱ्या छोट्याला सायकल चालवायला शिकवताना मजा येते. एखाद्या दिव्यांग व्यक्तीला रस्ता ओलांडायला मदत केली तर बरे वाटते. आपल्या यशाने आईबाबांच्या चेहऱ्यावर खुशी दिसली की खूप समाधान वाटते. थोडक्यात सांगायचे तर, माणसामध्ये ज्या वेगवेगळ्या क्षमता असतात, जे निरनिराळे गुणधर्म असतात त्यांच्याशी माणसाचे सुख निगडित असते. सौंदर्याचा आस्वाद घेणे आणि सौंदर्य निर्मिती करणे या माणसाच्या विशेष क्षमता आहेत. या क्षमता मनुष्येतर जिवांमध्ये अजिबात नाहीत असे नाही. सुगरण पक्षी घरटे विणतो, कोळी नाजूक रचनेचे जाळे विणतो, पाखरे गातात, किटक वाळूवर तुरु-तुरु चालतात. पण ते या सगळ्याचा 'सुंदर' म्हणून आस्वाद घेऊ शकतात का? कुणास ठाऊक! आज आपण एवढे म्हणू शकतो, की माणसाची जाणीव इतर सजीवांपेक्षा प्रगत असल्यामुळे, त्याला जाणीवेची जाणीव असल्यामुळे त्याच्या सौंदर्यजाणिवा इतर सजीवांपेक्षा भिन्न असू शकतात. त्यामुळेच त्याच्यापुढे सौंदर्यानुभवाचे, कलानुभवाचे एक नवेच विश्व खुले होते. या विश्वात, मूलभूत गरजांच्या पूर्तीने होणाऱ्या समाधानापलीकडचे सुख किंवा आनंद माणसाच्या वाट्याला येतो.



उमललेले नाजूक, सुगंधित फूल, सूर्यास्ताच्या वेळी विविध रंगांची उधळण करणारे आकाश, समुद्राची गाज, पक्ष्यांची किलबिल, कडाडणाऱ्या आणि अंधार उजळवून टाकणाऱ्या विजा, झाडांचे माथे जमिनीला टेकायला लावणारी वादळे; निसर्गाची अशी अनेक, कधी मोहित करणारी, कधी भयचकित करणारी रूपे आपण अनुभवतो. अशा अनुभवांनी आपण हरखून जातो, कधी उत्साहित होतो, तर कधी अचंबित होतो, निःशब्द होतो. अशा अनुभवांना 'सौंदर्यानुभव' म्हटले जाते. या अनुभवांमध्ये

निसर्गनिर्मित सौंदर्याप्रमाणे मानवनिर्मित सौंदर्याचाही अनुभव समाविष्ट असतो.

**चला पाहूया!**

तुमच्या परिसरातील निसर्गसुंदर स्थळाला/वस्तूसंग्रहालयाला/कलादालनाला भेट द्या.

माणसाच्या कलाव्यवहारामधून त्याची सौंदर्यासक्ती जशी दिसते, तशीच त्याची सर्जनशीलता म्हणजे निर्मितीक्षमताही दिसते. सौंदर्यमीमांसा ही तत्त्वज्ञानाची शाखा माणसाच्या सौंदर्यानुभवांचा, कलानुभवांचा सखोल अभ्यास करते.

गेल्या वर्षी आपण या शाखेची तोंडओळख करून घेतलेलीच आहे. सौंदर्य म्हणजे काय? सौंदर्यानुभवाचे स्वरूप काय असते? कलेचे मानवी जीवनातील महत्त्व काय आहे? कलाकृतीचे स्वरूप काय असते? कलाप्रक्रियेचे घटक कोणते आणि त्यांचा परस्परसंबंध कसा असतो? या प्रकारच्या, सौंदर्य आणि कलानिर्मिती व कलास्वाद यासंदर्भातील अनेक प्रश्नांची चर्चा या शाखेत होते. कलेचा समाजावर होणारा परिणाम, कला आणि नीती यांमधील संबंध, कलेचे मूल्यमापन करणारे निकष, कला आणि कारागिरी यांमधील संबंध अशा मुद्द्यांचा विचारही या शाखेत केला जातो. सौंदर्य आणि कला यांची चर्चा तत्त्वज्ञानात फार पूर्वीपासून होत असली, तरी सौंदर्यमीमांसेचा तत्त्वज्ञानाची एक शाखा म्हणून उगम १८व्या शतकात झाला. 'सौंदर्यमीमांसा' हा शब्द आपण Aesthetics या शब्दाचा मराठी भाषेतील पर्याय म्हणून वापरतो. जर्मन तत्त्वचिंतक बॉमगार्टेन (Baumgarten) याने Aesthetics या शब्दाचा अशा अभ्यासासाठी पहिल्यांदा उपयोग केला. Aesthanomai या ग्रीक शब्दापासून त्याने हा शब्द तयार केला. Aesthenomai म्हणजे इंद्रियांद्वारा अनुभव घेणे, तर Aesthetics म्हणजे इंद्रियानुभव आणि त्यांमधून निर्माण होणाऱ्या विशिष्ट प्रकारच्या भावना. बॉमगार्टेनने Aesthetics म्हणजे सौंदर्यानुभवाचा पद्धतशीरपणे अभ्यास करणारी शाखा अशी सौंदर्यमीमांसेची व्याख्या केली. कांटने नैतिक अनुभव आणि सुखद किंवा रोचक अनुभव यांपासून सौंदर्यानुभवाचे वेगळेपण कशात असते याची मांडणी करून सौंदर्यमीमांसेला तात्त्विक अधिष्ठान दिले.

**चला शोधूया!**

कांटच्या सौंदर्यविषयक तत्त्वज्ञानाची अधिक माहिती मिळवा.

नंतरच्या काळात सौंदर्य ही या शाखेतील मध्यवर्ती संकल्पना राहिली नाही. त्यामधील चिंतनाचा रोख कला आणि कलाविषयक प्रश्नांकडे जास्त प्रमाणात वळल्यामुळे या शाखेला 'कलेचे तत्त्वज्ञान' असेही म्हटले जाऊ लागले. या पाठात आपण या शाखेतील काही प्रमुख संकल्पनांचा परिचय करून घेऊया.

### सौंदर्यवादी/कलावादी दृष्टिकोन

आपले आपल्या भोवतालच्या जगाशी असलेले नाते अनेकपदरी असते. इंद्रियसंवेदना, भावभावना, बुद्धी, विचार, तर्क, कल्पना, कृती, मूल्यमापन अशा अनेक मार्गांनी आपण जगाशी जोडले जातो. विश्वाशी असलेल्या आपल्या नात्याच्या मुळाशी तीन प्रकारचे दृष्टिकोन असतात. ज्ञानात्मक/ज्ञानकेंद्री दृष्टिकोन माणसाचे 'ज्ञाता' हे रूप अधोरेखित करतो. या ज्ञात्याला विश्वाचा उगम, स्वरूप, कार्य या सगळ्यांचा वेध घ्यायचा असतो. जगात किती प्रकारच्या वस्तू आहेत? त्यांचे मूळ घटक कोणते? त्यांमध्ये होणारे बदल कोणते? त्यामागची तत्त्वे, नियम कोणते हे जाणून घेण्यात त्याला रस असतो. आपण पाहिले त्याप्रमाणे या कुतूहलातूनच तत्त्वज्ञान आणि विज्ञानाचा उगम होतो. जग समजून घेण्याच्या पद्धती विकसित होतात. तंत्रज्ञानाच्या विकासातून जगाचे अज्ञात पैलू उलगडून दाखवणारी उपकरणे तयार होतात. त्यांचा वापर करून संशोधन करताना ज्ञात्याची भूमिका तटस्थ निरीक्षकाची असते. भावभावना, कल्पना, संवेदनशीलता, मूल्ये या गोष्टींना इथे थारा नसतो. तुम्ही प्रयोगशाळेत जेव्हा प्रयोग करता, तेव्हा तुमच्या आवडीनिवडी, तुमच्या वैयक्तिक भावना, मन:स्थिती यांना काहीही महत्त्व नसते. महत्त्व असते ते प्रयोगविषयाला. त्याचप्रमाणे ज्ञानकेंद्री दृष्टिकोनात व्यक्तीला महत्त्व नसते. महत्त्व असते ते अभ्यासविषयाला, म्हणजे वस्तू किंवा घटना,

त्यांचे आंतरसंबंध यांना.

दुसरा दृष्टिकोन असतो तो आपल्या जगण्यासाठी काय उपयोगी आहे, फलदायी आहे याकडे लक्ष पुरवणारा. याला उपयुक्ततावादी किंवा व्यवहारवादी दृष्टिकोन म्हटले जाते. जीवनसंघर्षात आपला स्वतःचा जीव आणि आपल्या जीवजातीचे अस्तित्व टिकवून धरण्याच्या मूलभूत प्रेरणेमुळे आपल्यासाठी लाभदायक काय आणि हानिकारक काय याचा शोध माणूस सुरुवातीपासूनच घेत राहिला. या शोधाच्या मुळाशी निखळ कुतूहल नसते. केवळ ज्ञान मिळवण्याची प्रेरणा नसते, तर वर उल्लेखलेली एक जैविक प्रेरणा असते. उत्क्रांतीच्या प्रक्रियेत आणि सामाजिक सांस्कृतिक विकासाच्या प्रक्रियेत ही प्रेरणा विज्ञान तंत्रज्ञानाच्या विकासाशीही जोडली जाते. प्राथमिक स्वरूपाच्या तंत्रज्ञानाला वैज्ञानिक ज्ञानाची जोड मिळाल्यावर त्याची कार्यक्षमता कित्येक पटीने वाढते. त्याचप्रमाणात जीवनोपयोगी साधनेही वाढत जातात. ज्ञानकेंद्री दृष्टिकोन आणि उपयुक्ततावादी दृष्टिकोन परस्परपूरक असतात. उपयुक्त साधनांनी ज्ञानाची व्याप्ती वाढत जाते, तर सखोल ज्ञानामुळे काय उपयुक्त आणि काय निरुपयोगी किंवा नुकसानदायक याची समजही वाढत जाते.

हे दोन्ही दृष्टिकोन आपापल्या पद्धतीने विश्वातील वस्तूंचे, घटनांचे वर्गीकरणही करत असतात. विश्वात अपरिमित वस्तू असतात, असंख्य घटना घडत असतात. त्यांमधील साम्ये शोधून त्यांचे वर्गीकरण केले जाते. यासाठी ज्ञानकेंद्री दृष्टिकोन वस्तू किंवा घटना कुठल्या प्रकारच्या सर्वसाधारण नियमांच्या कक्षेत येतात याचा शोध घेतो. तो नियम त्या प्रकारच्या सर्व वस्तूंना किंवा घटनांना लागू होतो. वस्तूच्या स्वतंत्र, वैशिष्ट्यपूर्ण अस्तित्वापेक्षा, तिचा प्रकार किंवा वर्ग, ज्ञानकेंद्री दृष्टिकोनासाठी महत्त्वाचा असतो. उपयुक्ततावादी दृष्टिकोन वस्तूंचे वर्गीकरण त्यांच्या उपयुक्ततेनुसार, म्हणजे ज्या प्रकारची कार्ये त्या करू शकतात त्यांच्याप्रमाणे करतो. या दृष्टिकोनानुसार वस्तू या मुळात साधने किंवा उपकरणे असतात. एखादी वस्तू बनवण्यासाठी तिचा उपयोग कशासाठी करायचा आहे हे लक्षात घेऊन ती कशापासून बनवायची, तिला कुठला आकार द्यायचा हे ठरवले जाते. एकाच प्रकारच्या घटकद्रव्यामधून, एकाच आकाराच्या अनेक वस्तू बनवल्या जातात.

**चला करूया!**

वर्गात कागदापासून बनवता येणाऱ्या विविध वस्तू (ओरिगामी) तयार करून त्यांचे प्रदर्शन भरवा.

लाकडापासून अनेक वस्तू तयार होतात, पण त्यांची रचना वेगवेगळी असते. बसण्यासाठी खुर्ची, वस्तू ठेवण्यासाठी, लिहिण्यासाठी केलेले टेबल आणि थोड्या जागेत बसताही येईल आणि वस्तू ठेवताही येतील यासाठी तयार केलेले बाक, या सगळ्या वस्तूंच्या कार्यानुसार त्यांचे वर्गीकरण करणे हा उपयुक्ततावादी दृष्टिकोन आहे, तर या सगळ्या वस्तू लाकडाच्या आहेत, म्हणून त्यांना प्लॅस्टिक, धातू इत्यादींपासून बनवलेल्या वस्तूंपेक्षा वेगळ्या वर्गात टाकणे हा ज्ञानकेंद्रीय दृष्टिकोन आहे.

**चला करूया!**

केक किंवा बिस्किटांसाठी वापरल्या जाणाऱ्या साच्यांसारखे वेगवेगळे साचे घ्या आणि त्यांचा वापर करून मेण, माती अशा विविध घटक पदार्थांपासून वस्तू बनवा.


या दोन दृष्टिकोनांव्यतिरिक्त ज्या तिसऱ्या दृष्टिकोनातून आपण वस्तूंचाच नव्हे तर विश्वाचाही अनुभव घेतो, त्याला सौंदर्यवादी किंवा कलावादी दृष्टिकोन म्हणतात. अनुभवाला येणारी वस्तू कुठल्या घटकद्रव्यांपासून तयार झाली आहे? तिला कुठल्या प्रकारचे निसर्गनियम लागू होतात? तिचे कार्य काय? उपयोग काय? असे कुठलेही प्रश्न या दृष्टिकोनानुसार गौण ठरतात. त्यामुळेच ती वस्तू कुठल्या प्रकारात किंवा वर्गात मोडते यासंबंधीचे वर्गीकरण केले जात नाही. कुठलाही विशिष्ट प्राथमिक हेतू मनात न ठेवता; निसर्ग, वस्तू यांचा प्रत्यय जसा येईल तसा घेणे आणि त्यामधून ज्या संवेदना, प्रतिमा मनात उमटतील त्या उमटू देणे असे या दृष्टिकोनामधून घडत असते. या अनुभवात, ज्या वस्तूचा अनुभव आहे तिचे आणि जी व्यक्ती अनुभव घेते तिचे वैशिष्ट्यपूर्ण स्वरूप महत्त्वाचे असते. सौंदर्यवादी दृष्टिकोनाला निसर्गाची, विशिष्ट वस्तूंची, वैयक्तिक आणि सामाजिक जीवनाची अनेकविध रूपे त्यांच्या वैशिष्ट्यपूर्णतेसह अनुभवण्यात रुची असते.




तत्त्वज्ञानात या दृष्टिकोनाला एक वेगळेच महत्त्व आहे. आपण तत्त्वज्ञानाच्या सत्तामीमांसा, ज्ञानमीमांसा, नीतिमीमांसा या शाखांची ओळख करून घेतली आहे. या सर्व शाखांमध्ये माणसाचे संवेदनशीलता, कल्पनाशक्ती, सर्जनशीलता, भावनाशीलता हे गुणधर्म परिघावरच राहतात. सौंदर्यमीमांसा या सगळ्यांची दखल घेते आणि त्यामधून माणूसपणाचे आपले आकलन अधिक समृद्ध करते. त्याचप्रमाणे मानवेतर अस्तित्वाचा विचार केवळ माणसाच्या संदर्भात न करता त्या अस्तित्वाचा निखळ अनुभव आणि त्याचे व्यक्तीच्या मनोविश्वावर होणारे परिणाम यांचाही विचार सौंदर्यमीमांसेत होतो. आपल्या अनुभवाला येणाऱ्या वस्तू, व्यक्ती, संबंध, घटना या सगळ्यांकडे बघण्याची एक वेगळीच दृष्टि आपल्याला सौंदर्यमीमांसेमधून मिळते. या दृष्टिमुळे माणसांच्या उद्दिष्टांच्या, हेतूंच्या पलीकडे त्यांचे जे निखळ अस्तित्व असते, त्या अस्तित्वाशी आपण जोडले जातो. त्यामधून अस्तित्व-विशिष्टांची दखल घेण्याचा, त्यांची कदर करण्याचा संस्कार आपल्यावर नकळत होतो.

सौंदर्यात्मक दृष्टिकोनात, मानवेतर अस्तित्व, निसर्ग, यांचे अस्तित्व माणसापेक्षा वेगळे, सुटे न राहता ते मानवी भावविश्व, कल्पनासृष्टी, विचारदृष्टी यांचे अन्योन्य भाग होतात. माणसाची संवेदनक्षमता, सर्जनशीलता विश्व आणि विश्वातील प्रकट घटकांची अनोखी रूपे आपल्यासमोर आणतात आणि त्यामागील अप्रकट अस्तित्व जाणून घेण्याची ओढ निर्माण करतात. विश्व आणि त्यातील घटकांना केवळ संशोधनविषय किंवा उपयुक्त संसाधने म्हणून बघण्याच्या पलीकडे जाऊन अनुभवण्याची शक्यता सौंदर्यवादी दृष्टिकोनामुळे निर्माण होते. यातून प्रत्येक गोष्टीला स्वतःचे असे अस्तित्वविशिष्ट मूल्य असू शकते याची जाणीव माणसाला होते. निसर्ग आणि मानवाला संसाधन या रूपात पाहण्याच्या आजच्या काळात ही जाणीव खूप मोलाची आहे. ती आपल्याला स्वकेंद्री, मानवकेंद्री दृष्टीच्या पार जाऊन स्वतःकडे, समाजाकडे, सजीव-निर्जीव सृष्टीकडे पाहण्याची एक नवी दृष्टी देते. सामान्य माणसाला येणारा सौंदर्यानुभव आणि कलाकाराने केलेली कलानिर्मिती यांचा उगम या दृष्टिमधूनच होत असतो. आपण एका उदाहरणाच्या मदतीने हे समजावून घेऊया.

निसर्गात मुक्तपणे फिरताना अनेक गोष्टी आपल्या नजरेला पडतात. समजा, एक मित्रमैत्रिणींचा गट फिरायला गेलेला असताना एखाद्या प्रदेशात त्यांना खूप दगड पडलेले दिसले; तर काय प्रकारच्या प्रतिक्रिया होतील? कुणाला कुतूहल वाटेल की हे सगळे दगड इथे कुठून आले? एखाद्या भूगर्भशास्त्राच्या विद्यार्थ्याला तो दगड कुठल्या प्रकारचा आहे, कुठल्या प्रक्रियेमधून तयार झाला आहे याचे त्याने अभ्यासलेले वर्णन आठवेल. कुणाला हिंडताफिरताना त्या दगडांची अडचण वाटेल, कुणी त्यांचा बसण्यासाठी वापर करेल, काहीजण त्या दगडांपासून कुठली उपयुक्त उपकरणे, वस्तू, हत्यारे तयार करता येतील याबद्दल विचार करू लागतील, एखादीला मात्र त्या इतरत्र पडलेल्या दगडांमध्ये एखादी सुंदर रचना दिसेल, कुणाला दगडाचे छायाप्रकाशाच्या खेळातले रूप मोहवेल, कुणी त्यातल्या चमकदार कणांनी विस्मित होईल. एखाद्या दगडाचा गुळगुळीत, नितळ स्पर्श कुणाला आवडेल. एखाद्या कलाकाराला त्यांतून शिल्प घडवण्याची इच्छा होईल.



शिल्पकार जेव्हा दगडातून मूर्ती घडवतो किंवा वास्तुरचनाकार एखाद्या वास्तूची, प्रार्थनास्थळाची उभारणी करतो, तेव्हा त्या दगडाचे चिरस्थायित्व, सर्व ऋतूंना

सामोरे जाऊन तगून राहण्याची क्षमता हे गुणधर्म आपल्याला जाणवतात. लख्ख प्रकाश, संधिप्रकाश, ढगांमधून झिरपलेला प्रकाश, अंधारून येणारी संध्याकाळ अशा निरनिराळ्या स्थितींत दगडाचे दिसणारे रंगरूप, त्यावरची चकाकी हे आपल्या अनुभवाला येते. शिल्पकाराने निर्माण केलेल्या मूर्तीमधून प्रकट होणारे विविध भाव, एरवी जड, निर्जीव समजल्या जाणाऱ्या दगडाला जणू चैतन्यमय, गतिशील, भावात्मक अस्तित्व प्रदान करतात. निसर्गाच्या प्रत्येक आविष्काराचे, दगडासारख्या वस्तूंचे म्हणजे पर्यायाने विश्वाचेच अस्तित्वमूल्य कलानिर्मितीमधून असे प्रकट होते. असे मूल्यभान हा माणसाच्या सांस्कृतिकतेचा महत्त्वाचा पैलू आहे.



दगडासारख्या निसर्गनिर्मित वस्तूंप्रमाणे दैनंदिन जीवनात ज्यांचे असणे आपण गृहीत धरतो अशा टेबलासारख्या मानवनिर्मित वस्तूंचे अस्तित्वभानही कलाकार आपल्याला करून देत असतो. त्या वस्तूंशी निगडित इतर प्रतिमा आपल्या मनामध्ये उमटवत असतो. कल्पना करा, की तुम्ही एक चित्र पाहत आहात. त्या चित्रात कॅनव्हासवर एका टेबलाचे रेखाटन आहे, टेबलावर काही कागद आणि डोळ्यांवरून काढून ठेवलेला चष्मा अशा वस्तू दिसत आहेत.

ते रेखाटन बघताना नकळत नजरेसमोर काहीतरी लिहून टेबलावरून नुकतेच उठलेले आजोबा किंवा आई यांची प्रतिमा उमटेल. कुणाला एखादा लेखक आठवेल, कुणाला तत्त्वचिंतक तर कुणाला एखादा नेता. टेबल, कागद, चष्मा या वस्तू स्मरणचित्रे बनून भावबंध प्रकट करतील.

**चला करूया!**

वर्गात काही विद्यार्थी चित्रे काढतील आणि इतर विद्यार्थी त्या चित्रांमुळे त्यांच्या मनात कुठल्या प्रतिमा, कुठले भाव जागे झाले याबद्दल बोलतील.

### सौंदर्यानुभव

सौंदर्यवादी किंवा कलावादी दृष्टिकोन माणसाच्या सौंदर्यविषयक प्रगत जाणिवांमधून निर्माण होतो. या जाणिवांमुळेच 'सौंदर्यानुभव' हा अनुभवप्रकार शक्य होतो. सौंदर्यमीमांसा किंवा कलेच्या तत्त्वज्ञानानुसार निसर्ग आणि कलाकृती यांचा आस्वाद घेताना येणारा सौंदर्यानुभव म्हणजे विशिष्ट व्यक्तीला, निसर्गाचा किंवा कलाकृतींचा येणारा इंद्रियानुभव. सौंदर्यानुभव मुळात इंद्रियानुभव असला तरी त्याची कक्षा इंद्रियानुभवापुरतीच सीमित नसते. त्या अनुभवाचा परिणाम आपल्या भावना, विचार, कल्पना यांच्यावर होतो. या अनुभवाच्या आठवणी मनात रेंगाळत राहतात. कधी या अनुभवामुळे काही जुन्या अनुभवांच्या स्मृती जाग्या होतात. त्या अनुभवांचे एकमेकांशी असलेले नाते उलगडत जाते. स्वतःबद्दल, समाजाबद्दल, विश्वाबद्दल काही नव्याने समजायला लागते. एखादा चित्रपट किंवा नाटक बघताना असा अनुभव तुम्हांलाही आला असेल. इंद्रियानुभव, भावभावना, विचार, कल्पना या सगळ्यांना जोडणाऱ्या या प्रक्रियेतून त्या अनुभवाची सूक्ष्म, तरल अंगे आपल्याला जाणवत राहतात. आपल्या रोजच्या एकसुरी, काहीशा यांत्रिक जीवनाला सौंदर्यानुभव किंवा कलानुभव चैतन्य प्रदान करत असतो.

सौंदर्यानुभवाचा एक विशेष गुणधर्म म्हणजे तो आनंददायी असतो. त्यामधून मिळणाऱ्या आनंदाचे स्वरूप मात्र इंद्रियानुभवामधून एरवी मिळणाऱ्या आनंदापेक्षा खूपच वेगळे असते. या आनंदाचे वेगळेपण समजून घेतले, की सौंदर्यानुभवाची वैशिष्ट्ये समजायला मदत होते. एखादे सुंदर निसर्गदृश्य पाहून होणारा आनंद, एखादी मनाला भिडणारी कविता वाचण्याचा आनंद,

एखादा सुंदर नाट्यानुभव घेतल्यानंतर वाटणारे खोल समाधान यांची वैशिष्ट्ये जाणून घेण्याचा प्रयत्न तुम्ही कधी केला आहे? मनपसंद खाद्यपदार्थ मनसोक्त खायला मिळणे, आपल्याला खूप हवी असलेली एखादी वस्तू अचानक भेट म्हणून मिळणे, एखादी क्रीडास्पर्धा जिंकणे यांतून मिळणाऱ्या आनंदाशी त्यांची तुलना कधी केली आहे? केली नसलीत, तर नक्की करून बघा. अशी तुलना कशी करता येऊ शकते हे उदाहरणांमधून समजावून घेऊया.

**चला करूया!**

वर्गात काव्यवाचन, नाट्यउतारा वाचन करा व त्यातून मिळणारा आनंद अनुभवा.

समजा, आपल्यासमोर केशरी रंगाचा, तजेलदार, मधुर वासाचा आंबा ठेवला असेल, तर तो बघून आपल्याला छान वाटेलच, पण तो आंबा आपल्याला खायला मिळावा अशी इच्छा आपल्याला होईल. आंबा नुसता बघून समाधान होणार नाही, तो खायला मिळाला, तरच समाधान होईल. याउलट, एखादे सुंदर चित्र किंवा शिल्प बघितले, तर त्या नुसत्या दर्शनानेच आनंद होईल. ते चित्र किंवा शिल्प आपल्याला मिळावे, आपल्या मालकीचे असावे तरच मला आनंद होईल असे काही तुम्हांला वाटणार नाही.



कलासंग्रहालयांमध्ये अनेक कलाकृती जतन केलेल्या असतात. महाराष्ट्रात अनेक ठिकाणी कलापूर्ण शिल्पे आणि रचना असणारी लेणी, मंदिरे आहेत. ती बघूनही आपल्याला असाच वैशिष्ट्यपूर्ण आनंद मिळतो. एखाद्या डोंगरमाथ्यावरून दिसणाऱ्या, वृक्षराजीने नटलेल्या दऱ्या, त्यांमधून वाहणारे पाण्याचे शुभ्र खळाळते प्रवाह आपल्या मनाला निर्भेळ आनंद देतात. वेगवेगळ्या सुरांत शीळ घालणारी पाखरे मोहवून टाकतात.

**चला भेट देऊया!**

आपल्या परिसरातील प्राचीन कलावस्तू, स्थापत्य इत्यादींविषयी माहिती मिळवा. शक्य असल्यास प्रत्यक्ष भेट द्या. जसे की, प्राचीन गुंफा, मंदिरे, वाडे इत्यादी.

या उदाहरणांमधून हे लक्षात येते, की सौंदर्यानुभवातून अथवा कलानुभवातून मिळणारा आनंद व्यक्तीच्या इच्छा, प्रेरणा, अपेक्षा यांवर अवलंबून नसतो. जर्मन तत्त्वज्ञ इमॅन्युएल कांट सौंदर्यानुभवाला निरपेक्ष आनंद देणारा अनुभव असे म्हणतो. त्याच्या मते जी वस्तू किंवा कलाकृती आपल्याला सौंदर्यानुभव देते त्यातून मिळणारा आनंद त्या वस्तूच्या व्यावहारिक, उपयोगिता मूल्यावर किंवा नैतिक मूल्यावरही अवलंबून नसतो. या अर्थाने हा आनंद निखळ, निरपेक्ष असतो. असा आनंद ज्यामधून मिळतो तो सौंदर्यानुभव.

तुम्हांला नक्कीच असा प्रश्न पडलेला असेल, की सौंदर्यानुभव म्हणजे सौंदर्याचा किंवा सुंदरतेचा अनुभव ना? मग वर सौंदर्यानुभवाची जी चर्चा आपण केली, त्यात सौंदर्याचे विवेचन का केलेले नाही? तुमचा प्रश्न योग्य आहे. पण त्याचे उत्तर वाटते तेवढे सोपे नाही. सर्वसाधारणपणे एखादी व्यक्ती, वस्तू, दृश्य, कलाकृती आपल्याला भावते, आवडते. ती/ते सुंदर आहे असे म्हटले जाते. अर्थात प्रत्येक वेळेला 'सुंदर' या शब्दाचा उपयोग आपण करतोच असे नाही. दैनंदिन जीवनात, 'छान आहे', 'चांगले आहे', 'मला खूप आवडले' असेही आपण म्हणतो. त्या त्या काळाची अशीही काही खास विशेषणे असतात. 'सही', 'भारी', 'एक नंबर' अशी विशेषणे तुम्ही अनेक वेळा 'सुंदर' या अर्थाने वापरता ना?

**चला करूया!**

'दैनंदिन जीवनातील कला' याविषयी वर्गात सादरीकरण करा. उदा. सुशोभनाच्या विविध पद्धती, प्रकार, त्यांतील पारंपरिक आणि नवीन प्रकार.

## 'सौंदर्य' असते की भासते?

'सुंदरता', 'सौंदर्य' या संकल्पनेबद्दल तत्त्वज्ञानात अनेक प्रश्न निर्माण केले गेले आहेत. ज्याचे वर्णन करण्यासाठी आपण 'सुंदर' हे विशेषण वापरतो, त्यामध्ये सौंदर्य हा गुणधर्म असतो असे आपण मानतो. हा गुणधर्म रंग, रूप, गंध, आकारमान, वजन यांप्रमाणे वस्तूमध्ये अस्तित्वात असतो का? या प्रश्नाचे उत्तर होकारार्थी असते, तर या गुणधर्माचा नेमका निर्देश आपल्याला करता आला असता. सगळ्यांत महत्त्वाचे म्हणजे एखादी वस्तू सुंदर आहे की नाही याबद्दल टोकाचे मतभेद झाले नसते, एवढेच नव्हे, तर मतभेद झालेच असते, तर ते वस्तुनिष्ठ पद्धतीने मिटवणे शक्य झाले असते. एखादी वस्तू जड आहे की हलकी याबद्दलची मते व्यक्तिनिष्ठ असू शकतात, पण त्याच वस्तूचे वजन नक्की किती आहे, हे वस्तुनिष्ठपणे मोजता येते. सौंदर्य या गुणधर्माबाबत मात्र असा व्यक्तिनिरपेक्ष, वस्तुनिष्ठ निष्कर्ष काढता येऊ शकत नाही.

### चला करूया!

एका ग्लासात पाणी घ्या व तो हातात धरा. पाण्याचा ग्लास जड आहे किंवा नाही ते सर्वांना सांगा. तोच ग्लास पुढची १० मिनिटे त्याच स्थितीत धरून ठेवा. हाताला कळ लागली की सर्वांना सांगा. तेवढेच वजन असणारा पाण्याचा ग्लास (वस्तुनिष्ठ वास्तव) सुरुवातीला हलका व नंतर जड वाटू लागतो. (व्यक्तिनिष्ठ वास्तव) यांचा प्रत्यक्ष अनुभव घ्या. ही कृती गटांमध्येही करता येईल.

पाश्चात्त्य तत्त्वज्ञानाच्या इतिहासातील ग्रीक कालखंड आणि मध्ययुगीन कालखंड यांमध्ये सौंदर्य हे वस्तुगत म्हणजे वस्तुतच असते असे मानले जात असे. त्या काळात सौंदर्य ही संकल्पना वस्तुच्या रचनेच्या अनुषंगाने स्पष्ट केली गेली. वस्तू अनेक घटकांनी मिळून बनलेली असते. या घटकांमधून वस्तूचे गुणधर्म निष्पन्न होतात. वस्तूंच्या घटकांची रचना योग्य असेल, म्हणजेच तिच्यात सुसंवाद, समतोल, प्रमाणबद्धता, सममात्रता, लय असे गुणविशेष असतील, तर त्या रचनेला सुंदर मानले जात असे. म्हणजेच हे गुणविशेष सौंदर्याचे घटक मानले गेले. हे घटक वस्तुमध्ये असल्यामुळे सौंदर्य हा वस्तुगत गुणधर्म मानला गेला.

सौंदर्याच्या या आकलनाला आधुनिक कालखंडात डेव्हिड ह्यूम या तत्त्वज्ञाने छेद दिला. ह्यूमच्या मतानुसार सुंदरता वस्तूच्या ठिकाणी किंवा वस्तूमध्ये नसते. सौंदर्य हा वस्तूचा गुणधर्म किंवा घटक नाही, तर ते, त्या वस्तूचा अनुभव घेणाऱ्या व्यक्तीशी संबंधित आहे. एखादी वस्तू सुंदर आहे असे विधान वस्तुनिष्ठ नव्हे तर व्यक्तिनिष्ठ असते असे ह्यूम मानतो. म्हणतात ना, 'लैलाको देखना है तो मजनू की आँखोसे देखिये'। सौंदर्य हे पाहणाऱ्याच्या नजरेत असते, जे पाहतो त्यामध्ये नाही असा याचा अर्थ आहे. यामुळेच सौंदर्य 'असते' की 'भासते' असा प्रश्न निर्माण होतो. ह्यूमनंतर काही तत्वचिंतकांनी सौंदर्याला व्यक्तिनिष्ठ आणि वस्तुनिष्ठ असे दोन्ही प्रकारचे पैलू असतात असे मत मांडण्याचा प्रयत्न केला.


### चला बोलूया!

सौंदर्य 'असते' की 'भासते' यावर चर्चा करा. तुमची मते योग्य मुद्द्यांच्या आधाराने मांडण्याचा प्रयत्न करा.

सौंदर्य वस्तुगत आहे, की व्यक्तिगत या प्रश्नाशी निगडित असणारे आणखी काही महत्वाचे प्रश्न म्हणजे सौंदर्याची व्याख्या करता येईल का? सौंदर्याचे निकष ठरवता येतील का? तुम्ही विज्ञानात, गणितात अनेक व्याख्या शिकला आहात. एखाद्या शब्दाचा, त्यातून ध्वनित होणाऱ्या संकल्पनेचा अर्थ काटेकोरपणे स्पष्ट करणे हे व्याख्येचे कार्य असते. ज्या प्रकारच्या वस्तूचा निर्देश एखादी संकल्पना करते, त्या प्रकारच्या सर्व वस्तूंमध्ये अनिवार्यपणे असलेल्या गुणधर्मांचा उल्लेख व्याख्येत केला जातो. उदाहरणार्थ, 'त्रिकोण म्हणजे तीन सरळ रेषांनी सर्व बाजूंनी सीमित असलेली आकृती', ही त्रिकोणाची व्याख्या एकाच वेळी सर्व त्रिकोणांचा आवश्यक गुणधर्म सांगते, त्याचप्रमाणे त्रिकोणाचे इतर सर्व आकृत्यांपेक्षा असलेले वेगळेपणही अधोरेखित करते. ज्या ज्या गोष्टींना आपण सुंदर म्हणतो त्या

सर्वांमध्ये अनिवार्यपणे असलेले असे काही गुणविशेष असले, तर सौंदर्याची व्याख्या करता येईल. काही तत्त्वचिंतकांनी अशी व्याख्या करण्याचा प्रयत्न केला आहे. पण अनेक तत्त्वज्ञांच्या आणि विचारवंतांच्या मते सौंदर्याची व्याख्या करता येणे शक्य नाही. सौंदर्य हा वस्तुगत गुणधर्म नाही असे मानले, तर त्याची व्याख्या करता येत नाही असा निष्कर्ष निघतो. कारण व्याख्या वस्तुनिष्ठ असाव्या लागतात. सौंदर्याचे आकलन जर व्यक्तिनुसार बदलत असले, तर त्याची वस्तुनिष्ठ म्हणजेच व्यक्तिनिरपेक्ष व्याख्या करता येणार नाही.

त्याचप्रमाणे सौंदर्यानुभव व्यक्तिनिष्ठ असेल, तर सर्व व्यक्तींना मान्य होतील असे सौंदर्याचे निकषही सांगता येणार नाहीत हे स्पष्टच आहे. तुम्हांला सगळ्यांनाच हा अनुभव आला असेल, की तुम्हांला अतिशय भावलेली एखादी कथा, तुमच्या मित्रमैत्रिणींना मात्र आवडत नाही. तुम्हांला अजिबात न आवडलेली एखादी वास्तुरचना त्यांना फारच छान वाटते. ही उदाहरणे सौंदर्याचे निकष ठरवणे, सौंदर्याची व्याख्या करणे वाटते तेवढे सोपे नाही असे सुचवतात. कलांमध्ये असलेले वैविध्य, व्याख्येच्या वस्तुनिष्ठतेचा प्रश्न अधिकच जटिल करते. प्रत्येक कलेचे गुणविशेष कांही प्रमाणात तरी इतर कलांच्या गुणविशेषांपेक्षा वेगळे असतात. त्या त्या कलाविशिष्ट गुणधर्मांच्या संदर्भातच कलाकृतींच्या सौंदर्याची चर्चा केली जाऊ शकते. एखादे अमूर्त चित्र, एखादी सुरावट, एखादी कादंबरी, एखादा चित्रपट यांच्या सौंदर्याची चर्चा या सर्वांना लागू पडणारे काटेकोर निकष वापरून करणे शक्य होईल का?



**चला लिहूया!**

एखादे चित्र, कथा, चित्रपट याचे रसग्रहण करा व ते ज्या निकषांच्या आधारे केले त्या निकषांची यादी करा.

संस्कृतींचा इतिहास आपल्याला असेही शिकवतो की सौंदर्याचे निकष स्थळ-काळ-संस्कृतीनुरूपही बदलत असतात. गोरा रंग हे एकेकाळी सौंदर्याचे लक्षण मानले जाई, पण आता सावळेपणात, काळेपणातही सौंदर्य असते असे आपण मानतो. अभिजात कलांप्रमाणे लोककलांनाही सौंदर्यमूल्य असते हे आज सर्वमान्य मत आहे. एकेकाळी संस्कृत काव्यशास्त्रात साहित्य सुखान्त हवे असा एक निकष होता. बरेच नाटककार या निकषाचे पालन करत असत. पण भास आणि भवभूतीसारख्या नाटककारांनी या संकेताला छेद देणाऱ्या नाट्यकृतींची रचना केली. त्या रचनेलाही कलात्मकदृष्ट्या उच्च दर्जाचे मानले जाते.

सौंदर्याबाबतचा आणखी एक लक्षात घेण्याजोगा मुद्दा म्हणजे, प्रत्यक्ष जीवनात ज्या गोष्टी, घटना, दृश्ये आपल्याला सुंदर वाटत नाहीत, त्यांचे कलेमधून झालेले सादरीकरण सुंदर वाटू शकते. रस्त्याच्या कडेला साठलेला कचऱ्याचा मोठा ढिगारा कुणाला सुंदर वाटत नाही, पण त्याचे चित्र काढले तर ते चित्र सुंदर असू शकते. त्या चित्राचे मूल्यमापन कलाविषयक निकष लागू करून आपण करू शकतो. कलेशी, कलाकृतीशी निगडित सौंदर्यानुभवाची, एवढेच नव्हे, तर एकूणच कलानुभवाची चर्चाही सौंदर्यमीमांसेत केली जाते. या चर्चेची ओळख करून घेण्यासाठी आधी कलेचे स्वरूप आणि कलेचा इतिहास समजून घ्यायला हवा.

## कलेचे स्वरूप

कलेबद्दल विचार करताना प्रामुख्याने कलाकृती किंवा कलावस्तू, तिची निर्मिती करणारा कलाकार आणि तिचा आस्वाद घेणारा, अनुभव घेणारा आस्वादक या तीन घटकांकडे लक्ष पुरवावे लागते. हे करताना कलेबद्दल लक्षात येणारा एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे कला ही मनुष्यनिर्मित असते. निसर्गतः उपलब्ध नसणाऱ्या गोष्टी निर्माण करण्याचे सामर्थ्य किंवा सर्जनशीलता कलाकारामध्ये असते. या दृष्टिने कला ही माणसाच्या सर्जनाच्या क्षमतेचा, निर्मितीक्षमतेचा एक आविष्कार आहे. जीवनोपयोगी वस्तू, उपकरणे, साधने बनवणे हेही याच क्षमतेमुळे शक्य होते. मानवी संस्कृतीच्या आरंभीच्या काळात या दोन्ही प्रकारच्या निर्मिती हातात हात घालूनच होत असत. माणसाच्या ज्ञाता, कर्ता या रूपाप्रमाणेच त्याचे निर्माता, आस्वादक हे रूपही पुरातन काळापासूनच असल्याचे अभ्यासकांनी केलेल्या संशोधनात आढळते. अश्मयुगीन काळापासूनचे मानवी कारागिरीचे, कलेचे नमुने संशोधकांना सापडले आहेत.

मागच्या वर्षीच्या पुस्तकातील भीमबेटका इथले गुंफाचित्र तुम्हांला आठवते का? या गुंफाचित्राला आपण कलाकृती म्हणतो, पण त्याच काळात सापडलेल्या अवजारांना, भांड्यांना आपण कलाकृती म्हणत नाही. याचा अर्थ असा, की एखाद्या गोष्टीला 'कलाकृती' संबोधण्यासाठी ती मनुष्यनिर्मित असणे आवश्यक असले, तरी पुरेसे नाही. त्याव्यतिरिक्तही काही गुणधर्म तिच्यात असले, तरच तिला कलाकृती म्हणता येते. इंद्रधनुष्य मानवनिर्मित नाही, म्हणून 'कलाकृती' नाही हे स्पष्ट आहे. पण शिकारीसाठी वापराच्या धनुष्याला मानवनिर्मित असूनही कलाकृती म्हणता येत नाही. पण समजा कुणीतरी फुलापानांचे धनुष्य तयार केले, तर त्याला 'कलाकृती' म्हणता येईल. फुलापानांचे धनुष्य मनुष्यनिर्मित तर आहेच, पण ते कुठल्यातरी व्यावहारिक किंवा इतर उपयोगासाठी तयार केलेले नसते. ते तयार करण्यात कलाकाराला विशिष्ट प्रकारचा आनंद मिळत असतो, तसाच ते बघणाऱ्यालाही विशिष्ट प्रकारचा आनंद मिळतो. या प्रकारच्या आनंदाची चर्चा आपण सौंदर्यानुभवाचे स्वरूप समजावून घेताना केलेलीच आहे. त्यापुढे जाऊन आता हे लक्षात घ्यायला हवे, की कलानुभव हा निव्वळ सौंदर्यानुभव असतो असे नाही, एवढेच नव्हे तर तो सौंदर्यानुभवच असेल असेही नाही.

कलेच्या तत्त्वज्ञानात ललित कलांची चर्चा केली जाते. साहित्य, संगीत, नृत्य, नाट्य, चित्र, शिल्प इत्यादींना ललित कला म्हणून ओळखले जाते.

**चला करूया!**

आपल्या परिसरातील लोककलांविषयी माहिती जमवा. या माहितीचे वर्गात प्रदर्शन आयोजित करा.

ज्या कलांमध्ये निर्मिती करण्यामागचा हेतू उपयुक्तता नाही, तर आस्वाद आहे, त्या कलांना 'ललित-कला' म्हटले जाते. माणूस ज्या वस्तू बनवतो, त्यांतील अनेक प्रकारच्या वस्तू उपयुक्तही असतात तशाच कलेच्या दृष्टीने आकर्षकही असतात. कपडे, वाहने, भ्रमणध्वनी या उपयुक्त वस्तू खरेदी करताना आपण त्यांच्या उपयुक्ततेबरोबरच त्यांच्या आकर्षकपणाचाही विचार करतो. तरीही त्यांचे मूल्य मुख्यत: उपयुक्तता-मूल्यच असते.



याउलट कविता, गाणे, वाद्यवादन, चित्र इत्यादी गोष्टींचा आस्वाद घेतला जातो. त्यांना कला-मूल्य असते. काही प्रसंगी त्यांना उपयुक्तता-मूल्यही असले, तरी त्यांचे प्राथमिक मूल्य कला-मूल्य असते. एखाद्या छोट्या कलात्मक पुष्पपात्राचा उपयोग आपण कागद उडून जाऊ नयेत म्हणून ठेवायचे वजन म्हणून करू शकतो. तेव्हा त्याला उपयुक्तता-मूल्यही असते पण ते गौण असते. त्याचे मुख्य मूल्य कला-मूल्यच असते. एखादी कला याला अपवाद असते, कारण वास्तुरचना करताना ही वास्तू कशासाठी वापरायची आहे हे ध्यानात घेऊनच वास्तुनिर्मिती केली जाते. तरीही ताजमहाल किंवा व्हॅटिकनचे चर्च यांसारख्या वास्तू, वेरूळचे कैलास लेणे इत्यादी वास्तुरचनांची गणना अप्रतिम कलाकृतींमध्ये होते.

एकाअर्थी, माणसाला निसर्गाचा जो अनेकपदरी अनुभव येत होता, तो माणसाच्या कलाप्रेरणांच्या मुळाशी होता. माणूस पंचेंद्रियांद्वारा ज्याप्रमाणे रूप, रंग, गंध, रस, ध्वनी, पोत यांच्या संवेदना ग्रहण करत होता, त्याचप्रमाणे बुद्धीद्वारे नैसर्गिक घटनाप्रवाहांमधले रचनाबंधही जाणून घेत होता. त्याचबरोबर निसर्गाशी त्याचे भावबंधही जुळत होते. निसर्गातून माणसाला जगण्यासाठी आवश्यक सामग्री मिळते, तसेच काही नैसर्गिक घटनांमधून जीवन उद्ध्वस्तही होते. निसर्ग माणसाला मोहवतो, भयभीत करतो, स्तिमित करतो आणि चक्रावूनही टाकतो. माणसाचे निसर्गाशी असलेले नाते संवादाचेही आहे आणि संघर्षाचेही. निसर्गाची जी रूपे माणसाला कळत होती, ज्या भावना त्या रूपांमुळे निर्माण होत होत्या त्यांचे प्रकटीकरण कलानिर्मितीमध्ये दिसून येते. त्याच वेळी विश्वाच्या अस्तित्वाचा, विश्वामधील घटनांचा, प्रक्रियांचा अर्थ लावण्याचा

प्रयत्नही कलेत आढळून येतो.

माणसाची संवेदनक्षमता, बुद्धिशीलता, भावनाशीलता, कल्पनाशक्ती या सगळ्यांच्या एकत्रित परिणामांमधूनच संस्कृतीचा उगम झाला. आपण मागील वर्षी पाहिल्याप्रमाणे संस्कृतीच्या आरंभकाळात या क्षमता पुराकथा, तत्त्वज्ञान, धर्म, कला, विज्ञान या सगळ्यांमधून अभिव्यक्त झाल्या. कलाविष्कारामध्ये या सर्व क्षमतांना सर्जनशीलतेची जोडही मिळाली आणि संस्कृतीच्या विकासाबरोबरच माणसाचे कलाविश्वही विकसत गेले. नैसर्गिक विश्वाप्रमाणे सामाजिक विश्व, त्यातील घडामोडी, त्यामधील रचनाबंध हेही कलेचे विषय झाले. बराच काळ कलानिर्मिती धार्मिक जीवनदृष्टीशी निगडित होती. भारतातील बौद्ध, जैन लेणी आणि युरोपातील चर्च यांमध्ये आढळणारी चित्रे, शिल्पे ही यांचीच उदाहरणे आहेत. कलेची जीवनाशी, निसर्गाशी, धर्म आणि नीतीशी असणारी सांगड साधारणतः १८व्या शतकांपर्यंत कायम राहिली. यानंतरच्या काळात विज्ञान-तंत्रज्ञानाच्या झपाट्याने झालेल्या विकासाचा परिणाम इतर क्षेत्रांप्रमाणेच कलाक्षेत्रावरही पडला. कलेचे क्षेत्र अधिक स्वायत्त, स्वतंत्र होऊ लागले. कलेचे मूल्यमापन नीती, धर्म, यांच्या चौकटीत न करता कलाशास्त्रीय निकषांमधून होऊ लागले. वास्तवदर्शी, प्रतिकात्मक, रंजनात्मक अशी कलेची विविध रूपे सामोरी आली. कलानिर्मितीतील तंत्रज्ञानाचा वापर वाढला.

**चला शोधूया!**

वास्तवदर्शी, प्रतिकात्मक व रंजनात्मक कलांबाबत अधिक माहिती मिळवा.

कलांच्या विकासाच्या सुरूवातीच्या काळात कला आणि कारागिरी यांमध्ये फार फरक केला जात नसे. नंतर मात्र तसा फरक केला जाऊ लागला. कारागिरी किंवा हस्तकलांमध्ये उपयुक्तता मूल्याला प्राधान्य असते. हस्तकलांचा उपयोग साधारणपणे सजावटीसाठी केला जातो. कलेच्या तुलनेत कारागिरीत सर्जनशीलतेला कमी वाव असतो. ठराविक आकृत्या, विशिष्ट पद्धतीने वापरल्या जातात. त्या सुंदर, आकर्षक असतात, पण त्या कारागिराने स्वतंत्रपणे निर्मिलेल्या नसतात. मेंदी किंवा रांगोळी यांना या कारणानेच हस्तकला म्हटले जाते. कागदावर छापलेले आकृतीबंध जेव्हा मेंदीने किंवा रांगोळीने जसेच्या तसे रेखाटले जातात तेव्हा त्यासाठी कौशल्याची गरज असते. पण निर्मितीक्षमतेची गरज नसते, नवीन रचना तयार करताना मात्र निर्मितीक्षमता आणि कौशल्य दोन्हींची आवश्यकता असते. खरे पाहता कलाकृतीत कारागिरीचा, कौशल्याचा अंश असतोच आणि कारागिरीला कलात्मकतेचा पैलू असतोच.

## कलाप्रक्रिया आणि कलाप्रकार

याआधी पाहिल्यानुसार कलाकार, कलाकृती आणि आस्वादक किंवा रसिक हे कलेचे मुख्य घटक आहेत. कलाप्रक्रियेत निर्मिती-प्रक्रिया, सादरीकरण-प्रक्रिया आणि आस्वादन-प्रक्रिया या तीनही प्रक्रियांचा समावेश होतो. कलानिर्मितीची प्रक्रिया खूप गुंतागुंतीची असते. ती कलाकाराच्या आंतर्विश्वात घडत असते. त्यामध्ये अनेक घटक कार्यरत असतात. मानसशास्त्र, मेंदूविज्ञान या प्रक्रियेचा अभ्यास करतात पण अजूनतरी कलाकाराची ही आंतरिक प्रक्रिया नेमकी कशी घडून येते त्याचे सूत्र आपल्याला गवसेलेले नाही. कलादृष्टी सगळ्यांनाच असली, तरी कलानिर्मिती मात्र काहीजणच करू शकतात एखादा कृति आराखडा देऊन कलानिर्मिती होऊ शकत नाही. कलाकृती हे या आंतरिक प्रक्रियेचे बाह्य, दृश्य जगातले प्रकटीकरण असते. त्यासाठी कलाकार रंग, रेषा आकार, नाद, शब्द, हावभाव आणि हालचाली यांसारखी माध्यमे वापरून कलेचे सादरीकरण करतो. हे सादरीकरण, म्हणजेच कलाकृती, रसिकाला आस्वादनासाठी उपलब्ध होते. आस्वाद म्हणजे कलानुभवाला आस्वादकाचा उत्स्फूर्तपणे आलेला प्रतिसाद. हा प्रतिसाद आस्वादकाला कलाकृती भावली किंवा नाही हे दर्शविणारा असतो. तो काळाच्या ओघात परिणत होत जातो. काही आस्वादक याच्यापुढे जाऊन समीक्षकाच्या भूमिकेतून कलाकृतींचे विश्लेषण, मूल्यमापन, रसग्रहण करतात. वृत्तपत्रांत आणि इतर नियतकालिकांत तुम्ही असे समीक्षण वाचले असेल.

**चला बोलूया!**

माध्यमांतर हा विषय घेऊन हॅरि पॉटर ही कादंबरी व सिनेमा याबद्दल वर्गात चर्चा करा.

कलाकार कलावादी दृष्टिकोनातून निसर्गाची, समाजाची, जीवनाची अनेकविध रूपे त्यांच्या विशिष्टतेसहीत अनुभवत असतो. विश्वाला, जीवनाला त्यांतील अनेकतेसह, विविधतेसह आणि विशिष्टतेसह सामोरे जाण्याचा, त्यांना जाणण्याचा प्रयत्न करत असतो. त्याला त्या त्या अस्तित्वप्रकाराचे मर्म जाणून घ्यायचे असते. वैज्ञानिक किंवा उपयुक्ततावादी दृष्टिकोनातून निसटून गेलेले, अप्रकट राहिलेले अस्तित्व, स्वरूप कलाकार अनुभवत असतो. हा अनुभव फक्त सौंदर्याचाच असत नाही. जीवनाच्या विश्वाच्या बऱ्यावाईट, सुरूप–कुरूप सगळ्यांच बाजू त्याच्या जाणीवेच्या कक्षेत येतात. त्यांचा त्याला जाणवलेला, समजलेला अर्थ तो कलाकृतीमधून सादर करत असतो. या अर्थाने कलानुभव हा फक्त सौंदर्याचा अनुभव नसतो. कलेचे क्षेत्र जेव्हा स्वायत्त होऊ लागले तेव्हा कलानुभवाची व्यामिश्रता लक्षात येऊ लागली आणि कलाकृतीच्या मूल्यमापनासाठी उपयोगात आणण्याच्या निकषांची स्वतंत्रपणे चर्चा होऊ लागली. काळाच्या ओघात सौंदर्यमीमांसेची जागा

### कलाविषयक काही पाश्चिमात्य सिद्‌धांत

पाश्चिमात्य परंपरेत ग्रीक कालखंडापासून ते आजपर्यंत कलाविषयक आणि सौंदर्यविषयक प्रश्नांची चर्चा करण्यात तत्त्वचिंतकांना रस असल्याचे दिसून येते. कलाविषयक बाबींमध्ये कलानिर्मिती कशी शक्य होते? त्यामागील प्रेरणा काय असते? निर्माण झालेल्या कलाकृतीचे नेमके स्वरूप काय असते? कलाकृतीचे वैशिष्ट्य काय असते? अशा प्रकारच्या अनेक प्रश्नांबाबतचे दृष्टिकोन तत्त्वचिंतक आणि कलाकार यांनी व्यक्त केले आहेत.

ग्रीक तत्त्वचिंतक प्लेटोच्या मते, कलाकृती ही अनुकृती आहे. तुम्हांला माहीतच आहे, की अनुकृती ही नेहमी कशाची तरी नक्कल असते. प्लेटोच्या मते, कलाकृती ही निसर्गातील वस्तू अथवा दृश्यांची असते. तसेच ती मानवी विश्वातील व्यक्ती आणि घटना, प्रसंगांची असते. प्लेटोच्या मते, नैसर्गिक विश्व हीच मुळात आकारांच्या विश्वाची अनुकृती आहे आणि मानवी विश्व ही नैसर्गिक विश्वाची अनुकृती आहे. त्यामुळेच कलाकृती ही अनुकृतींची अनुकृती आहे. विश्वाशी निगडित सत्याचे स्वरूप जाणण्यासाठी कला महत्त्वाची नाही. नाट्य, महाकाव्ये यांतून देवदेवतांचे जे चित्रण केले जाते ते मानवी स्वभावाला खूप जवळ जाणारे असते. माणसाप्रमाणेच देवही एकमेकांचा राग, द्‌वेष करताना दिसतात, संघर्ष करताना दिसतात. या प्रकारच्या चित्रणामुळे देवांविषयी मानवाच्या मनात आदराची, सन्मानाची भावना तयार होणार नाही. योग्य धार्मिक भावना विकसित करण्यासाठी ईश्वर हा माणसापेक्षा वेगळा, श्रेष्ठ आहे, असे चित्र मानवी मनात ठसणे आवश्यक आहे. ईश्वराबद्‌दलच्या आदरयुक्त भीतीतून माणसाला नैतिक कृती करण्याची प्रेरणा मिळेल. म्हणूनच नैतिक दृष्टिकोनातूनही प्लेटोला कलेचे मूल्य उचित वाटत नाही. आदर्श राज्यनिर्मितीसाठी तत्त्वचिंतक राजाला जे नैतिक शिक्षण द्‌यायचे आहे त्या शिक्षणाच्या अभ्यासक्रमात कलेला स्थान नसावे अशी भूमिका प्लेटोने घेतली आहे.

ग्रीक कालखंडात तसेच मध्ययुगीन कालखंडात कलेचा विचार मुख्यतः सत्य, ज्ञान, नीती यांच्या अनुरोधाने झाला. कला प्रक्रियेचा विचार करताना कलाकृती आणि तिचा होणारा परिणाम या अनुषंगाने कला आणि कलाकृती यांचे महत्त्व आणि मूल्य पाहिले गेले. प्रबोधन काळानंतर जसजशी धर्माच्या प्रभावातून राजकारण, समाजकारण, अर्थकारण इ. क्षेत्रे स्वतंत्र झाली, तसतसा नीती आणि कला या क्षेत्रांवरही या घडामोडींचा परिणाम झाला. कला प्रक्रियेत कलाकार आणि कलाकृती हे घटक मध्यवर्ती ठरू लागले. कला म्हणजे कलाकाराच्या अंतर्विश्वाचे म्हणजेच भावविश्वाचे, कल्पनाविश्वाचे बाह्य प्रकटीकरण असा विचार व्यक्त होऊ लागला. या विचाराला कलेबाबतचा अभिव्यक्तिवाद अथवा आविष्कारवाद असेही म्हटले जाते. क्रोशे यांचा कला म्हणजे अंतःप्रज्ञा अथवा अंतःस्फूर्ती हा दृष्टिकोन किंवा टॉलस्टॉय यांचा कला म्हणजे संप्रेषण दृष्टिकोन हे या दृष्टिकोनाचे भिन्न आविष्कार आहेत.

क्रोशे यांच्या मतानुसार,कलानिर्मिती ही बौद्‌धिक प्रक्रिया नाही. निसर्गात, समाजात जे काही घडत असते, कलाकार जे काही अनुभवत असतो, त्यावर तो चिंतन करत असतो, त्यावर काही रचना करत

असतो. कलाकाराच्या मनात, भावविश्वात जे काही घडत असते त्यातून उत्स्फूर्तपणे कलाकाराच्याच मनात उमटलेला, प्रकट झालेला त्याचा प्रतिसाद म्हणजे कला. उत्स्फूर्तपणे मनात अभिव्यक्त झालेली ही कला अतिशय सूक्ष्म, तरल अशा प्रतिमांच्या स्वरूपाची असते. ती शुद्ध, निखळ असते. ही मनात निर्माण झालेली प्रतिमा इतर व्यक्तींपर्यंत संप्रेषित करण्यासाठी कलाकार बाह्य माध्यमांच्या साहाय्याने तिची मांडणी करतो. या मंडणीत तिचे निखळ स्वरूप काहीसे बाधित होते. बाह्य अभिव्यक्तीत कलात्मकतेच्या जोडीला कारागिरी, कौशल्य यांचा उपयोग केला जातो. कलाकृतीच्या, भावात्मकतेच्या सूक्ष्म, तरल रूपाला यामुळे काहीसा छेद दिला जातो. आस्वादक जेव्हा ही कलाकृती अनुभवतो तेव्हा तो आस्वादनाच्या प्रक्रियेत या शुद्ध, निखळ रूपाला, सूक्ष्म, तरल भावनांना अनुभव शकतो. आस्वादकाचे अंतर्विश्व या अनुभवाने समृद्ध होते. कलाकृतीचा बाह्याविष्कार म्हणजे जणूकाही कलाकार आणि आस्वादकाच्या अंतर्विश्वांना जोडणारा सेतू असावा असे क्रोशेच्या या मांडणीतून वाटते. क्रोशेच्या मते खरी कला ही कलाकाराच्या मनातील अंत:प्रज्ञेतून स्फुरलेले तिचे भावात्मक, प्रतिमास्वरूप.

टॉलस्टॉयच्या मते, सौंदर्य ही कला प्रक्रियेतील मध्यवर्ती संकल्पना नाही. कलाकाराने निर्मिलेली कृती सुंदर असेल पण सौंदर्यनिर्मिती हे कलेचे प्रयोजन नाही, कला महत्त्वाची. कारण कला म्हणजे मानवी हृदयांमधील संवाद. कला मानवी भावविश्वाला, मानवी हृदयाला साद घालत असते. माणसामाणसांना भावात्मक स्तरावर एकत्र आणण्याचे, त्यांच्यात संवाद निर्माण करण्याचे कार्य कला करत असते. महान कलाकृतीचे महत्त्व, मूल्य हे स्थळकाळातीत असते, सार्वत्रिक असते. कलानिर्मिती आणि कलास्वाद या टॉलस्टॉयच्या मते, मानवी जीवनातील महत्त्वपूर्ण कृती आहेत. कलाव्यवहार हा सामाजिक व्यवहाराचा अन्योन्य भाग आहे. उत्तम कलाकृतीत मानवी जीवनमूल्यांचे, जीवनसंघर्षाचे या जीवनसंघर्षात आपले स्वत्व आणि सत्त्व जपण्याच्या, टिकवण्याच्या मानवी प्रयत्नांचे चित्रण असते, असले पाहिजे असे टॉलस्टॉय मानतो. टपरीवर चहा विकणाऱ्या माणसाच्या हृदयालाही साद घालेल असा कलेचा आशय आणि स्वरूप असले पाहिजे. टॉलस्टॉय म्हणूनच कलेचे वर्णन मूलभूत, वैश्विक, मानवी भावनांचे, नैतिक मूल्यांचे संप्रेषण करणारी कृती असे करतो.

कलामीमांसेने घेतली आणि सौंदर्यमीमांसा (aesthetics) ही तत्वज्ञानाची शाखा 'कलेचे तत्वज्ञान' म्हणूनही ओळखली जाऊ लागली.

मानवी निर्मितीक्षमतेच्या प्रवासाची सुरुवात विविध प्रकारची भांडी, अवजारे, हत्यारे अशा जीवनोपयोगी वस्तू तयार करण्यापासून झाली. प्रारंभी ओबडधोबड असणारी ही निर्मिती हळूहळू अधिकाधिक सुबक, आटोपशीर आणि आकर्षक व्हायला लागली. यासाठी अर्थातच निसर्गात उपलब्ध असलेल्या माती, दगड, झाडांच्या फांद्या, प्राण्यांची हाडे यांसारख्या वस्तूंचा वापर केला गेला. काळाच्या ओघात उपयुक्तता ही निर्मितीमधून व्यक्त व्हायला लागली. वेगवेगळ्या आकारांचे दगड, शंख, शिंपले, हस्तिदंत यांपासून विविध आकाराचे दागिने बनवण्यास सुरुवात झाली. गुहा, घरे, प्रार्थनास्थळे यांच्या भिंती चित्रांनी सजू लागल्या. निसर्गात दिसणारे प्राणी, पक्षी यांच्या आकृत्या माणूस तयार करू लागला.

कलेच्या सादरीकरणासाठी जी माध्यमे वापरली जातात, त्यांच्या आधारावर ललित-कलांचे वर्गीकरण केले जाते. ज्या कला दृश्य माध्यमाचा वापर करतात, म्हणजेच ज्यांचा आस्वाद आपण डोळ्यांनी मिळणाऱ्या संवेदनांमार्फत घेतो त्यांना दृक्-कला म्हणतात. चित्रकला, शिल्पकला, स्थापत्यकला या दृक्-कला आहेत. संगीतामध्ये मग ते कंठसंगीत असो वा वाद्यसंगीत ध्वनीचे माध्यम उपयोगात आणले जाते. आपण कानांनी त्या ध्वनीचे श्रवण करतो, म्हणून संगीतही श्राव्यकला आहे. साहित्य शब्दांचे माध्यम वापरते, शब्द बघितले, वाचले जाऊ शकतात किंवा साहित्य ऐकलेही जाऊ शकते. परंतु त्यामुळे साहित्याला दृक किंवा श्राव्य म्हणता येत नाही. कारण शब्द म्हणजे

निव्वळ कागदावरच्या खुणा किंवा ध्वनी नसतात. त्यांना अर्थ असतो. शब्द प्रतिके असतात. म्हणून साहित्याला प्रतिकात्मक कला म्हटले जाते. ज्या कलांमध्ये निरनिराळ्या माध्यमांचा एकत्रितपणे वापर होतो, त्यांना मिश्र कला किंवा दृक्-श्राव्य कला म्हणतात. उदाहणार्थ नृत्य, नाटक, चित्रपट इत्यादी.



**चला करूया!**

विविध कलाप्रकार, त्यांचे उपप्रकार व उदाहरणे यांच्या साहाय्याने ललित कलांचा mind map तयार करा.

कलाकृतींचे सादरीकरण ज्या माध्यमांमधून होते. त्यांचे अवकाश आणि कलेशी विशिष्ट स्वरूपाचे नाते असते. संगीतात वापरल्या जाणाऱ्या स्वर आणि लयीचे अस्तित्व काळाशी निगडित असते. अवकाशातील त्यांचे स्थान आपल्याला सांगता येत नाही. संगीताला कालाभिमुख कला म्हणतात. चित्रकलेसारख्या दृक् कला अवकाशाशी निगडित असतात. नृत्यनाटिका, चित्रपट यांसारख्या कलांमध्ये कलाकारांचे देह हेच माध्यम असते. त्यांना रंगमंच, नेपथ्य या अवकाशातील घटकांची जोड असते. त्याचप्रमाणे या कलांमार्फत जी कथा उलगडली जाते तिला काळाचाही संदर्भ असतो. भूत-वर्तमान-भविष्यातील घटनांचा मेळ त्यांमध्ये असतो. असाच काळ आणि अवकाश या दोन्हींचा उपयोग साहित्यातही होतो. या सर्व कलांना काल-अवकाशाभिमुख कला म्हणतात.

**चला बोलूया!**

आपल्याला भावलेल्या एखाद्या कलाकृती/कलाविष्कारावर वर्गात चर्चा करा.

## कलेची उद्दिष्टे

कलेमधून माणूस काय साध्य करू बघत असतो याची चर्चा फार पूर्वीच्या काळापासून झाली आहे. प्लेटो आणि ॲरिस्टॉटल या ग्रीक तत्वज्ञांनी कला निसर्गाचे, समाजजीवनाचे अनुकरण करत असते असे मत मांडले. या मताप्रमाणे कलाकृती ही वास्तवाची अनुकृती म्हणजे नक्कल असते. हे अनुकरण ढोबळ, स्थूल आणि वरवरचे असू शकते किंवा तरल, सूक्ष्म आणि मर्मग्राही असू शकते. या मताचा प्रभाव मध्ययुगातही होता. प्रबोधनानंतरच्या काळातल्या विचारवंतांचा कल कलेला कलाकाराच्या अंतर्विश्वाची, भावविश्वाची अभिव्यक्ती मानण्याकडे होता. कॉलिंगवूड, क्रोशे यांनी या मताचा पुरस्कार केला. २०व्या शतकात, रशियन साहित्यिक टॉलस्टॉय यांनी संप्रेषण हे कलेचे उद्दिष्ट असते असा विचार मांडला. मानवी भावभावना, संवेदना आणि मूल्ये यांच्या संप्रेषणामधून एक वैश्विक समाज निर्माण करण्यासाठी कला हे एक प्रभावी माध्यम आहे असे ते मानीत.

सर्वसाधारण व्यक्तींप्रमाणे अनुभवाच्या तपशीलात न अडकता कलाकार वस्तूंचे आशयमर्म, रचनाबंध टिपतो. अनुभव प्रत्यक्षात कसा आला, याच्या पलीकडे जाऊन तो कसा असू शकला असता, त्याच्या शक्यता, कल्पनेच्या, विचारांच्या पातळीवर ग्रहण करतो. यामुळेच कलाकृतीची मांडणी वास्तव आणि कल्पना, वास्तव आणि शक्यता यांचे मिश्रण असते.

नैसर्गिक आणि सामाजिक वास्तवांचे, संशोधन आणि उपयोजन यांच्या पलीकडचे आकलन करून घेणारी कला हे संस्कृतीचे फार महत्वाचे अंग असते. संस्कृतीच्या वेगवेगळ्या पैलूंमध्ये माणसाच्या नैसर्गिक क्षमतांचा आविष्कार झालेला असतो. कलानिर्मिती आणि कलास्वाद या मानवी क्षमता संस्कृतीच्या विकासाबरोबर विकसत जातात असे दिसते. सामाजिक, राजकीय, आर्थिक परिस्थितीचाही कलेवर परिणाम होत असतो. कला संस्कृतीचे असे अंग आहे की जे परंपरा आणि बदलता काळ या दोन्हींशी निगडित असते. ती परंपरेला जिवंतही ठेवू शकते आणि तिला गतिशील, कालसुसंगतही बनवू शकते. सामाजिक परिस्थितीवर भाष्य करणाऱ्या, चिकित्सा करणाऱ्या कलाकृती चांगल्या

## भारतीय (संस्कृत) परंपरेतील कलाविचार

सौंदर्य आणि कला यांच्या विविध अंगांची चर्चा करणारी संपन्न परंपरा संस्कृत साहित्यात आढळून येते. या परंपरेची सुरुवात इ.स.१ल्या शतकात भरतमुनींच्या 'नाट्यशास्त्र' या ग्रंथापासून होते. या ग्रंथात नाट्यलेखन व नाट्यप्रयोग या दोन्हींचेही विस्तृत आणि सखोल विवेचन आहे. नाट्यनिर्मिती आणि नाट्यास्वाद यांच्या संदर्भात भरताने रस आणि भाव या संकल्पनांची चर्चा केली आहे. भरताचा रस-भावविचार हा भारतीय सौंदर्यमीमांसेतील मूलभूत आणि महत्त्वपूर्ण विचार आहे. इ.स.६व्या शतकात भामहाने नाटकेतर साहित्याला लागू पडणाऱ्या सौंदर्यविचारांच्या मांडणीस सुरुवात केली. भामहाने अलंकार हा शब्दप्रयोग साहित्याबाबतच्या सौंदर्यविषयक चर्चेसाठी वापरला. अलंकार म्हणजे साहित्य/काव्याची शोभा वाढवणारे घटक. भामह आणि दण्डी यांनी केलेली अलंकारशास्त्राची मांडणी महत्त्वपूर्ण आहे. वामनाने 'रीती' हे सौंदर्यतत्त्व या रूपात सादर करून साहित्यात आशय आणि आशयाची मांडणी हे दोन्हींही महत्त्वाचे असते असे मत मांडले. काव्याचे सौंदर्य हे आशय-घनता आणि त्या आशयाला सादर करणारा रचनाबंध या दोहोंशीही संबंधित असते हे अधोरेखित केले. आनंदवर्धनाने 'ध्वनि' या तत्त्वाची मांडणी केली. साहित्याला जो सूचितार्थ असतो तो साहित्याला कलेचा दर्जा प्राप्त करून देतो हे त्याने अधोरेखित केले. माघकवीने सौंदर्यासाठी रमणीय हा शब्द वापरलेला दिसून येतो. 'जे क्षणाक्षणाला नवीन दिसते ते सुंदर', अशी सौंदर्याची व्याख्या त्याने केली आहे.

संस्कृत साहित्यशास्त्र विचाराला संपन्न अशी संस्कृतातील साहित्याची पार्श्वभूमी होती असे आपल्याला दिसून येते. कलेचे प्रयोजन काय याचाही विचार भारतीय परंपरेत झालेला दिसतो. भरताने (१) योग्य, अयोग्य काय यांविषयीचे विवेचन, जाणीव निर्माण करणे आणि (२) आनंद (विश्रांतीजनन) ही जाणीव अप्रत्यक्षरित्या कलात्मक पद्धतीने विकसित करणे असे कलेचे दुहेरी प्रयोजन मानलेले दिसते, ज्यामुळे आपल्यासाठी हितकर काय याचा बोध होतानाच तो बोध आनंद निर्माण करणाराही असेल.

भरताने नाट्यशास्त्रात रस सिद्धांताची मांडणी केली. रंगमंचावर नट व नटी आपल्या अभिनयाद्वारे नाटककाराची संहिता प्रेक्षकांसमोर सादर करतात. संहिता आणि अभिनय उत्तम आणि अनुरूप असेल तर रंगमंचावर रसाची निर्मिती होते. म्हणजेच रस हा आस्वाद्य असतो आणि आस्वादक या रसाचा अनुभव घेतो. भरतानंतर अनेक कलामीमांसकांनी रस सिद्धांताची मांडणी केली. भरताने शृंगार, करुण, हास्य, वीर, भयानक, रौद्र, बीभत्स व अद्भूत अशा आठ रसांची मांडणी करून सविस्तर चर्चा केली. अभिनवगुप्तांनी या आठ रसांमध्ये नवव्या शांत रसाची भर घातली.

भारतीय परंपरेत सौंदर्यानुभवाला अडथळा आणणाऱ्या घटकांचीही 'रसविघ्न' या संकल्पनेच्या अंतर्गत चर्चा केलेली दिसून येते. भारतीय परंपरेत संगीत, शिल्प, स्थापत्य इ. कलांविषयीची शास्त्रशुद्ध चर्चा करणारेही ग्रंथ लिहिले गेलेले दिसून येतात. तसेच सर्व कलांमध्ये काही परस्परसंबंध आहे, एकसूत्रता आहे असाही विचार मांडलेला आपल्याला आढळून येतो. (कलेतील परस्परसंबंध दाखवणारा विष्णुधर्मोत्तर पुराणातील संवाद आठवतो ना?)

निरोगी समाजजीवनासाठी अतिशय महत्त्वाच्या असतात. भावनांची आशयसंपन्न अभिव्यक्ती करणाऱ्या कलाकृती व्यक्तीचे भावजीवन समृद्ध करत असतात. त्याचबरोबर त्याबद्दलची व्यक्तीची जाणीव अधिक सूक्ष्म आणि सखोल करतात. आपले अनुभवविश्व संपन्न करणारा, आपल्याला अंतर्मुख करणारा, आनंद देणारा, अनेक शक्यतांच्या संदर्भात वास्तवाची चिकित्सा करणारा कलानुभव, व्यक्ती आणि समाज या दोन्हींच्या सर्वांगीण घडणीसाठी अत्यंत आवश्यक असतो. कलेचे स्वरूप, कार्य तसेच धर्म, तत्त्वज्ञान, विज्ञान यांच्याशी कलेचे असलेले संबंध या सगळ्यांचे भान कलेचे तत्त्वज्ञान आपल्याला करून देते. कलेच्या वाटेने जात आपले

जीवन समृद्ध करताना हे भान आपल्याला खूप मदत करते.

## वैज्ञानिक दृष्टिकोन

'कारण म्हणजे काय' या पाठात आपण पाहिले की कलेचा प्रांत हा मुख्यतः व्यक्तिनिष्ठ आणि आंतरव्यक्तिनिष्ठ अनुभव आणि अनुभूतींचा प्रांत आहे. विज्ञान वस्तुनिष्ठ वास्तवातील वस्तू/घटितांचा अभ्यास करते. असे असताना कलेच्या बाबतीतला विज्ञानविचार हा व्याघात तर ठरत नाही?

यांतील वस्तुस्थिती अशी आहे, की कलेच्या प्रांतातील अनेक गोष्टी वरपांगी वस्तुनिष्ठ वास्तवाचा भाग नसल्या तरी त्यातही उत्क्रांतीच्या प्रक्रियेतील काही घडामोडी कारणीभूत आहेत असे अभ्यासकांना दिसून आले. आपल्या आजूबाजूच्या प्राणीपक्ष्यांकडे पाहिले तर असे दिसून येते, की 'सजणे/सजवणे' ही गोष्ट काही फक्त माणसांपुरती मर्यादित नाही. अनेक पक्षी अतिशय सुबक घरटी बांधतात. ती त्यांची जीवनावश्यक कृती आहे असे म्हटले तरी काही पक्षी त्याहून पुढे जाऊन घरटे चक्क 'सजवतात'. बोअर बर्ड या नावाने ओळखला जाणारा पक्षी जमिनीवर घरटे उभे करतो आणि तसे करताना त्यात रंगीबेरंगी फुलं, पानं आणि मिळेल त्या वस्तू आणून घरटे चक्क शोभिवंत करतो. अशा 'सुंदर' घरट्याकडे मादी आकृष्ट झाली नाही तरच नवल!

तसेच माणूस प्रजातीशी जवळच्या प्रजातीत म्हणजे कपी किंवा वानरकुळातदेखील या प्रकाराने स्वतःला सजवण्याचे वर्तन दिसून येते. चिंपांझी मादीला रीबिनी, लेस वगैरे माणूस मादीप्रमाणे डोक्यात घालून बघावेसे वाटल्याच्या नोंदी आहेत. यांतून प्राणी नेमका काय विचार करत असतील हे कळणे अवघड असले तरी त्यांच्या आणि आपल्या सौंदर्यविषयक वर्तनातील सारखेपणा कळल्यावर आपण चकित होते.

आता माणसांकडे वळूया. त्यांच्या आवडी-निवडीत वस्तुनिष्ठ असे काय असते? कुणाला कुठले चित्र आवडावे हा ज्याच्या त्याच्या आवडीचा प्रश्न. परंतु तुम्ही कधी हे निरीक्षण केले आहे का की दवाखाने किंवा रुग्णालयांत कोणती किंवा कशा प्रकारची चित्रे लावलेली असतात? आठवून बघितल्यावर तुम्हांला जाणवेल की या चित्रांत अनेकदा सुंदर निसर्गदृश्ये असतात किंवा लहान मुलांची चित्रे अथवा छायाचित्रे. याचे कारण काय असेल? पिकासोचे चित्र कुणाला आवडेल, कुणाला नाही किंवा कुणी नुसतेच 'काही कळत नाही बुवा या चित्रातील' असे म्हणेल. परंतु निसर्गदृश्ये आणि त्यातही अशी निसर्गदृश्ये ज्यांत पाणी (जलाशय) आहे, वृक्षराजी आहे, ही दृश्ये सर्वांना 'कळतात' एवढेच नव्हे तर त्यांच्याकडे बघून माणसांना त्वरित बरे वाटते. ही बरे वाटण्याची भावना काही नेहमी जाणवण्याएवढी ठळक असते असे नव्हे. पण आपल्याही नकळत आपल्या मेंदूने त्याची नोंद घेतलेली असते एवढे खरे. मेंदू त्याची नोंद घेतो हे आता आपल्याला मेंदू संगणकाशी जोडून प्रत्यक्ष पाहतादेखील येते. दवाखाने आणि रूग्णालये येथे पूर्वापार निसर्गदृश्ये लावण्याची पद्धत आहे. प्रयोग न करताच माणसाचा हा स्वभाव लक्षात आल्यानेच ही परंपरा सुरू झाली असणार. यात मानवी स्वभावाचे अचूक निरीक्षणच दडलेले आहे.



निसर्ग आणि लहान मुले यांची दृश्ये जगभरातील माणसांना का बरे आवडत असतील? कदाचित याचे रहस्य आपल्या उत्क्रांतीच्या इतिहासात दडलेले आहे. पाणी आणि अन्नाची समृद्धता या गोष्टी आपल्या पूर्वजांसाठी जीवनावश्यक होत्या. पाण्याकडे, सुघड भूमीकडे, वृक्षराजींकडे बघून त्यांचे डोळे निवत असतील. तीच गोष्ट लहान मुलांच्या चित्रांबद्दलची. पुढल्या पिढीची ज्यांनी चांगली जोपासना केली त्यांचेच वंशज टिकले असे असल्यामुळे मुलांची चित्रे माणसांना बघायला आवडतात हे समजू शकते. अर्थात, ही गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे की यालाही अपवाद असतात.

असेही भेटू शकतात की ज्यांना एखादे सुंदर निसर्गदृश्य बघून अगदी कसेसेच होते! या विचारानेदेखील हसू आले ना? म्हणूनच तर त्यातून मानवी वर्तनाचा नियम अपवादासह हाती लागण्याची क्षमता उत्पन्न होते.

अर्थात, विज्ञानाला केवळ कयास बांधणे पुरेसे नसते. एखादे तत्त्व किंवा नियम म्हणून सिद्ध होण्यासाठी त्याला व्यक्तिनिरपेक्ष स्थान असावे लागते. त्यात वारंवार प्रयोग करून पडताळणी करण्याची क्षमता असावी लागते. त्या नियमाच्या प्रकाशात (त्या नियमाशी संबंधित) घटितांचे स्पष्टीकरण मिळावे लागते. विज्ञानाच्या या पद्धतीला अनुसरून असे फारच थोडे नियम माणसाच्या कलादृष्टीविषयी विज्ञानाला सापडले आहेत.

सर्वच कलानुभवांचे स्पष्टीकरण काही निसर्गदृश्यांएवढे थेटपणे देता येणार नाही. माणसाची नजर आणि इतर इंद्रियानुभव काळाच्या ओघात कसे घडत गेले याची फार थोडी माहिती आपल्यापाशी आहे. त्यातील 'दृष्टी' किंवा 'नजर' यांवर सर्वांत जास्त काम झालेले आहे. त्यामुळे 'दिसण्या'शी संबंधित अनेक घटकांचा उलगडा विज्ञान वस्तुनिष्ठपणे करू शकते. परंतु या बाबतीत संशोधन अजूनही प्रगतिपथावर आहे.

मुख्य मुद्दा असा, की कलेच्या बाबतीत सर्वच अनुभूतींना व्यक्तिनिष्ठ अथवा आंतरव्यक्तिनिष्ठ असा शिक्का मारण्यापूर्वी त्यातही काही वस्तुनिष्ठता असू शकते. एवढे समजण्याएवढे विज्ञान पुढे गेले आहे हे निश्चित.

**चला बोलूया!**

'सिनेमा आणि आपण' या विषयावर आपल्या महाविद्यालयात चर्चासत्र/परिसंवाद आयोजित करा. सिनेमाचा समाजावर कोणत्या प्रकारे परिणाम होतो? परिणाम होतो का? हे मुद्दे महत्त्वाचे आहेत.

**चर्चा करा**

**एक गमतीशीर निरीक्षण :** माणसांना लहान वयात कानी पडलेले संगीत जास्त भावते असे दिसते. लहानपणी रेडिओ, टि.व्ही., सीडी प्लेअरवर मराठी-हिंदी गाणी ऐकली असतील, किंवा प्रत्यक्ष गाण्याचे कार्यक्रम ऐकले असतील तर त्याचा 'संस्कार' मेंदूत पक्का झालेला असतो. मग मोठेपणी अचानक एखादे वेगळे संगीत कानावर पडले तर काय होते? वेगळेपणामुळे कुतूहल वाटते, पुन्हापुन्हा ऐकावेसे वाटते, की नको ते संगीत असे वाटते? आपला अनुभव इतरांना सांगा. त्यांचे याविषयीचे अनुभव ऐका. आपल्या अनुभवात काही साम्य आढळते का?

## शब्दसूची

सर्जनशीलता - Creativity
व्यवहारवादी - Practical
प्रकट - Manifest
अप्रकट - Latent
स्वकेंद्री - Self-centered
मानवकेंद्री - Humancentric/ Anthropocentric
एकसुरी - Monotonous
समतोल - Balanced
प्रमाणबद्धता - Proportion
सममात्रता - Symmetry
लय - Rhythm
आस्वादक - Appreciator
ललित कला - Liberal Arts
रचनाबंध - Pattern
वास्तवदर्शी - Realistic
प्रतिकात्मक - Symbolic
समीक्षण - Criticism
व्यामिश्रता - Complexity
संप्रेषण - Communication
अनुकृती - Imitation
अभिव्यक्तिवाद - Expressionism

## स्वाध्याय

**प्रश्न १ कंसातील योग्य पर्याय निवडून पुढील विधाने पूर्ण लिहा.**

(१) ........ अनुभवांमध्ये निसर्गनिर्मित व मानवनिर्मित घटकांचा समावेश असतो.

(सौंदर्यविषयक, काल्पनिक, गूढ)

(२) भरताचा ........ विचार हा भारतीय सौंदर्यमीमांसेतील मूलभूत आणि महत्त्वपूर्ण विचार आहे.

(रस-भाव, भावभावना, रस-भावना)

(३) ग्रीक व मध्ययुगीन कालखंडात सौंदर्य हा ........ गुणधर्म मानला गेला.

(व्यक्तिनिष्ठ, वस्तुनिष्ठ, आंतरव्यक्तिनिष्ठ)

**प्रश्न २ पुढील प्रश्नांची २० ते २५ शब्दांमध्ये उत्तरे लिहा.**

(१) कलावादी दृष्टिकोनाची दोन उदाहरणे सांगा.

(२) सौंदर्यानुभवाचे गुणधर्म कोणते?

(३) 'सुंदर'साठी दैनंदिन जीवनात वापरले जाणारे कोणतेही चार शब्द सांगा.

(४) कलाकृती म्हणजे काय?

(५) कलाप्रक्रियेचे मुख्य घटक सांगा.

**प्रश्न ३ टीपा लिहा.**

(१) प्लेटोचा कलाविषयक अनुकृती सिद्धांत

(२) कलाप्रकार

(३) भारतीय कलाविचार.

**प्रश्न ४** कलेच्या स्वरूपाची सविस्तर चर्चा करा.

**प्रश्न ५** कलाविषयक विविध पाश्चिमात्य सिद्धांत स्पष्ट करा.

**प्रश्न ६ पुढील प्रसंगावर संवाद लिहा.**

सौंदर्य वस्तुगत असते वा नसते, यावर कलाकार व रसिक यांतील संवाद लिहा.

**उपक्रम**

तुमच्या परिसरातील एखाद्या कलाकाराची मुलाखत घ्या. कलेमुळे त्यांचे भावजीवन, जीवनानुभव कसे समृद्ध झाले हे जाणून घ्या


# ७. विज्ञान, तंत्रज्ञान आणि तत्त्वज्ञान

- प्रस्तावना
- जाणिवेची जाणीव
- माणूस आणि निसर्ग – तत्त्वज्ञानातील दृष्टिकोन
- माणूस आणि निसर्ग संबंधाचा ऐतिहासिक आढावा
- तंत्रज्ञानातील प्रक्रिया आणि त्यांचा मानवी समाजावर होणारा परिणाम
- जैवतंत्रज्ञान आणि आजचे काही महत्त्वाचे प्रश्न

## प्रस्तावना

विज्ञान म्हणजे निसर्गनियमांचा अभ्यास. तंत्रज्ञान म्हणजे निसर्गात उपलब्ध साधनसामग्रीवर शारीर ऊर्जेने (म्हणजे अन्न खाऊन जी ऊर्जा मिळते ती वापरून) किंवा त्याबरोबर शरीरबाह्य ऊर्जेने (लाकूडफाटा, खनिजइंधन इत्यादींने) प्रक्रिया करून सुरक्षितता, सुविधा, रंजन साधण्याची कला आणि विज्ञान. प्रक्रिया करायची म्हणजे काहीतरी **श्रम** आणि **हानी** आलेच. विज्ञान आणि तंत्रज्ञान यांच्या संदर्भात तत्त्वज्ञानाची भूमिका काय? तर या दोन्हींच्या स्वरूप, कार्य, पद्धती आणि उद्दिष्टांचा माणसाच्या आणि एकूण निसर्गाच्या दृष्टीने ऊहापोह करणे. या सर्वांची ओळख आपण गेल्यावर्षी करून घेतली.

आपण तंत्रज्ञान वापरतो. तंत्रज्ञानाची निर्मिती, प्रसार आणि परिणामांची चर्चा आपण ऐकतो. कोणी म्हणते तंत्रज्ञानच सर्व प्रश्न सोडवेल. कोणी म्हणते, तंत्रज्ञानानेच प्रश्न निर्माण झाले, आता तंत्रज्ञानापासून लांब गेल्याशिवाय पर्याय नाही. पण लांब जाणे म्हणजे नेमके काय?




याबाबतीत विज्ञान काय सांगते? विज्ञान आणि तंत्रज्ञान यांचे एकमेकांशी नाते काय? विज्ञान आणि तंत्रज्ञान या दोन्हींतील नात्याच्या संदर्भात तत्त्वज्ञानाची भूमिका काय? असे प्रश्नदेखील पडू शकतात. याच प्रश्नांचा मागोवा घेताना, या पाठात, आपण इतिहासात डोकावणार आहोत. तंत्रज्ञानाने मानवी समाजाला कसा आकार दिला ते आपण बघणार आहोत. आजूबाजूच्या सजीवसृष्टीकडे पाहिले तर असे दिसून येते की पृथ्वीवर केवळ माणूस ही प्रजाती अशी आहे की जी शरीरबाह्य ऊर्जा प्रचंड मोठ्या प्रमाणात लागणारे तंत्रज्ञान वापरते. असे कशाने होऊ शकले? माणसांत आणि इतर सजीवांत काय वेगळेपण आहे?

## जाणिवेची जाणीव

आपण तंत्रज्ञान वापरतो आणि त्याच्या भल्याबुऱ्याची चर्चादेखील करतो. कारण इतर प्राण्यांकडे नसलेली एक गोष्ट मानवप्राण्याकडे आहे असे आपण मानतो. ती गोष्ट म्हणजे जाणिवेची जाणीव. इतर प्राण्यांकडे जाणीव असावी, परंतु जाणिवेची जाणीव नाही. जाणिवेची जाणीव म्हणजे काय? आपण संवेदनांचा अनुभव घेतो. आपण विचार करतो. एवढेच नव्हे, तर आपण संवेदनांचा आणि विचार करण्याचाही विचार करू शकतो. विचारात जाणीवपूर्वक बदल घडवून आणू शकतो.

### कृती

विचार करण्याचा विचार म्हणजे काय? खरेदीचे उदाहरण घेऊ. आपण खरेदीला जाण्याचा विचार करतो. खरेदीला जाण्याच्या विचाराचा विचारही करू शकतो. आपल्या मनात असे विचार येऊ शकतात की आपल्याला खरेदीला का जावेसे वाटते आहे? खरेच वाटते आहे का? की दुसऱ्याकडे बघून तसे वाटते आहे? खरेदी नाही केली तर काय होईल? केली तर काय होईल? इत्यादी. ही यादी कितीही लांबवता येईल. असे अन्य कोणते विचार आपल्याला खरेदी करण्याच्या विचाराच्या बाबतीत सुचतात याची चर्चा करा.

इतर प्राणी विचार करत असतील का? विचार करण्याचा विचार करत असतील का? जाणीवेच्या जाणिवेची एक मुख्य खूण म्हणजे जाणीवपूर्वक बदल घडवून आणण्याची क्षमता, असे मानले तर प्राण्यांच्या ठायी ती आढळते का? विचार करा. कदाचित तसे नाही म्हणूनच काल्पनिक गोष्टीत बंड करून उठणारे प्राणी आपल्याला भेटतात. हाच निकष माणसाला लावायचा ठरवला तर काय दिसते? माणसे अनेकदा 'गतानुगतिक' असल्याप्रमाणे वागतात असे म्हटले जाते, ते का? जाणीवपूर्वक बदलाच्या बाबतीत आपला वैयक्तिक अनुभव काय सांगतो?

**चला वाचूया!**

'Animal Farm' हे पुस्तक मिळवून वाचा.

कदाचित वनस्पती आणि प्राण्यांना तंत्रज्ञान निर्माण करायचे नसले तरी माणसाने तंत्रज्ञानाच्या माध्यमातून काय चालवले आहे याची निदान चर्चा करायला त्यांना आवडले असते!




माणसाने तंत्रज्ञानाच्या माध्यमातून निसर्गात जो बदल घडवून आणला आहे त्याविषयी इतर सजीवांना काय वाटते याविषयी आपल्याला वस्तुनिष्ठपणे काही म्हणता येत नाही. त्यांना जाणिवेची जाणीव नाही असे आपण मानतो. परंतु आपण त्यांच्या भल्याबुऱ्याविषयी विचार करतो, निदान तशी तयारी दाखवतो. माणसासकट सर्व सजीव-निर्जीव सृष्टीचा आपण एकत्र विचार करू शकतो. या सर्वंकष विचारातून तत्वज्ञानाची भूमिका तयार होत राहते. माणूस आणि निसर्ग यांच्यातील नात्याचा अभ्यास तत्वज्ञानात केला जातो.

## माणूस आणि निसर्ग- तत्वज्ञानातील दृष्टिकोन

उत्क्रांतीच्या प्रवासात माणूस सुरूवातीला इतर प्राण्यांप्रमाणेच होता. म्हणजे मुख्यतः अन्न खाऊन जी ऊर्जा मिळते ती (शारीर ऊर्जा) वापरून आपल्या तहानभूकेची सोय बघत होता. पिलांचे भरणपोषण करत होता. माणूस तंत्रज्ञान वापरू लागला आणि इतर सृष्टीपासून जसाकाही वेगळा झाला. वरचढ झाला. माणूस स्वतःसंबंधी आणि निसर्गासंबंधी जो विचार करतो, आपले आणि निसर्गाचे नाते ज्याप्रकाराने जाणतो त्यावरून तीन महत्त्वाचे दृष्टिकोन आपल्या हाती लागतात. एक आहे मनुष्यकेंद्री विचार (anthropocentrism), दुसरा आहे जीवकेंद्री विचार (bio-centrism) आणि तिसरा निसर्गकेंद्री विचार (eco-centrism). अनेक पद्धतींनी हे दृष्टिकोन अभ्यासता येतात. आपण त्यांची ढोबळमानाने ओळख करून घेऊ.

मनुष्यकेंद्री विचार म्हणजे असे मानणे की सर्व सृष्टी केवळ माणसाच्या उपभोगासाठी आहे. या उपभोगाचे दोन प्रकार असू शकतात. स्वतःवर आणि इतर सजीवांवर होणाऱ्या परिणामांची फारशी तमा न बाळगता उपभोग घेणे आणि दुसरा म्हणजे परिणामांचा विचार करून उपभोग घेणे.

जीवकेंद्री विचार असं सांगतो की इतर जिवांमध्ये देखील माणसाप्रमाणेच चैतन्य आहे. त्यांना जगण्याचा तेवढाच हक्क आहे आणि माणसाने आपल्या हातून त्यांची हानी होईल असे कोणतेही कृत्य टाळले पाहिजे असा विचार काही संस्कृती अथवा धर्मपरंपरेत आढळतो.

निसर्गकेंद्री विचार म्हणजे माणूस हा सृष्टीचा केवळ एक घटक आहे असे मानणे. तो सृष्टीपासून वेगळा नाही, वरचढ तर अजिबात नाही. त्याच्याकडे निसर्गात हस्तक्षेप करण्याची क्षमता असेल तर ती त्याने अत्यंत सांभाळून वापरली पाहिजे. निसर्गकेंद्री विचारात सजीव आणि निर्जीव सृष्टीतील क्रियाप्रतिक्रियांना केंद्रस्थानी ठेवले जाते. आपल्या ग्रहावर आढळणारी जीवसृष्टी

आजवर आपल्या माहितीत एकमेवाद्वितीय अशी आहे. निर्जीव सृष्टीच्या मुशीत सजीवसृष्टी घडली आहे आणि निर्जीवसृष्टीशी तिचा क्रियाप्रतिक्रिया स्वरूपातील संबंध सतत येत असतो याची जाणीव ठेऊन आपल्या कृतींचा विचार करावा असे ही विचारसरणी सांगते.

मानवजातीच्या इतिहासात, माणसाच्या सांस्कृतिक वाटचालीत या सर्व दृष्टिकोनांचे प्रतिबिंब पडलेले आपल्याला दिसून येते. धर्मांमध्ये, चालीरीतींमध्ये, हे विचार दृग्गोचर झालेले आपल्याला दिसून येतात. यांतील काही ठळक उदाहरणे आपल्या परिचयाची असतात. उदाहरणार्थ, काही आदिवासी समूहांमध्ये झाड कापण्यापूर्वी झाडाची प्रार्थना करून त्याची अनुमती घेण्याची परंपरा आहे. हे जबाबदारीने उपभोग घेण्याचे द्योतक आहे असे आपण म्हणू शकतो. कोणत्याच एका धर्मात अनिर्बंधपणे उपभोग घ्या असे सुचविलेले नाही ही लक्षात घेण्यासारखी गोष्ट. याअर्थाने धर्मांची भूमिका माणसाला परिणामांची पर्वा न करता अनिर्बंध उपभोगापासून थांबवणे अशीच आहे. परंतु विविध धर्म आणि सांस्कृतिक परंपरा यांची आपापली वैशिष्ट्ये आहेत.




**माणूस आणि निसर्गसंबंधाचा ऐतिहासिक आढावा**

अश्मयुगीन माणसाला आपण आणि इतर जीवसृष्टी याविषयी काय वाटत होते हे आपल्याला त्याने मागे ठेवलेल्या काही पुराव्यांवरून समजते. प्राचीन गुंफांमधील भित्तिचित्रे, उत्खनने यांवरून, तसेच, आज जे समूह दुर्गम भागांत आदिम माणसाच्या जीवनशैलीला अनुसरून राहत आहेत त्यांच्या अभ्यासातून असे दिसून येते, की तत्कालीन माणसाच्या निसर्गविषयक धारणा वेगळ्या होत्या. नैसर्गिक शक्तींबद्दल त्याला अचंबा होता, भय होते, आदर होता. नदी, पर्वत, पाऊस, वृक्ष या त्याच्या दृष्टीने शक्ती होत्या. त्यांना प्रसन्न ठेवणे हे त्याला त्याचे कर्तव्य वाटत असले पाहिजे.

शेतीयुगाचा प्रारंभ म्हणजे वनस्पती आणि प्राणी यांना माणसाळवण्याची सुरुवात. हे साध्य झाल्यामुळे हे सारे जीव आपली मालमत्ता आहेत अशी समजूत दृढ होऊ शकली. श्रेष्ठत्वाची समजूत दृढ होऊ शकली. अनेक ठिकाणी या विचारधारेलाही अपवाद होतेच.

**चला बोलूया!**

निसर्गविषयक जाणीव असणाऱ्या विविध परंपरा, विचारधारांची माहिती मिळवून वर्गात त्याची चर्चा करा.




**चला विचार करूया!**

श्रेष्ठत्व व मालकीचा प्रभाव असणाऱ्या विचारधारांचा परामर्श घ्या.

मालकी आणि श्रेष्ठत्व या धारणेपासून फारकत घेऊन, इतर प्राणी आणि वनस्पती यांच्या ठिकाणी देखील जाणीव आहे आणि माणूस हा इतर सजीवांपैकीच एक आहे, वरचढ नाही, ही जाणीव विशेषतः पाश्चात्त्य जगतात यथावकाश पसरत गेली. आल्डो लिओपोल्ड, अल्बर्ट श्वाईत्झर हे या विचारधारेचे प्रवर्तक होते. माणसाला स्वतःविषयी जाणीव तर आहेच परंतु जाणिवेचे वर्तुळ वाढत जाऊन त्यात संपूर्ण जीवसृष्टी सामावून घेता येऊ शकते हे या विचारवंतांनी प्रकर्षाने सांगितले.

माणसाला अनिर्बंध हस्तक्षेपापासून रोखणे आणि काय करावे/करू नये हे सांगणे हे धर्माचे एक निहित कर्तव्य होते असे दिसते. विज्ञानाच्या नियमांच्या प्रकाशात कसे वागावे आणि कसे वागू नये याची तत्त्वे शोधणे ही एक पर्यायी पद्धती आहे. विज्ञानाचे अधिष्ठान वस्तुनिष्ठता असे आहे. एक किंवा अधिक व्यक्तींनी त्यावर विश्वास ठेवायचे नाकारले तरी वस्तुनिष्ठ सत्यावर त्याचा परिणाम होत नाही. त्यामुळे वस्तुनिष्ठ जगातील प्रश्न हाताळण्यासाठी विज्ञाननियमांचा अभ्यास अतिशय महत्त्वाचा ठरतो.

उदाहरणार्थ, बॉईलचा नियम, चार्ल्सचा नियम यांवरून हवामानाचे भाकित करता येते. चक्रीवादळ यायचे असेल तर ते या नियमांमुळे समजू शकते. सतर्कतेमुळे हानी टळू शकते किंवा तीव्रता कमी होते. नियमांचे हे फलित आहे. असे अन्य निसर्गनियम आहेत. उदाहरणार्थ, ऊर्जा आणि द्रव्याच्या अविनाशित्वाचा नियम. अविनाशित्वाचा नियम असे सांगतो की म्हणजे शून्यातून वस्तुनिर्मिती (मूठ बंद करून हवेतून घड्याळ काढणे) अशक्य आहे. हे नियम आपण वर्तनासाठी किती वापरून घेणार यांवर आपले वैयक्तिक आणि सामाजिक स्वास्थ्य अवलंबून आहे. या नियमांच्या अज्ञानातून केलेले प्रयोग किंवा 'कृती' व्यक्तीला आणि समाजालादेखील संकटात टाकू शकतात.

**लायसेंकोचा 'प्रयोग' :** त्रोफिम लायसेंको हा रशियातील शेती संशोधक होता. त्याने मेंडेलप्रणीत जनुकांच्या सिद्धांताला नाकारले. लायसेंकोचा विश्वास होता, की गव्हाच्या पिकाला थंडीमध्ये टिकायला शिकवले तर त्याच्या बीजांमधून होणारी पुढची पिढीदेखील थंडीवर मात करू शकेल. यासाठी लायसेंकोने अब्जावधी गव्हाची रोपे सायबेरियामध्ये 'शिकण्यासाठी' पाठवली. हा काळ होता साधारण १९३५च्या आसपासचा. लायसेंकोचा प्रयोग अर्थातच फसला. म्हणावे तेवढे उत्पन्न मिळाले नाही. त्यामुळे तत्कालीन सोव्हिएत महासंघावर अमेरिकेकडून मोठ्या प्रमाणावर गहू आयात करण्याची नामुष्की ओढवली. उत्क्रांती आणि जनुकविज्ञान याचे नियम न अनुसरल्याने काय होऊ शकते त्याचा हा एक ऐतिहासिक नमुना आहे.

माणसे 'सोने दुप्पट करून देतो' अशा बुवाबाजीला फसतात. 'शून्य कचरा' अशी संकल्पना प्रकल्पांच्या जाहिरातीत वापरली जाते. खरी गोष्ट अशी की आपण सामग्रीवर प्रक्रिया करणार असू तर त्यातून उपघटकांची निर्मिती अटळ आहे. कचरा नको असेल तर तो निर्माण होणार नाही यासाठी प्रयत्न करावा लागेल. म्हणजे उत्पादन टाळावे लागेल. हे उपघटक नकोसे असतात तेव्हा त्यांना आपण कचरा म्हणतो. पुनर्नविकरणात देखील कचरा तयार होतोच. माणसे असे यंत्र बनविण्याची खटपट करत राहतात की जे एकदा बनवले की स्व – ऊर्जेवर चालू शकेल, म्हणजे निरंतर गतीयंत्र ('पर्पेचुअल मोशन मशीन'). पण असे यंत्र बनविणे अशक्य आहे हे ऊर्जेच्या नियमांच्या अभ्यासाने समजते.

विज्ञानविचार जरी पूर्वीपासून माणसाच्या विचारविश्वाचा भाग असला तरी सामुदायिकपणे विज्ञानाची वाटचाल अलीकडे सुरू झाली. आताचे विज्ञानविश्व बघितले तर असे लक्षात येते की विज्ञान काही एकट्यादुकट्याने करण्याची गोष्ट नाही. अनेक माणसे एकत्र येतात, प्रयोग करतात, निष्कर्षांची पडताळणी करतात, प्रयोगांसाठी साधने निर्माण करतात. याअर्थाने विज्ञान हा वस्तुनिष्ठ सत्याच्या आकलनाचा सामुदायिक प्रयत्न आहे. मात्र, विज्ञानाच्या नियमांच्या प्रकाशात काय करावे आणि काय करू नये, हे कसे समजावून घ्यावे याच्या पद्धती समाजात तेवढ्या रूजलेल्या नाहीत. हे अजूनही नवे क्षेत्र आहे.

मुळात विज्ञानाकडून आचरणाच्या तत्त्वांची अपेक्षा हीच गैरलागू आहे असेही काहीजण म्हणतील. विज्ञान केवळ निसर्गनियम सांगते. तुम्ही काय करा अथवा करू नका याबद्दल विज्ञान उदासीन असते. परंतु असाही प्रश्न विचारला जाऊ शकतो की काय करायचे हे कळले नाही तर नुसत्या नियमांचा काय उपयोग? भलेही नीतिविचार सांगणे हे विज्ञानाचे प्रथम कर्तव्य नसेल परंतु नीतिविचाराच्या आधारे कृतींचा परामर्श आवश्यक तर आहेच. म्हणूनच नियम आणि वर्तन यांच्यातील सांधेजोड हे कार्य तत्त्वज्ञानाचे होते. काय करावे याचे उत्तर, दर वेळी, 'चक्रीवादळ आहे, आता पाण्यात जाणे धोकादायक' इतके सरळ नसते. काही वेळा कृती ठरविण्यासाठी व्यापक, सर्वसमावेशक, सुसंगत चित्र

पाहावे लागते. अनेक विद्याशाखांचा एकत्रित अभ्यास करावा लागतो, त्यांच्या पद्‌धतींची आणि एकंदरीत उद्‌दिष्टाची चर्चा सतत करावी लागते. विज्ञानाच्या वाटचालीला ऐतिहासिक पार्श्वभूमी असते. संस्कृती, समाज यांचे कोंदण असते. आर्थिक आयाम असतात. या सर्व गोष्टींचा एकत्रित विचार तत्त्वज्ञानात केला जातो. विज्ञान, तंत्रज्ञानविषयक आजचे प्रश्न कोणते आणि त्यासंबंधी तत्वज्ञानाची भूमिका काय हे समजावून घेण्यापूर्वी तंत्रज्ञानातील प्रक्रियांचा मानवी समाजावर कसा परिणाम होतो ते पाहू. इतिहासात तंत्रज्ञानाने समाजाला कसा आकार दिला तेदेखील तपासू.

**तंत्रज्ञानातील प्रक्रिया आणि त्यांचा मानवी समाजावर होणारा परिणाम**

माणसाने निसर्गातील सहज उपलब्ध सामग्रीवर हात चालवून बघितला. दगड, माती, खनिजइंधन, अशुद्‌ध धातू, यांसारखी अजैविक सामग्री आणि वनस्पती/प्राणी यांसारखी जैविक सामग्री त्याने वापरून बघितली आणि आजही तो ती वापरतो. आदिमानवाने पहिले दगडी अवजार बनवले ते तंत्रज्ञान होते आणि आज आपण अवकाशात चांद्रयाने पाठवतो, तेदेखील तंत्रज्ञान आहे. (जैविक सामग्रीबाबतीत, शेती अथवा पशुपालन हेदेखील तंत्रज्ञान आहे आणि क्लोनिंगदेखील तंत्रज्ञानच आहे.) या उदाहरणांमध्ये एक सारखेपणा आहे, तो म्हणजे प्रक्रियेचा. दगडी अवजार आपले आपण बनत नाही आणि चांद्रयानदेखील. शेती आपली आपण होत नाही आणि क्लोनिंगदेखील. या सर्वांसाठी निसर्गात उपलब्ध सामग्रीवर प्रक्रिया करावी लागते. तंत्रज्ञानातील प्रक्रिया अत्यंत मोजक्या असू शकतात तसेच असंख्य असू शकतात.

प्रक्रिया करायची म्हणजे त्यासाठी काही श्रम करावे लागतात. त्यातून आपले काही नुकसान झाले तर त्याची तयारी ठेवावी लागते. नुकसान शारीरिक, मानसिक दोन्ही प्रकारचे असू शकते.

**चला बोलूया!**

आपल्या आजूबाजूला असलेली विविध माणसे बघा, ती किती आणि कोणत्या स्वरूपाची नोकरी/व्यवसाय करीत आहेत? ही सगळी कामे दिसायला सुटीसुटी दिसत असली तरी त्यांचा एकमेकांशी काही मेळ बसत असेल का? याची वर्गात चर्चा करा.

खनिजइंधन वापरात येण्यापूर्वी माणसे ज्या प्रकारच्या उद्योगव्यवसायात होती त्याला उद्‌देशून बारा बलुतेदारी हा शब्द तुम्ही ऐकला असेल. म्हणायला वेगवेगळ्या दिसत असणाऱ्या उद्योगांतील समान धागा शेती असा दिसतो. तसेच आताच्या काळातील विविध उद्योगांचा मग तो व्यापार असो, दळणवळण, वस्तूसेवा क्षेत्र या सगळ्यांचे मूळ खनिजइंधन आणि त्यावर आधारित तंत्रज्ञान असे आहे.

शेतीपूर्व अवस्थेतील शिकारी/अन्न-संकलकाची कल्पना करा. शेती करण्यासाठी त्यांना जमीन साफ करावी लागली असेल, बिया निवडून आणाव्या लागल्या असतील, पेराव्या लागल्या असतील इत्यादी. यासाठी लागणारी शारीर ऊर्जा त्यांना कुठून मिळाली असेल? निसर्गात तयार फळे, मुळे, शिकार मिळत होती त्यातून. जगण्यासाठी दिवसाला (सर्वसाधारणपणे) दोन हजार कॅलरीज लागतात. अन्ननिर्मितीसाठी ही ऊर्जा वापरताना, जेवढी वापरली तेवढी किंवा त्याहून जास्त ऊर्जा पिकवलेल्या अन्नातून मिळायला हवी, तर ऊर्जेचे गणित नफ्याचे होणार. प्रत्यक्षात मात्र असे होत नाही. जेवढी ऊर्जा अन्ननिर्मितीत घालावी लागते तेवढी ऊर्जा निर्मिलेल्या अन्नातून कधीही मिळत नाही आणि हे सत्य केवळ शेतीबाबत नाही तर तंत्रज्ञानातील सर्वच प्रक्रियांच्या मुळाशी आहे. याचे कारण 'एन्ट्रपि' नावाचा विज्ञाननियम.

कल्पना करा, दोन लाख वर्षांपूर्वीचा कालखंड आहे. पृथ्वीवर आजच्या तुलनेत फार थोडी माणसे आहेत आणि ती विखुरलेली आहेत. छोट्या टोळ्यांमधून रहात आहेत. वानरांच्या टोळ्या असतात तशी. परंतु आता दगडांना आकार द्यायला जमतो आहे. धार लावायला जमते आहे. लाकडाच्या खोबणीत दगड बसवून कुऱ्हाडीसारखा वापरता येतो आहे. या साऱ्या प्रक्रिया आहेत. यात लागणारे कौशल्य कदाचित टोळीतील एकादोघांकडे जास्त चांगले असेल. पण थोड्याफार फरकाने सर्वांना ते येत असेल. त्यात स्त्री-पुरूष असा भेद फारसा नसेल. ज्यांना ते जास्त चांगले येते त्यांना कदाचित थोडे जास्त काम पडत असेल, त्याचा मोबदला म्हणून त्यांना गोळा करून आणलेल्या अन्नातील थोडा अधिक वाटा मिळत असेल. परंतु, श्रमनैपुण्य, शारीरिक, मानसिक हानी यांत फार भेद नसेल.

मग सत्तर हजार वर्षांपूर्वी शब्दभाषेचा उगम झाला.

वस्तू आणि सेवा माणसांना एकत्र बांधून ठेवतात. आताच्या काळात वस्तू आणि सेवा दोन्ही विजेवर आधारित असतात. किंबहुना वीज हा उद्योग क्षेत्राचा आणि अप्रत्यक्षपणे आपल्या जीवन व्यवहारांचा कणाच होय. आपण प्रचंड प्रमाणात वीज वापरतो. ही वीज मुख्यतः कोळसा/डिझेल जाळून तयार होते. उष्णतेचे यांत्रिक, विद्युत आणि अन्य ऊर्जा प्रकारांत रूपांतर करण्यामध्ये एकमेकांशी संबंधित अनेक प्रक्रिया अनुस्यूत असतात. वस्तू बनविण्यासाठी लागणाऱ्या कच्च्या मालावरदेखील अनेक प्रक्रिया होतात. या प्रक्रिया कोणत्या त्याची एक (सर्वसमावेशक नसलेली) यादी बघूया–

- स्रोत कुठे आहेत ते शोधून काढणे– खनिज तेल (विहिरी), कोळसा, खनिज (खाणी), लाकूड आणि इतर सेंद्रीय पदार्थ (जंगले आणि लावलेली झाडे) आणि वापराच्या दृष्टीने या स्रोतांचा दर्जा आणि प्रमाण बघणे.
- त्यांच्या उत्खननासाठी आणि वाहतुकीसाठी पायाभूत सुविधा निर्माण करणे. इंधनावर प्रक्रिया करण्यासाठी व्यवस्था करणे (रिफायनरी, कोळसा धुणे, भुकटी करणे इत्यादी).
- तयार झालेल्या इंधनाची वाहतूक करणे आणि ते साठविण्याची व्यवस्था करणे किंवा त्यातून विद्युतऊर्जा निर्मिती करणे आणि ती जिथे वापरायची आहे तिथंवर पोहोचवणे.
- या सर्व प्रक्रियांसाठी आणि त्यांच्या कार्यवाहीसाठी यंत्रे, अवजारे, वाहने, माध्यमे लागताता – ती बनविणे आणि वापरणे, देखभाल आणि दुरूस्ती, सुरक्षिततेची खबरदारी इत्यादी.
- तयार झालेल्या कचऱ्याचे विघटन, पर्यावरणीय सुरक्षा आणि पूरक बाबी, उदाहरणार्थ, व्यवस्थापन पद्धती, वित्त व्यवस्थापन, संशोधन व विकास, मानवसंसाधन विकास इत्यादी.
- तंत्रज्ञानातील गुंतागुंत वाढली की परिणामांची अनिश्चितता वाढते. चुका, अपयश, अनावश्यक बाबी, अपघात आणि संकटांमुळे ही यादी वाढत राहते. वाढलेली उष्णता, प्रदूषण, राख, गाळ, डबर, कचरा, घाण, मोडीत निघालेल्या वस्तू या स्वरूपात आपल्या आजूबाजूला उपपदार्थ साठत जातात. या सगळ्यांनी आपला परिसर बिघडून आपल्यावर थेट किंवा अप्रत्यक्ष परिणाम होत राहतो.
- कोळसा, खनिजतेल आणि खनिजं यांची उपलब्धता सर्वत्र सारखी नसल्यामुळे राष्ट्राराष्ट्रातील तेढ वाढते.

भाषा हेदेखील तंत्रज्ञान आहे. आपले स्वरयंत्र आणि आपली शारीर ऊर्जा वापरून बनलेले तंत्रज्ञान. या तंत्रज्ञानाने माणसांतील साहचर्य वाढले. अनोळखी लोकांशी अर्थपूर्ण संवाद होऊ शकला. वस्तू आणि घटितांचे नेमके वर्णन करता येऊ लागले. आपले हेतू नेमके सांगता येऊ लागले. याचा परिणाम अधिक माणसे एकत्र येण्यात झाला. माणसांच्या टोळ्यांचा आकार वाढला. भाषातंत्रज्ञानामुळे माणूस इतर प्राण्यांपेक्षा सबळ झाला.

दहा हजार वर्षांपूर्वी पशुपालन आणि शेती सुरू झाले. हा माणसाच्या इतिहासातील सर्वांत महत्त्वपूर्ण बदल असे म्हणता येईल. शेतीमध्ये अनेक प्रक्रिया अनुस्यूत होत्या. वनस्पतींवरील प्रयोगांपासून ते जमीन सपाट करणे, शेत राखणे, तयार झालेले धान्य साठवणे, वापरणे अशी या प्रक्रियांची एक भलीमोठी यादी करता येईल. यात श्रम, नैपुण्ये, शारीरिक–मानसिक हानी यांची असमान विभागणी मोठ्या प्रमाणावर सुरू झाली. यातूनच सामाजिक उतरंड जन्माला आली. शेतीसाठी गुरे आणि माणसे यांची अन्न खाऊन मिळालेली ऊर्जा कामी आली. अन्न पिकवायचे आणि त्यातून मिळालेली ऊर्जा अन्न पिकवायला वापरायची. असे हे चक्र सुरू झाले. पुरूष आणि स्त्रिया यांच्या वंशवृद्धी करीत जगण्याजगविण्यातील कामांमध्ये मोठा फरक पडला. नकोशी आणि धोकादायक कामे करण्यासाठी गुलाम निर्माण झाले. याचा थेट संबंध शेतीतंत्रज्ञानाच्या स्वरूपाशी आहे.

### एन्ट्रोपिचा नियम

विज्ञानाच्या परिभाषेत हा नियम असा की 'विश्व ज्या कणांपासून बनले आहे ते कण सतत विखुरत आहेत'. याचे दैनंदिन जीवनातील उदाहरण बघू. तुम्ही कधी सहलीला गेला असाल आणि शेकोटी पेटवली असेल. त्यासाठी लाकडे गोळा केली असतील. आग पेटवली असेल. भोवतीने बसून गाणी, गप्पागोष्टी केल्या असतील. त्या वेळी ऊब तर वाटली असेलच पण त्यातून निघणारा धूर आणि मागे राहिलेली राखही तुम्ही पाहिली असेल. तुम्हीकाही धूर आणि राख यांची इच्छा केली नसेल पण तरीही ते तिथे असतातच. हा एन्ट्रपिच्या नियमाचा परिणाम आहे. आम्हांला फक्त जाळ हवा. धूर, राख नको वगैरे काही म्हणता येत नाही. दुसऱ्या दिवशी धूर काही तिथे साठून राहिलेला दिसत नाही, तो हवेत सर्वत्र सारख्या प्रमाणात विखुरतो. हादेखील एन्ट्रपिच्या नियमाचाच परिणाम.


बर्फ वितळते, गरम चहा थंड होतो, लोखंडाला गंज चढतो अशी अन्य काही उदाहरणे सांगता येतील.

आता हा नियम तंत्रज्ञानाला कसा लागू होतो ते बघू. तुम्ही एखाद्या तंत्रज्ञानाबद्दल असे दावे ऐकले असतील की ते बनवायला जेवढी ऊर्जा लागली आहे त्यापेक्षा जास्त ऊर्जा ते तुम्हांला परत करते. प्रत्यक्षात असे कधीही संभवत नाही. कारण विज्ञाननियम असे सांगतो की हे अशक्यप्राय आहे. तंत्रज्ञान याचा अर्थ प्रक्रिया करणे. ती प्रक्रिया करण्यासाठी (शारीर किंवा शरीरबाह्य) ऊर्जा वापरणे. एन्ट्रपिचा नियम असं सांगतो की 'इनपुट' म्हणजे तंत्रज्ञानासाठी वापरली जाणारी ऊर्जा ही नेहेमीच 'आऊटपुट' किंवा मिळणाऱ्या ऊर्जेपेक्षा जास्त असते. त्यामुळे कोणतेही तंत्रज्ञान हे वस्तुतः तोट्याचेच असते. तोटा वेगवेगळ्या स्वरूपाचा असतो. आपण जरी तोटा हा शब्द नेहमी पैशांसंबंधी वापरत असलो तरी तंत्रज्ञानाच्या बाबतीत त्याचा अर्थ 'वापरता न आलेला सामग्रीचा भाग' असा होतो. म्हणजे लाकडे पेटवली तर त्यातून केवळ जाळ मिळतो असे नाही तर धूर आणि राख हेदेखील निर्माण होतात. पेट्रोल अथवा डिझेल वापरून आपण जेव्हा गाडी चालवतो तेव्हा आपली गाडी तर चालते पण त्याजोडीने धूर, तरंगणारे घातक कण इत्यादी निर्माण होतातच.

सौरऊर्जा, पवनऊर्जा हे आणि असे इतर स्त्रोत स्वच्छ ऊर्जेचे स्त्रोत म्हणून गणले जात असले तरी प्रत्यक्षात मात्र ही ऊर्जा वापरण्यासाठी यंत्रे बनवावी लागतात. ऊर्जास्रोत विखुरलेल्या स्वरूपात असेल तर तो वापरण्यासाठी बनवलेल्या यंत्रांवर खर्च होणारी ऊर्जा अफाट असते. विखुरलेल्या ऊर्जास्रोतांतून (म्हणजे सौर/पवन/लाटा इत्यादी) वापरण्याजोगी ऊर्जा मिळवण्यासाठी बनवलेली यंत्रे (म्हणजे पवनचक्की, सौर पॅनेल) ऊर्जेच्या परिभाषेत नेहमी तोट्याची असतात. एका पवनचक्कीतून दुसरी पवनचक्की बनविण्याएवढी ऊर्जा कधीही मिळू शकत नाही कारण ऊर्जेचा नियम तसा आहे. हा नियम मानवनिर्मित नसल्यामुळे तो बदलताही येणार नाही. या नियमामुळेच आपल्या भोवतीची सृष्टी जशी आहे तशी आहे. पर्वतांवरून माती वाहून खाली येणे, पाण्याची धूप होणे, पाऊस पडणे, हिमनदी वितळून पाणी सरोवरे अथवा समुद्रापर्यंत नद्यांच्यामार्फत जाणे, पदार्थांचे ज्वलन ही सारी या नियमाची उदाहरणे आहेत. त्यामुळे हे नियम कशासाठी असे प्रश्न गैरलागू ठरतात. या नियमांशी स्वतःला जुळवून घेतलं असता आपल्या आजूबाजूला ज्या गोष्टी सतत घडत असतात त्यातील आपल्याला जाणवणारी अनिश्चितता थोडी कमी होऊ शकते. तंत्रज्ञान जितके जटिल तेवढी अनिश्चिता वाढत जाते. तोटेदेखील वाढत जातात आणि या तोट्यांचे धनी कुणालातरी व्हावेच लागते. शेती हेदेखील तंत्रज्ञान आहे. या तंत्रज्ञानाने मानवी समाजरचनेत बदल घडवून आणले. याचे कारण तंत्रज्ञानातून निर्माण झालेले तोटे भरून काढण्यासाठी नैसर्गिक परिसंस्था, गुरे, गुलाम निर्माण झाले. स्त्रियांकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला. मालकी भावना निर्माण झाली तशी 'संपत्तीला वारस देणारी' म्हणून स्त्रीकडे बघण्यात येऊ लागले. या सर्वांच्या मुळाशी तंत्रज्ञानाचे मूळ स्वरूप आणि विज्ञानाचा नियम आहे ही गोष्ट मात्र अस्पष्ट राहिली.

पुढे धातुयुगात हे अधिक मोठ्या प्रमाणावर घडले. भारताच्या संदर्भात, पहिले आणि दुसरे नागरीकरण ही याच युगाची वैशिष्ट्ये आहेत. हरप्पा संस्कृतीच्या नागरी वसाहतींमध्ये साधी घरे आणि गढीसदृश घरे असे फरक दिसून येतात. घरांतील चीजवस्तू, दफनांतील चीजवस्तू यांवरून कोण किती धनवान होते याचा अंदाज बांधता येतो. या पुढचा इतिहास हा सामाजिक उतरंड आणि विषमता वाढत जाण्याचा इतिहास आहे. याच्या मुळाशी तंत्रज्ञानाचे स्वरूप आणि त्यात अनुस्यूत असलेल्या प्रक्रिया असे आहे.

१९व्या शतकात वाफेच्या शक्तीचा शोध लागला आणि २०व्या शतकात मोठ्या प्रमाणात वीजनिर्मिती करता येऊ लागली. या सगळ्या काळात तंत्रज्ञान अधिकाधिक गुंतागुंतीचे होत गेले. तंत्रज्ञानात अंतर्भूत असलेल्या प्रक्रियांची संख्या अपरिमित वाढली.




याचा परिणाम म्हणजे मोठ्या प्रमाणावर माणसे तंत्रज्ञानाला बांधलेली राहू लागली. तीच त्यांच्या जगण्याची तऱ्हा झाली. जशी शेती सुरू झाल्यावर माणसे शेतात उगवलेले आणि शिजलेले धान्य खायला सरावली, नुसते सरावली एवढेच नव्हे तर त्यांना कच्चे, न शिजलेले फारसे खाता येत नाही अशी त्यांची स्थिती झाली. त्याचप्रमाणे वीजनिर्मितीनंतरच्या तंत्रज्ञानात माणसे तंत्रज्ञानाने आकार दिलेल्या जीवनशैलीने राहू लागली. त्याखेरीजचे जिणे त्यांना आता माहिती नाही किंवा मानवणार नाही अशी परिस्थिती निर्माण झाली.

या बदलत्या स्थितीचे परिणाम माणसावर होऊ लागले तसेच ते इतर सृष्टीवर आणि पुढे जाऊन आपल्या ग्रहावरील सजीवसृष्टीसाठी आवश्यक पर्यावरणावरदेखील होऊ लागले. आजमितीस आपण माणसाने निर्माण केलेल्या हवामानबदल, जागतिक तापमानवाढ, वाळवंटीकरण यांसारख्या गंभीर पर्यावरणीय प्रश्नांविषयी शालेय शिक्षणापासून चर्चा करत आलो आहोत ते प्रश्न निर्माण होण्यामागे तंत्रज्ञानाचे स्वरूप कारणीभूत आहे.

तंत्रज्ञान आणि माणूस यांच्या संबंधाची जाणीव माणसांमध्ये वेगवेगळ्या तऱ्हेने दिसून येते. कुणी म्हणते ही जणूकाही न संपणारी तंत्रज्ञानाधारित हस्तक्षेपाची मालिका थांबवायला हवी तर कुणी म्हणते नवे तंत्रज्ञान या प्रश्नांना उत्तरे शोधेल. हस्तक्षेप थांबवणे म्हणजे काय ?

माणसाने पहिले दगडी अवजार बनवले, शेती केली, तिथपासून ते आजच्या गुंतागुंतीच्या तंत्रज्ञानापर्यंत हे नेमके का बरे केले असेल या प्रश्नाचे ठोस उत्तर मिळत नाही. माणूस हादेखील एके काळी इतर प्राण्यांसारखाच होता. त्याला आजूबाजूच्या गोष्टींवर प्रयोग का करून पाहावेसे वाटले? प्रयोग करून बघण्यापूर्वी त्याला आपण करत असलेल्या हस्तक्षेपाच्या परिणामांची पूर्ण जाणीव होती का? याचे होकारार्थी उत्तर देता येत नाही. उत्क्रांतीच्या भाषेत या प्रेरणेला अचानक झालेले बदल असे म्हणता येते. त्याला काही ठोस दिशा अथवा हेतू असणे गरजेचे नाही.

याचा अर्थ हस्तक्षेपाची प्रक्रिया एकाच प्रकारे चालू राहील असे मात्र नाही. परिणामांची जाणीव जशी वाढेल तसे त्यात बदल नक्कीच होऊ शकतात.



तंत्रज्ञान नेहमीच तोट्याचे असेल तर ते वापरूच नये का? तसे मात्र नाही. तंत्रज्ञानाने आपली सुरक्षा, कष्टापासून मुक्ती व करमणूक याबाबतीत मदत केली आहे. आपल्या (शारीरिक व बुद्धीच्या) क्षमतांशी सुसंगत उपकरणे, साधने, अवजारे करण्यासाठी तंत्रज्ञान वापरायचे असते. तोटे कमी असणारे, दुसऱ्यांना भरपाई करावी न लागणारे, सामाजिक प्रश्न कमीत कमी निर्माण करणारे असे समुचित तंत्रज्ञानदेखील शक्य असते.










पावसाचे पाणी साठविणाऱ्या टाक्या

**चर्चा करा :** मोठे धरण बांधणे हे जटिल तंत्रज्ञानाचे उदाहरण आहे. पावसाचे पाणी घरगुती वापरासाठी साठवणे हे सोप्या तंत्रज्ञानाचे उदाहरण. अशी अन्य उदाहरणे मिळवा व वर्गात त्यांची चर्चा करा.

आपण बघितले की माणूस हा जाणिवेची जाणीव असणारा प्राणी आहे. म्हणजे तो स्वतःमध्ये जाणीवपूर्वक बदल करू शकतो. असे असेल तर तंत्रज्ञानाचे संभाव्य धोके ओळखून सावध होणे आणि तंत्रज्ञानाचे मूळ उद्दिष्ट ओळखून तंत्रज्ञान वापरणे हेदेखील माणूस करू शकतो. बदल होताना ते समुदायातील प्रत्येक सदस्याच्या बाबतीत एकसारखे किंवा एकदम होत नाहीत. व्यक्ती बदलू शकतात. समाजात नवे काही येण्याची, बदल होण्याची प्रक्रिया कशी घडते हा एक अतिशय महत्त्वाचा विषय आहे.

**चर्चा करा :** मृत सिंहाचा सांगाडा आणि चार विद्वान ही पंचतंत्रातील गोष्ट आठवते का? आपले ज्ञान आणि कौशल्य दाखविण्यासाठी निघालेले चार विद्वान आणि त्यांना दिसलेला एक सांगाडा अशी ती गोष्ट आहे. शहाण्याला शेवटी काय करावे लागते? इतर तिघांचे मन वळवता येते का? की स्वतःपुरते उत्तर शोधावे लागते?

तंत्रज्ञानाची गती आणि व्याप्ती यांचा वेग गेल्या शतकात कमालीचा वाढलेला असला तरी त्याचा परिणाम सुरूवातीला वेगवेगळ्या भूभागांवर वेगवेगळ्या तऱ्हेने झाला. त्यात्या भूभागाचा नैसर्गिक आणि सांस्कृतिक वारसा यांचा तंत्रज्ञानाच्या गतीवर आणि व्याप्तीवर मोठा प्रभाव होता. शीत कटिबंधीय प्रदेशात वीजआधारित नवे तंत्रज्ञान उदयाला आले आणि वेगाने फोफावले. उष्ण कटिबंधात त्याचा वेग कमी होता.

नवे तंत्रज्ञान इथे निर्माण झालेले नसल्याने सर्वसामान्य माणसांचे त्याविषयीचे आकलन, वर्तन तंत्रज्ञानाशी सुसंगत नसल्याचे आढळून येते. याचे साधे उदाहरण म्हणजे वाहनसुरक्षा आणि रहदारीचे नियम यांविषयी दिसून येणारी बेपर्वाई. शीत कटिबंधीय देशांमध्ये, वाहनविषयक तंत्रज्ञान निर्माण झाले आणि पसरले. तेथील नागरिकांमध्ये स्वयंशिस्त अधिक प्रमाणात आढळते. त्याला अपवाद असू शकतात. परंतु सर्वसामान्य निरीक्षण असे सुचविते, की नागरिक तंत्रज्ञान वापरण्याच्या गरजा जाणतात, त्याच्याशी सुसंगत व्यवहार करतात.

बेपर्वाई आणि बेजबाबदार वर्तन यांवर मात करण्यासाठी कठोर कायदे, शिक्षण आणि जाणीव जागृती यांची जोड लागते. आपणदेखील आपल्या आजूबाजूला तंत्रज्ञानविषयक बेजबाबदार वर्तन अनुभवतो. कायदा आणि शिक्षणातून यांवर नियंत्रण मिळवण्याचा प्रयासदेखील अनुभवतो.

**चला बोलूया!**

वाहनसुरक्षा, रहदारीचे नियम आणि आपला अनुभव यांची वर्गात चर्चा करा.

मागील शतकाच्या शेवटच्या टप्प्यात उदयाला आलेले माहितीतंत्रज्ञान मात्र आता सर्वत्र पसरत चालले आहे. या तंत्रज्ञानाचा झपाटा असा आहे, की आधीच्या तंत्रज्ञानाच्या आविष्कारांच्या तुलनेत अत्यंत कमी काळात त्याने जग कवेत घेतले आहे. संगणकात माहितीचे तुकडे साठवणे (डेटा किंवा विदा) आणि विविध आज्ञावलींद्वारे (अल्गोरिदम) या तुकड्यांचे सुसंगत आणि उपयुक्त माहितीत रूपांतर करणे आणि त्यांचे नियंत्रण व वहन करणे असे या तंत्रज्ञानाचे स्वरूप आहे. सुरूवातीला खोलीएवढ्या आकाराचे संगणक आता अनेकविध स्वरूपात आणि आकारांत आपल्या आजूबाजूला आहेत. संगणक म्हणजे संगणकीय कामे करू शकणारी विविध यंत्रे. आपल्या भोवती माहितीतंत्रज्ञान आधारित व्यवस्थेचे जाळे आता घट्ट होत चालले आहे. पूर्वी माणसे करत होती ती अनेक कामे आता संगणक करताना दिसतो. रोबोटिक्स आणि कृत्रिम बुद्धीमत्ता ही याच तंत्रज्ञानाची अतिप्रगत रूपे आहेत.

**चला वाचूया!**

माहिती तंत्रज्ञानाचा इतिहास मिळवून वाचा.

तत्वज्ञानाच्या दृष्टीने महत्वाचे हे की माणसावर या साऱ्याचा परिणाम कशा तऱ्हेने झाला किंवा होतो आहे?

पृथ्वीवर सजीवसृष्टी साडेतीन अब्ज वर्षे नांदते आहे. माणसाच्या प्रजातीचा इतिहास साधारण पन्नास लाख वर्षांचा आहे. गेल्या दहा हजार वर्षांत माणसाने आपल्या आजूबाजूला असलेल्या सजीवांवर नियंत्रण मिळवणे, त्यांना पाळणे, आपल्या उपयुक्ततेसाठी पोसणे याला सुरूवात केली. माणसाला हे सर्व करता आले ते त्याच्या बुद्धिमत्तेच्या जोरावर. माणसापाशी प्राण्यांच्या तुलनेत फारशी शक्ती अथवा विष, नखे अशी साधने नव्हती. तरीही तो सजीवसृष्टीवर हुकूमत मिळवू शकला याचे कारण त्याची प्रभावी बुद्धिमत्ता. असे जर असेल तर याच प्रभावी बुद्धिमत्तेच्या जोरावर संगणक माणसाचे काय करेल आणि माणसाला त्याला तोंड देण्यास समर्थ कसे करता येईल? हा प्रश्न विचारवंतांना भेडसावत आहे.




चार्ली चॅप्लीनने मॉडर्न टाइम्स चित्रपटात वापरलेली प्रतिमा. माणसे आणि मेंढ्या यांत फरक राहिलेला नाही असे त्याने सुचविले होते. तेव्हा अजून संगणक अवतरला नव्हता. आता या जमान्यात माणसांची स्थिती काय होईल? हाताला काम असेल पण ते आपल्या आवडीचे, आपल्या क्षमतांप्रमाणे असेल का असे प्रश्न या काळात पुढे येत आहेत.

माणूस सजीव असल्याने आणि विज्ञानाच्या भाषेत सजीवातील मुख्य घटक कार्बन असा असल्याने आपण त्यास 'कार्बन-जीवन' म्हणू. संगणकातील मुख्य घटक सिलिकॉन असल्याने ते झाले 'सिलिकॉन-जीवन'. माणसानेच 'सिलिकॉन-जीवन' निर्माण केले असले तरी ते बुद्धिमत्तेच्या बाबतीत माणसाच्या वरचढ आहे कारण त्याची माहिती साठवण्याची व जलद संस्करण करण्याची क्षमता व इतर अनेक बाबतीतील क्षमता म्हणजे आवाका (range), bandwidth, साठवणक्षमता (memory), गती (speed), अचूकता (accuracy), लवचिकता (flexibility) प्रचंड आहेत.

माहिती तंत्रज्ञानाचा आजवरचा प्रवास पाहता, भविष्यात मानव संपूर्णपणे या तंत्रज्ञानावर अवलंबून असेल असे चित्र दिसते. मानवी जीवनातील अधिकतम क्रियाप्रक्रिया माहिती तंत्रज्ञानाच्या माध्यमातून पार पाडल्या जातील आणि आपण यंत्रांचे दास होऊन जिवंत राहू अशी भीती व्यक्त केली जाते. या भीतीची उजळ बाजू अशी की जे होऊ घातले आहे ते ओळखून आपण स्वतःला असे होण्यापासून वाचवूदेखील शकतो.

**चला बोलूया!**

माहिती तंत्रज्ञानाने निर्माण केलेल्या समस्यांवर गटात चर्चा करा.

नव्या तंत्रज्ञानाच्या युगातला आपला अनुभव कसा असतो? आपण अशा जगात राहतो की वस्तू भरपूर आहेत, पण सगळ्यांना उपलब्ध नसतात आणि असतात त्या वापरण्यावर बंधने असतात. स्मार्टफोन आणि तत्सम उपकरणे पुष्कळ असतात परंतु त्यांतील सर्वच उपकरणे सर्वांना परवडणारी असतात असे नाही आणि जी आपल्या हातात येतात त्यापासून आपल्याला नेमके कोणते धोके आहेत हे आपल्याला फारसे ठाऊक नसते. आपण बातम्या ऐकतो, की मोबाईलमधील खेळापायी मुले अभ्यासातील लक्ष गमावतात, त्यांना खरे कोणते आणि आभासी कोणते यांतील फरक कळेनासे होतात, त्यांना खऱ्या माणसांशी बोलणे अवघड वाटते, त्या ऐवजी ऑनलाईन संपर्क ठीक वाटतो. काही मुले तर यांहून पुढे जाऊन मोबाईलवरील खेळांच्या नादात आपला जीव गमावतात. हे असे कशाने होते? यासाठी आपल्याला आपल्या आतदेखील डोकवायला हवे. आपला मेंदू, आपले शरीर कसे काम करते माहीत हवे.

**चला पाहूया!**

मोबाईल व तंत्रज्ञानाच्या दुष्परिणामांवर आधारित चित्रपट पहा व वर्गात त्यावर चर्चा करा. उदा. '२.०' हा हिंदी चित्रपट.

### जैवतंत्रज्ञान आणि आजचे काही महत्वाचे प्रश्न

आज तंत्रज्ञान या स्थितीस जाऊन पोहोचले आहे की त्याने केवळ वस्तू निर्माण करणे शक्य होते असे नाही, तर त्यायोगे सजीवांच्या शरीराच्या आतदेखील अनेक बदल करणे शक्य झाले आहे. उत्क्रांती आणि जीवशास्त्राच्या अभ्यासाने आपल्याला सजीवसृष्टी कशी निर्माण झाली आहे हे समजले, पृथ्वीवरील अनेकविध वनस्पती/प्राणी/सूक्ष्मजीव यांची ओळख करून घेता आली. त्यांची शरीरयंत्रणा कशा तऱ्हेने काम करते हे कळले. आता याचा उपयोग करून माणूस काय काय करू शकतो? सर्वांत महत्त्वाची गोष्ट अशी की तो यात बदल घडवून आणू शकतो.

जीवशास्त्रीय तत्त्वे, प्रक्रिया, प्रणाली व जीव यांचा व्यवसायांत वापर करणारे तंत्रज्ञान म्हणजे जैवतंत्रज्ञान. सजीवसृष्टीतील घटकांचा, उदा. सूक्ष्मजीव, वनस्पती, प्राणी यांचा शेती, मानवी आरोग्य, औषधोपचार इत्यादी क्षेत्रांत उपयोग करून घेणे हे जैवतंत्रज्ञानाच्या अंतर्गत येते. जैवतंत्रज्ञानाच्या प्रगतीचा वेग बघता या तंत्रज्ञानाचा वापर विवेकाने केला नाही तर भविष्यकाळात मानवजातीवर अनेक गंभीर संकटे ओढवतील अशी भीती व्यक्त केली जाते. आताच जनुकांमध्ये फेरबदल केलेल्या सजीवांची निमिर्ती, मूळ पेशींचा (स्टेम सेल्स) वैद्यकीय उपचारात वापर, पेशींचे प्रतिरूपीकरण (क्लोनिंग) वगैरे गोष्टी प्रत्यक्षात आलेल्या आहेत. या सर्वांचा प्रत्यक्ष वापर करताना उद्‌भवू शकणारे सामाजिक आणि नैतिक प्रश्न प्रचंड आहेत.

माणसांचे इतर सजीवांशी असलेले नाते, स्वजातीयांशी असलेले नाते आणि 'स्व'चे आकलन या

तीनही बाबतीत सतत फेरउजळणी करत राहणे हे काम तत्वज्ञानाचे आहे.

सजीवांबद्दल माणसाची जी नीती आणि कृती आहे तिचे विश्लेषण करणाऱ्या विद्याशाखेला जीवनीतिशास्त्र असे म्हटले जाते. वैद्यकीय नीतिशास्त्र हेदेखील याच शाखेचा एक भाग आहे. वैद्यकीय संशोधन आणि आचरण यांबाबतचा मूल्यविचार हा वैद्यकीय नीतिशास्त्राचा गाभा आहे. सध्या या क्षेत्रात प्रश्न कोणते आहेत? आयुरारोग्य, निरोगी जीवनशैली, समाजातील सर्व घटकांना प्राप्य असे औषधोपचार ही आव्हाने अजून कायम आहेत आणि दुसऱ्या बाजूला माणसाला अमरत्व आणि सदैव आनंदी असण्याचे वरदान हवे आहे. अजूनतरी ही क्षितिजे दूर दिसत असली तरी त्या दिशेने वाटचाल सुरू आहे. याचा परिणाम असा होऊ शकतो की समाजातील 'आहे रे' आणि 'नाही रे' यांच्यातील दरी वाढत जाऊ शकते. या स्थितीत उपलब्ध साधनांचा वापर नेमका कशासाठी आणि कुणासाठी केला जाणार याविषयी प्रश्नचिन्ह आहे. माहिती तंत्रज्ञान आणि जैवतंत्रज्ञान यांच्या मिलाफातून पुढील काळात आणि पुढील पिढ्यांसाठी नेमके कशा प्रकारचे जीवनमान निर्माण होणार आहे याकडे लक्ष ठेवणे गरजेचे आहे.

तत्वज्ञानाच्या अभ्यासातून अनेक विद्याशाखांचा एकत्रित विचार करता येऊ शकतो आणि त्यातून मानवी समाजाचे आणि इतर सृष्टीचे सुसंगत, व्यापक चित्र बघता येते. यासाठी तत्वज्ञानाच्या पद्धती अधिक चांगल्या प्रकारे समजून घ्यायला हव्या. त्यातूनच काळाशी सुसंगत तत्वचिंतन करणे शक्य होईल.

तंत्रज्ञानाने जीवनातील जवळजवळ सर्व क्षेत्रांवर आपली मोहोर उमटवली. अर्थकारण, समाजकारण, राजकारण तंत्रज्ञानाच्या अनुषंगाने आमूलाग्र बदलले. धर्म, साहित्य, संस्कृती, न्यायव्यवस्था, वित्तव्यवस्था, कलाप्रांत व इतर उद्योगधंदेही त्याला अपवाद नव्हते. डिजिटल युगाने क्रांती घडवून आणली. त्याबरोबर काही नवीन प्रश्न निर्माण झाले. तत्वज्ञान अशा प्रश्नांचा, समस्यांचा मागोवा घेते. त्यानुसार सामाजिक तत्वज्ञान, राजकीय तत्वज्ञान, आर्थिक तत्वज्ञान अशा तत्वज्ञानाच्या वेगवेगळ्या शाखा विकसित होतात.

## शब्दसूची

अविनाशित्वाचा नियम - Law of Conservation
पुनर्नविकरण - Recycling
आयाम - Dimensions
सेवा - Services
उत्क्रांती - Evolution
स्वयंशिस्त - Self discipline

## स्वाध्याय

**प्रश्न १ कंसातील योग्य पर्याय निवडून पुढील विधाने पूर्ण लिहा.**

(१) सर्व सृष्टी केवळ आपल्या उपभोगासाठी आहे असे मानणे हा ...... विचार आहे.
(जीवकेंद्री, मनुष्यकेंद्री, निसर्गकेंद्री)

(२) ...... हा वैज्ञानिक ज्ञानाचा गुणधर्म आहे.
(वस्तुनिष्ठता, व्यक्तिनिष्ठता, आंतरव्यक्तिनिष्ठता)

**प्रश्न २ पुढील विधाने सत्य की असत्य हे सकारण सांगा.**

(१) मानवप्राण्याकडे जाणिवेची जाणीव असते.

(२) इतर जिवांमध्ये माणसांप्रमाणेच चैतन्य आहे हा मानवकेंद्री विचार आहे.

(३) पुनर्नविकरणातदेखील कचरा तयार होतो.

(४) तंत्रज्ञानातील गुंतागुंत वाढली की परिणामांची अनिश्चितता वाढते.

**प्रश्न ३ टीपा लिहा.**

(१) माणूस आणि निसर्ग

(२) लायसेंकोचा प्रयोग

(३) तंत्रज्ञानाने मानवी समाजरचनेत झालेले बदल

(४) माहिती तंत्रज्ञानाचे धोके.

**प्रश्न ४** तंत्रज्ञानात्मक विकासाने मानवी समाजावर कोणते परिणाम झाले हे विस्तारपूर्वक स्पष्ट करा.

**प्रश्न ५** वस्तू आणि सेवानिर्मितीची प्रक्रिया व त्या प्रक्रियेचे परिणाम स्पष्ट करा.

**प्रश्न ६ पुढील प्रसंगावर संवाद लिहा.**

चांगले जीवन जगण्यासाठी तंत्रज्ञानाचे होणारे फायदे व त्यांतील धोके सांगणारा संवाद लिहा.

**उपक्रम**

तुमच्या भागातील उत्पादन केंद्राला (कारखाना, कुटीर उद्योग इ.) भेट द्या. तेथील निर्मितीप्रक्रिया आणि त्या प्रक्रियेचे पर्यावरणावरील परिणाम समजून घ्या.

# नोंदी

# इयत्ता ९ ली ते १२ वी ई-लर्निंग साहित्य

## मराठी, इंग्रजी माध्यमांमध्ये उपलब्ध

ebalbharati

**वैशिष्ट्ये**

- विषय योजनेनुसार निर्धारित करण्यात आलेल्या विषयांचा समावेश.
- पाठ्यपुस्तकावर आधारित परिपूर्ण ई-लर्निंग साहित्य.
- दृक-श्राव्य स्वरूपात.
- पाठनिहाय आशयाचे सादरीकरण व आवश्यकतेनुसार प्रश्नांचा समावेश.
- विविध कृती, चित्रे, आकृत्या इत्यादींचा समावेश.
- सहज व सोप्या अध्ययनासाठी ॲनिमेशनचा वापर.
- स्वाध्यायांचा समावेश.

पाठ्यपुस्तक मंडळ, बालभारती मार्फत इयत्ता १ ली ते १२ वी च्या मराठी व इंग्रजी माध्यमाच्या विद्यार्थ्यांसाठी ई-लर्निंग साहित्य (Audio-Visual) उपलब्ध करून देण्यात येत आहे.

ई-लर्निंग साहित्य घेण्यासाठी....

- वरील Q.R.Code स्कॅन करून ई-लर्निंग साहित्य मागणीसाठी नोंदणी करा.
- Google play store वरून ebalbharati app डाऊनलोड करून ई लर्निंग साहित्यासाठी मागणी नोंदवा.
- पाठ्यपुस्तक मंडळाच्या www.ebalbharati.in, www.balbharati.in या संकेतस्थळांवर भेट द्या.

कलेचे तत्त्वज्ञान म्हणजे काय ?

तंत्रज्ञान आपल्याला कुठवर नेणार?

विचार आणि भावना यांचा संबंध काय ?

कारण म्हणजे काय ?

मी कोण ?

विश्व काय आहे, कसे आहे?

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ,
पुणे–४११००४.

मराठी तत्त्वज्ञान इयत्ता बारावी ₹ 68.00